# INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISIPLINARY STUDIES

MONTHLY DOUBLE-BLIND PEER REVIEWED REFERRED OPEN ACCESS INTERNATIONAL JOURNAL

www.irjms.in

E-mail : irjms2015@gmail.com irjms.in@gmail.com

Volume IX, Special Issue 11 Part -III ISSN : 2454-8499 NOVEMBER 2023


पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे,

## वाघीरे कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

सासवड, ता. पुरंदर, जि. पुणे

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## ४६ वे राष्ट्रीय अधिवेशन

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

दि. २५, २६ व २७ नोव्हेंबर २०२३


**विशेष संपादक**

प्राचार्य डॉ. पंडित शेळके

डॉ. दत्तात्रय संकपाळ डॉ. विशाल पावसे



Executive Editor
Prof. Tanaji Jadhav

IRJMS

Chief Editor
Dr. Mahendra Avaghade

# International Research Journal of Multidisciplinary Studies

Chief Editor
Dr. Mahendra R. Avaghade

Executive Editor
Prof. Tanaji D. Jadhav

Published by
**IJRMS**
Sr. No. 397, Flat No. 7, 4 Sizan Society,
Bhugaon, Tal. Mulshi, Dist. Pune 412115

**Printed by**
Harshada Printers, Pune


Copyrights: Editors @2023
All Rights reserved

ISSN: 2454-8499

Issue
Available at www.irjms.in

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे,

## वाघीरे कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

**सासवड,** ता. पुरंदर, जि. पुणे

# मराठी अर्थशास्त्र परिषद

### ४६ वे राष्ट्रीय अधिवेशन नोव्हेंबर २०२३

दि. २५, २६ व २७ नोव्हेंबर २०२३

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

## माजी अध्यक्ष मराठी अर्थशास्त्र परिषद

पहिले (१९७७-७८)



डॉ. नी.वि. सोवनी

दुसरे (१९७८-७९)



डॉ. वि.म. दांडेकर

तिसरे(१९७९-८०)



डॉ.श्री.आ. देशपांडे

चवथे (१९८०-८१)



डॉ. वि.वि. बोरकर

पाचवे (१९८१-८२)



डॉ. या.शि. महाजन

सहावे (१९८२-८३)



डॉ. आनंद नाडकर्णी

सातवे (१९८३-८४)



डॉ. स.ह. देशपांडे

आठवे (१९८४-८५)



डॉ. वि. बा. घुगे

नववे (१९८५-८६)



डॉ. ह.कृ. परांजपे

दहावे (१९८६-८७)



डॉ. रविन्द्र सबनीस

अकरावे (१९८७-८८)



डॉ. गि.सो. कल्याणकर

बारावे (१९८८-८९)



डॉ. नलिनी पंडित

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे,

## वाघीरे कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

**सासवड,** ता. पुरंदर, जि. पुणे

# मराठी अर्थशास्त्र परिषद

### ४६ वे राष्ट्रीय अधिवेशन नोव्हेंबर २०२३

दि. २५, २६ व २७ नोव्हेंबर २०२३

## माजी अध्यक्ष मराठी अर्थशास्त्र परिषद

तेरावे (१९८९-९०)



डॉ. रवीन्द्र दोशी

चौदावे (१९९०-९१)



डॉ. श्रीनिवास खांदेवाले

पंधरावे (१९९१-९२)



डॉ. ज.फा. पाटील

सोळावे (१९९२-९३)



डॉ. शशिकांत गंधे

सतरावे (१९९३-९४)



डॉ. व्यं.सु. पाटणकर

अठरावे (१९९४-९५)



डॉ. के. जी. पठाण

एकोणवीसावे (१९९५-९६)



डॉ. शि.ना. माने

विसावे (१९९६-९७)



डॉ. भ.ग. बापट

एकविसावे (१९९७-९८)



डॉ. दि. व्यं. जहागीरदार

बाविसावे (१९९८-९९)



डॉ. र. पु. कुरूलकर

तेविसावे (१९९९-२०००)



डॉ. सु.दा. तुपे

चौविसावे (२०००-०१)



डॉ. भालचंद्र मुणगेकर

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे,

# वाघीरे कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

**सासवड,** ता. पुरंदर, जि. पुणे

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## ४६ वे राष्ट्रीय अधिवेशन नोव्हेंबर २०२३

दि. २५, २६ व २७ नोव्हेंबर २०२३

## माजी अध्यक्ष मराठी अर्थशास्त्र परिषद

पंचविसावे (२००१-०२)



डॉ. अ.रा. पडोशी

सव्विसावे (२००२-०३)



डॉ. संतोष दास्ताने

सत्ताविसावे (२००३-०४)



डॉ. सुर्यकांत जगदाळे

अठ्ठाविसावे (२००४-०५)



डॉ. मधुकर शिंदे

एकोणतिसावे (२००५-०६)



डॉ. सर्जेराव ठोंबरे

तिसावे (२००६-०७)



डॉ. दिलीप कदम

एकतिसावे(२००७-०८)



डॉ. पी.बी. कुलकर्णी

बत्तिसावे (२००८-०९)



डॉ. व्ही.बी. भिसे

तेहतिसावे (२००९-१०)



डॉ. विनायक देशपांडे

चौतीसावे (२०१०-११)



डॉ. मुक्ता जहागीरदार

पस्तिसावे (२०११-१२)



डॉ. आ.गो. पुजारी

छत्तिसावे (२०१२-१३)



डॉ. के. के. पाटील

सदतिसावे (२०१३-१४)



डॉ. जगन्नाथ पाटील

अडतिसावे (२०१४-१५)



डॉ. श्रीराम द. जोशी

एकोणचाळीसावे (२०१५-१६)



डॉ. सुहास आव्हाड

चाळीसावे (२०१६-१७)



डॉ. शिवाजीराव भोसले

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे,

# वाघीरे कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

**सासवड,** ता. पुरंदर, जि. पुणे

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## ४६ वे राष्ट्रीय अधिवेशन नोव्हेंबर २०२३

दि. २५, २६ व २७ नोव्हेंबर २०२३

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

## माजी अध्यक्ष मराठी अर्थशास्त्र परिषद

एक्केचाळसावे (२०१७-१८)



डॉ. रामचंद्र रसाळ

बेचाळीसावे (२०१८-१९)



प्रा.चारूदत्त गोखले

त्रेचाळीसावे (२०१९-२०)



डॉ. रामदास माहोरे

चव्वेचाळीसावे (२०२०-२१)



डॉ.अनिल सुर्यवंशी

पंचेचाळीसावे (२०२१-२२)



डॉ. रामदास भांडवलकर

सेहेचाळीसावे(२०२२-२३)



डॉ.दिलीप अर्जुने

**INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES**

***SPECIAL ISSUE ON MARATHI AARTHSHASHTRA PARISHED Nov. 2023***

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

# INDEX



| SR. NO | TITLE | PAGE NO. |
|---|---|---|
| 1 | **प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा शेतकऱ्यावर झालेला परिणाम**<br>**डॉ. सदाशिव राजाराम बनकर** | 1 |
| 2 | **ॲडम स्मिथ, मार्क्स, जेकब मिन्सर यांचा मानवी भांडवलाचे सिद्धांत**<br>**डॉ. विठ्ठल मा. घिनमिने** | 6 |
| 3 | **पायाभूत सुविधांमधील रस्ते वाहतूकीची सद्यस्थिती**<br>**स्वाती विजय पाटील, डॉ .एन.जी.सूर्यवंशी** | 12 |
| 4 | महाराष्ट्रातील वाहतूक व्यवस्थेचे अर्थशास्त्र<br>**डॉ. राजेश्री अप्पाराव जाधव** | 19 |
| 5 | **कृषी विकास योजनांचा अभ्यास**<br>**डॉ.सत्यम काकासाहेब सानप, महेश रामराव भोसले** | 27 |
| 6 | **केंद्र सरकारच्या विकास योजना आणि भारतीय शेती**<br>**प्रा. डॉ.खोकले आर.के** | 34 |
| 7 | **भारतातील मानवी भांडवल निर्मितीतील अडथळे**<br>**प्रा. डॉ. जे एस इंगळे** | 42 |
| 8 | **महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत ग्रामीण रस्त्यांचे महत्व**<br>**प्रा. डॉ. विष्णु व पवार** | 49 |
| 9 | **मानव संसाधन विकास मंत्रालयाची मानवी भांडवलातील भूमिका**<br>**डॉ.जयश्री पंढरीनाथ जाधव** | 54 |
| 10 | **मानवी भांडवलाचे सैध्दांतिक विश्लेषण**<br>**प्रा.डॉ. संजय पांडुरंग पाटील** | 62 |
| 11 | **येत्तदेषीय वृद्धी सिद्धांत: व्याख्या, इतिहास आणि टीका**<br>**सूर्यकांत पांडूरंग गायकवाड,प्रा.डॉ.अजय देरेकर** | 67 |
| 12 | **शासन पुरस्कृत प्रमुख कृषी योजना: एक दृष्टीक्षेप**<br>**सूर्यकांत पांडूरंग गायकवाड , प्रा.डॉ.अजय देरेकर** | 72 |
| 13 | **महाराष्ट्रातील रस्ते वाहतूक क्षेत्रातील प्रादेशिक विषमता**<br>**प्रा. अमोल अरुण पगार** | 81 |

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
*SPECIAL ISSUE ON MARATHI AARTHSHASHTRA PARISHED Nov. 2023*

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)


| SR. NO | TITLE | PAGE NO. |
|---|---|---|
| 14 | महिलांचा आर्थिक विकास आणि मानवी भांडवल<br>ज्योती प्रविणचंद्र पाटील | 86 |
| **15** | पायाभूत सुविधांमधील रस्ते वाहतूकीची सद्यस्थिती<br>स्वाती विजय पाटील, डॉ .एन.जी.सूर्यवंशी | 91 |
| 16 | जळगांव तालुक्यातील शेतकऱ्यांच्या सामाजिक,आर्थिक स्थितीवर कृषी शासकीय योजनाच्या परिणामांचा अभ्यास.<br>प्रा.डॉ. मनोजकुमार राम गायकवाड, श्री.निलेश रविंद्र कोळी | 97 |
| 17 | "भारतामधील मानवी भांडवलातील कंत्राटी कामगार: आव्हान आणि उपाय"<br>डॉ. बी. एस. पाटील, डॉ. के. बी. ढोरे | 112 |
| 18 | केंद्रीय ग्रामीण विकास योजना आणि रोजगार व आर्थिक स्वावलंबनाचे साधन<br>प्रा. डॉ. सुदाम वसंतराव पवार | 121 |
| 19 | भारतीय शेती आणि केंद्र पुरस्कृत विकास योजना<br>प्रा.डॉ.अनिल दि.वाडकर | 127 |
| 20 | सामाजिक चिंतेच्या श्रेणीत – वंचित घटक<br>डॉ. अनिता एस.फापाळे | 135 |
| 21 | केंद्र पुरस्कृत विकास योजना आणि भारतीय शेती<br>प्रा. राजेंद्रकुमार रामराव गव्हाळे, उज्वला रामचंद्र महाजन | 143 |
| 22 | केंद्र सरकारच्या प्रमुख कृषी विकास योजना आणि भारतीय शेती व शेतकरी<br>डॉ प्रशांत एन. देशमुख | 149 |
| 23 | मानवी भांडवलाच्या विकासात श्रमिकाचे योगदान: सैद्धांतिक विश्लेषण<br>प्रा.डॉ .रमेश तुकाराम काशिदे, प्रा.समीर महादेव कुंभारकर | 158 |
| 24 | भारत सरकारच्या कृषी क्षेत्र विकासासाठी अंमलात आणलेल्या शीतगृह साखळी विकास धोरणांची चिकित्सा<br>डॉ. कारभारी भालचंद्र काशिनाथ | 162 |
| 25 | संस्थात्मक कामगिरीवर मानवी भांडवल व्यवस्थापनाचा प्रभाव<br>रुपाली प्रकाश शेंडकर, स्वाती बाबुराव शिंदे | 178 |
| 26 | केंद्र पुरस्कृत कृषी विकास योजना आणि भारतातील शाश्वत शेती : एक अभ्यास<br>राम गोविंद दळवे | 187 |
| 27 | महाराष्ट्रातील रस्ते वाहतूक व्यवस्थेचे अर्थशास्त्र आणि वास्तविकता<br>गणेश बापूराव गावंडे | 194 |

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
*SPECIAL ISSUE ON MARATHI AARTHSHASHTRA PARISHED Nov. 2023*

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

# प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा शेतकऱ्यावर झालेला परिणाम

**डॉ. सदाशिव राजाराम बनकर**
सहाय्यक प्राध्यापक,अर्थशास्त्र विभाग
श्रीपतराव कदम महाविद्यालय शिरवळ
मोबाईल – ९७५२३५३७११, ई मेल – sadashivbankar@gmail.com

प्रस्तावना- *भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये कृषी क्षेत्राचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. भारत एक कृषिप्रधान देश आहे. भारतातील राष्ट्रीय उत्पन्नाचा पाया शेती आहे या बाबीचा विचार करून भारत सरकारने शेतकऱ्याना आर्थिक मदत पोचवण्यासाठी प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेची सुरवात केली. या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्याचे जीवनमान उंचावणे व त्यांना आत्मनिर्भर बनवणे तसेच त्यांना सशक्त करणे हे या योजनेचे मुख्य उद्दिष्ट आहे. एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या सर्वसाधारणपणे ३७ टक्के उत्पन्न कृषी क्षेत्रातून मिळते. देशातील एकूण लोकसंख्येपैकी ६८ टक्के लोकसंख्या कृषी क्षेत्रात कार्यरत आहे. भारतासारख्या शेतीप्रधान अर्थव्यवस्थेत राष्ट्रीय उत्पन्नाचे प्रमूख साधन, रोजगार निर्मितीचे प्रमुख स्त्रोत ,औद्योगिक विकास तसेच व्यापाराचे साधन म्हणूनही शेती क्षेत्राकडे पाहिले जाते. परंतु भारतीय कृषी क्षेत्रात अनिश्चित स्वरूपाचा पाऊस ,महापूर, जमिनीची धूप , जंगलतोड, क्षारयुक्त जमिनी , पिकांवरील किड व रोग इत्यादी नैसर्गिक समस्या आहेत. त्यामुळे शेतीपासून मिळणारे उत्पन्न अल्प प्रमाणात आहे . तसेच भारतातील वारसा हक्काने शेती क्षेत्राचे तुकडीकरण होत आहे . त्यामुळे शेती क्षेत्रात वापरायच्या आधुनिक यंत्रसामग्रीच्या वापरावर मर्यादा येत आहेत. शेती व्यवसायाचा पाया मजबूत करण्यासाठी केंद्र सरकार शेतीविषयक वेगवेगळ्या योजना राबवत असते. त्यातील ही एक प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना आहे. ही योजना १ डिसेंबर २०१८ पासून सुरु झाली आहे. सुरवातीला कमी शेतजमीन ( २ हेक्टर पर्यंत ) असणाऱ्या शेतकऱ्याचे उत्पन्न वाढवण्यासाठी केंद्र सरकारने ही योजना सुरु केली होती . त्यामुळे याचा लाभ कमी शेतकरी घेत होते नंतरच्या काळात या योजनेत बदल करून सरकारने सरसकट सर्व शेतकऱ्याना या योजनेचा लाभ देण्याचे आदेश देण्यात आले असले तरी घटनात्मक पदावरील व्यक्ती ( राष्ट्रपती ,उपराष्ट्रपती , सरन्यायाधीश ) आजी माजी लोकप्रतिनिधी ( आमदार, खासदार, महापौर ) सरकारी कर्मचारी ,करदाते यांना या योजनेचा लाभ घेता येत नाही. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेत केंद्र सरकारने निकष शिथिल केल्यामुळे लाभार्थी शेतकरी कुंटूबाच्या संख्येत वाढ झाली आहे. महाराष्ट्र राज्यात या योजनेचा लाभ सव्वा कोटी शेतकरी घेत आहेत. या योजनेद्वारे शेती असणाऱ्या कुंटूबाला दर चार महिन्याने दोन हजार म्हणजे वार्षिक सहा हजार रुपये अर्थसाह्य दिले जाते. सरकारच्या अंमलबजावणीमुळे शेती व्यवसायावर परिणाम झालेला आहे . प्रस्तुत शोधनिबंधात सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यामध्ये या योजनेचा काय परिणाम झाला . याची अभ्यास मांडणी केली आहे.*

उद्दिष्टे – १ प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेचे निकष यांचा अभ्यास करणे. २ प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा शेतकऱ्यावर झालेला परिणाम याचा अभ्यास करणे .

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

संशोधन पद्धती – सदर शोधनिबंध तयार करत असताना प्राथमिक व दुय्यम साधनसामुग्रीचा वापर केला आहे . प्राथमिक सामग्रीमध्ये शेतकऱ्याच्या मुलाखती घेतल्या आहेत. द्वितीयक सामग्रीमध्ये इंटरनेट, गॅझेटीयर ,पुस्तके , विश्वकोश, विकिपीडिया याचा वापर केला आहे.

अभ्यास क्षेत्र –खंडाळा हे महाराष्ट्राच्या सातारा जिल्ह्यातील एक गाव आहे. तसेच तालुक्याचे ठिकाण आहे. नीरा नदी या भागातून वाहते. हे ठिकाण सातारा जिल्ह्याच्या उत्तर दिशेला आहे. या खंडाळा तालुक्यात ६६ खेडी गावे आहेत. यातील खंडाळा , शिरवळ व लोणंद ही मोठी गावे आहेत. खंडाळा व लोणंद या दोन ठिकाणी स्वतंत्र नगरपंचायती आहेत. शिरवळ या गावामध्ये दोन टप्प्यात महाराष्ट्र ओदयेगिक विकास महामंडळ वसलेले आहे. याचबरोबर खंडाळा ओद्योगिक वसाहत ही केसुर्डी या गावच्या हद्दीत वसलेली आहे. खंडाळा तालुक्याचे वाई तालुक्यातून प्रशासकीय कारणासाठी विभाजन करण्यात आले आहे. त्यामुळे खंडाळा व महाबळेश्वर हे तालुके नव्याने आस्तित्वात आले आहेत. खंडाळा तालुक्याचे हवामान थंड व आल्हाददायक आहे. जून ते सप्टेंबर या कालावधीत नेऋत्य मोसमी वाऱ्यापासून वर्षातील सर्वाधिक पाऊस पडतो. येथे ऑक्टोबर ते मार्च हा हिवाळा ऋतू असतो. जून ते सप्टेंबर हा पावसाळा ऋतू असतो तर एप्रिल ते जून हा उन्हाळा ऋतू असतो.

खंडाळा तालुक्याचे क्षेत्रफळ ५२३.७२ चौ.कि.मी. आहे. सन २०११च्या जणगणनेनुसार खंडाळा तालुक्याची लोकसंख्या १,३७,४१८ इतकी आहे. यामध्ये पुरुष लोकसंख्या ७०५६५ आणि स्त्री लोकसंख्या ही ६६८५३ इतकी आहे. खंडाळा तालुक्यामध्ये लिंग गुणोत्तराचे प्रमाण हे ९४७ इतके आहे. म्हणजेच हे महाराष्ट्राच्या लिंग गुणोत्तराच्या तुलनेत सकारात्मक आहे. कारण महाराष्ट्राचे लिंग गुणोत्तराचे प्रमाण हे ९२९ इतके आहे. खंडाळा तालुक्यात साक्षरता दर हा ७६.०८% आहे. त्यामध्ये पुरुष साक्षरता दर हा ८०.९७% तर स्त्री साक्षरता दर हा ७०.९१% आहे. खंडाळा तालुक्याची लोकसंख्या घनता २६३ दर चौ.कि.मी. आहे. खंडाळा तालुक्यात लोणंद व शिरवळ येथे कातडी कमावण्याचे काम चालते.

**प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचे निकष** – कमी शेतजमीन असणाऱ्या शेतकऱ्याचे उत्पन्न वाढवण्यासाठी केंद्र सरकारने सुरु केलेली प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना महाराष्ट्र राज्यात ०१/१२/२०१८ पासून राबवण्यास प्रारंभ झाला. दोन हेक्टर पर्यंत शेतजमीन असणाऱ्या प्रत्येक कुंटूबाला दर चार महीन्याने २००० रुपये म्हणजेच वार्षिक ६००० रुपये अर्थसाह्य दिले जाते. म्हणजेच दर महिन्याला शेतकऱ्याची किमंत केंद्र सरकारने ५०० रुपये एवढी अल्प प्रमाणात केली आहे. शिवाय दोन हेक्टर क्षेत्राची मर्यादा घातली होती. ही मर्यादा काढून टाकण्यात आली आहे .या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्याला किसान सन्मान निधी योजनेच्या अंतर्गत नोंदणी करावी लागेल.त्यानंतर लाभार्थी यादीत नाव समाविष्ट केले जाईल.अनेक शेतकरी नोंदणी करताना अनेक चुका करतात त्यामुळे त्याचा हप्ता येत नाही त्याचे बँक खाते क्रमांक ,नाव ,पत्ता ,फोन नंबर यापैकी काहीतरी चुकलेले असते.

या योजनेमध्ये पुढे केंद्र सरकारने बदल केला आणि सरसकट सर्वच शेतकऱ्याना या योजनेचा लाभ देण्याचे आदेश देण्यात आले. त्यामुळे लाभार्थी संख्येत वाढ झाली आहे. ही योजना सर्वांना लागू आहे असा चुकीचा समज झाला आणि

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

काही अपात्र शेतकरी या योजनेमधून वगळण्यात आले कारण असे लाभार्थी आयकर भरणारे होते. अपात्र शेतकऱ्याकडून सरकारने दिलेली रक्कम परत घेणार आहे. कारण या योजनेचे जे निकष होते त्या निकषात असे लाभार्थी पात्र झालेले नव्हते. अपात्र ठरण्यासाठी सरकारने पुढील निकष ठरवले आहेत. जमीन धारण करणारी संस्था , संवेधानिक पद धारण केलेली आजी माजी व्यक्ती , आजी माजी सर्व मंत्री , आजी माजी आमदार खासदार , आजी माजी महापौर जि.प.अध्यक्ष ,आयकर भरणारी व्यक्ती , निवृत्ती वेतन १००० रुपयेपेक्षा जास्त घेणारी व्यक्ती, नोंदणीकृत डॉक्टर वकील अभियंता, इत्यादी. पीएम किसान सन्मान निधी योजनेत राज्य सरकार ज्या शेतकऱ्याना अर्थसाह्याची गरज आहे. त्याची पात्रता निश्चित करत असते. या योजनेनुसार पती आणि पत्नी दोघेही या योजनेचा लाभ घेऊ शकत नाहीत. जर लाभ घेतला असेल तर सरकार त्याच्याकडून वसुली करेल. या योजनेचा लाभ भारतात राहणाऱ्या कोणत्याही राज्यातील शेतकऱ्याना घेता येतो. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा शेतकऱ्यावर झालेला परिणाम – खंडाळा तालुका हा शेतीप्रधान आहे या तालुक्यामध्ये खरीप व रब्बी अशा दोन्ही हंगामातील पिके घेतली जातात. बाजरी,तांदूळ,भुईमुग व घेवडा ही खरीप हंगामात पिके घेतली जातात.त्याचबरोबर रब्बी हंगामात गहू ,हरभरा व ज्वारीचे पीक घेतले जाते. खंडाळा तालुक्यात कमी पावसाच्या प्रदेशात बाजरीचे पीक घेतले जाते.त्याचप्रमाणे भुईमुग हरभरा व कांद्याचे पीकही येथे घेतात. तसेच या तालुक्यात पाडेगाव येथे ऊस संशोधन केंद्र (स्थापना १९३२) आहे. खंडाळा तालुक्यात कांद्याचे उत्पादन जास्त प्रमाणात घेतात. येथील लोणंदचा कांदा प्रसिद्ध आहे .

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा परिणाम हा खंडाळा तालुक्यातील शेतकऱ्यावर झालेला आहे . देशातील शेतकऱ्याची आर्थिक परस्थिती चांगली नाही. त्यामुळे केंद्र सरकार शेतकऱ्याच्या प्रगतीसाठी अनेक योजना सुरु करते. अशीच एक प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना आहे. देशातील अनेक शेतकऱ्याना या योजनेचा लाभ मिळतो. शेतकरी हा या योजनेच्या पैशाचा वापर उदरनिर्वाहासाठी जास्त करू लागला आहे . कारण हा पैसा म्हणजे पेन्शन योजना आहे असे शेतकऱ्याना वाटू लागले आहे. याचाच परिणाम या निधीतून कौटुंबिक खर्च वाढला आहे . या निधीचा वापर शेतीची मशागत खर्च , बी बियाणे व कीटकनाशक यावरील खर्च वाढला पाहिजे परंतु यावरील खर्च कमी प्रमाणात करू लागला आहे. शेतकरी हा कमी उत्पन्न असलेला घटक आहे. त्यामुळे त्याचे बँकेत खाते नसते परंतु या योजनेचा लाभ घेण्यासाठी अगोदर बँकेत खाते असावे लागते कारण सरकार प्रत्यक्ष शेतकऱ्याच्या खातेवर रक्कम जमा करते. त्यामुळे बँकेतील खातेदाराची संख्या वाढली आहे. त्याचप्रमाणे या योजनेचा लाभ घेण्यासाठी मोबाईल क्रमांक देणे बंधनकारक केले आहे त्यामुळे मोबाईल धारकाची संख्या वाढली आहे.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या धरतीवर महाराष्ट्र सरकारने नमो किसान महा सन्मान निधी योजना सुरु केली आहे. या योजनेंतर्गत शेतकऱ्याना वार्षिक ६००० रुपये अतिरिक्त देण्यास सागितले आहे. या अंतर्गत प्रत्येक हप्त्यात २००० रुपये देखील दिले जातील.याचा अर्थ शेतकऱ्याना पीएम किसान सन्मान निधी योजनेतून ६००० व महाराष्ट्र सरकारकडून ६००० असे १२००० रुपये मिळणार आहेत. ही योजना फक्त महाराष्ट्र राज्यापुरती मर्यादित आहे.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

शिफारशी–१ सर्व शेतकऱ्यांनी उत्पनाचे इतर मार्ग शोधले पाहिजेत.

२ केंद्र सरकारने या योजनेची रक्कम महागाईच्या प्रमाणात वाढवली पाहिजे.

निष्कर्ष - शेतकरी यांची आर्थिक परस्थिती कमकुवत झाली होती . शेतकऱ्याना आर्थिक परस्थितीत सुधारणा करण्यासाठी प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा उपयोग होऊ लागलेला आहे. या योजनेची रक्कम सरकारने वाढवणे गरजेचे आहे.

**संदर्भ साधने -**

*१ मराठी विश्वकोश, सातारा जिल्हा ,वसंत चौधरी .*
*२ सातारा जिल्हा , गॅझेटीयर, महाराष्ट्र शासन २०१२ .*
*३ सातारा जिल्हा ,कृषी विभाग , महाराष्ट्र शासन .*
*४ विकिपीडिया , मुक्त ज्ञानकोश .*
*५सकाळ,८एप्रिल२०२०*
*६www.krushi.sanman nidhi.Govt.of India.*

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
*SPECIAL ISSUE ON MARATHI AARTHSHASHTRA PARISHED Nov. 2023*

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

# ॲडम स्मिथ, मार्क्स, जेकब मिन्सर यांचा मानवी भांडवलाचे सिद्धांत

**डॉ. विठ्ठल मा. घिनमिने**
सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख
श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय, वडनेर ता.हिंगनघाट जिल्हा. वर्धा
आजीव सभासद क्रमांक -१५१९
मो.नं. – ९६८९६४२४४९, Email- vghinmine1980 @ gmail.com

**गोषवारा :**

*सध्याच्या काळात विकसित देशांची अर्थव्यवस्था तंत्रज्ञानात्मक बनली आहे. म्हणूनच गेल्या शतकाच्या उत्तरार्धात आणि वर्तमान शतकाच्या सुरूवातीस सामाजिक-आर्थिक विकास ही मानवी घटकाची भूमिकेत उत्तरोत्तर वाढ होत आहे. अशा परिस्थितीत एखाद्या व्यक्तीला, जो मुख्य उत्पादक शक्ती आहे त्याला उत्पादन आणि ज्ञानाच्या साधनांसह सशस्त्र असणे आवश्यक आहे. अर्थात पुरेसे शिक्षित असणे आवश्यक आहे. माहिती समर्थन ही संप्रेषणाची एक ज्ञात पद्धत आहे आणि एखाद्या व्यक्तीला उत्तेजक कामगार क्रियांच्या अंमलबजावणीत मदत करत असते. म्हणूनच आधुनिक अर्थव्यवस्थेत मानवी संसाधने स्पर्धात्मक फायदे मिळविण्यात आणि आर्थिक विकासाचे उच्च-गुणवत्तेचे मापदंड सुनिश्चित करण्यात निर्णायक भूमिका निभावतात.या नवीन तयार झालेल्या आर्थिक परिस्थितीत बौद्धिक घटकाचा विकास अधिक प्रभावी आहे.*

*मानवी भांडवलाच्या संकल्पनेचा मोठा फायदा म्हणजे विविध संघटित क्रियाकलापांचे विश्लेषण करणे जे मानवी क्षमता वाढवतात. ज्यामुळे वास्तविक उत्पन्नाची शक्यता वाढते. लोक उत्पादक आणि ग्राहक दोन्ही क्षमता प्राप्त करतात. यातील अनेक क्षमता हे स्पष्टपणे गुंतवणुकीचे उत्पादन आहे. आर्थिक वाढ, वेतन आणि पगाराच्या पद्धतीतील बदल आणि उत्पन्नाच्या वैयक्तिक वितरणाविषयी महत्त्वाचे अनिश्चित प्रश्न आहेत, जे मानवी भांडवलाची गुंतवणूक लक्षात घेतल्यावर सोडवता येतील. श्रमशक्तीचे मोजमाप करण्याच्या पद्धतीमध्ये आणि शिक्षण आणि वैद्यकीय सेवेसाठी सार्वजनिक खर्चाच्या उपचारांमध्ये देखील पक्षपाती आहेत जे मानवी भांडवलाच्या संकल्पनेचा वापर करून दुरुस्त केले जाऊ शकतात. ॲडम स्मिथ हे पहिले अर्थशास्त्रज्ञ होते. ज्यांनी वेतन भिन्नता आणि त्यांच्या अस्तित्वाची कारणे शोधण्याचा प्रयत्न केला. स्मिथच्या मध्ये मजुरीच्या भिन्नतेचे एक कारण म्हणजेच मजुरीच्या अयोग्य ते सह मजुरीची सकारात्मकता बदलते. तर कार्ल मार्क्स यांनी "श्रमशक्ती" असे संबोधून मानवी भांडवलाची कल्पना सुचवली आणि असे प्रतिपादन केले की भांडवलशाही व्यवस्थांमध्ये लोक उत्पन्नाच्या बदल्यात त्यांची श्रमशक्ती अर्थांत मानवी भांडवल विकतात. मिन्सर यांनी पहिले प्रतिमान मांडले यात कोणत्याही प्रशिक्षणापूर्वी व्यक्तींना एकसारखे गृहीत धरले जातात ज्यामुळे अपेक्षित प्रशिक्षण कालावधीच्या आधारावर रोजगारासाठी विभेदक वेतनावर कार्य करण्यासाठी भाग पाडले*

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
*SPECIAL ISSUE ON MARATHI AARTHSHASHTRA PARISHED Nov. 2023*

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

*जातात. भविष्यातील निव्वळ कमाई प्रवाहाच्या वर्तमान मूल्यांचे विविध स्तरावर गुंतवणुकीशी समीकरण करून भरपाई देणाऱ्या भिन्नतेचा आकार निर्धारित केला जातो.*

**प्रस्तावना :**

मानवी संसाधनाचे आर्थिक विकासातील महत्त्व विविध अर्थशास्त्रज्ञांनी अनेक दशकांपासून विशद केलेले आहे. ॲडम स्मिथ यांनी आपल्या 'An Enquiry the Nature and Causes of Wealth of Nations या ग्रंथात शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट केले आहे. त्यांनी मनुष्याद्वारा संपादित कौशल्याचा स्थिर भांडवलामध्ये समावेश केला होता. त्यांच्या मते मानवी भांडवल ही अशी संकल्पना आहेत की जी अर्थशास्त्रज्ञाने उत्पादन प्रक्रियेत उपयुक्त मानलेली आहेत यामध्ये कर्मचाऱ्यांचे ज्ञान, कौशल्य, चांगले आरोग्य आणि शिक्षण यांचा समावेश होतो. मानवी भांडवलाचा व्यक्तीच्या व्यक्तिगत मिळकतीवर मोठा प्रभाव पडत असतो. मानवी भांडवलामुळे व्यक्तींना तरुण वयात उच्च आर्थिक परतावा प्राप्त होत असतो. मानवी भांडवलामुळे शिक्षण आणि प्रशिक्षणाद्वारे व्यक्तीचे अंतर्गत गुणवत्ता आणि उत्पादनाची सुधारित पातळी सक्षम होत असते.म्हणूनच ॲडम स्मिथ यांनी त्यांच्या भांडवलाच्या व्याख्येत " सर्व रहिवासी किंवा समाजातील सदस्याच्या अधिग्रहित आणि उपयुक्त क्षमता" समाविष्ट केलेल्या आहेत. मानवी भांडवल या शब्दाचा सर्वात प्रथम वापर प्रोफेसर फिशर यांनी केलेला आढळतो. डॉ. मार्शल यांनी सुद्धा शिक्षणावरील गुंतवणुकीला राष्ट्रीय गुंतवणूक मानले होते. तसेच त्यांनी मानवी संसाधन गुंतवणुकीला मौल्यवान गुंतवणूक म्हटले आहे. पॉल स्टीट्रे या अर्थशास्त्रज्ञांनी आरोग्य आणि पोषणावरील गुंतवणूक श्रमिकाची उत्पादकता वाढवण्यासाठी महत्त्वपूर्ण मानलेली आहे. व्यापारवादी अर्थशास्त्रज्ञ सर विल्यम पेट्टी यांनी १६९१ मध्ये संपूर्ण लोकसंख्येचे मौद्रिक मूल्य मापण्याचा प्रयत्न केलेला होता. त्यांनी मानवी भांडवल या संकल्पनेचा उपयोग इंग्लंडची शक्ती प्रदर्शित करणे, स्थलांतराचे आर्थिक परिणाम स्पष्ट करणे, युद्धात झालेल्या मानवी जीवनाच्या मूल्याचा शोध घेणे आणि देशाचे मृत्यूमुळे झालेले पैशातील मूल्य ठरवणे यासाठी केलेला होता. याशिवाय डॉ.अमर्त्य सेन यांनी विकास म्हणजे जीवनाची गुणात्मकता ही क्षमता विस्तारावर अवलंबून असते. यामध्ये तंत्रज्ञान आणि भौतिक मानवी भांडवलाचे कार्य यांचा विचार केलेला आहेत.

**मानवी भांडवलाची संकल्पना:**

अर्थशास्त्रात "भांडवल" म्हणजे व्यवसायाला विक्री केलेल्या वस्तू आणि सेवांच्या निर्मितीसाठी आवश्यक असलेल्या सर्व मालमत्तांचा संदर्भ आहे. या अर्थाने, भांडवलामध्ये उपकरणे, जमीन, इमारती, पैसा आणि अर्थातच लोक-मानवी भांडवल यांचा समावेश होतो.तथापि, सखोल अर्थाने, मानवी भांडवल हे एखाद्या संस्थेसाठी काम करणाऱ्या लोकांच्या शारीरिक श्रमापेक्षा अधिक आहे. हा अमूर्त गुणांचा संपूर्ण संच आहे जे ते लोक संस्थेमध्ये आणतात जे त्यास यशस्वी होण्यास मदत करू शकतात. यापैकी काही शिक्षण, कौशल्य, अनुभव, सर्जनशीलता, व्यक्तिमत्व, चांगले आरोग्य आणि नैतिक चारित्र्य यांचा समावेश होतो.दीर्घकाळात जेव्हा नियोक्ते आणि कर्मचारी मानवी भांडवलाच्या

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

विकासामध्ये सामायिक गुंतवणूक करतात तेव्हा केवळ संस्थांना त्यांच्या कर्मचाऱ्यांना आणि ग्राहकांनाच फायदा होत नाही तर समाजालाही फायदा होतो. उदाहरणार्थ, काही अल्पशिक्षित समाज नवीन जागतिक अर्थव्यवस्थेत भरभराट करतात.नियोक्त्यांसाठी, मानवी भांडवलामध्ये गुंतवणुकीत कामगार प्रशिक्षण, प्रशिक्षण कार्यक्रम , शैक्षणिक बोनस आणि फायदे, कौटुंबिक सहाय्य आणि महाविद्यालयीन शिष्यवृत्ती यांसारख्या वचनबद्धतेचा समावेश होतो. कर्मचाऱ्यांसाठी, शिक्षण घेणे ही मानवी भांडवलामधील सर्वात स्पष्ट गुंतवणूक आहे. त्यांच्या मानवी भांडवलात केलेल्या गुंतवणुकीचा मोबदला मिळेल याची कोणतीही खात्री नियोक्ते किंवा कर्मचाऱ्यांना नाही. उदाहरणार्थ, महाविद्यालयीन पदवी असलेले लोक देखील आर्थिक मंदीच्या काळात नोकऱ्या मिळविण्यासाठी संघर्ष करतात.थोडक्यात मानवी भांडवलामधील गुंतवणुकीचा स्तर थेट आर्थिक आणि सामाजिक आरोग्याशी संबंधित आहे.

मानवी भांडवल म्हणजे ज्ञान कौशल्य अनुभव आणि सामाजिक गुणाची बेरीज जी एखाद्या व्यक्तीच्या आर्थिक मूल्याची निर्मिती करण्याच्या पद्धतीत कार्य करण्याच्या क्षमतेमध्ये योगदान देत असून शिक्षण आणि आरोग्य हे महत्त्वाचे पैलू आहेत त्यामुळे मानवी भांडवला सुधारणा होत जातात याशिवाय आर्थिक प्रगतीसाठी योगदान देत असतात.भांडवलाची कल्पना फार पूर्वीपासून मजबूत असून ती भौतिकवादाशी जुळलेली आहे. जी आर्थिक विचारांमध्ये भौतिक भांडवलाच्या वर्चस्वातून स्पष्ट होते. भांडवलाच्या सर्वसमावेशक संकल्पनेचा तार्किक आधार असून ज्यामध्ये मानवी भांडवलाचा समावेश आहे. ही संकल्पना उत्पन्नाच्या सर्व स्रोतांना भांडवलाचे स्वरूप मानते. या स्त्रोतांमध्ये केवळ नैसर्गिक संसाधने आणि पुनरुत्पादक उत्पादक आणि उपभोग्य वस्तू आणि वस्तू यासारख्या भौतिक स्वरूपांचा समावेश नाही तर उत्पादक आणि ग्राहकांच्या वारशाने मिळालेल्या आणि प्राप्त केलेल्या क्षमतांसारख्या मानवी स्वरूपांचा देखील समावेश आहे. भांडवलाकडे पाहण्याचा दृष्टिकोन ज्यामध्ये मानवी भांडवलाचा समावेश होतो त्याचे दोन मोठे फायदे आहेत. मानवी भांडवल आणि भौतिक भांडवल या दोन्ही गोष्टी विचारात घेतल्यास, अर्थशास्त्रातील अनेक पूर्वाग्रह दुरुस्त करता येतील. उत्पन्नाच्या प्रवाहाच्या भौतिक स्त्रोतांवर जास्त भर देणे हा त्यापैकी एक आहे. मानवी भांडवलाची गुंतवणूक अशा कार्यक्रमांचा अविभाज्य भाग नसलेल्या देशांच्या गुंतवणूक कार्यक्रमांमधील असंतुलन जवळून संबंधित आहे.

**ॲडम स्मिथ यांचा मानवी भांडवलाचा सिद्धांत:**

अर्थशास्त्राचा जनक ॲडम स्मिथ हे पहिले अर्थशास्त्रज्ञ होते. ज्यांनी वेतन भिन्नता आणि त्यांच्या अस्तित्वाची कारणे शोधण्याचा प्रयत्न केला. स्मिथच्या मध्ये मजुरीच्या भिन्नतेचे एक कारण म्हणजेच मजुरीच्या अयोग्य ते सह मजुरीची सकारात्मकता बदलते. एखाद्या व्यक्तीची मजुरी अधिक असेल तर जास्त प्रमाणात श्रम करण्यासाठी तो प्रवृत्त होत असतो. याशिवाय स्मिथ यांनी एखाद्या व्यक्तीच्या शिक्षणाची किंवा प्रशिक्षणाची किंमत हे व्यक्तीचे गुंतवणूक असून ती भविष्यातील मिळकतीची क्षमता निर्माण करते.विद्यार्थ्यांच्या जीवन काळात केली जाणारी गुंतवणूक ही आर्थिक

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

दृष्ट्या सक्षम होण्यासाठी केली जाते. या गुंतवणुकीवरील परताव्याचा दर मोजण्यासाठी शिक्षण व त्यानंतर प्रशिक्षण दिल्यास सामान्य लोकांपेक्षा हे विद्यार्थी आर्थिक दृष्ट्या अधिक सक्षम असे ॲडम स्मिथला वाटत होते.

नवपरंपरागत सिद्धांतानुसार श्रमाची उत्पादकता ही मजुरीचे निर्धारण करीत असते. वेतनातील फरक हा शिक्षण, प्रशिक्षण आणि कार्यक्षम श्रम ऊर्जा यावर अवलंबून असतो.मानवी भांडवल एखाद्याच्या मालकीच्या मालमत्तेचा एक मोठा साठा आहेत. आणि जो एखादया व्यक्तीला मिळकतीचा प्रवाह प्राप्त करण्यासाठी सक्षम बनवितो.याशिवाय तो अगदी रकमेवर कमावलेल्या व्याजाप्रमाणे असतो म्हणूनच आधुनिक काळात मानवी भांडवल हे मुख्यत्वे शिक्षण, प्रशिक्षण आणि अनुभवाचे उत्पादन आहेत असे म्हटले जाते. मानवी भांडवलातील गुंतवणुकीला भौतिक भांडवला मधील गुंतवणुकी सारखे मानले जाऊन मानवी भांडवला मधील गुंतवणूक आरोग्य सेवा, औपचारिक शिक्षण आणि कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणातील सुधारणा सुद्धा अवलंबून असतात असे नवपरंपरावादी अर्थशास्त्रज्ञांना वाटतात. प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ डब्ल्यू. शुल्झ यांनी असा युक्तिवाद केलेला आहेत की मानवी भांडवलाच्या गुणवत्तेमधील फरक हे राष्ट्रांमधील विकासाच्या विविध स्तरांचे कारण आहेत आणि मानवी भांडवलाच्या सुधारणामुळे भौतिक भांडवलाची गरज कमी होऊ शकते म्हणून मानवी भांडवली ही एक अतिशय मौल्यवान संपत्ती असून ती कर्मचारी आणि व्यावसायिक कामगिरी यांच्यातील एक उपयुक्त दुवा म्हणून कार्य करू शकते.

**मार्क्सवादी यांचा मानवी भांडवलाचा सिद्धांत :**

सन १८७९ मध्ये प्रशियाचे तत्वज्ञानी कार्ल मार्क्स यांनी "श्रमशक्ती" असे संबोधून मानवी भांडवलाची कल्पना सुचवली आणि असे प्रतिपादन केले की भांडवलशाही व्यवस्थांमध्ये लोक उत्पन्नाच्या बदल्यात त्यांची श्रमशक्ती अर्थात मानवी भांडवल विकतात. स्मिथ आणि इतर पूर्वीच्या अर्थशास्त्रज्ञांच्या विरोधात, मार्क्सने मानवी भांडवल सिद्धांताविषयी दोन असहमत निराशाजनक तथ्ये कडे लक्ष वेधले आहे .

१. उत्पन्न मिळविण्यासाठी कामगारांनी प्रत्यक्षात काम केले पाहिजे - त्यांचे मन आणि शरीर लागू केले पाहिजे. एखादे काम करण्याची निव्वळ क्षमता ही प्रत्यक्षात करण्यासारखी नसते.
२. कामगार त्यांचे मानवी भांडवल "विक्री" करू शकत नाहीत कारण ते त्यांची घरे किंवा जमीन विकू शकतात. त्याऐवजी, ते मजुरीच्या बदल्यात त्यांची कौशल्ये वापरण्यासाठी नियोक्त्यांसोबत परस्पर फायदेशीर करार करतात, अगदी त्याच प्रकारे शेतकरी त्यांची पिके विकतात.

मार्क्सने पुढे असा युक्तिवाद केला की हे मानवी भांडवल करार कार्य करण्यासाठी, नियोक्त्यांना निव्वळ नफा मिळणे आवश्यक आहे. दुसऱ्या शब्दांत, कामगारांनी त्यांची संभाव्य श्रमशक्ती टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक त्या वरच्या आणि पलीकडे काम केले पाहिजे. उदाहरणार्थ, श्रम खर्च महसुलापेक्षा जास्त असतो. तेव्हा मानवी भांडवल

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

करार अयशस्वी होतो. याशिवाय मार्क्सने मानवी भांडवल आणि गुलामगिरी यातील फरक स्पष्ट केला. मुक्त कामगारांच्या विपरीत गुलाम लोकांना-मानवी भांडवल-विकले जाऊ शकते, जरी ते स्वत: उत्पन्न मिळवत नाहीत.

**जेकब मिन्सर यांचा मानवी भांडवलाचा सिद्धांत:**

आधुनिक मानवी भांडवल सिद्धांताची सुरुवात जेकब मिन्सर यांच्या कार्याद्वारे केली जाते. ज्यामध्ये मानवी संसाधनांमधील गुंतवणूक इतर प्रकारच्या गुंतवणुकीप्रमाणे मानण्यात आलेली आहे. जेकब मिन्सर यांनी १९५८ मध्ये 'जर्नल ऑफ पॉलिटिकल इकॉनॉमि'मध्ये 'मानवी भांडवल आणि वैयक्तिक उत्पन्न वितरणातील गुंतवणूक' या लेखात अर्थशास्त्रातील मानवी भांडवल या संकल्पनेचा वापर केलेला दिसून येतो. मिन्सर यांनी १९५८ मध्ये पहिले प्रतिमान मांडले यात कोणत्याही प्रशिक्षणापूर्वी व्यक्तींना एकसारखे गृहीत धरले जातात ज्यामुळे अपेक्षित प्रशिक्षण कालावधीच्या आधारावर रोजगारासाठी विभेदक वेतनावर कार्य करण्यासाठी भाग पाडले जातात. भविष्यातील निव्वळ कमाई प्रवाहाच्या वर्तमान मूल्यांचे विविध स्तरावर गुंतवणुकीशी समीकरण करून भरपाई देणाऱ्या भिन्नतेचा आकार निर्धारित केला जातो.

जेकब मिन्सर यांचे पहिले प्रतिमान खालील प्रमाणे आहेत.

Inw (s) = Inw (0) + rs

येथे Inw (s) म्हणजे एखाद्या व्यक्तीच्या S वर्षाच्या शिक्षणासह कमाईची नोंद दर्शविते.

Inw (0) म्हणजे शिक्षणाची मूलभूत वर्ष असलेल्या व्यक्तीच्या वार्षिक कमाईच्या नोंदीचे प्रतिनिधित्व करतो आणि r हा परताव्याचा अंतर्गत दर आहे.

वरील समीकरणा नुसार अधिक परिश्रम घेतलेल्या व्यक्तींना जास्त मिळकत प्राप्त होत असते. वेगवेगळ्या वर्षाचे शालेय शिक्षण असलेल्या व्यक्तीच्या कमाईच्या पातळीतील फरक समीकरणाच्या उजव्या बाजूच्या समीकरणाद्वारे निर्धारित केला जातो.

मिन्सर यांनी १९७४ मध्ये दुसरे प्रतिमान मांडले. या प्रतिमानात नौकरीच्या वेळी गुंतवणुकीसाठी परवानगी देते आणि मिळकतीचे तपशील मिळवते जे पहिल्या प्रतिमानासारखे आहे. संभाव्य मिळकत आणि श्रम - बाजारातील वर्षाचा अनुभव यांच्यातील संबंध प्रस्थापित करण्यासाठी निरीक्षण केलेली मिळकत संभाव्य मिळकतीच्या कमी गुंतवणुकीच्या खर्च इतकी असते असे गृहीत धरून मिन्सर यांनी खालील प्रमाणे दुसरे समीकरण मांडलेले आहे.

Inw (sx) = a o + P s S + B o x + B 1 $^{x2}$

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

वरील समीकरणात Inw (sx) म्हणजे निरीक्षण केलेल्या मिळकतीसाठी असून, x म्हणजे कामाच्या अनुभवाची रक्कम, Ps हा औपचारिक शालेय शिक्षणावरील परताव्याचा दर आणि s हा शिक्षणाच्या वर्षाचे प्रतिनिधित्व करतो. इंटरसेप्ट टर्म हे लॉग स्किल किंमत आणि व्यक्तीच्या प्रारंभिक क्षमतेचे उत्पादन आहे. गुणांक ßo आणि ß1 अनुभवावर परतावा येण्यासाठी आहे.

या दुसऱ्या प्रतिमानाला मिन्सरचे मानक वेतन समीकरण म्हटल्या जाते. जे दीर्घ मिळकतीला स्थिर अटीवर आणि श्रम बाजार अनुभवाच्या चतुर्भुज शर्तींवर आधारित आहे. या समीकरणांमध्ये शालेय शिक्षणाच्या वर्षाच्या सामान्य वितरणाला मिळकतीच्या दीर्घकालीन वितरणामध्ये बदलत असते. शालेयोत्तर गुंतवणुकीचे परिणाम व्यक्तीमध्ये सारखेच असतात आणि शालेय स्तरावर ते अवलंबून नसतात. या गृहीत्यानुसार मिक्सर यांनी वय- कमाई प्रोफाइल आणि अनुभव -मिळकत प्रोफाइल यांच्यात एक महत्त्वाचा फरक आहेत. जिथे अनुभव म्हणजे शाळा सोडण्यापासूनचे वर्ष होय. मिळकत अनुभव प्रोफाइल शालेय स्तरावर समांतर असतात आणि मिळकत वय प्रोफाइल शालेय स्तरावरील वयानुसार बदलत असते.

थोडक्यात या प्रतिमानात वेतन आणि अनुभव यांच्यातील सांख्यिकीय संबंधाचे प्रतिनिधित्व केलेले आहे. शालेय शिक्षणानंतरच्या मानवी- भांडवल संचयाच्या अंतरजातत्त्वाकडे दुर्लक्ष करते आणि शालेय शिक्षण आणि प्रशिक्षण यांचा समन्वय करीत असते.

**समारोप :**

मानवी भांडवलाची संकल्पना मानवी संसाधन भांडवलशाहीच्या आर्थिक प्रतिमानातूनच उद्भवली आहे. जी सुधारित उत्पादकता किंवा कार्यप्रदर्शन आणि मानवी संसाधनांच्या विकासासाठी सतत आणि दीर्घकालीन गुंतवणूकीची आवश्यकता यांच्यातील संबंधांवर जोर देते. हे प्रतिमान व्यापक स्तरावर लागू केले जाऊ शकते जेथे मानवी भांडवलामधील गुंतवणूक राष्ट्रीय आणि जागतिक आर्थिक कामगिरीवर परिणाम करणारी म्हणून पाहिली जाते. देतो, मानव-संसाधन भांडवलशाही मॉडेल असा युक्तिवाद करते की उत्पादक क्षमतेचा मुख्य स्त्रोत, अर्थव्यवस्था किंवा संस्थेमध्ये, लोकांच्या क्षमतेवर अवलंबून असतो. म्हणूनच, भविष्यात मानवी भांडवलाची क्षमता वाढवणारी शिक्षण प्रणाली विकसित करून या संसाधनाच्या संभाव्यतेचा फायदा घेण्यासाठी धोरणे विकसित करणे आवश्यक आहे. राष्ट्रीय अर्थव्यवस्थेसाठी, उच्च आर्थिक उत्पादकतेसाठी आणि राष्ट्रीय जीवनाची गुणवत्ता राखण्यासाठी किंवा सुधारण्यासाठी उद्योगाच्या गरजा पूर्ण करणाऱ्या दर्जेदार कार्यबलाची तरतूद सुनिश्चित करण्यासाठी शैक्षणिक संस्थांमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. एखाद्या संस्थेसाठी, हे मॉडेल सूचित करते की उच्च उत्पादकता आणि कार्यप्रदर्शन विकसित शिक्षण प्रणालींवर अवलंबून असते जे एखाद्या संस्थेची तिच्या मानवी संसाधनांसाठी बांधिलकी दर्शवते.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

**संदर्भ सूची :**

*१ ) गोलडीन क्लाडिया ( २०१४ ) – ह्यूमन कॅपिटल , अर्थशास्त्र विभाग, हावर्ड विद्यापीठ*

*२ ) स्मिथ ॲडम ( १७७६ ) राष्ट्राच्या संपत्तीचे स्वरूप आणि कारणे*

*३ ) जागतिक मानव विकास अहवाल – २०१९*

*४ ) मार्क्स कार्ल – श्रम – शक्तीची खरेदी आणि विक्री*

*५ ) लुकास राबर्ट ई.जुनीयर १९९३ – इकोनोमेट्रिका*

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
*SPECIAL ISSUE ON MARATHI AARTHSHASHTRA PARISHED Nov. 2023*

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

# पायाभूत सुविधांमधील रस्ते वाहतूकीची सद्यस्थिती

**[1]स्वाती विजय पाटील, [2]डॉ .एन.जी.सूर्यवंशी**
[1]संशोधक विद्यार्थिनी, [2]मार्गदर्शक
मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव.
कवयत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव

**गोषवारा**

*देशाच्या आर्थिक ,सामाजिक विकासासाठी देशातील प्राथमिक क्षेत्र,द्वितीय क्षेत्र तसेच तृतीय क्षेत्र यांचा विकास होणे महत्वाचे आहे .या तीनही शेती,व्यापार ,व सेवा क्षेत्रा च्या विकासात पायाभूत सुविधामधील वाहतूक सुविधेचे महत्व हे खूप मोलाचे आहे .रस्ते वाहतूक ही महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात मोलाची भर घालते ,आर्थिक ,सामाजिक तसेच प्रत्येक व्यक्तीच्या वयक्तिक विकासातही रस्ते वाहतूकीचे महत्व आहे .या मध्ये पायाभूत सुविधा म्हणजे काय ? वैशिष्ट्ये, महत्व तसेच पायाभूत सुविधामधील महत्वाचा भाग वाहतूक यातील रस्ते वाहतुकीचे महत्व ,महाराष्ट्रातील रस्त्यांची माहिती ,समस्या यात महामार्गाचे बांधकाम महानगरातील प्रमुख रस्त्यांची रुंदीकरण तसेच त्यांचा दर्जा सांभाळणे ते दुर्गम ग्रामीण वस्त्यांपर्यंत रस्त्यांचे जाळे पोहोचवणे या सर्वांचाच या पुनर्रचनेत अंतर्भाव होतो. वाढत्या औद्योगीकरणामुळे झपाट्याने शहरीकरण अनुभवणाऱ्या देशात रस्त्यांच्या अपुरे पणाची समस्या सर्वत्र भेडसावत आहे. शहरांतर्गत व शहरांमध्ये मधील वाहतूक दुथडी भरून वाहत असल्याने त्याचा प्रचंड ताण राष्ट्रीय अर्थव्यवस्थांवर पडतो तसेच त्यामुळे मनुष्यबळाचे उत्पादकता व राहणीमान ही खालावते घुसमट व प्रवासात जाणारा वेळ,निकृष्ट रस्त्यांमुळे वाहनांचे होणारी झीज व क्षती, अपघात व दुखापतींची मोठी संख्या यासारख्या दुष्परिणामांची झळ कोणत्याही महानगरीय रहिवाशांच्या नित्य परिचयाची आहे,या साठी उपाययोजना होणे महत्वाचे आहे .*

प्रस्तावना

भारतातील पायाभूत सुविधांची सुरुवात ब्रिटिश प्रशासनाच्या काळात झालेली दिसते, परंतुत्यानंतरच्या काळात भारतात वाढत्या लोकसंख्येमुळे आर्थिक विकासाचा निश्चित दर वाढण्याच्या हेतूने पायाभूत सुविधांच्या विकासाकडे पाहिजे तितके लक्ष देता आलेले नाही असे दिसते. १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले त्यानंतर १९४८ मध्ये औद्योगिक धोरण राबविले १९५०मध्ये भारताने राज्यघटनेचास्वीकार केला परिणामी रीतसर रित्या आर्थिक विकासासाठी १९५१ पासून पंचवार्षिक योजनांचा स्वीकारकेला पंचवार्षिक योजना म्हणजे पायाभूत संरचनेच्या विकासाचा एक मोलाचा दगडच ठरलेला आहे. पंचवार्षिक योजनांच्या नियोजनामुळे आर्थिक विकासाला योग्य दिशा प्राप्त झाली.पायाभूत सुविधामध्ये वाहतूक घटका मध्ये रस्ते वाहतूक ,रेल्वे वाहतूक ,जल वाहतूक ,हवाई वाहतूक यांचा समावेश होतो.महाराष्ट्रा मध्ये रस्ते वाहतुकीचा जास्त वापर होताना दिसून येतो .

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

रस्त्यांचे महत्त्व स्पष्ट करताना अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉन एफ केनेडी एकेकाळे असे म्हणाले होते, की“ अमेरिका श्रीमंत आहे म्हणून अमेरिकेत चांगले रस्ते नाहीत, तर अमेरिकेत चांगले रस्ते आहेत म्हणूनअमेरिका श्रीमंत आहे “ ज्याप्रमाणे बैलगाडीच्या चाकाला केंद्रबिंदूशी जोडून केंद्रबिंदूशी सोडून विविध आरया असतात अगदी त्याचप्रमाणे एखाद्या भागात मुख्य शहरांना जोडणारे विविध रस्ते गावपातळीपासूनअसतील तर त्या भागाचा विकास निश्चित रित्या होतो निश्चितपणे होतो कोणत्याही प्रदेशाच्याविकासासाठी रस्त्यांचे स्थान महत्त्वाचे आहे रस्ते विकास ही विकासाची प्राथमिक अट आहे.

**उदिष्टे**

१.पायाभूत सुविधांची माहिती करून घेणे.

२.पायाभूत सुविधामधील वाहतूक व्यवस्थेमधील रस्ते वाहतुकीची माहिती घेणे.

३.रस्ते वाहतूक विषयक समस्या व उपाययोजनाचा अभ्यास करणे.

**गृहीतक**

१.महाराष्ट्रातील वाहतूक व्यवस्थेमधील रस्ते वाहतूकीमध्ये वाढ होत आहे.

पायाभूत सुविधा व्याख्या

पायाभूत सुविधा हा शब्द इंग्रजीतील Infra-structure या दोन शब्दापासून तयार झालेला आहे. Infra हार्लॅटिन शब्द असून त्याचा अर्थ पाया किंवा तळ असा घेतला जातो, तर Structure हा इंग्रजी शब्द असूनयाचा अर्थ रचना किंवा ढाचा असा घेतला जातो. इन्फ्रास्ट्रक्चर याचा अर्थ पायाभूत सुविधा होय.देशाचाआर्थिक सामाजिक राजकीय आणि सांस्कृतिक विकास ज्या घटकांवर अवलंबून असतो त्या सर्व घटकांचासमावेश पायाभूत क्षेत्रात केला जातो.

अल्बर्ट ओ हर्षमन- प्राथमिक दुय्यम व तृतीय क्षेत्रातील उत्पादक कार्य याशिवाय पार पाडले जाणार नाहीअशा मूलभूत सेवा म्हणजेच पायाभूत सुविधा होय व्यापक अर्थाने विचार करता कायदा सुव्यवस्था श्रोतापासून शिक्षण आणि सार्वजनिक आरोग्य ते वाहतूक दळणवळण वीज आणि पाणीपुरवठा अशा सर्वसार्वजनिक सेवा आणि शेती परिसेवा म्हणजे जलसिंचन व सांडपाणी व्यवस्था यांचा यात समावेश होतो.

मात्र या संकल्पनेचा कठीण गाभा वाहतूक आणि वीज या पुरताच मर्यादित असू शकतो.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

**पायाभूत सुविधांची वैशिष्ट्ये**

- ○ बाह्य बचतीचा स्त्रोत
- ○ सार्वजनिक वस्तू या प्रकारात समावेश
- ○ मोठ्या प्रमाणावर खर्चाची गरज
- ○ नवनिर्मितीस प्रेरणा
- ○ उत्पादक कार्यास प्रोत्साहन

**पायाभूत सुविधांचे महत्त्व**

- नवप्रवर्तनासाठी योग्य परिस्थिती
- उत्पादन वाढीला गती
- शेती उद्योग व सेवा क्षेत्राचा विकास
- उत्पादक कार्याला प्रेरणा
- औद्योगिक विकास
- समतोल प्रादेशिक विकास
- कृषी क्षेत्राचा विकास
- सामाजिक व सांस्कृतिक प्रगती
- आर्थिक विकासात सहाय्य
- कृषी प्रगती अपेक्षित वेळेत होते
- उद्योगांचा जलद विकास होतो
- अर्थव्यवस्थेत समतोल विकास साध्य करता येतो
- उत्पादन घटकांची गतिशीलता वाढते.
- देशाची सामाजिक व सांस्कृतिक प्रगती होते
- बाजारपेठांचा विस्तार होतो

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

| रस्त्यांचे प्रकार रस्ते (किमी) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्ष | राष्ट्रीय महामार्ग | प्रमुख राज्य महामार्ग | राज्य महामार्ग | प्रमुख जिल्हा रस्ते | इतर जिल्हा रस्ते | ग्रामीण रस्ते | एकूण |
| २०११ - १२ | ४,३७६ | उ .ना | ३४,१५७ | ५०,२५६ | ४७,५२९ | १,०६,६०१ | २,४२,९१९ |
| २०१२ - १३ | ४,३७६ | ६,६९४ | २७,५२८ | ५०,२५६ | ४७,५७३ | १,०६,७४५ | २,४३,१७२ |
| २०१३-१४ | ५,८५८ | ६,३३७ | ३३,९६३ | ५०,२३२ | ५२,७६१ | १,१४,५५७ | २,६३,७०८ |
| २०१४-१५ | ४,७६६ | ६,१६३ | ३३,८६० | ५०,५८५ | ५८,११५ | १,४५,८७९ | २,९९,३६८ |
| २०१५-१६ | ४,९०१ | ५,२४९ | ३३,६९५ | ५२,२७५ | ५६,५६४ | १,५३,४३५ | ३,०५,११९ |
| २०१६-१७ | ७,६८२ | ३,९७१ | ३०,७७६ | ५१,६२७ | ५६,३३६ | १,५३,९४६ | ३,०४,३३६ |
| २०१७-१८ | १०,१९५ | ३,२७२ | २९,१५१ | ५५,०३० | ५३,९२४ | १,५२,२७२ | ३,०३,८४३ |
| २०१८-१९ | १०,३०० | २,९६७ | २८,४६६ | ६०,५३१ | ४९,२०६ | १,५७,१२७ | ३,०८,५९७ |
| २०१९-२० | १७,७२६ | २,९६७ | २९,०३० | ६३,८८६ | ४७,३९८ | १,४८,३३५ | ३,०९,३४२ |
| २०२०-२१ | १८,०८९ | २,९०० | २९,३८८ | ६८,३५० | ४६,४०८ | १,५७,९८० | ३,२३,११५ |
| २०२१-२२ | १८,३६६ | २,६२२ | २९,२६५ | ६८,५३५ | ४५,३७१ | १,५९,७१४ | ३,२३,८७३ |

(संधर्ब स्त्रोत –महाराष्ट्राची आर्थिक पाहणी ) (उना – उपलब्ध नाही )

स्पष्टीकरण –

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

वरील तक्त्यावरून रस्त्यांची वर्ग निहाय लांबी (कि.मी) मध्ये अभ्यासताना २०११-१२ मध्ये राष्ट्रीय महामार्ग लांबी हि ४,३७६ (कि.मी) ,राज्य महामार्ग लांबी ३४,१५७कि.मी,मुख्य जिल्हा रस्ते ५०,२५६ कि.मी ,इतर जिल्हा रस्ते ४७,५२९ कि.मी ,तर गाव/ग्रामीण रस्ते लांबी १,०६,६०१ इतकी दिसते, आणि एकूण रस्ते लांबी हि २,४२,९१९ कि.मी दिसून येते .२०१२-१३ मध्ये राष्ट्रीय महामार्ग लांबी ४,३७६कि.मी ,प्रमुख राज्य महामार्ग लांबी ६,६९४ कि.मी ,राज्य महामार्ग लांबी २७,५२८ कि.मी ,मुख्य जिल्हा रस्ते लांबी ५०,२५६ कि.मी ,इतर जिल्हा रस्ते लांबी ४७,५७३ कि.मी ,तर गाव/ग्रामीण रस्ते लांबी १,०६,७४५ कि.मी ,आणि एकूण रस्ते लांबी हि २,४३,१७२ इतकी वरील तक्त्यावरून दिसून येते .एकूण रस्ते लांबी मध्ये २०१३-१४ मध्ये २,६३,७०८ कि.मी इतकी तर २०१४-१५ मध्ये २,९९,३६८ कि.मी दिसून येते तर २०१५-१६ मध्ये या मध्ये वाढ होऊन एकूण रस्ते लांबी हि ३,०५,११९ कि.मी इतकी दिसून येते,२०१६-१७ मध्ये एकूण रस्ते लांबी वरील तक्त्यावरून ३,०४,३३६ कि.मी दिसून येते.२०१७-१८ मध्ये रस्त्याची एकूण लांबी ३,०३,८४३ कि.मी इतकी वरील तक्त्यावरून दिसून येते.२०१८ -१९ मध्ये ३,०८,७९७ कि.मी रस्त्यांची एकूण लांबी दिसून येते.२०१९-२० मध्ये महाराष्ट्रातील रस्ते लांबी मध्ये एकूण रस्ते लांबी हि ३,०९,३४२ कि.मी दिसून येते.२०२०-२१ मध्ये एकूण रस्ते लांबी ३,२३,११५ कि.मी दिसून येते.तर २०२१-२२ या वर्षात राष्ट्रीय महामार्ग लांबी हि १८,३६६ कि.मी , प्रमुख राज्य महामार्ग लांबी २,६२२ कि.मी , राज्य महामार्ग लांबी २९,२६५ कि.मी , मुख्य जिल्हा रस्ते लांबी ६८,५३५ कि.मी इतर जिल्हा रस्ते ४५,३७१कि.मी तर ग्रामीण रस्ते लांबी १,५९,७१४ कि.मी आणि एकूण रस्ते लांबी हि ३,२३,८७३ कि.मी इतकी दिसून येते.

वरील तक्त्या वरून असे दिसून येते कि २०११-१२ मध्ये एकूण रस्ते लांबी हि २,४२,९१९कि.मी इतकी होती तर आता २०२१-२२ मध्ये रस्त्याच्या लांबी मध्ये वाढ होऊन २०२१-२२मध्ये एकूण रस्ते लांबी हि ३,२३,८७३कि.मी वाढलेली वरील तक्त्यावरून दिसून येते.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या सुरु असलेल्या प्रकल्पांची सद्यस्तिती

| प्रकल्पाचे नाव | सुरु झाल्याचे वर्ष | काम पूर्ण होण्याचे अपेक्षित वर्ष |
|---|---|---|
| हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग | २०१६-१७ | २०२१-२२ |
| पुणे चक्राकार मार्ग | २०१६-१७ | २०२४-२५ |
| ठाणे-घोड बंदर उन्नत मार्ग | २०१६-१७ | उना |
| भिवंडी-कल्याण –शिळफाटा उन्नत मार्ग | २०१६-१७ | २०२१-२२ |
| विदर्भातील रेल्वे वरील पूल | २०१६-१७ | उना |
| ठाणे खाडी पूल-टप्पा तीन | २०१६-१७ | २०२३-२४ |

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

| | | |
|---|---|---|
| मुंबई-पुणे जुन्या –राष्ट्रीय महामार्ग -४ चे ६ पदरी रुंदीकरण | २०१६-१७ | २०२०-२१ |
| मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गचे आवर्धन | २००९-१० | २०२२-२३ |
| सीमा तपासणी नाक्याचे आधुनिकीकरण | २००८-०९ | उना |
| वर्सोवा-वांद्रे सागरी सेतू प्रकल्प | २००७-०८ | २०२३-२४ |
| विक्रीकरभवन(ठेवी तत्वावरील प्रकल्प ) | २०१२-१३ | उना |
| राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (ठेवी तत्वावरील प्रकल्प ) | २०१६-१७ | उना |

(संधर्ब स्त्रोत –महाराष्ट्राची आर्थिक पाहणी ) (उना – उपलब्ध नाही )

स्पष्टीकरण – वरील तक्त्यावरून दिसून येते कि महाराष्ट्रात रस्ते प्रकल्प सुरु आहेत,काही प्रकल्प चालू आहेत तर काही पूर्ण होण्याचा मार्गावर आहे,मात्र असे ही काही प्रकल्प आहेत कि ज्यांचे सुरु झाल्याचे वर्ष आधीचे असून काम पूर्ण होण्याचे अपेक्षित वर्ष संपून हि पूर्ण झालेले दिसून येत नाही.

रस्ते वाहतूक विषयक समस्या –

रस्ते वाहतूक हि देशाच्या आणि आपल्या महाराष्ट्राच्या विकासात हातभार लावणारी महत्वाची वाहतूक व्यवस्था आहे ,ज्या प्रमाणे अन्न,वस्त्र,निवारा,आरोग्य,शिक्षण या मानवाच्या मुलभूत गरजा आहेत त्या प्रमाणे अर्थीक गरज पूर्ण करण्याचे महत्वाचे साधन म्हणजे रस्ते वाहतूक आहे असे मला वाटते .कारण मानवाला कामासाठी घराबाहेर पडावे लागते. रस्ते वाहतुकी विषयक अनेक समस्या दिसून येतात काही शहरी भागात रस्त्यांची दुरावस्था झाली आहे ,खराब रस्त्यामुळे वाहनाचे नुकसान होते ,वाहनाचे अपघात होतात,माणसांचे अपघात होतात त्यात काही वेळा माणसे जखमी होतात तर काही वेळा माणसे मृत्युमुखी पडतात तसेच अजूनही ग्रामीण भागात पक्के रस्ते नाहीत, आदिवासी दुर्गम पाडे तर आसे आहेत कि तिथे रस्तेच नाही ते लोक डोंगर दर्यातून मार्ग काढून त्याचे कामे करताना दिसून येतात तरी रस्ते वाहतुकीच्या या समस्या सोडवण्यासाठी उपाय करयला पाहिजे .

काही ठिकाणी चागल्या प्रतीचे रस्ते आहेत उदा. हिंदू ह्दयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग तरीही या महामार्गावर अपघात घडून येताना दिसून येत आहेत या मध्ये मानवी चुका मुळे अपघात होताना दिसून येत आहे .या मध्ये मद्यपान करून वाहने चालवणे,वाहन चालवताना धूम्रपान करणे,पुढे जाणार्या वाहनाची स्पर्धा करणे,आक्रमक मानसिकता असणे अशा अनेक कारणामुळे हि रस्ते अपघात होताना दिसून येत आहेत. या साठी उपायकरणे हे आवश्यक आहे .

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

समारोप

मला असे वाटते कि , महाराष्ट्रा मध्ये राज्य सरकार विकासासाठीच्या अनेक योजना राबवत असते,योजनासाठी अर्थ सहाय्य पुरवत असते,त्यात पायाभूत सुविधांसाठी अनेक उपक्रम राबवले जातात. रस्ते वाहतुकीच्या संदर्भात महाराष्ट्रात अनेक नवनवीन योजना सुरु केल्या आहेत त्यात हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग तसेच विविध धार्मिक स्थळांचे नवीनकरण, रस्ते बांधणी इत्यादी कार्यक्रम राबवताना दिसून येतात हे कार्यक्रम राबवत असताना सुरुवातीचे रस्ते प्रकल्प सुरळीत चालू आहेत का? त्यांची डागडुजी होते का? लोकांना त्यापासून अपाय होतो आहे का? हे देखील पाहणे गरजेचे आहे नवीन योजना,नवीन उपक्रम राबवणे ही महाराष्ट्राच्या दृष्टीने चांगली बाब /कामगिरी आहे मात्र पूर्वीच्या प्रकल्पाकडे पाठ न फिरवता सिंहावलोकन करण्याची नितांत आवश्यकता आहे.

संदर्भ ग्रंथ

*१.पायाभूत भौतिक सुविधा*

*२.भारतीय अर्थव्यवस्था*

*३ . अर्थसंवाद*

*४ .महाराष्ट्राची आर्थिक पाहणी*

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
*SPECIAL ISSUE ON MARATHI AARTHSHASHTRA PARISHED Nov. 2023*

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

# महाराष्ट्रातील वाहतूक व्यवस्थेचे अर्थशास्त्र

**डॉ.राजेश्री अप्पाराव जाधव**
(अर्थशास्त्र विभाग प्रमुख)
महात्मा गांधी महाविद्यालय अहमदपूर

आजीव सभासद क्रमांक:- 1964

## प्रस्तावना

प्रत्येक राष्ट्राच्या सर्वांगीण विकासात वाहतूक व्यवस्थेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे भारतासारख्या विकसनशील देशाच्या दृष्टीने रस्ते वाहतुक महत्त्वाची पायाभूत गरज आहे ग्रामीण शहरी राज्य महामार्ग राष्ट्रीय मार्ग व्यापक स्तरावर मालवाहतूक व प्रवासी वाहतुकीच्या माध्यमातून श्रम वस्तू व सेवा याची ज्ञान करण्यासाठी वाहतूक व्यवस्था ही महत्वपूर्ण आहे  वाहतूक या शब्दाचा अर्थ एका ठिकानाहुन दुस-या ठिकानी माल ने-आण करणे होय. डॉ. मार्शल यानी 1919 मध्ये Industry and Trade या पुस्तकात वाहतुक व्यवस्थेचे योगदान स्पष्ट केले.

कोणत्याही देशात उपलब्ध असणाऱ्या पायाभूत सुविधांवर त्या देशाचा आर्थिक विकासा अवलंबून असतो आर्थिक विकासाबरोबर सर्वांगीण विकास स्वयंपूर्ण विकास देखील अवलंबून असतो. अर्थव्यवस्थेमध्ये क्षेत्र कोणतेही असो जलद गतीने विकास घडवून येण्यासाठी उत्पादनाच्या क्षेत्राला गतिमान करावे लागते शेती उद्योग आणि या सर्व क्षेत्राला गतिमान करण्यासाठी कच्चामाल यंत्रसामग्री अवजारे श्रमिकाचा पुरवठा वाहतूक व दळणवळणाच्या सुविधा वीज पाणी बाजारपेठा या सगळ्या गोष्टीचा समावेश असतो ज्या सुविधा व सेवा याचा समावेश पायाभूत संरचनेमध्ये केला जातो. महाराष्ट्रातील वाहतूक व्यवस्थेचा अभ्यास करत असताना वाहतूक व्यवस्था म्हणजे एका ठिकाणाहून अन्य ठिकाणी झालेले व्यक्तीचे वस्तूचे प्राण्याचे हस्तांतरण होईल मानवी शरीरामध्ये रक्तवाहिन्याला जसे महत्त्व आहे तसे अर्थव्यवस्थेमध्ये वाहतूक क्षेत्राला महत्त्व आहे शेती उद्योग व्यापार इत्यादीचा विकास होण्यासाठी वाहतूक साधनांची उपलब्धता असणे आवश्यक असते वाहतूक साधनांमुळेच उत्पादन केंद्र व बाजारपेठा जोडल्या जातात विविध बाजारपेठा व ग्राहक देखील जोडले जातात लोक एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात ये जा करत राहतात त्यामुळे त्यांच्यात एकात्मतेची भावना निर्माण होते देशाची संरक्षण व्यवस्थादेखील अधिक प्रभावी व कार्यक्षम होण्यासाठी वाहतूक साधने महत्त्वाचे असतात महाराष्ट्र राज्य हे भारतातील सर्वाधिक विकसनशील आर्थिक क्षेत्रांपैकी एक आहे.

कोणतीही अर्थव्यवस्था वाढीला लागते तेव्हा त्यामध्ये गुंतवणूक व ऊर्जा क्षेत्राचे जसे महत्त्व असते तितकेच महत्त्व वाहतुक व्यवस्थेला असते. वाहतूक क्षेत्राचे जाळे म्हणजे देशाच्या अर्थव्यवस्थेच्या रक्तवाहिन्यांचे जाळे असते. हे जाळे जेवढे मोठे व सशक्त तेवढी वाहतूक सुकर! भारतीय अर्थव्यवस्था पुढील १५ वर्षांत जर ८ ते ९% दराने वाढणार असेल तर त्याचा अर्थ त्यापेक्षा जास्त दराने व्यापाराची वृद्धी होण्याची गरज आहे. व्यापाराची वृद्धी याचाच अर्थ देशांतर्गत व आयात-निर्यातीसाठी मालाची अधिक ने-आण म्हणजेच ती ने-आण करणारी वाहतुकीची साधने व त्यांचे जाळे व या सर्वांचे व्यवस्थापन यांत प्रचंड प्रमाणात वाढ होण्याची अपेक्षा आहे. आज वाहतूक क्षेत्र हे देशाच्या वार्षिक सकल उत्पन्नाच्या ५.५% इतके आहे तर वाहतुकीच्या अनुषंगाने होणारा एकूण खर्च हा देशाच्या वार्षिक सकल उत्पन्नाच्या १४% इतका

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

मोठा आहे. सर्वसाधारणपणे विकसनशील देशांत हा खर्च ८ ते ९% इतका असतो. अर्थात आपल्या देशात असणाऱ्या अनास्थेमुळे व अकार्यक्षमतेमुळे हा खर्च तुलनेने खूपच जास्त आहे. येणाऱ्या काळात म्हणूनच वाहतूक व वाहतुकीचे व्यवस्थापन या क्षेत्राकडे उद्योगांनी व सरकारने अधिक आस्थेने बघणे जरुरी आहे. अन्यथा शरीरातील रक्ताभिसरणातील अडथळ्यांमुळे शरीराला जशी इजा पोहोचू शकते तशीच इजा देशाच्या वाढत्या अर्थव्यवस्थेला पोहोचू शकते. रेल्वे, रस्ते वाहतूक (माल व प्रवासी), हवाई वाहतूक, बंदरे, शहरी वाहतूक व दुर्गम भागातील वाहतूक. भारतीय अर्थव्यवस्थेचा सर्वात मोठा भर हा रेल्वे व रस्ते वाहतुकीवर आहे.

**वाहतूक व्यवस्थेचे प्रकार**

वाहतूक साधनाचे प्रामुख्याने चार प्रकार पडतात. त्यात

**१)रस्ते वाहतूक**

व्यापार व व्यवसायाच्या दृष्टीने रस्त्याची उपयुक्तता फार प्राचीन काळापासून झालेली आहे प्रत्येक राज्यकर्त्याने आपापल्या राज्यात व्यापाराला प्रोत्साहन देण्यासाठी रस्त्याची निर्मिती केलेली आहे रस्ते वाहतूक कार्यक्षम असेल समाधानकारक असेल तर प्रशासकीय कार्यक्षमता वाढते पूर्वीच्या काळी रस्ते फारसे सुव्यवस्थित नव्हते आधुनिक काळामध्ये रस्ते बांधणीला मोठ्या प्रमाणात सुरुवात झालेली आहे वाहतूक साधनात रस्त्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे रस्ते उपलब्ध झाल्याशिवाय माणसाच्या गरजेनुसार एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी मालाची वाहतूक प्रवासी वाहतूक होणे अशक्य आहे रस्त्यामुळे शहरी भाग ग्रामीण भाग बाजारपेठा प्रशासकीय केंद्रे कारखाने हे सर्व क्षेत्रे परस्परांशी जोडले गेलेले आहेत त्यामुळे विकासाची गती वाढलेली आहे एवढेच नसून रस्त्यामुळे सर्व दुरक्षत्रे पहाडीक्षेत्रे दुर्गमक्ती क्षेत्र इतर भागाशी जोडता आले म्हणून अर्थव्यवस्थेमध्ये रस्ते वाहतुकीला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

देश पातळीवर आतापर्यंत दोन रस्ते विकास योजना आखण्यात आले असून पहिली रस्ते विकास योजना 1961 ते 1981 वीस वर्षाच्या कालखंडासाठी तयार करण्यात आली यामध्ये गाव जवळच्या रस्त्यापासून किमान आठ किलोमीटर पेक्षा अधिक अंतरावर नसू नये त्यानंतर दुसरी योजना 1981 ते 2001 ही दुसरी रस्ते विकास योजना तयार करण्यात आली या वीस वर्षाच्या योजनेत डोंगराळ भागातील गावे रस्त्यापासून किमान पाच किलोमीटरच्या आत असावीत राज्यात रस्त्याचे जाळे फार मोठ्या त्या जाळ्यामध्ये प्रामुख्याने राष्ट्रीय महामार्ग राज्य महामार्ग प्रमुख जिल्हा रस्ते व ग्रामीण रस्ते इत्यादीचा समावेश होतो.

**२) रेल्वे वाहतूक**

महाराष्ट्रात कृषी व उद्योगाचे विकासाच्या दृष्टीने रेल्वे वाहतुकीला अनन्य साधारण महत्त्व आहे लांब अंतरासाठी रेल्वे हे अत्यंत सोयीचे साधन असून जड व अवाढव्य वस्तूच्या वाहतुकीसाठी रेल्वे ही सुयोग्य असे साधन आहे मुंबई येथे कापड उद्योगाची प्रगती होण्यास रेल्वे वाहतूक कारणीभूत आहे शेती क्षेत्रातील वस्तूंना विस्तृत बाजारपेठ रेल्वे वाहतुकीमुळे शक्य झालेली आहे रेल्वेमुळेच राज्याच्या एका भागातून दुसऱ्या भागात लोखंड पोलाद कोळसा फुले फळे भाजीपाला यासारख्या वस्तूची जलद गतीने वाहतूक करता येते तसं पाहिलं तर रेल्वे वाहतुकी स्वस्त वाहतूक आहे औद्योगिक विकासात गतिमान आणण्याचे काम ही वाहतूक व्यवस्था करते राज्यामध्ये श्रमिकाच्या कार्यक्षमतेत किंवा गती

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

क्षमतेमध्ये वाढ होण्यास रेल्वे वाहतूकच महत्त्वाचे आहे भारतामध्ये 853 मध्ये पहिली मुंबई ते ठाणे हा रेल्वे मार्ग अस्तित्वात आला पण ती महाराष्ट्रातूनच भारतीय रेल्वे ही इंग्रजांनी आपणास दिलेली मोठी देणगी असून इंग्रजांच्या राजवटीमध्ये लॉर्ड डलहौसीच्या काळामध्ये महाराष्ट्रात रेल्वे वाहतुकीचा प्रारंभ झाला भारतातील अन्नधान्य आणि कच्चामाल इंग्लंडकडे पाठवण्यासाठी इंग्लंडमधील कारखान्यात तयार झालेल्या वस्तूची भारतात विक्री करण्यासाठी ब्रिटिशांनी जलद वाहतुकीचे प्रभावी साधन म्हणून भारतामध्ये रेल्वे वाहतुकीचे जाळे विणले रेल्वे मार्गाच्या बांधकामाचा वेग थोडा सुरुवातीला मंदावला आणि 1950 मध्ये रेल्वे मार्गाची लांबी 53 हजार 600 किलोमीटर पर्यंत पोहोचली खाजगी क्षेत्रातील ब्रिटिश कंपन्याने रेल्वे मार्गाच्या क्षेत्रामध्ये हा सर्वात विस्तार केला होता 1947 नंतर भारत सरकारने ही रेल्वे वाहतूक आपल्या ताब्यात घेतली आणि आज भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील सर्वात मोठा उद्योग म्हणून भारतीय रेल्वेचा उद्देश उल्लेख करावा लागतो महाराष्ट्रामध्ये रेल्वे मार्गाचा पाया सुमारे दीडशे वर्षांपूर्वीच रोवला गेला असून भारतातील पहिला रेल्वे मार्ग महाराष्ट्रात मुंबई ते ठाणे दरम्यान सुरू झाला सन १९६० पर्यंत हा मार्ग पुण्यापर्यंत वाढवण्यात आला त्यावेळी या मार्गावर ग्रेट इंडियन सुला रेल्वे आणि बॉम्बे बरोडा अँड सेंट्रल इंडिया या खाजगी कंपन्या द्वारा रेल्वे चालवल्या जात होत्या मार्च 2010 अखेर राज्यातील रेल्वे मार्गाच्या लांबीचे कोकण रेल्वे सहप्रती हजार चौरस किलोमीटर क्षेत्रात प्रमाण देशाच्या 19.69 किमीच्या तुलनेत 19.74 किमी पर्यंत आहे राज्यातील प्रमुख रेल्वे मार्ग व चालू असलेल्या रेल्वेच्या मार्गाच्या कामाचा तपशील सुद्धा त्या ठिकाणी आपणाला सांगता येतो मुंबई दिल्ली पश्चिम रेल्वे चा रोडगेज मार्ग आहे मुंबई दिल्ली मध्ये रेल्वेचा ब्रॉडगेज मार्ग आहे मुंबई कलकत्ता मध्ये रेल्वेचा ब्रॉड मार्ग आहे त्याचबरोबर मुंबई चेन्नई दिल्ली आणि मुंबई मंगलोर कोकण रेल्वेचा ब्रॉड मार्ग किनारा आहे असं महाराष्ट्रामध्ये रेल्वे मार्गाचा खूप मोठ्या प्रमाणामध्ये विस्तार झालेला आहे.

### ३) हवाई वाहतूक

आधुनिक काळात वाहतूक क्षेत्रात अधिक गतिमान वाहतूक म्हणून ओळखली जाणारी हवाई वाहतूक हवाई वाहतुकीला आनंद साधारण महत्त्व आहे भारताप्रमाणे महाराष्ट्रात देशांतर्गत आंतरराष्ट्रीय अशा दोन्ही हवाई वाहतूक व्यवस्था उपलब्ध आहेत हवाई वाहतुकी खर्चिक वाहतूक व्यवस्था असली तरीही व्यवस्था वेळेची बचत करणारी आहे राज्यात हवाई वाहतुकीचे जाळे निर्माण करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात विमानतळाची सोय करण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे भारतासारख्या खंडप्राय देशात तत्परतेने वाहतूक करण्यासाठी व अमूल्य वेळ वाचवण्यासाठी प्रभावी ठरते 1911 मध्ये हवाई वाहतुकीचा मार्ग सुरू झाला असला तरी हवाई वाहतुकीची सुरुवात खऱ्या अर्थाने 1927 मध्ये नागरी हवाई उड्डाण विभागाच्या स्थापनेबरोबरच झाली 1950 पर्यंत 21 कंपन्याची स्थापना करण्यात आली या कंपन्यांच्या सेवेमध्ये समन्वय नसल्यामुळे आणि परस्परातील स्पर्धेमुळे जवळपास सर्वच कंपन्यांना नुकसान सहन करावे लागले हवाई कंपन्यांच्या सरकार द्वारा नियमितपणे आर्थिक साह्य देऊन हवाई वाहतूक चालू ठेवण्याचा प्रयत्न केला परंतु त्याची स्थिती गंभीर झाल्यामुळे सरकारने मे १९७३ मध्ये हवाई महामंडळ अधिनियम पास करून हवाई वाहतुकीचे राष्ट्रीयीकरण केले. महाराष्ट्रात मुंबई पुणे नागपूर औरंगाबाद हे आंतरराष्ट्रीय हवाई मार्गाचे प्रमुख केंद्र आहेत शांताक्रुज या विमानतळावर विदेशी विमानांची वाहतूक होते अलीकडे विमान वाहतुकीत खूप मोठे बदल झालेले आहेत प्रचंड मोठी व वेगवान विमान निघालेली आहे म्हणून शांताक्रुज जवळ छत्रपती शिवाजी विमानतळ हे नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्यात आले पुणे हे शिक्षणाच्या पंढरीचे क्षेत्र म्हणून ओळखले जाते म्हणून शैक्षणिक वायद्योगिक दृष्ट्या महत्त्व असल्याने पुण्याहून मोठ्या प्रमाणात हवाई वाहतूक चालते औरंगाबाद हे ऐतिहासिक ठिकाण म्हणून जवळ जगप्रसिद्ध

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

अजिंठा व वेरूळच्या लेण्या आहेत त्यामुळे औरंगाबादला पर्यटनाच्या दृष्टीने अतिशय महत्त्व आहे अजिंठा वेरूळ या लेण्या पाहण्यासाठी देशातून प्रदेशातून अनेक पर्यटक हवाई मार्गाने येतात नागपूर , सोलापूर नाशिक कोल्हापूर रत्नागिरी अकोला चंद्रपूर धुळे उस्मानाबाद जळगाव भंडारा कराड फलटण विमानतळे आहेत नागपूर हे हवाई मार्गाचे राज्यातील एक महत्त्वाचे केंद्र आहे आणि देशाच्या मध्यवर्ती भागात असल्याने विमान वाहतुकीला वाहतुकीच्या दृष्टीने नागपूरला महत्त्व आहे महाराष्ट्र शासनाने विशेष उद्देश कंपनी म्हणून 2002 मध्ये महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित ( एमआयडीसी ) स्थापन केलेली आहे. नागपूर येथील बहुआयामी आंतरराष्ट्रीय प्रवासी व नागपूर आंतरराष्ट्रीय विमानतळ हे प्रकल्प महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मार्फत कार्यान्वित क्षेत्र आहे राज्यातील तीन आंतरराष्ट्रीय व पाच देशांतर्गत विमानतळावरून करण्यात येणाऱ्या प्रवासी व मालवाहतुकीबाबतचा तपशील पाहता आंतरराष्ट्रीय प्रवासी हवाई वाहतूक मालवाहतुकीमध्ये 2005 6 च्या तुलनेत 2009-10 मध्ये वाढ झालेली आहे प्रवासी वाहतूक 2005 सहा मध्ये 103.87 लाख तर 2009-10 मध्ये अनुक्रमे 404. 02 लाख पर्यंत वाढलेली दिसून येते देशांतर्गत प्रवासी वाहतूक पुणे विमानतळावरून आंतरराष्ट्रीय प्रवासी वाहतूक म्हणून आंतरराष्ट्रीय विमानतळावरून हवे वाहतुकीचे सर्वाधिक महत्त्व दिसून येते.

**४) जलवाहतूक**

जलवाहतुकी इतर वाहतुकीच्या मानाने स्वस्त वाहतूक आहे जलवाहतूक ही समुद्र नद्या कालवे या मार्गाने जाते काही प्रमाणात वाहतुकीचा हा प्रकार श्रम प्रधान स्वरूपाचा आहे जलवाहतुकी भारतातील पारंपारिक पद्धतीची वाहतूक व्यवस्था म्हणून ओळखली जाते विदेशी व्यापाराच्या दृष्टीने ही वाहतूक महत्त्वाची आहे वस्तूची आयात निर्यात मोठ्या प्रमाणात या वाहतुकीमधूनच केली जाते महाराष्ट्रात ७२० किलोमीटर लांबीचा समुद्रकिनारा लाभला आहे महाराष्ट्राचा हा किनारा लगत सागरी वाहतुकीचा विकास मोठ्या स्वरूपात झालेला आहे. समुद्रकिनाऱ्यावर मुंबईसारखे नैसर्गिक बंदर असून कोकणच्या किनारपट्टीवर उत्तरेस डहाणूपासून दक्षिणेस खोलपर्यंत 48 नोंदणी करत लहान बंधारे आहेत याशिवाय चार उपबंधारे आहेत या सर्व बंदरातून अंतर्गत व्यापार आयात निर्यात व्यापार प्रवासी वाहतूक केली जाते मुंबई बंदर हे भारताचे आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे बंदर असून भारताचा बहुसंख्य विदेशी व्यापार ही या बंदरातूनच केला जातो मुंबई बंदरामध्ये मुंबई येथे मुंबई पोर्ट ट्रस्ट तसेच नावासेवा येथे जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट ही दोन बंधारे कार्यान्वित आहेत 2010 11 मध्ये मुंबई पोर्ट ट्रस्ट आणि जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट यांनी 455.89 लाख टन सागरी मालाचे वाहतूक केली मुंबई पोर्ट ट्रस्ट या बंदरातून 2005 सहा मध्ये एकूण मालवाहतूक 441.19 लाख टन इतकी करण्यात आली 2009-10 मध्ये एकूण मालवाहतूक 545.41 लाख टन इतकी करण्यात आली जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट या बंदरातून 2005-6 मध्ये एकूण मालवाहतूक 378.36 लाख इतकी असून त्यात आयात 185.37 लाख करण्यात आली दोन्ही बंदराचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे एकूण मालवाहतुकीमध्ये आयात निर्यातीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसून येते महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या नियंत्रणाखाली राज्यातील सर्व 48 लहान बंधारे खाजगी क्षेत्राच्या सहभागाद्वारे विकसित करण्याचा निर्णय घेतला लहान बंदरातून 2009-10 मध्ये करण्यात आलेली मालवाहतूक 125.10 लाख टन असून त्यात आयात निर्यात 13.37 लाख टन इतकी करण्यात आली 256 च्या तुलनेमध्ये 2009-10 मध्ये एकूण प्रवासी वाहतुकीमध्ये वाढ झालेली दिसून येते.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

स्वतंत्र भारतात रेल्वेचा अर्थसंकल्प भारतीय अर्थसंकल्पाहून वेगळा मांडला जातो. आज वास्तविक अशी गरज नाही व जगात कोणतेही सरकार असा स्वतंत्र अर्थसंकल्प मांडत नाही. विकसित देशांत तर रेल्वेचे खासगीकरण झाले आहे. तेथे रेल्वेमार्ग वेगळ्या कंपन्यांच्या मालकीचे असतात, तर रेडिओ लहरींप्रमाणे या मार्गावर धावणाऱ्या गाडय़ा वेगळ्या कंपन्यांच्या मालकीच्या असतात. यामुळे एकाच रेल्वेची मक्तेदारी न राहता, स्पर्धात्मक उद्योगामुळे त्या मार्गाची व गाडय़ांच्या वाहतुकीची उत्पादकता व कार्यक्षमता सतत वाढती ठेवावी लागते. रेल्वे वाहतुकीची देशाच्या अर्थव्यवस्थेला होणारी मदत बघता स्पर्धात्मक रेल्वे उद्योग असणे गरजेचे असते. ब्रिटिशांनी मुळात ती खासगी उद्योगात सुरू केली, पण स्वतंत्र भारतात तिचे सरकारीकरण होऊन तिची मक्तेदारी आली व अनुत्पादन व अकार्यक्षमता या दोन्ही अवगुणांनी भारतीय अर्थव्यवस्थेचे मोठेच नुकसान केले आहे. १९५१ साली भारतीय रेल्वे एकूण मालवाहतुकीच्या ८९% हिस्सा वाहून नेत होती. १९८६-८७ मध्ये हा हिस्सा केवळ ५३% वर आला तर २००७/०८ च्या आकडेवारीनुसार हा हिस्सा केवळ ३०% वर आला आहे. वास्तविक रेल्वे वाहतूक ही किंमत व पर्यावरण या दोन्ही दृष्टींनी अर्थव्यवस्थांना किफायतशीर ठरत असताना गेल्या ६५ वर्षांत मालवाहतुकीच्या त्याच्या घसरत्या हिश्शामुळे भारतीय अर्थव्यवस्थेचे ३८,५०० कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा एक अंदाज वर्तवण्यात आला आहे. आज भारतीय रेल्वेचे जाळे हे ६३,३२७ कि.मी. म्हणजेच जगातील तिसऱ्या क्रमांकाचे एवढे मोठे आहे. ७,००० फलाट असणारी ही रेल्वे ही जवळजवळ १४ लाख लोकांना नोकरी व रोजगार पुरवते. ७३८ कि.मी. लांब कोकण रेल्वे ही त्यावरील २००० पूल व ९२ बोगदे यामुळे जागतिक उत्तमतेचा नमुना आहे. आपल्या तंत्रज्ञांकडे अत्याधुनिक तंत्रज्ञान आहे, पण त्याचा उपयोग या प्रचंड रेल्वेच्या जाळ्याचा कार्यक्षमतेने वापर करण्यासाठी होत नाही. भारतीय अर्थव्यवस्थेत आज रेल्वे फक्त २ लाख कोटी टन कि.मी. इतक्या मालाची ने-आण करते. जर अर्थव्यवस्था ८% नी वाढणार असेल तर ही वाहतूक ९.७% नी वाढेल व २०३१-३२ पर्यंत रेल्वेला १३ लाख कोटी टन कि.मी. म्हणजेच सध्याच्या ६.५ पट जास्त मालवाहतूक करावी लागेल. सरकारने रेल्वेच्या बाबतीत काही क्रांतिकारक धोरणात्मक बदल केले तरच हे शक्य होऊ शकेल. रस्ते वाहतूक ही रेल्वेप्रमाणेच देशाच्या अर्थव्यवस्थेची जरुरी आहे. रेल्वेच्या वाहतुकीतला जो हिस्सा कमी होत गेला तो रस्ते वाहतुकीने उचलला. ९०च्या दशकात साधारण २० कि.मी. रस्त्यांचे जाळे वार्षिक ३% च्या वेगाने वाढत जाऊन आज ४० लाख कि.मी. इतके झाले आहे. पण याच काळात वाहनांची संख्या मात्र वार्षिक १५% नी वाढत गेल्याने अर्थात वाहतूक घनता सतत वाढत राहिली. यामुळे रस्त्यावर वाहतुकीची कोंडी, इंधनाचा अपव्यय, धुराचा होणारा पर्यावरणऱ्हास, यामुळे या देशाला रस्ते वाहतूक आर्थिक व सामाजिक खर्चाचा विचार करता खूपच महाग पडत आहे. जागतिक पातळीवर दर कि.मी.चा खर्च कॅनडामध्ये १२ रुपये आहे, जपानमध्ये २२ रुपये आहे, फ्रान्समध्ये ३२ रुपये तर भारतात ४२ रुपये एवढा आहे. यात सामाजिक खर्चाची बेरीज केली तर दर कि.मी.चा खर्च १०० रुपयांच्याही वर जाईल. भारतीय अर्थव्यवस्थेला हा खर्च परवडण्यासारखा नाही. वर सांगितलेल्या ४० लाख कि.मी.पैकी केवळ १४ लाख कि.मी. रस्ते हे डांबर, सिमेंटने आच्छादित आहेत, तर १० लाख कि.मी. हे रेती व दगडाच्या तुकडय़ांनी आच्छादित आहेत. बाकी सर्व कच्चे रस्ते आहेत. या रस्त्यांवरून आज भारतातील ६१% मालवाहतूक होते व ती वार्षिक १६ ते १८% नी वाढत आहे. रेल्वेपेक्षा गेल्या २० वर्षांत भारतात रस्त्यांची बऱ्या प्रकारे वाढ झाली आहे. २०१३ पर्यंत भारतात ७० हजार कि.मी.चे राष्ट्रीय महामार्ग असल्याचे दाखवण्यात आले आहे, तर केवळ १२०८ कि.मी.चे द्रुतगती मार्ग झाले आहेत. राष्ट्रीय महामार्गापैकी ३८% महामार्ग हे मुंबई-गोवा मार्गासारखे सिंगल लेन आहेत, तर ५५% मार्ग हे दुहेरी लेनचे आहेत.वाहतूक उद्योगाचे अर्थव्यवस्थेतील महत्त्व जाणून घेताना केंद्र व राज्य या दोन्ही सरकारांनी एका व्यापक धोरणाची आखणी करणे जरुरी आहे. कारखान्यातील माल थेट बाजारपेठेत किंवा बंदरात इष्टतम पद्धतीने कसा जाईल यासाठी वेगवेगळी मंत्रालये व वेगवेगळी धोरणे असण्यापेक्षा एकच वाहतूक मंत्रालय व

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

व्यापक सर्वसमावेशक धोरण आखणे जरुरी आहे. पुढच्या २० वर्षांत जवळजवळ ३० ते ४० लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीची आवश्यकता असणाऱ्या या क्षेत्राकडे म्हणूनच अधिक गांभीर्याने पाहणे जरुरी आहे व वाढत्या अर्थव्यवस्थेसाठी अनिवार्य आहे.

**वाहतूक व्यवस्थेचे महत्त्व**

**१) वाहतुक व उत्पादन**

औद्योगिक व कृषी उत्पादन कार्यासाठी वाहतूक यंत्रणा मोठ्या प्रमाणावर चालना देते. उत्पादन कार्यासाठी लागणारी यंत्रसामुग्री, श्रम, कच्चा माल इ. उत्पादनांचा पुरवठा, उत्पादित मालाला बाजारपेठेपर्यंत नेणे इ. विविध क्रिया सुदृढ वाहतूक व्यवस्थेने नियमितपणे पार पाडल्या जातात. परिणामी उत्पादकांना आदाने, मालाला योग्य बाजारपेठ, ग्राहकांना गुणवत्तापूर्ण व दर्जेदार, स्वस्त वस्तूंचा पुरवठा इ. गोष्टी सहज शक्य होतात. यातून उत्पादन कार्याला दिशा व गती प्राप्त होते.

**२) वाहतुक व विभाजन**

भूमी, श्रम, भांडवल व संयोजक या उत्पादन घटकांना अनुक्रमे खंड, वेतन, व्याज, नफा या स्वरूपात मोबदले प्राप्त होतात. एकूण राष्ट्रीय उत्पन्नांचेच वाटप या पद्धतीने होत असते, वाहतूक व्यवस्था हा या संपत्ती विभाजनातील मुख्य दुव्वा असतो. कारण श्रमबाजार इतर क्षेत्रासाठी वाहतुकीने खुला होतो. यातूनच जमिनीच्या, भांडवलाच्या श्रमाच्या वापराचे नवनवे पर्याय पुढे येतात. त्याच्या गतीशीलतेत व मागणीत वाढ घडून येते. परिणामी त्यांना खंड, वेतन या स्वरूपात मिळणारे मोबदले वाढतात. भूमी, श्रम, कच्चा माल इ. ची युक्त उपलब्धता संयोजकांना नवनव्या उत्पादन कार्यांना प्रेरणा देतात. थोडक्यात वाहतुकीच्या विकास आणि विस्तारातून संपत्तीच्या विभाजनाचा प्रश्न योग्यरित्या सोडविला जातो.

**३) वाहतुक व भूमीचा वापर**

आधुनिक वाहतूकीच्या साधनांचा विकास आणि विस्तार जसजसा होत गेला तसतसे विकासाच्या प्रवाहापासून दूर राहिलेल्या मागास, दुर्गम, डोंगराळ प्रदेशांना मुख्य प्रवाहाशी जोहता आले. परिणामी तिथल्या उत्पादन घटकांच्या व नैसर्गिक संसाधने यांच्या युक्त वापराच्या नव्या संधी निर्माण होतात. उद्योग, व्यापार यांचे नवनवे प्रकल्प उभे राहतात. पायाभूत सुविधांच्या निर्मितीला वेग येतो. यामधून शेती, उद्योग, सेवा, वाहतुक, दळणवळण इ. विविध क्षेत्रांसाठी जमिनीची मागणी व वापर वाढतो. परिणामी त्याचा खंड वाढून विकासाला गती प्राप्त होते.

**४) वाहतूक व शेती**

अलिकडील काळात ग्रामीण व शहरी भागात वाहतुकीच्या सोयी व साधनांच्या उपलब्धतेमुळे शेतीचे उत्पादन, उत्पादकता, विपणन, प्रक्रिया यांमध्ये खूप सुधारणा होत आहे. आधुनिक शेतीसाठीची अवजारे, यंत्रे,तंत्रज्ञान, खते, बी-बीयाणे, जंतू व किटकनाशके, सिंचनासाठीची साधने, साठवणूक, प्रक्रिया, प्रतवारी, पॅकेजींगच्या सोयी, जाहिराती,

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

प्रशिक्षण, संशोधन इ. असंख्य गोष्टी आता थेट शेतकऱ्यांच्या घरापर्यंत व बांधापर्यंत पोहचल्या आहेत. उत्पादन कार्यासाठीची आदाने व उत्पादित मालाची विक्री यामध्ये 'वाहतुक हा महत्त्वाचा घटक ठरत आहे.

**५) वाहतुक व रोजगार**

. रस्ते, रेल्वे, जलवाहतूक व हवाई वाहतूक अशा सर्वच प्रकारांमध्ये रोजगार निर्मिती घडून येते. वाहतुकीच्या पायाभूत सुविधांच्या निर्मितीमध्ये म्हणजे रस्ते, बस स्थानके, रेल्वे रूळ, रेल्वे स्टेशन्स, बंदरे, विमानतळे इ. च्या उभारणीसाठी मोठ्या प्रमाणावर श्रमाला मागणी असते. वाहने, रेल्वे, विमाने, जहाजे यांच्या निर्मिती व देखभालीचे असंख्य उद्योग आज लाखो लोकांना रोजगार देत आहेत. वाहतुकीच्या सोयी व साधने यांची निर्मिती करणाऱ्या उद्योगांनाही लागणारा कच्चा माल, अवजारे, यंत्रे, यांची निर्मिती व पुरवठा करणाऱ्या क्षेत्रांमध्ये व व्यावसायात देखील रोजगार संधी वाढत आहेत. रस्ते, रेल्वे, सागरी व विमान वाहतुकीच्या व्यवस्थापन कार्यामध्ये देखील अनेक रोजगारसंधी वाढत आहेत. सध्याच्या 'वाहतूक व्यवस्थेत माहिती तंत्रज्ञानाच्या वापरावर भर दिला जात आहे. त्यामुळे त्या क्षेत्रातही रोजगार निर्मितीला चालना मिळत आहे.

६) वाहन उद्योगाला चालना :

वाहतुकीच्या विविध सोयी उपलब्ध असतील तर वाहन उद्योगाला चालना मिळते. टू-व्हीलर, थ्री-व्हीलर, फोर व्हीलर इ. प्रकारच्या प्रवासी व मालवाहतुक गाड्यांचा वापर व मागणी वाढत जाते. परिणामी त्याच्या उत्पादनातही वाढ होते. विविध देशी, विदेशी व बहुराष्ट्रीय कंपन्या मोठ्या प्रमाणावर वाहन उद्योगामध्ये विस्तार करत आहते.

७) व्यवसायाच्या नवनव्या संधी निर्माण होतात :

एखाद्या देशात जसजशी वाहतुक क्षेत्राची प्रगती होत जाते तसतशा अनेक नव्या व्यवसाय संधी निर्माण होतात. बस स्थानक, रेल्वे स्टेशन, विमानतळे इ. ठिकाणी दुकाने, हॉटेल्स, लॉजिंग इ. साठी व्यावसायिक संधी निर्माण होतात. हायवे लगत ढाबे, हॉटेल्स, मॉल्स यांचे व्यवसाय उभे राहतात. किरकोळ विक्रेते, फेरीवाले, रिक्षा इत्यादींना संधी निर्माण होतात. विविध टोलनाक्यांवर स्थानिक फळे, भाजीपाला इत्यादींची विक्री करता येते.

८) व्यापाराला चालना :

रस्ते, रेल्वे, जल व हवाई वाहतूकीच्या प्रगतीतून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय व्यापाराला चालना मिळते. ग्रमीण व शहरी भागांतील शेती व उद्योगांत निर्माण झालेल्या वस्तू व उत्पादने रस्ते वाहतूकीने रेल्वे स्टेशनपर्यंत व रेल्वेने बंदरांपर्यंत वाहून नेता येतात व जलमार्गांने त्याची परकीय निर्यात होते. याच पद्धतीने परदेशातून आयात केलेला माल देशाच्या विविध भागांत वितरीत केला जातो. देशाच्या विविध प्रादेशिक व राज्या-राज्यांतील भागात देखील अशाच वस्तूंची आयात-निर्यात वाहतूक साधनांद्वारे केली जाते. परिणामी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय व्यापाराला उत्तेजन मिळते.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

९) शेती क्षेत्राला चालना :

औद्योगिक क्षेत्रात निर्माण होणारी यंत्रे-अवजारे, खते, जंतुनाशके, किटक नाशके इ. वाहतुकीद्वारे ग्रामीण भागात पोहोचविली जातात व खेड्यामध्ये शेतीत निर्माण होणारे धान्य, फळ, भाजीपाला, दूध दररोज शहरांमध्ये नागरीकांपर्यंत पोहोचविला जातो. ग्रामीण भागातील शेतीत गुंतलेल्या लोकांना शहरांतील बाजारपेठांशी वाहतुक जोडते. त्यामुळे त्यांचा राहणीमानाचा दर्जा उंचावतो.
वाहन उद्योगाला चालना वाहतुकीच्या विविध सोयी उपलब्ध असतील तर वाहन उद्योगाला चालना मिळते. टू-व्हीलर, थ्री-व्हीलर,फोर व्हीलर इ. प्रकारच्या प्रवासी व मालवाहतुक गाड्यांचा वापर व मागणी वाढत जाते. परिणामी त्याच्या उत्पादनातही वाढ होते. विविध देशी, विदेशी व बहुराष्ट्रीय कंपन्या मोठ्या प्रमाणावर वाहन उद्योगामध्ये विस्तार करत आहते.

१०) व्यवसायाच्या नवनव्या संधी निर्माण होतात :

एखाद्या देशात जसजशी वाहतुक क्षेत्राची प्रगती होत जाते तसतशा अनेक नव्या व्यवसाय संधी निर्माण होतात. बस स्थानक, रेल्वे स्टेशन, विमानतळे इ. ठिकाणी दुकाने, हॉटेल्स, लॉजिंग इ. साठी व्यावसायिक संधी निर्माण होतात. हायवे लगत ढाबे, हटिल्स, मॉल्स यांचे व्यवसाय उभे राहतात. किरकोळ विक्रेते, फेरीवाले, रिक्षा इत्यादींना संधी निर्माण होतात. विविध टोलनाक्यांवर स्थानिक फळे, भाजीपाला इत्यादीची विक्री करता येते.

**संदर्भ सूची**

- महाराष्ट्राची अर्थव्यवस्था - डॉ. र. पु. कुरलकर
- महाराष्ट्राची अर्थव्यवस्था - डॉ. माधव बिरादार
- योजना मासिक – नोव्हेंबर 2015
- Wikipedia
- https://vishwakosh.marathi.gov. in
- महाराष्ट्राची अर्थव्यवस्था - प्रा. भालेराव / प्रा. निकम

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
*SPECIAL ISSUE ON MARATHI AARTHSHASHTRA PARISHED Nov. 2023*

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

# कृषी विकास योजनांचा अभ्यास

**डॉ.सत्यम काकासाहेब सानप[1], महेश रामराव भोसले[2]**
1, सहयोगी प्राध्यापक, इंद्रायणी महाविद्यालय, तळेगाव दाभाडे, पुणे.
मोबाईल नंबर- +91-9881370468, ईमेल- satyamsanap26@gmail.com
2, संशोधक, रामकृष्ण मोरे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय आकुर्डी, पुणे.
मोबाईल नंबर- +91-7020220341, ईमेल- mbhosale87@gmail.com

**१ .प्रस्तावना:**

भारत हा एक विकसनशील देश आहे जिथे बहुतांश लोकसंख्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे त्यांच्या उपजीविकेसाठी शेतीवर अवलंबून आहे. २०११ च्या जनगणनेनुसार, ६८.८४ % लोक खेड्यात राहतात. त्यामुळे शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी कृषी योजना राबविण्याची गरज आहे. भारत सरकारने शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी शेतकऱ्यांच्या कल्याणाला आपले पहिले प्राधान्य मानले आहे. जलद औद्योगिकीकरण हेच आर्थिक प्रगतीचे सूत्र आहे हा एक सामान्य गैरसमज आहे. मात्र, शेतीशिवाय औद्योगिक प्रगती शक्य नाही. भारतातील सुमारे दोन तृतीयांश लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे, ज्यामुळे ते तेथील सर्वात लक्षणीय मुख्य उद्योगांपैकी एक बनले आहे. यासाठी केंद्र सरकारने शेती क्षेत्रासाठी महत्वपूर्ण योजना सुरु केल्या आहेत . या कृषी योजना शेतकऱ्यांसाठी अधिक फायदेशीर आहेत. या शोधनिबंधामध्ये भारतातील शेती क्षेत्रासाठी सुरु केलेल्या तीन महत्त्वाच्या सरकारी योजनांचा अभ्यास केलेला आहे .

**२ . उद्दिष्टे:**

या शोधनिबंधाचे मुख्य उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत
(१) भारत सरकारच्या शेतीसाठीच्या विविध योजना आणि कार्यक्रम जाणून घेणे.
(२) योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचतात की नाही हे शोधणे.
(३) विविध योजनांद्वारे आर्थिक समावेशन जाणून घेणे.

**३ .साहित्याचे पुनरावलोकन:**

१ प्रधान, आणि मोहापात्रा (२०१५ ) यांनी सांगितले की, कृषी आणि उपक्रमांमध्ये आयसीटीच्या यशस्वी वापरासाठी विपुल भविष्याची भेट आहे. तथापि, अद्याप बरेच काही तयार करणे बाकी आहे. या नंतरच्या शिफारशींच्या अंमलबजावणीमुळे शेतीमध्ये ICT ची पूर्ण शक्यता स्वीकारण्यात मदत होऊ शकते.

२ अर्घ्य दास आणि नीलमाधव पटनायक (२०२० ) कृषी उत्पादनात कृषी पत महत्त्वाची भूमिका बजावते. या संशोधन लेखात असे म्हटले आहे की शेतकऱ्यांना योग्य वेळेत कर्ज उपलब्ध होणे गरजेचे आहे ज्यामुळे शेतीचे उत्पन्न वाढते.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

**४ . संशोधन पद्धती :**

हा अभ्यास दुय्यम माहितीवर आधारित आहे ज्यात सरकारी अहवाल, वेबसाइट डेटा, वेगवेगळ्या जर्नल्समध्ये प्रकाशित लेख, ऑनलाइन लेख, वृत्तपत्रे यांचा समावेश आहे.

**५ .केंद्र सरकारच्या योजना:**

या शोधनिबंधामध्ये भारतातील शेती क्षेत्रासाठी सुरु केलेल्या तीन महत्त्वाच्या सरकारी योजनांचा अभ्यास केलेला आहे.

**५.१ ई-नाम----**

e-NAM, डिजिटल ई-मार्केटिंग उपक्रम १४ एप्रिल २०१६ रोजी सुरू करण्यात आलेला आहे. आतापर्यंत १८ राज्ये आणि ३ केंद्रशासित प्रदेशांमध्ये १००० APMC मंडई यशस्वीरित्या समाकलित करण्यात आल्या आहेत, ज्यामध्ये १७५ वस्तूंची नोंद करण्यात आली आहे. एकात्मिक बाजारपेठेतील प्रक्रिया सुव्यवस्थित करून आणि उत्पादनांच्या वास्तविक वेळेच्या किंमत शोधांना प्रोत्साहन देऊन कृषी विपणनामध्ये एकसमानता आणण्याच्या दृष्टीकोनातून या व्यासपीठाची सुरुवात करण्यात आली आहे. यामुळे शेतकरी आणि इतर भागधारकांसाठी मोठी बाजारपेठ निर्माण झाली आहे

- ई-नामची वैशिष्ट्ये:

i भाषा: ई-नाम वेबसाइट आणि पोर्टल १२ भाषांमध्ये उपलब्ध आहे जसे की इंग्रजी, हिंदी, बंगाली, मराठी, गुजराती, तमिळ, तेलुगू, पंजाबी, ओडिया, डोगरी, मल्याळम आणि कन्नड.

ii GPS आधारित eNAM मंडी लोकेटर : शेतकरी/विक्रेते मोबाईल ॲपद्वारे GPS आधारित मंडी लोकेटर वैशिष्ट्य वापरून त्यांच्या जवळपासची eNAM मंडी शोधू शकतात. या विकासामुळे वापरकर्त्याला १०० किलोमीटरच्या त्रिज्यापर्यंत निवडलेल्या मंडई सहजपणे शोधून त्यापर्यंत पोहोचण्यास आणि त्यांचे कृषी उत्पादन विकण्यास मदत होते.

iii ऑटो सेल करार: अंमलबजावणी वेळ कमी करण्यासाठी ऑटो सेल करार वैशिष्ट्य जोडले गेले आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या व्यवहाराची प्रतीक्षा करण्याची वेळ कमी झाली आहे.

iv. BHIM पेमेंट सुविधा तसेच मोबाइल ॲप्लिकेशनद्वारे पेमेंट करण्याची सुविधा देते

v.ई-लर्निंग मॉड्यूल: नोंदणी, ई-नाम प्रक्रिया इत्यादींचे ई-लर्निंग मॉड्यूल शेतकरी भागधारकांसाठी ई-नाम वेबसाइटवर उपलब्ध आहे.

- **शेतकऱ्यांना होणारा फायदा :---**

-- eNAM मोबाईल ॲपवर शेतकरी मालाच्या प्रचलित किमती आणि गेल्या ३ दिवसांची माहिती अगदी मंडीत जाण्यापूर्वी पाहू शकतात.
-- शेतकरी त्यांच्या उत्पादनाची थेट ऑनलाइन बोलीमूल्य मोबाईलद्वारे पाहू शकतात.
-- शेतकऱ्याच्या मालाच्या अंतिम बोली दराचा तपशील शेतकऱ्याला एसएमएसद्वारे प्राप्त होतो.
-- शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट बोली मूल्य हस्तांतरित करण्यासाठी ऑनलाइन पेमेंट गेटवे उपलब्ध आहे.
-- शेतकरी आपला माल एकापेक्षा जास्त बाजारात विकू शकतात.
-- e-NAM देशभरातील खरेदीदार/व्यापारी आणि शेतकरी यांच्यात थेट व्यापार सुलभ करते.
-- गुणवत्तेचे परीक्षण केलेल्या मापदंडांवर आधारित किंमती.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

- **eNAM ची अखिल भारतीय कामगिरी (३१ मार्च २०२१ पर्यंत):**

अ) भागधारकांची नोंदणी---
ई-नाम वर नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांची संख्या : १.७० कोटी
नोंदणीकृत व्यापाऱ्यांची संख्या : १.६४ लाख
नोंदणीकृत कमिशन एजंटची संख्या : ९०९८०

ब) व्यापार रेकॉर्ड----
एकूण व्यापाराची नोंद : ४.३१ कोटी MT
नोंदवलेले व्यापार मूल्य : रु. १३०७५३ कोटी
व्यापार करण्यायोग्य वस्तू अधिसूचित: १७५ वस्तू

• १.७५ कोटी पेक्षा जास्त शेतकरी आणि २.४३ लाख व्यापाऱ्यांनी e-NAM प्लॅटफॉर्मवर नोंदणी केली आहे (३१ मार्च २०२३ पर्यंत).
• २५७७ FPOs e-NAM प्लॅटफॉर्मवर ऑनबोर्ड केले गेले आहेत.
• e-NAM प्लॅटफॉर्मवर २.५० लाख कोटी रुपयांचे व्यापार मूल्य नोंदवले गेले आहे.
• १६ मार्च २०२३ पर्यंत, २३ राज्ये आणि ४ केंद्रशासित प्रदेशातील १३६१ मंडई e-NAM प्लॅटफॉर्मसह एकत्रित करण्यात आल्या आहेत.
• डिजिटल इंडिया अवॉर्ड २०२२ : कृषी मंत्रालयाच्या इलेक्ट्रॉनिक नॅशनल ॲग्रिकल्चर मार्केट (e-NAM) उपक्रमाने नागरिकांच्या डिजिटल सक्षमीकरण श्रेणीमध्ये प्लॅटिनम पुरस्कार (पहिला) जिंकला.

स्रोत:https://enam.gov.in/web/assest/download/eNAM_Directory
स्रोत: https://pib.gov.in

**५.२ पीएम-किसान योजना:**

हि योजना भारत सरकारने १ डिसेंबर २०१८ मध्ये अंमलात आणली आहे. या योजनेचा मुख्य उद्देश जमीन धारक कुटुंबांना रुपये ६००० प्रति वर्ष समान आर्थिक सहाय्य देणे आहे. या योजनेंतर्गत भारत सरकारकडून लाभार्थ्यांच्या बँक खात्यांमध्ये हा निधी थेट हस्तांतरित करण्यात येणार आहे . कुटुंब व्याख्येनुसार पती, पत्नी आणि मुले यांचा समावेश होतो आणि या कुटुंबाला राज्य सरकार आणि केंद्रशासित प्रदेश प्रशासनाकडून मान्यता दिली जाईल जे या योजनेच्या लाभासाठी योग्य आहेत.

२०१९ मध्ये, भारत सरकारने PM किसान सन्मान निधी (PM-KISAN)1 सुरु केले जेणेकरून प्रत्येक शेतकऱ्याला वर्षाला ६०००रु.चे खात्रीशीर रोख हस्तांतरण प्रदान केले जाईल. नियमित हप्त्यांमधून मिळणाऱ्या या पूरक उत्पन्नामुळे अगदी लहान शेतकऱ्यांनाही चांगल्या दर्जाच्या निविष्ठा खरेदी करणे, त्यांच्या जमिनीची उत्पादकता सुधारणे आणि त्यांचे उत्पन्न वाढवणे शक्य झाले आहे.

खालीलप्रमाणे एकूण देयके (रु ) वितरीत केली गेले आहेत .

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

| महिने आणि वर्ष | एकूण देयके (रु.) |
|---|---|
| ऑगस्ट-नोव्हेंबर २०२१ -२२ | १०७८०३८९२ |
| एप्रिल-जुलै २०२१ -२२ | ११०९८९४५५ |
| डिसेंबर-मार्च २०२०-२१ | १०२३४५१३२ |
| ऑगस्ट-नोव्हे २०२०-२१ | १०२२८१६७३ |
| एप्रिल-जुलै २०२०-२१ | १०४९२८८६० |
| डिसेंबर-मार्च २०१९-२० | ८९५८७९५९ |
| ऑगस्ट-नोव्हेंबर २०१९-२० | ८७६१९८४४ |
| एप्रिल-जुलै २०१९-२० | ६६३१८४३९ |
| डिसेंबर-मार्च २०१८-१९ | ३१६०८९२७ |

स्त्रोत:pmkisan.gov.in

- **पीएम-किसान उपलब्धी:**

--३१ ऑगस्ट २०२२ पर्यंत, या योजनेअंतर्गत ११.३७ कोटी शेतकऱ्यांना लाभ झाला आहे पात्र लाभार्थ्यांना ११ हप्त्यांमध्ये दोन लाख कोटी रु. पेक्षा जास्त निधी मिळाला आहे.
--ही योजना सुरुवातीला दोन हेक्टरपर्यंत जमीनधारक असलेल्या लहान आणि सीमांत शेतकऱ्यांसाठी होती परंतु १-६-२०१९ पासून सर्व भूधारक शेतकऱ्यांना समाविष्ट करण्यासाठी योजनेची व्याप्ती वाढवण्यात आली.
--PM-KISAN ने आर्थिक वर्ष २०२०-२१ साठी योजनेचे हप्ते फ्रंटलोड करून कोविड-१९ महामारीचे प्रतिकूल परिणाम प्रभावीपणे कमी करण्यात मदत केली. १.२९ लाख कोटी रु. महामारी दरम्यान (२३ फेब्रुवारी २०२२ पर्यंत) वितरीत करण्यात आले आहेत.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

**५.३ प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना (PMKSY):**

PMKSY हि योजना २०१५ मध्ये शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढवणे, खात्रीशीर सिंचनाखाली लागवडीयोग्य क्षेत्राचा विस्तार करणे, पाणी वापर कार्यक्षमता सुधारणे आणि शाश्वत जलसंधारण पद्धतींना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आली आहे . ही केंद्र प्रायोजित योजना (कोअर स्कीम) आहे, जिथे केंद्र-राज्यांचा
वाटा ७५ :२५ आहे . उत्तर-पूर्व प्रदेश आणि डोंगराळ राज्यांच्या बाबतीत केंद्र-राज्यांचा वाटा ९० :१० असेल. २०२० मध्ये, जलशक्ती मंत्रालयाने PMKSY अंतर्गत प्रकल्पांच्या घटकांच्या जिओ-टॅगिंगसाठी मोबाइल ॲप्लिकेशन सुरू केले.

**उद्दिष्टे:**

-- शेतात पाण्याचा भौतिक प्रवेश वाढवणे आणि खात्रीशीर सिंचनाखाली लागवडीयोग्य क्षेत्र वाढवणे (प्रत्येक शेतीला पाणी ).

-- योग्य तंत्रज्ञान आणि पद्धतींद्वारे पाण्याचा सर्वोत्तम वापर करण्यासाठी जलस्रोत, वितरण आणि त्याचा कार्यक्षम वापर यांचे एकत्रीकरण.

--सिंचन आणि इतर पाणी बचत तंत्रज्ञान (प्रति थेंब अधिक पीक), शाश्वत जलसंधारण पद्धती लागू करणे

-- माती आणि जलसंधारण, भूजलाचे पुनरुत्पादन, पाणी व्यवस्थापन आणि पीक संरेखनाशी संबंधित विस्तार क्रियाकलापांना चालना देणे .

PMKSY ही एकछत्री योजना आहे, ज्यामध्ये जलशक्ती मंत्रालयामार्फत राबविण्यात येत असलेल्या दोन प्रमुख घटकांचा समावेश आहे, ते म्हणजे, प्रवेगक सिंचन लाभ कार्यक्रम (AIBP), आणि प्रत्येक शेतीला पाणी (HKKP). HKKP मध्ये चार उप-घटकांचा समावेश होतो: कमांड एरिया डेव्हलपमेंट आणि वॉटर मॅनेजमेंट (CAD&WM), पृष्ठभाग लघु पाटबंधारे (SMI), जल संस्थांची दुरुस्ती, नूतनीकरण आणि जीर्णोद्धार (RRR), आणि भूजल (GW) विकास.
याव्यतिरिक्त, PMKSY मध्ये पाणलोट विकास (WD) घटक आहे ज्याची अंमलबजावणी भूसंसाधन विभागाकडून केली जाते. पुढे, 2015-22 या कालावधीत, प्रति ड्रॉप मोअर क्रॉप (PDMC) घटक देखील PMKSY अंतर्गत कृषी आणि शेतकरी कल्याण विभागामार्फत राबविण्यात येत होता.

भूजल आणि प्रति ड्रॉप मोअर क्रॉप घटक वगळता PMKSY ची योजना भारत सरकारने २०२१-२२ ते २०२५-२६ या कालावधीसाठी खालील उद्दिष्टांसह मंजूर केली आहे:

i AIBP मध्ये CAD&WM: ६० चालू AIBP, ८५ चालू ,CAD&WM मोठे/मध्यम प्रकल्प पूर्ण करणे आणि AIBP अंतर्गत निधीसाठी आणखी प्रकल्पांचा समावेश. याशिवाय लखवार आणि रेणुका प्रकल्प या दोन राष्ट्रीय प्रकल्पांनाही निधी मंजूर झाला आहे. २०२१-२२ ते २०२५-२६ या कालावधीत AIBP अंतर्गत १३.८८ लाख हेक्टर सिंचन क्षमता आणि CAD&WM अंतर्गत ३०.२३ लाख लागवडीयोग्य कमांड एरिया कव्हरेजची कल्पना करण्यात आली आहे.

ii PMKSY-HKKP: ३.७ लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करणे आणि ०.८ लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करण्यासाठी भूपृष्ठीय लघुसिंचन आणि जलस्रोतांची दुरुस्ती, नूतनीकरण आणि पुनर्संचयित करण्यासाठी नवीन प्रकल्प हाती घेणे, २०२१-२२ ते २०२५-२६ या कालावधीसाठी मंजूर करण्यात आले आहे. याशिवाय, भूजल घटकाच्या अंमलबजावणीला केवळ २०२१-२२ साठी तात्पुरती मान्यता देण्यात आली आहे. भूजल घटकाखालील लक्ष्यित लाभ ८२२९० हेक्टर सिंचन होते.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

iii PMKSY-WD: PMKSY च्या पाणलोट विकास घटकांतर्गत ४९.५ लाख हेक्टर पर्जन्य/निकृष्ट जमिनीचा समावेश असलेले मंजूर प्रकल्प पूर्ण करणे, तसेच २.५ लाख हेक्टर अतिरिक्त क्षेत्र संरक्षित सिंचनाखाली आणणे, २०२१-२२ ते २०२२-२६ या कालावधीत अंमलबजावणीसाठी मंजूर करण्यात आले आहे.

- २०१५-१६ मध्ये PMKSY सुरु झाल्यापासून त्याच्या विविध घटकांमधील उपलब्धी खाली दिली आहे:

| PMKSY चे घटक | कालावधी वर्ष २०१६-२२ मधील उपलब्धी |
|---|---|
| जलद सिंचन लाभ कार्यक्रम(AIBP) | २४.३५ लाख हेक्टरची नवीन सिंचन क्षमता निर्माण झाली |
| आदेश क्षेत्र विकास आणि पाणी व्यवस्थापन (Command Area Development & Water Management) | १६.४२ लाख हेक्टर लागवडीयोग्य कमांड एरियाचा समावेश आहे |
| प्रत्येक शेताला पाणी - पृष्ठभाग लघुसिंचन | २.५८ लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली |
| प्रत्येक शेताला पाणी - दुरुस्ती, चे नूतनीकरण आणि जीर्णोद्धार जल संस्था | ०.८४ लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली |
| प्रत्येक शेताला पाणी – भूजल | जमिनीच्या पाण्याने ६९३७८ हेक्टर सिंचन केले. |
| प्रति थेंब अधिक पीक | ६१.७२ लाख हेक्टर क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली आले आहे |
| पाणलोट विकास | १४.५४ लाख हेक्टर अतिरिक्त क्षेत्र संरक्षणात्मक सिंचनाखाली आणले आहे |

स्रोत: https://pib.gov.in/PressReleaseIframePage.aspx?PRID=1848470

**निष्कर्ष :**

या अभ्यासातून विविध कृषी कार्यक्रमांची परिणामकारकता दिसून येते आणि या योजनांचे लाभ आणि लाभार्थी देखील ओळखले जातात. या संशोधनांतर्गत विविध वित्तीय सेवा, आर्थिक समावेशन, अनुदाने, जाहीर केलेला निधी, कृषी उत्पादनांसाठी ऑनलाइन प्लॅटफॉर्म, सूक्ष्म सिंचनासाठी निधी आणि सिंचन क्षेत्रात वाढ इत्यादी फायदे झालेले दिसून आले आहेत. बहुतांश योजना त्यांचे उद्दिष्ट पूर्ण करण्यात यशस्वी झाल्या आहेत. परंतु अजूनही काही कृषी योजनांचे उद्दिष्ट पूर्ण होणे बाकी आहे .या योजने सोबत इतर योजना प्रभावीपणे अमलात आल्यातर नक्कीच शेतकर्यांचे उत्पन्न दुप्पट होण्यास मदत होईल आणि भारतीय अर्थव्यस्थेला चालना मिळून GDP वाढ होण्यास मदत होईल.हा शोधनिबंध कृषी योजनांबद्दल जागरूकता प्रदान करतो.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

**संदर्भ:**

१ . https://enam.gov.in/
२ . https://pmksy.gov.in/
३. प्रधान महापात्रा (2015). ई-कृषी: भारतीय शेतकऱ्यांसाठी सुवर्णसंधी. इंटरनॅशनल जर्नल ऑफ रिसर्च अँड डेव्हलपमेंट - एक व्यवस्थापन पुनरावलोकन, 4 (1), 2319–5479.
४. अर्घ्यदीप दास आणि नीला माधव पटनायक (२०२०). ग्रामीण भारतातील आर्थिक समावेशासाठी कृषी पत वितरण आणि देयक प्रणालीमधील नवकल्पना. इंटरनॅशनल जर्नल ऑफ लाइव्हस्टॉक रिसर्च, 9(2), 23-30.
५ . https://www.india.gov.in/
६. https://pib.gov.in/indexd.aspx
७. http://niti.gov.in/
८. https://pmkisan.gov.in/

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
*SPECIAL ISSUE ON MARATHI AARTHSHASHTRA PARISHED Nov. 2023*

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

# केंद्र सरकारच्या विकास योजना आणि भारतीय शेती

**प्रा. डॉ.खोकले आर.के**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
शिवाजी महाविद्यालय, रेणापूर.
ता. रेणापूर जि. लातूर.
ईमेल: rkkhokale60@gmail.com

*** गोषवारा :-**

*भारतीय अर्थव्यवस्था ही कृषिप्रधान अर्थव्यवस्था आहे. भारतामध्ये नैसर्गिक साधनसंपदा विपुल प्रमाणात असूनही भारताच्या कृषी क्षेत्राचा विकास तेवढ्या प्रमाणात झालेला दिसून येत नाही. केंद्र सरकारच्या विकास योजना आणि भारतीय शेती या विषयावर संशोधन लेख लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. भारतात आतापर्यंत कृषी क्षेत्राशी संबंधित अनेक क्रांत्या झाल्या यामध्ये हरितक्रांती, स्वेतक्रांती,निळी क्रांती,पिवळी क्रांती, या वेगवेगळ्या क्रांत्या झाल्या असल्या तरी जगाचा पोशिंदा असणाऱ्या शेतकऱ्याचा विकास झाला आहे का? त्याच्या राहणीमानामध्ये सुधारणा झाली आहे काय? शेतीची उत्पादकता वाढली आहे काय? वाढली आहे असे वाटत असेल तर शेतकरी आत्महत्या का करतो? या सर्व बाबींचा सार मांडण्याचा प्रयत्न संशोधन लेखामध्ये केला आहे. केंद्र सरकारच्या विकास योजना राबविल्या जातात पण खरंच या योजनांचा गरजू शेतकऱ्यांना लाभ झाला आहे काय? खऱ्या अर्थाने शेतकरी व शेतीचा विकास व्हावा असे वाटत असेल तर शेतकऱ्याच्या मालाला योग्य भाव मिळणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांना त्यांनी उत्पादित केलेल्या मालाची किंमत ठरविण्याचा अधिकार शेतकऱ्याला मिळेल तेव्हाच खऱ्या अर्थाने शेतकऱ्याचे दारिद्र्य कमी होईल आणि शेती हा सर्वात मोठा उद्योग म्हणून गणला जाईल. भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीची भूमिका महत्त्वाची आहे. राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा जास्त आहे, रोजगार पुरविणारे क्षेत्र, परकीय चलन,ग्रामीण भागाची नाळ जुळणारे क्षेत्र म्हणून शेतीकडे पाहिले जाते. म्हणून गांधीजी म्हणतात खेड्याकडे चला खेडी स्वयंपूर्ण झाली पाहिजे तरच देशाचा विकास होऊ शकते असे मला वाटते.*

**प्रस्तावना:-**

भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारतात नैसर्गिक साधन सामग्री भरपूर प्रमाणात आहे. भारताचा शेती हा प्रमुख व्यवसाय असल्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था कृषी प्रधान अर्थव्यवस्था समजली जाते. शेती व्यवसाय हा जगातील सर्वश्रेष्ठ व महत्त्वपूर्ण व्यवसाय म्हणून मान्यता पावला आहे. हजारो वर्षांपूर्वी आदिमानव हा झाडाची फळे,कंदमुळे,डिंक गोळा करून आपला उदरनिर्वाह करीत होता. अलीकडे भारतीय अर्थव्यवस्था ही एक अविकसित अर्थव्यवस्थेकडून विकसनशील अर्थव्यवस्थेकडे वेगाने वाटचाल करणारी अर्थव्यवस्था आहे. शेती हा भारतातील सर्वात जुना व परंपरागत व्यवसाय आहे. आजही देशातील 58% लोकसंख्या शेती या प्रमुख व्यवसायावर अवलंबून आहे. देशात वेगवेगळ्या क्रांत्या झाल्या असल्या तरी भारत महासत्ता बनण्याची स्वप्न पाहत आहे. हे स्वप्न खरंच पूर्ण होऊ शकेल किंवा नाही याची

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

संवेदनशील मनाच्या माणसास भीती वाटते. " स्वप्ने कधीच मरत नसतात " असे म्हणतात, हे खरे असली तरी स्वप्न पाहणारा स्वप्न पाहता पाहता मरू शकतो. कारण ग्रामीण दारिद्र्य आणि विकासाबाबतची अवस्था अशी झाली आहे.

केंद्र शासनाने अनेक विकास योजना चालू केल्या आहेत.या विकास योजनांचा भारतीय शेतीला फायदा झाला आहे काय? शेतकऱ्याचे राहणीमान सुधारले आहे काय? शेतीची उत्पादकता वाढली आहे काय? शेतकऱ्याच्या जीवन आवश्यक गरजा पूर्ण झाल्या आहेत काय? अशा अनेक प्रश्नांची उकल करण्याचा प्रयत्न या संशोधन लेखाच्या माध्यमातून केला आहे.

*** संशोधनाची उद्दिष्टे :-**

1. विकास योजना चा थोडक्यात आढावा घेणे.
2. भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासात शेतीची भूमिका अभ्यासणे.

*** संशोधन पद्धती:-**

प्रस्तुत शोधनिबंधाकरिता दुय्यम साधनसामग्रीचा आधार घेण्यात आला आहे. यामध्ये संदर्भ ग्रंथ, मासिके,इंटरनेटचा आधार घेण्यात आला आहे. वरील उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून माहितीचे संकलन करण्यात आले आहे.

*** केंद्र सरकारच्या विकास योजनांचा आढावा :-**

ग्रामीण अर्थव्यवस्था शेतीवर आधारित आहे. बहुतांशी शेतकरी स्वतःच्या किंवा इतरांच्या शेतात काम करतात. ज्यांना ग्रामीण भागामध्ये काम मिळत नाही असे नागरिक शहराकडे स्थलांतर करतात. अशा परिस्थितीत गावातल्या गावात उत्पन्नाचे मार्ग,उत्पन्न करून देण्यासाठी आणि समृद्ध गाव- खेड्याचे स्वप्न साकारण्यासाठी केंद्र शासनाने अनेक विकास योजना सुरू केल्या आहेत. आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना ही प्रामुख्याने देशाच्या 2017 च्या राष्ट्रीय आरोग्य धोरणामध्ये नोंद केलेल्या सार्वत्रिक आरोग्य व्याप्तीचे लक्ष प्राप्त करण्यासाठी आहे. 1 एप्रिल 2022 च्या स्थितीनुसार आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेची व्याप्ती 14 कोटी कुटुंबीय आहेत. डिजिटल इंडिया एक पाऊल खेड्याकडे या योजनेअंतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदीचे स्वप्न भारताच्या प्रत्येक नागरिकाला इंटरनेटच्या विशाल दुनियेत जोडून जागतिक बनविण्यासाठी 1 जुलै 2015 रोजी दिल्लीतील इंदिरा गांधी इंडोर स्टेडियम वरून डिजिटल इंडिया ची घोषणा केली. श्यामाप्रसाद मुखर्जी रु अर्बन अभियान 6 जानेवारी 2016 रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी छत्तीसगड येथे सुरू केले. ग्रामीण भागाचा आर्थिक, सामाजिक व भौतिक विकास करण्यासाठी शहराप्रमाणे पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी या अभियानाची राज्यात अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेण्यात आला. स्टॅन्ड अप इंडिया 15 ऑगस्ट 2015 मध्ये सुरू करण्यात आली. अनुसूचित जाती -जमातीच्या उमेदवारांमध्ये तसेच महिलांमध्ये उद्योग क्षमता वाढविण्यासाठी ही योजना महत्त्वाची आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 16 जानेवारी 2016 रोजी स्टार्ट अप इंडिया

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

सुरू केली. स्टार्ट अप इंडिया ला मेक इन इंडिया ची पुढील साखळीच्या रूपात पाहिले जाते. मेक इन इंडिया 15 ऑगस्ट 2014 रोजी सुरू केली. अशा वेगवेगळ्या योजना केंद्र शासनाने शेती व उद्योगाच्या विकासासाठी सुरू केल्या आहेत. काही योजना चा संक्षिप्त आढावा आपण या संशोधन लेखात घेणार आहोत.

*** महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण हमी योजना :-**

2 ऑक्टोबर 2009 रोजी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे नाव बदलून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण हमी योजना असे करण्यात आले. या योजनेस मनरेगा या संक्षिप्त नावाने देखील ओळखले जाते. या रोजगार हमी कार्यक्रमांतर्गत रोजगारात वाढ होत आहे. पहिल्या वर्षात 2006-7 मध्ये 200 जिल्ह्यात 2.10 कोटी घराणा रोजगार दिला गेला. आणि 90.5 कोटी लोकांना रोजगार मिळाला. 2007-8 मध्ये 3.39 कोटी कुटुंबांना या कार्यक्रमांतर्गत रोजगार देण्यात आला. 2009 -10 मध्ये या योजनेसाठी 39 हजार 100 कोटी रुपये खर्च करण्यात येणार होते ते वाढवून 2010 -11 मध्ये 40 हजार 100 कोटी रुपये करण्यात आले. मनरेगा यंत्रणा आणि जनसामान्य या दोघा मध्ये माहितीची थेट देवाण-घेवाण होण्याच्या उद्देशाने ग्रामीण विकास मंत्रालयाने 19 जून 2017 ला Janmanrega नावाचे मोबाईल ॲप सुरू केले आहे. या ॲपवर योजनेची उद्दिष्टे,कार्यक्षेत्र,व कामाची माहिती उपलब्ध आहे. या योजनेअंतर्गत 2020 -21 या आर्थिक वर्षात 7.37 कोटी कुटुंबांना या योजनेमार्फत रोजगार पुरविण्यात आला आहे.

*** प्रधानमंत्री आवास योजना :-**

ग्रामीण भागातील जनतेला निवाऱ्याची सोय व्हावी म्हणून ही योजना कार्यरत आहे. मानवाच्या मूलभूत गरजा पैकी निवारा ही महत्त्वाची गरज आहे.त्यासाठी मानवाला जीवन जगत असताना जशी अन्न,वस्त्राची गरज असते तशीच निवार्याची ही गरज असते. म्हणून केंद्र शासनाने प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजना सुरू केली. या योजनेची मूळ इंदिरा आवास योजनेत सापडते.ग्रामीण भागातील गरीब जनतेला सन्मानाने जगण्यासाठी निवारा मिळणे महत्त्वाचे असते. ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना घरे बांधण्यासाठी जून 1985 मध्ये ही योजना सुरू केली. नंतर ती जवाहर रोजगार योजनेचा भाग झाली. 1जानेवारी 1996 पासून इंदिरा आवास योजना स्वतंत्रपणे राबवली जाऊ लागली. या योजनेचा मुख्य उद्देश होता ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखाली लोकांना विशेषता अनुसूचित जाती जमाती व वेठबिगारी लोकांना घरे बांधण्यासाठी किंवा कच्ची घरे अद्यावत करण्यासाठी अनुदान देणे. नंतरच्या काळात म्हणजेच 1995 -96 पासून या योजनेचा लाभ विधवा तसेच देशाच्या रक्षणासाठी युद्धामध्ये शहीद झालेल्या सैनिकांच्या वारसांना देण्यात येऊ लागला. या योजनेच्या लाभार्थ्यांची निवड ग्रामपंचायत करीत असे. ही योजना केंद्र शासनाची आहे. योजना खर्चाचा वाटा केंद्र- राज्य 75 :25 असा होतो. 2016- 17 मध्ये 60 :40 करण्यात आला. ईशान्य पूर्व व हिमालयातील राज्यासाठी हा वाटा 90: 40 होता. भूमिहीनांना जमीन घेण्यासाठी हा केलेल्या योजना खर्चात केंद्र- राज्य वाटा 50 :50 होता.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

23 मार्च 2016 मध्ये केंद्रीय मंत्रिमंडळाने इंदिरा आवास योजनेचे नाव प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण करण्याची मंजुरी दिल्यामुळे 1 एप्रिल 2016 पासून नवीन योजना लागू झाली. या योजनेचा लाभ घेणारी व्यक्ती आर्थिक, सामाजिक व जातीय जनगणना 2011 चा आधार घेतला जात आहे. एकही खोली नसलेले व वंचित गट या योजनेचे लाभार्थी आहेत. सर्वांसाठी घर 2022 ही दीर्घावधी लक्ष गाठण्यासाठी चार कोटी ग्रामीण घरे बांधावे लागणार आहेत. पहिल्या टप्प्यातील म्हणजेच पुढील तीन वर्षात म्हणजे 2018 -19 पर्यंत एक कोटी ग्रामीण घरे बांधण्याचे उद्दिष्टे ठेवण्यात आले आहे. दुसऱ्या टप्प्यात 2019 -20 ते 2021- 22 या तीन वर्षासाठी 1.95 कोटी घरे बांधण्याची उद्दिष्टे आहे. एकूण योजना खर्चातील 60% वाटा अनुसूची जाती जमातीसाठी 15 टक्के वाटा अल्पसंख्यांकांसाठी 5% टक्के वाटा अपंगासाठी खर्च करण्याच्या मार्गदर्शक सूचना प्रकाशित करण्यात आल्या आहेत.

*** प्रधानमंत्री ग्राम सडक योजना :-**

सर्व गावांना रस्त्याने जोडण्याच्या उद्देशाने ही योजना 25 डिसेंबर 2000 ला सुरू करण्यात आली. या योजनेसाठी सुरुवातीला शंभर टक्के खर्च केंद्र शासन करीत असे परंतु नंतरच्या काळात केंद्र व राज्य वाटा 60: 40 असा झाला आहे. तसेच योजनेसाठी पेट्रोलवर अतिरिक्त शूल का कारले जाते, त्यातील 50 टक्के रक्कम वापरली जाते. 2003 पर्यंत हजार पेक्षा जास्त लोक वस्तीचे 2007 पर्यंत 500 पेक्षा जास्त लोक वस्तीचे सपाट प्रदेशातील गाव आणि 250 पेक्षा जास्त डोंगराळ प्रदेशात गाव जोडण्याचे लक्ष ठेवण्यात आले. या योजनेचा पहिला टप्पा 25 डिसेंबर 2000 पासून सुरू झाला आहे. सर्व 1.78 लाख गावे रस्त्याने जोडणे या टप्प्याचे लक्ष आहे. 1.78लाख गावे जोडण्याचे लक्ष 2017 पर्यंत पूर्ण करण्याचे ठरले. 2015 -16 च्या अर्थसंकल्पात ही लक्ष 2022 पर्यंत पूर्ण करण्याचे ठरले.

*** पंतप्रधान मंत्री पिक विमा योजना :-**

ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था शेतीवर आधारित आहे. भारताची 70 टक्के वरून अधिक लोकसंख्या शेती आणि शेतीशी संबंधित व्यवसाय करते. परंतु दुर्दैवाने काही वर्षात देशाच्या व राजाच्या कृषी व्यवसायाचा दर कमी केला आहे. देशातील कृषी क्षेत्राला हवामानात झालेल्या बदलामुळे फार मोठे नुकसान सहन करावे लागले आहे.वातावरणातील बदलामुळे अनेक गावात दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. हवामान बदलामुळे पाऊस वेळेवर पडत नाही. काही भागात मोठ्या प्रमाणावर पडून शेतकऱ्याचे नुकसान करतो तर काही भागात काहीच पडत नसल्यामुळे ही शेतकऱ्यांच्या पिकाचे नुकसान होते. देशाच्या सर्वच भागात हे संकट असल्यामुळे सर्व शेतकऱ्यांना आर्थिक कवच देण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यानी पूर्वीच्या सर्व विमा योजनेतील त्रुटी दूर करण्यात आली. पूर्वी मंडल स्तरावर शेतीचे नुकसान झाले असेल तर शेतकऱ्यांना भरपाई मिळत होती. आता वैयक्तिक स्तरावर विम्याचा अधिक लाभ मिळणार आहे. 13 जानेवारी 2016 रोजी या योजनेची घोषणा करण्यात आली व एक एप्रिल 2016 रोजी या योजनेची अंमलबजावणी करण्यात आली. प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत भारतीय कृषी विमा कंपनी बरोबरच योजनेत नमूद खाजगी विमा कंपन्याकडूनही विमा संरक्षण घेण्याची तरतूद आहे.ही योजना कर्जदार शेतकऱ्यांना शक्तीची व बिगर कर्जदार

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

शेतकऱ्यांना ऐच्छिक आहे. पी कंपनी नंतर 14 दिवसाच्या आत शेतात असणाऱ्या मालावर कोणते ही नैसर्गिक संकट आली तर या संकटास शेतकऱ्यांना हमखास लाभ होईल.

*** प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना :-**

शेती व्यवसायासाठी पाण्याची मोठ्या प्रमाणात आवश्यकता असते. दिवसेंदिवस पाण्याचे कमी होणारे प्रमाण घटत चाललेली शेतीची उत्पादकता, वाढ चाललेला शेतीवरील खर्च, वाढत्या शेतकऱ्याच्या आत्महत्या सर्व बाबीचा विचार करून 2015- 16 पासून सूक्ष्म सिंचन योजना, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना या केंद्र शासनाच्या महत्त्वकांक्षी योजनांमध्ये एक जुलै 2015 रोजी समाविष्ट करण्याची घोषणा केली. ही योजना कृषी मंत्रालयांतर्गत सुरू केली. शेतकऱ्यांची आत्मनिर्भरता वाढावी यासाठी प्रत्येक शेतकऱ्याच्या शेतात पाणी उपलब्ध करणे तसेच पाण्याची कार्यक्षमता वाढून पाण्याच्या प्रत्येक थेंबाचा वापर करून सूक्ष्म सिंचन करून जास्तीत जास्ती उत्पादन मिळविणे या योजनेचा उद्देश आहे. जलसंधारण व जल पुनर्भरण क्षेत्रात प्रगती करण्यासाठी या योजनेची आखणी करण्यात आली. या योजनेअंतर्गत ठिबक सिंचन, तुषार सिंचन शेतकऱ्यांना अनुदानावर देण्यात येते. शेती आणि शेतकरी विकासासाठी 35 हजार 984 कोटीची तरतूद प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना लागू करून त्या अंतर्गत 28.5 लाख हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणणे. अपूर्ण असलेल्या 89 योजना त्वरित कार्यान्वित करणे. वरील सर्व योजनांचा थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. या योजनांच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा विकास झाला आहे परंतु ज्या प्रमाणात विकास व्हायला पाहिजे होता त्या प्रमाणात झालेला दिसून येत नाही.

*** भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासात शेतीची भूमिका :-**

भारत हा कृषिप्रधान देश असून शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. ग्रामीण भागात राहणाऱ्या जनतेचा आणि ग्रामीण भागाचा विकास शेतीच्या विकासावर अवलंबून असतो. शेती हा मूलभूत उद्योग असून विकसनशील राष्ट्रातील औद्योगीकरणाचे ते स्त्रोत असते. देशातील इतर अनेक उद्योगाची प्रगती शेतीवर अवलंबून असते.हे आपणास विसरून चालत नाही. कृषी उत्पादन निसर्गावर अवलंबून असल्यामुळे जीवन आवश्यक असणाऱ्या अन्नधान्यासाठी देशातील सर्व जनतेला अवलंबून राहावे लागते.म्हणून म्हटले जाते की शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे. म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासात शेतिची भूमिका महत्त्वाची असताना दिसून येते.ते पुढील मुद्द्याच्या साह्याने आपणास लक्षात येईल.

*** जनतेच्या उपजीविकेचे प्रमुख साधन :-**

भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीचे स्थान महत्त्वाचे आहे.कारण भारतीय लोकांच्या उपयोगीतेचे साधन म्हणून शेतीकडे पाहिले जाते. जगाचा पोशिंदा म्हणून शेतकऱ्याकडे पाहिले जाते. शेतकऱ्याने काबाडकष्ट करून अन्नधान्याचे

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

उत्पादन घेतले नाही तर मूलभूत गरज म्हणून ज्याच्याकडे पाहिले जाते ती गरज पूर्ण करणारा शेतकरी आहे. हे विसरून चालत नाही जनतेच्या उपजीविकेचे साधन म्हणून शेतीकडे पाहिले जाते.

*** राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा :-**

भारतीय शेती देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नाचा महत्त्वाचा स्त्रोत मानला जातो. एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील एखाद्या क्षेत्राचा वाटा किती आहे त्यावरून त्या क्षेत्राचे महत्त्व लक्षात येते. शेती क्षेत्रात कार्यरत लोकसंख्येची प्रमाण 1991 च्या जनगणनेनुसार 66.8% होते. दुय्यम क्षेत्रात 12.7% तर सेवा क्षेत्रात 20.5% होते. यावरून एकूण लोकसंख्येपैकी 67% लोकसंख्या कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. 2010 -11 मध्ये कृषी आणि संलग्न क्षेत्राचा हिस्सा 14.6% इतका होता आता तो 2020- 21 मध्ये 20.2% इतका झाला आहे. प्रगतशील राष्ट्राच्या तुलनेत आजही भारतातील राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा वाटा अधिक आहे.

*** आर्थिक स्थिरता :-**

देशातील जनतेमध्ये आर्थिक स्थिरता प्राप्त करण्यासाठी शेतीची भूमिका महत्त्वाची आहे ग्रामीण भागात भारत असून शहरी भागात इंडिया आहे असे अनेकाचे मत आहे त्यामुळे ग्रामीण आणि शहरी वातावरणात मोठ्या प्रमाणात फरक जाणवतो असे असले तरी ग्रामीण भागातील जनतेला स्थिरता प्राप्त करून देण्यासाठी शेतीची भूमिका महत्त्वाची आहे.

*** औद्योगिक विकास :-**

औद्योगिक विकास आर्थिक विकासाचा पाया असतो. औद्योगिक विकास साध्य करावयाचा असेल तर उद्योगांना लागणारा कच्चामाल शेती क्षेत्रातून उत्पादित केला जातो. कृषी मालावर प्रक्रिया करणारे उद्योग स्थापन होत असतात म्हणून देशाच्या विकासामध्ये कृषी क्षेत्राची भूमिका महत्त्वाची असते.

*** परकीय चलन प्राप्ती :-**

भारतातून मोठ्या प्रमाणावर निर्यात शेती क्षेत्रातून उत्पादित होणाऱ्या मालाची होताना दिसते. ज्यामुळे अन्नधान्य, साखर, तंबाखू,चहा,जूट,फळे या निर्यातीमुळे भारताला मोठ्या प्रमाणावर परकीय चलन प्राप्त होते. या परकीय चलनापासून आवश्यक असणारी यंत्रसामग्री, तंत्रज्ञान, संशोधन याची आयात करता येते. परकीय चलनाच्या गंगाजळीमध्ये वाढ होते. त्यामुळे व्यवहार तोल अनुकूल होण्यास मदत होते.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

*** रोजगार निर्मिती :-**

शेतीवर अवलंबून असणारांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे. 2011 च्या जनगणनेनुसार 64.8% लोकसंख्या शेती क्षेत्रावर अवलंबून होती. रोजगार पुरविणारी शेती देशातील सर्वात मोठे क्षेत्र आहे. भारतामध्ये 50% रोजगार कृषी क्षेत्रातून उपलब्ध होतो. म्हणून रोजगार निर्मितीसाठी कृषी क्षेत्र महत्वाचे आहे. वरील प्रमाणे भारतीय अर्थव्यवस्थेत कृषीची भूमिका थोडक्यात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

*** सारांश :-**

भारत हा कृषिप्रधान देश आहे असे आपण मानतो, शेतकरी जगाचा पोशिंदा आहे अशीही मानतो, केंद्रशासनाने ग्रामीण विकासासाठी अनेक योजना राबविण्याचे काम केली परंतु त्या योजनेचा खरा लाभ ग्रामीण भागातील किती शेतकऱ्यांना झाला. या योजनांचा लाभ घेऊन खरच शेतकऱ्यांमध्ये सुधारणा झाली आहे काय?शेतकऱ्याचे राहणीमान सुधारले आहे काय? शेतीची उत्पादकता वाढले आहे काय? या सर्व प्रश्नांची उत्तरे नाही असे मिळतात. खरंच भारतीय शेती आणि शेतकऱ्याचा विकास व्हावा असे वाटत असेल तर शासनाने राबवलेली शेतीसंबंधीचे धोरणे शेतकऱ्याच्या बाजूने असावीत. शेतकऱ्यांच्या मालाला योग्य किंमत मिळावी यासाठी किमान हमीभाव ठरविताना खर्चाचा विचार शासनाने करावा. उत्पादन करणारा शेतकरी ज्या मालाचे उत्पादन करतो त्या मालाच्या किमती ठरविण्याचा अधिकार शेतकऱ्यांना देण्यात यावा.शेती हा भारतातील सर्वात मोठा उद्योग म्हणून शेती क्षेत्राकडे पाहण्याची गरज आहे. केंद्र शासनाच्या विकास योजना चांगल्या आहेत त्याबाबत शंका नाही परंतु या योजनांचा देशांमधील किती जनतेला फायदा झाला, या योजना पासून अजून अलिप्त असणाऱ्या समाजाला या योजनेचा कसा फायदा होईल हे पाहण्याची महत्त्वाची जबाबदारी शासनाची आहे असे मला वाटते. भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये शेतीची भूमिका महत्त्वाची आहे. राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा, परकीय चलन, रोजगार, औद्योगिक विकास, उपजीविकेचे साधन सर्वात महत्त्वाचे म्हणजे मूलभूत गरजा पैकी अन्नधान्याची मूलभूत गरज पुरविणारा शेतकरी याकडे शासनाने विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे. शेतकऱ्याच्या हिताची धोरणे शासनाने राबवली पाहिजेत.भारताचा खरा आर्थिक विकास साध्य करावयाचा असेल तर भारताला खरी गरज आहे Make in India ऐवजी Make in Agriculture आणि Smart City ऐवजी Smart Village ची आवश्यकता आहे असे मला वाटते.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

*** संदर्भसूची :-**

1) प्रा. श्रीनिवास धूत, प्रा. पी. आर. कुलकर्णी, ग्रामीण अर्थव्यवस्था व सहकार (1990) पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर.

2) प्रा. नानासाहेब पटनुरे, प्रा. डॉ. मनोज कुमार सोमवंशी, ग्रामीण अर्थशास्त्र (2016) अरुणा प्रकाशन, लातूर.

3) डॉ. गंगाधर वि.कायंदे पाटील, शेतीचे अर्थशास्त्र (2003) चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक.

4) डॉ. निता वाणी, कृषी अर्थशास्त्र (2012) प्रशांत पब्लिकेशन,जळगाव.

5) डॉ. रामेश्वर भिसे, कृषी विकासाचे अर्थशास्त्र (2011) प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.

6) उद्योजक मासिक (ऑक्टोबर 2022)

7) योजना मासिक (जून 2022)

8) योजना मासिक (ऑक्टोबर 2022)

9) योजना मासिक (जानेवारी 2023)

10) उद्योजक मासिक (सप्टेंबर 2023)

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
*SPECIAL ISSUE ON MARATHI AARTHSHASHTRA PARISHED Nov. 2023*

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

# भारतातील मानवी भांडवल निर्मितीतील अडथळे

**प्रा. डॉ. जे एस इंगळे**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
प्रा. डॉ. एन. डी. पाटील कॉलेज मलकापूर, जिल्हा कोल्हापूर
मोबाईल 87 66 02 73 59, Gmail –jayavantingale@gmail.com
आजी सदस्य क्रमांक 42

**शोधनिबंधाचा गोषवारा**

*'भारतातील मानवी भांडवल निर्मितीतील अडथळे' असे या शोधनिबंधाचे शीर्षक आहे. या शोधनिबंधात सुरुवातीला मानवी भांडवल या संकल्पनेचा अर्थ स्पष्ट करून सांगितला आहे. देशातील बुद्धिमान व्यक्तींचा समावेश मानवी भांडवल या संकल्पनेत होतो. राष्ट्राच्या सर्वांगीण विकासाला सहाय्यभूत ठरणाऱ्या व्यक्ती म्हणजे मानवी भांडवल होय. या व्याख्येवरून मानव आणि मानवी भांडवल यात फरक असल्याचे आपल्या लक्षात येते. देशातील सर्व व्यक्ती किंवा सर्व मनुष्य म्हणजे मानवी भांडवल नव्हे तर एकूण लोकसंख्येतील हुशार, बुद्धिमान, तज्ञ व्यक्ती म्हणजेच मानवी भांडवल होय. असे मानवी भांडवल ज्या देशात विपुल प्रमाणात असते, त्या देशाचा आर्थिक विकास झपाट्याने घडून येत असतो. इंग्लंड, जपान अशा अनेक राष्ट्रांनी ते सिद्ध करून दाखवले आहे. नॉर्वे या देशाचा मानव विकास निर्देशांक क्रमांक जगात 1 आहे. अमेरिका चौथ्या स्थानी, कॅनडा सहाव्या स्थानी, भारत 134 व्या स्थानी आहे . मानव विकास निर्देशांकात पाकिस्तानचा क्रमांक 145 वा आहे, तर नायगर या देशाचा क्रमांक 186 वा आहे. सन 1975 साली भारताचा मानव विकास निर्देशांक 0.412 इतका होता तर सन 2011 साली तो 0.547 इतका होता. नॉर्वेचा तो 0.943 आहे. या शोधनिबंधात भारतातील मानवी भांडवल निर्मितीतील प्रमुख अडथळे स्पष्ट केले आहेत. मानवी भांडवलाची संख्यात्मक व गुणात्मक वाढ का कमी आहे त्याची कारणे स्पष्ट केली आहेत. कमी आयुर्मान, निरक्षर व अल्पशिक्षित लोकांचे मोठे प्रमाण, परदेशात मानवी भांडवलाचे उड्डाण, प्रचंड लोकसंख्या, उदासिन जनता, तांत्रिक व्यावसायिक व वैद्यकीय शिक्षणाच्या अपुऱ्या सुविधा, स्त्रियांचा कनिष्ठ दर्जा, सार्वत्रिक दारिद्र्य या कारणांमुळे मानवी भांडवल निर्मितीचा दर भारतात कमी आहे. मानवी भांडवलाच्या निर्मितीचा दर वाढवा यासाठी आणि मानवी भांडवलाचा दर्जा वाढावा यासाठी काही उपाय या शोधनिबंधात सुचवले आहेत. लोकसंख्या वाढीच्या वेगावर नियंत्रण ठेवणे, निरक्षरतेचे उच्चाटन करणे, कारकूनी शिक्षणाऐवजी यांत्रिक, तांत्रिक, वैद्यकीय शिक्षण देणे, चांगला सकस पौष्टिक आहार उपलब्ध करून देणे, अंधश्रद्धा व व्यसनाधिनता नष्ट करणे इत्यादी उपाय योजून मानवी भांडवलाची संख्यात्मक व गुणात्मक वाढ घडवून आणता येईल.*

**प्रास्ताविक :**

भांडवल हा उत्पादनाचा एक अत्यंत महत्त्वाचा घटक मानला जातो. भांडवल म्हणजे केवळ पैसा नव्हे, मनुष्याने निर्माण केलेल्या उत्पादनाच्या साधनांना भांडवल असे म्हणतात. अर्थशास्त्रात मनुष्य (जनता, लोक, श्रमशक्ती इत्यादी) म्हणजे भांडवल मानले जाते. त्याला मानवी भांडवल (Humsn Capital) असे म्हणतात. या शोधनिबंधात मानवी भांडवल म्हणजे काय? मानवी भांडवलाचे महत्व, भारतातील मानवी भांडवल निर्मितीतील अडथळे आणि मानवी भांडवलाचा दर्जा उंचावण्यासाठी कोणते उपाय योजना येतील या बाबींची चर्चा केली आहे.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

**शोधनिबंधाचे उद्देश:**

सदरचा शोधनिबंध हा मानवी भांडवलाशी संबंधित आहे. त्यानुसार या निबंधाचे उद्देश निश्चित केले आहेत. या शोधनिबंधाचे प्रमुख उद्देश खालीलप्रमाणे स्पष्ट केले आहेत.

१) मानवी भांडवलाच्या उपयुक्ततेवर प्रकाश टाकणे.

२) भारतातील सद्यस्थितीतील मानवी भांडवलाच्या दर्जाची माहिती घेणे. जगातील विविध देशातील मानवी भांडवलाची तुलना करणे.

३) मानवी भांडवलाचा दर्जा आणि शिक्षण, आरोग्य, आहार इत्यादी घटकातील सहसंबंध अभ्यासणे किंवा मानवी भांडवलाच्या निर्मितीवर, दर्जावर परिणाम करणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे.

४) भारतातील मानवी भांडवल निर्मितीच्या मार्गातील अडथळे किंवा अडचणी यावर प्रकाश टाकणे.

५) मानवी भांडवल निर्मितीचा वेग वाढावा आणि मानवी भांडवलाचा दर्जा उंचावा यासाठी उपाय सुचविणे.

**व्याप्ती व मर्यादा** :

प्रस्तुतच्या शोधनिबंधात जास्त करून भारतातील मानवी भांडवल निर्मिती आणि भारतातील मानवी भांडवलाच्या दर्जावर प्रकाश टाकण्यात आला आहे. ही या शोधनिबंधाची व्याप्ती व मर्यादा आहे. जगातील विकसित देशातील मानवी भांडवलाच्या निर्मितीबाबत आणि दर्जाबाबत सविस्तर माहिती या निबंधात देण्यात आलेली नाही. या निबंधात भारतातील मानवी भांडवलाचा दर्जा का कमी आहे आणि हा दर्जा कसा उंचवता येईल? या बाबींवर प्रकाश टाकलेला आहे.

**संशोधन पद्धती:**

अर्थशास्त्रीय संशोधन पद्धतीपैकी दुय्यम साधनसामग्री (Secondary data) या पद्धतीचा अवलंब करून प्रस्तुतचा शोधनिबंध तयार केला आहे. या विषयावर मराठी व इंग्रजीत प्रसिद्ध झालेले लेख, ग्रंथ, रेफरन्स बुक्स यांचा आधार घेऊन मानवी भांडवलाशी संबंधित विषयावर निबंध तयार केला आहे.

**संशोधन विषयाचे महत्व** :

या शोधनिबंधात प्रामुख्याने भारतातील मानवी भांडवलाच्या दर्जाचा अभ्यास केला आहे . भारतातील मानवी भांडवलाच्या निर्मितीत कोणते अडथळे आहेत आणि मानवी भांडवलाचा दर्जा उंचावण्यासाठी देशाने कोणते उपाय योजले पाहिजेत या बाबींची माहिती या निबंधात दिली आहे. मानवी भांडवलाचा दर्जा उंचावण्यात शिक्षण संस्था, विद्यापीठे, सरकार, समाज किंवा जनता हे घटक कोणती भूमिका बजाऊ शकतात याची माहिती या निबंधात दिली आहे. त्यामुळे हा निबंध या सर्व घटकांना उपयुक्त आहे. अविकसित आणि विकसनशील देशात मानवी भांडवल निर्मितीत काही प्रमुख अडथळे आहेत. हे अडथळे पार केले तर त्या देशातील मनुष्यबळाचा / मानवी भांडवलाचा दर्जा सुधारून त्या देशांच्या

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

विकासाचा वेग वाढू शकतो हा महत्त्वाचा मुद्दा या शोधनिबधात पुन्हा पुन्हा उद्धृत केला आहे . आज जगात 150 पेक्षा अधिक देश अविकसित आणि विकसनशील आहेत. त्या देशांच्या आर्थिक विकासात अनेक अडथळे आहेत. त्यापैकी एक अडथळा म्हणजे त्या देशातील निकृष्ट मानवी भांडवलाचा दर्जा हा होय. मानवी भांडवलाचा दर्जा उंचावला तर हे गरीब देश झपाट्याने प्रगती करू शकतात, म्हणून जगातील अनेक देशांच्या दृष्टीने 'मानवी भांडवल' हा विषय अत्यंत महत्त्वाचा व कळीचा ठरलेला आहे.

**मानवी भांडवल: व्याख्या व अर्थ:**

राष्ट्राच्या आर्थिक विकासात भौतिक भांडवलाची भूमिका जेवढी महत्वाची असते, तेवढीच मानवी भांडवलाची भूमिका सुद्धा महत्त्वाची असते. मानवी भांडवल म्हणजे काय हे पाहणे महत्वाचे असते. जुन्या किंवा सनातनवादी अर्थतज्ञांनी सुद्धा आपल्या अर्थशास्त्रीय ग्रंथात मानवी भांडवलावर चर्चा केली आहे. ॲडम स्मिथ यांनी 'राष्ट्राची संपत्ती' (राष्ट्राच्या संपत्तीचे स्वरूप व तिची कारणमीमांसा) हा ग्रंथ लिहिला असून या ग्रंथात जरी मानवी भांडवल हा शब्द वापरला नसला तरी मानवी भांडवलाचे महत्व विशद केले आहे. उत्पादन किंवा संपत्तीत वाढ करण्यासाठी शिक्षण आणि प्रशिक्षण आवश्यक आहे असे स्मिथ यांनी आपल्या ग्रंथात म्हटले आहे.[१]

''मानवी भांडवल म्हणजे एखाद्या राष्ट्रांमधील कौशल्ये, क्षमता, शिक्षण, प्रशिक्षण आणि ज्ञानाचा साठा होय.''

मानवी भांडवलाची आणखी एक सर्वसाधारण व्याख्या खालील शब्दात स्पष्ट केली आहे. ''राष्ट्राच्या एकूण लोकसंख्येतील बुद्धिमान व्यक्ती (शिक्षक, प्राध्यापक, डॉक्टर, इंजिनिअर, शास्त्रज्ञ, संशोधक, कलावंत, उद्योजक इत्यादी) म्हणजे त्या देशातील मानवी भांडवल होय''.

**मानव विकास निर्देशांक क्रमांक (वर्ष 2011)**

भारत मानव विकास निर्देशांकात खूपच पिछाडीवर असल्याचे खालील तक्त्यावरुन दिसून येते.

| अ.क्र. | देश | HDI क्रमांक | मानव विकास निर्देशांक (HDI) |
|---|---|---|---|
| 1 | नॉर्वे | 1 | 0.943 |
| 2 | अमेरिका | 4 | 0.910 |
| 3 | कॅनडा | 6 | 0.908 |
| 4 | भारत | 134 | 0.547 |
| 5 | पाकिस्तान | 145 | 0.504 |
| 6 | नायगर | 186 | 0.295 |

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

(स्त्रोत : दत्त व सुंदरम्, 'इंडियन इकॉनॉमी' आवृत्ती ६७, पृ.क्र.७०)

**विविध वर्षातील भारताचा मानव विकास निर्देशांक**

| **अ.क्र.** | **वर्ष** | **मानव विकास निर्देशांक** (HDI) |
|---|---|---|
| 1 | 1975 | 0.412 |
| 2 | 1985 | 0.476 |
| 3 | 1995 | 0.546 |
| 4 | 2004 | 0.619 |
| 5 | 2007 | 0.612 |
| 6 | 2011 | 0.547 |

(स्त्रोत : दत्त व सुंदरम्, 'इंडियन इकॉनॉमी' आवृत्ती ६७, प्र.क्र.७०)

**भारतातील मानवी भांडवल निर्मितीतील अडथळे**

भारताची आजमितीची लोकसंख्या १३० कोटीपेक्षा जास्त आहे. भारतात मनुष्यबळ किंवा उत्पादक लोकसंख्या प्रचंड असली तरी मानवी भांडवलाची संख्यात्मक व गुणात्मक वाढ कमी आहे. भारतातील मानवी भांडवल निर्मितीतील काही प्रमुख अडथळे थोडक्यात खालीलप्रमाणे स्पष्ट केले आहेत.

**१) अपेक्षित आयुर्मान कमी :**

विकसित देशांच्या तुलनेत अद्यापही भारतीय लोकांचे सरासरी आयुर्मान कमी आहे. डॉक्टर, संशोधक, शास्त्रज्ञ इत्यादी बुद्धिमान व्यक्ती अकाली मृत्यू पडण्याचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे या बुद्धिमान लोकांच्या बुद्धीचा, ज्ञानाचा, अनुभवाचा फायदा राष्ट्राला दीर्घकाळ घेता येत नाही.

**२)निरक्षर अल्पशिक्षित लोकांचे मोठे प्रमाण:**

भारताच्या एकूण लोकसंख्येत निरक्षर आणि अल्पशिक्षित लोकांचे प्रमाण मोठे आहे. हे प्रमाण जवळ जवळ 50% आहे. या लोकांचा आर्थिक विकासासाठी फारसा उपयोग होत नाही. फारच थोडा लाभ होतो. निरक्षर व अल्पशिक्षित लोकांना उत्पादनाच्या प्रक्रियेत चांगल्या प्रकारे भाग घेता येत नाही.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

**३) परदेशात मानवी भांडवलाचे उड्डाण:**

दरवर्षी भारतातील चांगले मनुष्यबळ (चांगले मानवी भांडवल) जगातील प्रगत देशात नोकरी, व्यवसायासाठी स्थलांतरित होताना दिसते. याला मानवी भांडवलाचे उड्डाण असे म्हणतात. भारतातील दहा लाखापेक्षा अधिक डॉक्टर्स, इंजिनियर्स, शास्त्रज्ञ, संशोधक, तज्ञ प्रोफेसर इंग्लंड अमेरिका या राष्ट्रांची सेवा करत आहेत. अमेरिकेतील 'नासा' या संशोधन संस्थेत जे एकूण शास्त्रज्ञ आहेत त्यापैकी 30% शास्त्रज्ञ एकट्या भारत या देशातील आहेत. यावरून भारतातील चांगले मनुष्यबळ (मानवी भांडवल) का कमी आहे किंवा का वाढत नाही याची कल्पना येते. दरवर्षी परदेशात नोकरी व्यवसायानिमित्त वास्तव्यास जाणाऱ्या उच्चशिक्षित, बुद्धिमान भारतीयांचे प्रमाण वाढत आहे. अशा प्रकारे भारतातून विकसित देशात होणारे बुद्धिवंतांचे स्थलांतर ही मानवी भांडवलाच्या निर्मितीतील मोठी अडचण ठरली आहे.

**४)प्रचंड लोकसंख्या:**

जगात भारतातील लोकसंख्या प्रचंड आहे. 130 कोटी पेक्षा अधिक लोक देशात आहेत. या सर्व जनतेला पुरेसे व चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळत नाही. त्यामुळे चांगले मानवी भांडवल देशाला मिळत नाही. प्रचंड लोकसंख्येमुळे कुपोषण, बालमृत्यू, सततचे आजारपण या समस्या गंभीर होत आहेत. सरकारला सर्व लोकांपर्यंत चांगल्या आरोग्य सुविधा (वैद्यकीय सुविधा) पुरवता येत नाहीत. प्रचंड लोकसंख्येमुळे शिक्षण, आरोग्य सुविधांवर प्रचंड ताण पडला आहे. त्यामुळे मानवी भांडवल निर्मितीचा व गुणवत्तेचा दर्जा ढासळत चालला आहे.

**५) जनतेची उदासीनता, प्रतिसाद कमी:**

जाज्वल्य राष्ट्रनिष्ठा असलेल्या जनतेचे प्रमाण कमी आहे. बहुसंख्य जनता उदासिन आहे. धर्मांधता, जात्यंधता, व्यसनाधिनता प्रचंड आहे. त्यामुळे चांगल्या मानवी भांडवल निर्मितीचा दर खूपच कमी आहे. गलिच्छ राजकारण करणारी, व्यसनांच्या विळख्यात अडकलेली व धर्मांध जनता विकासाला सहाय्यभूत ठरत नाही. अशा लोकांना मानवी भांडवल म्हणता येत नाही. अशी निरुपयोगी जनता भारतात मोठ्या प्रमाणावर आहे.

**६) तांत्रिक, व्यावसायिक, वैद्यकीय शिक्षणाच्या सुविधा कमी :**

भारतात वाङ:मयीन शिक्षणाच्या सुविधा बऱ्यापैकी आहेत. परंतु तुलनेने तांत्रिक, व्यावसायिक (धंदेवाईक), वैद्यकीय शिक्षणाच्या सुविधा अत्यंत कमी आहेत. त्यामुळे भारतातील मानवी भांडवल निर्मितीचा दर कमी आहे. विविध कौशल्य अंगी असलेल्या लोकांचे प्रमाण देशात कमी आहे. अशी कौशल्ये विकसित करणाऱ्या किंवा देणाऱ्या शिक्षण संस्थांची संख्या ही खूपच कमी आहे.

**७) रोजगार न मिळणे:**

भारतातील कित्येक हुषार, बुद्धिमान तरुण-तरुणी बेरोजगार आहेत. सरकार त्यांना नोकऱ्या देऊ शकत नाही. त्यामुळे या मानवी भांडवलाचा देशाच्या विकासासाठी उपयोग करून घेता येत नाही. चांगल्या व्यक्तींना / उच्च शिक्षित व्यक्तींना रोजगार मिळत नसल्याने इतरही लोकांना गुणवत्ता वाढीचे / उच्च शिक्षण घेण्याचे प्रोत्साहन मिळत नाही.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

**८) स्त्रियांना कमी महत्व:**

भारतात आजही बहुसंख्य स्त्रियांना कुटुंबात, समाजात चांगला दर्जा दिला जात नाही. बहुसंख्य स्त्रिया आजही चूल आणि मूल पुरत्याच मर्यादित आहेत. विकासासाठी किंवा उत्पादनासाठी त्यांचा उपयोग होत नाही. एकूण लोकसंख्येत स्त्रियांची संख्या जवळजवळ निम्मी आहे. स्त्रियांना संधी व दर्जा नसल्याने मानवी भांडवल निर्मितीचा दर खूपच कमी आहे.

**९) दारिद्र्य**:

भारतात आज सुमारे 25% लोक दारिद्र्य रेषेखाली आहेत. अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण या प्राथमिक गरजासुद्धा त्यांना आपल्या उत्पन्नातून भागवता येत नाहीत. गरीब लोक आपल्या मुलांना चांगले शिक्षण देऊ शकत नाहीत. चांगला आहार देऊ शकत नाहीत. त्यामुळे चांगले मनुष्यबळ (चांगले मानवी भांडवल) देशात तयार होत नाही.

**१०) इतर घटक:**

भारतातील मानवी भांडवल निर्मितीच्या मार्गात इतरही काही अडथळे आहेत. ते थोडक्यात खालीलप्रमाणे स्पष्ट केले आहेत.

अ) गुणवत्तेपेक्षा जातीला सरकार महत्व देते. त्यामुळे शिकण्याची प्रेरणा राहत नाही. चांगले मानवी भांडवल देशाला देण्याची क्षमता व पात्रता असणाऱ्या कुटुंबातून त्यामुळे चांगले मानवी भांडवल तयार होत नाही.

आ)उद्योजकता गुणधर्म असणाऱ्या लोकांचे प्रमाण देशात खूपच कमी आहे.

अशा प्रकारे वरील विविध कारणांमुळे भारतात प्रचंड लोकसंख्या असूनही भारतात मानवी भांडवल निर्मितीचा दर खूपच कमी आहे. त्यामुळे प्रगत राष्ट्रांच्या तुलनेत आपला विकासही कमी आहे.

**मानवी भांडवलाच्या निर्मितीचा दर वाढावा यासाठी आणि मानवी भांडवलाचा दर्जा वाढावा यासाठी काही उपाय**

आर्थिक विकासात मानवी भांडवलाची भूमिका अनन्यसाधारण आहे. देशात केवळ प्रचंड लोकसंख्या असून चालत नाही. एकूण लोकसंख्येत बुद्धिमान लोक किती आहेत? यावरून मानवी भांडवलाची संख्यात्मक व गुणात्मक प्रगती समजत असते. देशाच्या सर्वांगीण विकासासाठी मानवी भांडवल देशात पुरेशा प्रमाणात असले पाहिजे. भारताला आर्थिक आणि ज्ञानाच्या बाबतीत महासत्ता बनायचे असेल तर मानवी भांडवलाच्या निर्मितीकडे व दर्जाकडे लक्ष दिले पाहिजे. त्यासाठी काही उपाय खालीलप्रमाणे सुचवले आहेत.

१) सरकारने कला, वाणिज्य, शिक्षणापेक्षा व्यावसायिक, धंदेवाईक, यांत्रिक, तांत्रिक, वैद्यकीय, कौशल्याधारित शिक्षणाच्या सुविधेत पुरेशा प्रमाणात वाढ केली पाहिजे.
२) निकृष्ट मानवी भांडवलाचे प्रमाण कमी करण्यासाठी, चांगल्या मानवी भांडवलात वाढ घडवून आणण्यासाठी लोकसंख्या वाढीचा वेग खूपच कमी केला पाहिजे.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

३) जात, धर्मापेक्षा गुणवत्ता, लायकी या बाबींना महत्त्व दिले पाहिजे.
४) जात्यंध्यपणा, धर्मांधता, निरक्षरता, व्यसनाधिनता या बाबी नष्ट झाल्या पाहिजेत.
५) शिक्षणाची गुणवत्ता (क्वालिटी) वाढवली पाहिजे.

**समारोप**

अशा प्रकारे राष्ट्राच्या जलद आर्थिक विकासासाठी मानवी भांडवलाची भूमिका खूप महत्वाची असते. शिक्षण, आरोग्य, रोजगार, आहार यात प्रचंड गुंतवणूक करून सरकारला मानवी भांडवल निर्मितीचा वेग आणि दर्जा यात वाढ करता येते. मानवी भांडवल निर्मितीत सरकार बरोबर शिक्षण संस्था, विद्यापीठ, समाजातील लोक यांची सुद्धा भूमिका खूप महत्वाची असते. या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नातून मानवी भांडवलाचा दर्जा उंचावून देशाच्या प्रगतीचा सुद्धा दर वाढवण्यास मदत होते.

**संदर्भ**:

१) देशमुख पुरुषोत्तम विष्णुपंत, ‘मानवी भांडवलाचे सैद्धांतिक विश्लेषण’, अर्थसंवाद, एप्रिल-मे-जून 2023, खंड-47 अ.क्र.1 प्रक. 58.
२) तत्रैव पृ. क्र. 60
३) उखळकर ए. एस., ‘व्यावसायिक पर्यावरण’ पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर, ऑक्टोबर 2011
४) झामरे जी. एन., ‘भारतीय अर्थशास्त्र’, पिंपळापुरे अँड कं. पब्लिशर्स, नागपूर, नोव्हेंबर 2010
५) रायखेलकर व दामजी, ‘भारतीय अर्थव्यवस्था’, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, जानेवारी 2013.
६) देसाई व भालेराव, ‘भारतीय अर्थव्यवस्था’ निराली प्रकाशन, पुणे, सप्टेंबर 2012.

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
*SPECIAL ISSUE ON MARATHI AARTHSHASHTRA PARISHED Nov. 2023*

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

# महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत ग्रामीण रस्त्यांचे महत्व

**प्रा. डॉ. विष्णु व पवार (सहाय्यक प्राध्यापक)**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
मधुकरराव पवार कला महा. मुर्तिजापूर जि. अकोला.
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावली
आजीव सभासद- 1883 मोबाईल न. 7798004528
Email-ID.- vishnupawar1974@gmail.com

**गोषवारा**

*देशाच्या एखाद्या भागात चांगले सोईचे रस्ते नसणे म्हणजे त्या भागाला, तसेच त्या परिसरातील रहिवाशांना अनेक योजना, सोयी - सुविधांपासून वंचित ठेवण्यासारखे आहे. रस्त्यांअभावी अनेक मुलभूत सुविधा तेथील जनतेला मिळू शकत नाहीत. त्यांच्या आर्थिक गरजा पूर्ण होऊ शकत नाहीत. इतकेच नाहीतर वाहतूक व्यवस्थेअभावी जनतेला सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रामध्ये प्रगतीच्या संधी कमी उपलब्ध होतात. नवीन व्यवसायाच्या अत्यंत मर्यादित संधी निर्माण होतात. तसेच रोजगारही कमी प्रमाणात उपलब्ध होतात.*

**प्रस्तावना**

ग्रामीण जनतेच्या प्रगतीमध्ये रस्ते आणि वाहतूक व्यवस्था सर्वात मोठी आणि महत्वाची भूमिका बजावत असतात. त्या भागाला जोडणाऱ्या रस्त्यांवरच ग्रामीण भागाचा आर्थिक विकास आणि त्या भागाची सामाजिक प्रगती तसेच ग्रामीण भागातील जनतेच्या राहणीमानाचा दर्जा अवलंबून असतो, असे म्हणावे लागेल देशाच्या एखाद्या भागात चांगले सोईचे रस्ते नसणे म्हणजे त्या भागाला, तसेच त्या परिसरातील रहिवाशांना अनेक योजना, सोयी-सुविधांपासून वंचित ठेवण्यासारखे आहे. रस्त्यांअभावी अनेक मुलभूत सुविधा तेथील जनतेला मिळू शकत नाहीत, त्यांच्या आर्थिक गरजा पूर्ण होऊ नाहीत. इतकेच नाहीतर वाहतूक व्यवस्थेअभावी जनतेला सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रामध्ये प्रगतीच्या संधी कमी उपलब्ध होतात. नवीन व्यवसायाच्या अत्यंत मर्यादित संधी निर्माण होतात. तसेच रोजगारही कमी प्रमाणात उपलब्ध होतात.

भारतात लक्षावधी खेडी आहेत भौगोलिक आणि हवामानाचा विचार केला तर प्रांत, विभागावर फार मोठा फरक त्यामध्ये दिसनू येतो.

ग्रामीण रस्त्यांच्या विकासाला अधिक गती देण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने 'मुख्यमंत्री ग्रामसडक योजना' सुरु केली आहे. केंद्र शासनाच्या पंतप्रधान ग्रामसडक योजनेच्या धर्तीवर या योजनेची आखणी करण्यात आली आहे. या योजनेतून राज्यातील वाड्या, वस्त्या, गावांना रस्ते बांधून देण्याबरोबरच सध्या अस्तित्वात असलेल्या व दुरवस्था झालेल्या ग्रामीण रस्त्यांची दर्जोन्नती करण्याचे धोरण निश्चित करण्यात आले आहे.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

**ग्रामीण भागात रस्त्यांची बांधणी.**

कोणत्याही ग्रामीण भागात रस्ता बांधण्याची जबाबदारी ही त्या त्या राज्यांची असते. त्यामुळे अगदी गावातील रस्ते बांधणीच्या कामात केंद्र सरकार थेट हस्तक्षेप करू शकत नाही. तसेच केंद्र सरकारकडून छोट्या गावातल्या रस्त्यांसाठी थेट निधी देवू शकत नाही. मात्र पाचव्या पंचवार्षिक योजनेपासून केंद्र सरकारने ग्रामीण भागातील रस्त्यांच्या प्रकल्पांना वेगवेगळ्या योजनांमाध्यमांतून निधी पुरवण्यास प्रारंभ केला आहे. किमान आपूर्ती कार्यक्रम (एम.एन. पी.) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम (एन. आर. ई. पी.) ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी कार्यक्रम (आर. एल. ई. जी. पी.) आणि जवाहर रोजगार योजना ( जे. आर. वाय.) या योजनांव्दारे ग्रामीण भागात रस्ते निर्मितीसाठी केंद्र सरकार मोठ्या प्रमाणावर निधी खर्च करीत आहे. खेड्यापाड्यातील जनतेचे राहणीमान उंचावण्यासाठी रस्त्यांचे जाळे असणे आवश्यक आहे. दळणवळणाची सुविधा निर्माण झाली तरच ग्रामीण भागातील जनतेला शहराशी संपर्क साधणे सोपे जाणार आहे. हे लक्षात घेवून केद्र सरकारने रस्ते कामांसाठी थेट निधी पुरवायला प्रारंभ केला. सन २००० मध्ये केलेल्या एका पाहणीत असे लक्षात आले की, देशातील ४.० टक्के वस्त्यांपर्यंत अद्याप रस्ताच पोहोचला नाही. म्हणजेच देशातील ४० टक्के गावातील जनतेपर्यंत रस्त्याव्दारे सर्व ऋतूंमध्ये संपर्कच साधता येत नव्हता अनेक गावांशी पावसाळ्यात संपर्क तुटायचा. राज्य सरकारांनी काम केलेल्या गावातील रस्त्यांचा दर्जा अतिशय खराब असल्यामुळे बहुतांश वेळा पावसाळ्यात संपूर्ण रस्ताच वाहून जात असे. (सरकार ईटी एएल-२००७). ग्रामीण भागाला शहराशी जोडण्याच्या हेतूने सरकारने प्रधानमंत्री ग्राम

सडक योजना (पी. एम. जी. एस.वाय.) सन २००० मध्ये सुरू केली. या योजनेसाठी केंद्र सरकारने निधी तर दिलाच याशिवाय जागतिक बँक, अशियाई विकास बैंक यासारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांकडूनही निधी उपलब्ध करून देण्यात आला. वर्षभरातील सर्व ऋतुंमध्ये रस्त्यांमार्फत संपर्क कायम रहावा, अशा दर्जाचे रस्ते बांधण्याचे उद्दिष्ट्य निश्चित करण्यात आले. या योजनेनुसार एक मार्गिका ३.७७ मिटरची ठेवण्याचे निश्चित करण्यात आले. पठारावरील ज्या गावांची वस्त्यांची लोकसंख्या १००० आहे, तर डोंगराळ भागातल्या तसेच आदिवासी, र्यक्रम वाळवंटातील ५०० पेक्षा जास्त लोकसंख्या असेल त्या गावांना जोडण्याचे धोरण ठरविण्यात आले. ही सगळी कामे सन २००३ पर्यंत पूर्ण करण्याची योजना ग्रामीण आखण्यात आली. यानंतरचे सरकारने उचललेले पाऊल म्हणजे; पठारावरील ज्या वाड्यांची लोकसंख्या ५०० आहे आणि डोंगराळ, आदिवासी, वाळवंट या भागातील ज्या गावांची लोकसंख्या २५० आहे, अशा गावांना २००७ पर्यंत रस्त्यांनी जोडण्याची योजना तयार करण्यात आली. या महत्वाकांक्षी रस्ते बांधणी कार्यक्रमामुळे मार्च २०१३ पर्यंत ५१ टक्के गावे जोडली गेली. प्रधानमंत्री ग्राम सडक योजना सुरू होऊन आता बारा वर्षे झाली. रस्ता तयार झाल्यानंतरही पहिली पाच वर्षे रस्त्याच्या डागडुजीचे कामही त्याच कंत्राटदाराने करायचे असे या योजनेत ठरले. वाहतूक दिवसेंदिवस जास्त वाढल्याने रस्ते लवकर खराब होऊ लागले. जागोजागी खड्ये पडू लागले. अर्थात याला त्या त्या प्रदेषातले हवामानही कारणीभूत होते. तसेच काही मार्गांवर अपेक्षेपेक्षा जास्त मोठ्या प्रमाणात वाहतूक वाढली. त्यामुळे रस्ता रूंदीकरणाची आवश्यकता भासू लागली. आता या नव्या वाढीव रस्ते कामांना सरकारने प्रधानमंत्री ग्रामीण सडक योजना-२ असे नामाभिधान दिले आणि बऱ्याच ठिकाणी रस्तारुंदीची कामे सुरू केली. मात्र ज्या रस्त्यांचे काम पहिल्या योजनेनुसार झाले होते तेच रस्ते रूंद करण्यात आले.

जागतिक बँकेने एक विकासकार्यक्रम तयार केला आहे, त्याला 'रूरल ऍक्सेस इंडिकेटर' (आर. ए. आय.) असे संबोधले जाते. त्यानुसार संपूर्ण विभागाचा विचार करून संपर्क साधने निर्माण करण्याचे काम केले जाते. त्या विशिष्ट

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

भागात दोन किलोमिटर क्षेत्रामध्ये किती ग्रामस्थ राहतात, ( साधारणपणे २० ते २५. मिनिटांमध्ये पायी चालत किती अंतर कापले जाते, याचा विचार हे धोरण निश्चित करताना केला ) याची

पाहणी करून प्रधानमंत्री ग्रामीण सडक योजना राबविली गेली. तर महाराष्ट्र राज्यासाठी मुख्यमंत्री ग्राम सडक योजना राबविली गेली.

**मुख्यमंत्री ग्रामसडक योजना'**

राज्यातील अनेक गावे, विशेषत: दुर्गम भागातील गावे अजुनही रस्त्यांपासून दूर आहेत. रस्ते नसल्याने या गावातील विद्यार्थी, मुली यांना शिक्षणापासून दूर रहावे लागते. अधिकारी, कर्मचारी, डॉक्टर इत्यादी लोक या गावात जाण्यास उत्सूक नसतात आणि त्याअभावी हे गाव आरोग्य, शिक्षण, पोषण, रोजगार इत्यादी प्राथमिक बाबींपासूनही कोसो दूर राहते. त्यामुळेच केंद्र शासनाने अशा दुर्गम वाड्या, खेडी, पाडे, वस्त्या किंवा ज्या गावांना अजूनपर्यंत रस्त्याची जोडणी मिळाली नाही, त्यांच्यासाठी ‘पंतप्रधान ग्रामसडक योजना' सुरु केली. राज्यातील अनेक वाड्या-वस्त्या, छोटी गावे यांना या योजनेचा लाभ मिळाला आहे. पण तरीही सन २०११ च्या जनगणनेनुसार राज्यात अद्यापही रस्त्याने न जोडल्या गेलेल्या गावांची संख्या अधिक आहे. त्यामुळेच राज्य शासनाने आपली स्वतंत्र अशी 'मुख्यमंत्री ग्रामसडक योजना' सुरु केली आहे.

या योजनेंतर्गत ७३० किमी लांबीची नवीन जोडणी व ३० हजार किमी लांबीवर रस्ते दर्जोन्नतीसाठी काम करण्यात येणार आहे. राज्यातील सर्व गावे, वाड्या, वस्त्या दर्जेदार रस्त्यांनी जोडण्याचा शासनाचा मानस आहे. सर्वसाधारण क्षेत्रात ५०० पेक्षा जास्त तर आदिवासी क्षेत्रात २५० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या पण अद्याप रस्त्याने न जोडल्या गेलेल्या गावांना या योजनेतून प्राधान्याने रस्ते दिले जाणार आहेत. त्यानंतर उर्वरीत लोकसंख्येच्या न जोडलेल्या वाड्या-वस्त्यांची लोकसंख्येच्या उतरत्या क्रमाने निवड करुन जोडणी करण्यात येणार आहे.

या योजनेत अस्तित्वात असलेल्या रस्त्यांची दर्जोन्नतीही केली जाणार आहे. यासाठी ३० हजार किमीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. ही दर्जोन्नती करताना ५०० पेक्षा अधिक लोकसंख्येच्या गावाला जोडणाऱ्या, एसटी बसच्या अधिक फेऱ्या असलेल्या, जास्त वर्दळ असलेल्या रस्त्यांची प्राधान्याने निवड करण्यात येते. यासाठी ज्या गावांची निवड झाली असेल त्यांनी त्यांना उपलब्ध झालेल्या १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून १५ टक्के निधी स्वेच्छेने दिल्यास त्यांचा प्राथम्याने विचार करण्यात येतो.

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेसाठी राज्याने निश्चित केलेल्या उद्दिष्टाच्या पुर्ततेसाठी पुढील पाच वर्षात साधारण १३ हजार ८२८ कोटी रुपयांचा निधी लागणार आहे. या योजनेतून सुमारे एक हजार कोटी रुपयांची कामे लवकरच सुरु करण्यात येणार आहेत. राज्याच्या नुकत्याच जाहीर झालेल्या अर्थसंकल्पात चालू आर्थिक वर्षासाठी या योजनेत ५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून अजून अधिकचा निधी उपलब्ध करुन देण्यात येईल, असे घोषीत करण्यात आले आहे. शिवाय या योजनेसाठी जिल्हा नियोजन समितीच्या रस्ते क्षेत्रातील निधी उपलब्ध करण्यात येतो. आदिवासी भागातील रस्त्यांसाठी आदिवासी विकास विभागाकडूनही निधी उपलब्ध करुन देण्यात येतो.

या योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्ह्यात पालकमंत्री व जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दोन स्वतंत्र समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. पालकमंत्र्यांच्या समितीमार्फत रस्तेबांधणी आणि दर्जोन्नतीसाठी गावांची निवड केली जाते तर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत रस्त्यांच्या कामासाठी भूसंपादन करणे,

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

अतिक्रमणे हटविणे व इतर अडचणी दूर करुन समन्वय साधण्याची जबाबदारी असते. राज्यात या योजनेची अंमलबजावणी सुरु झाली असून प्रत्येक जिल्ह्याला त्यांचे उद्दिष्ट निश्चित करुन देण्यात आले आहे.

योजनेच्या अंमलबजावणीत राज्य शासनामार्फत नुकताच एक महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. त्यानुसार या योजनेअंतर्गतच्या रस्त्यांच्या डांबरीकरणाच्या कामात निरुपयोगी प्लॅस्टिकचा वापर करण्यात येणार आहे. मोठ्या प्रमाणात निर्माण होणारा प्लॅस्टिकच्या कचऱ्याचा प्रश्न सध्या गहन झाला आहे. त्याच्या व्यवस्थापनाची मोठी समस्या आहे. पण त्याचवेळी रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामात निरुपयोगी प्लॅस्टिकचा वापर केल्यास रस्त्याच्या टिकाऊपणामध्ये वाढ होते, असे अभ्यासाअंती सिद्ध झाले आहे. त्यामुळे भारतीय रस्ते महासभेने उष्ण मिश्रीत डांबरीकरणाच्या कामात निरुपयोगी प्लॅस्टिकचा वापर करण्याबाबत मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. या सूचना लक्षात घेऊन केंद्रीय भूपृष्ठ महामार्ग मंत्रालयाने राष्ट्रीय महामार्गावरील डांबरीकरणात निरुपयोगी प्लॅस्टिकचा वापर करण्याबाबत सूचना निर्गमित केल्या आहेत.

केंद्र शासनाने पंतप्रधान ग्रामसडक योजनेतही निरुपयोगी प्लॅस्टिकचा वापर करण्याचा निर्णय घेतला आहे. त्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने जिथे निरुपयोगी प्लॅस्टिकच्या व्यवस्थापनाचा प्रश्न गहन झाला आहे अशा पाच लाख लोकसंख्येच्या शहरापासून ५० किमी त्रिज्येच्या आत येतात अशा रस्त्यांच्या डांबरीकरणाच्या कामात निरुपयोगी प्लॅस्टिकचा वापर करण्यास मान्यता दिली आहे. हे करताना भारतीय रस्ते महासभेच्या मार्गदर्शक सुचनांचा अवलंब करावा, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. या योजनेतून रस्ता मंजूर झाल्यास तो दर्जेदार आणि मजबूत कसा होईल यावर स्थानिक ग्रामस्थांनी लक्ष देणे गरजेचे आहे.

**प्रश्न आणि आव्हाने**

प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेतून स रस्त्यांची बांधणी केल्यामुळे जोडरस्त्यांचे या जाळे निर्माण होण्यास खूपच मदत झाली. र ग्रामीण भागाला षहरांषी जोडण्याचे मोठे आणि महत्वाचे काम झाले. अर्थात रस्ते जोडण्याचे आव्हान पेलणे खरोखरीच क अवघड होते. कारण प्रत्येक ठिकाणची भौगोलिक परिस्थिती वेगळी असल्याने रस्ते तयार करून गावांना जोडणे किती कठीण होते, याविशयी मुद्दे खाली देण्यात आले आहेत.

- ज्या खेडेगावांची लोकसंख्या कमी आहे, त्यांना जोडणारे रस्ते निर्माण करण्याबाबत आपल्याकडे अतिषय उदासिनता आहे. मुळात गावाच्या i लोकसंख्येची कसोटी रस्ते निर्मितीला लावणेच अयोग्य आहे. कारण भारतासारख्या देशात त्या-त्या क्षेत्राची गरज ओळखून, रस्त्यांचे जाळे निर्माण रस्त्यांचे जाळे निर्माण करण्याची आवश्यकता आहे.
- रस्त्यांची निर्मिती होणे महत्वाचे आहे. केवळ जास्त लोकसंख्येशी संपर्क होतो की नाही, हे पाहणे अयोग्य आहे. योज सध्या प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेमध्ये अर्धा किलोमिटर आणि दीड किलोमिटर वाह परिघाचा विचार केला जातो. यामध्ये पठारी प्रदेश तसेच पर्वतीय प्रदेशांचाही नवे समावेश आहे. वाळवंटी प्रदेशात वसाहती विखुरलेल्या असतात, त्यामुळे केवळ अंतराचा विचार करणे योग्य नाही. तर दूरच्या वसाहतींमध्ये संपर्काचे महत्वाचे पिल

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

साधन म्हणजे परवडणाऱ्या दरामध्ये एका अभि ठिकाणाहून दुसरीकडे जाण्यासाठी उत्तम असे रस्ते असले पाहिजेत. यामुळे ज्यांना शक्य आहे त्यांना स्वतःचे वाहनही वापरणे शक्य होऊ शकते.

- ज्या ज्या ग्रामीण भागात रस्त्यांची कामे पूर्ण चांगली आहेत, त्या रस्त्यांवर गेल्या काही वर्षात मोठ्या प्रमाणावर वाहतुकीची वर्दळ वाढली आहे. मात्र या रस्त्यांची दुरूस्ती करणे आणि दर्जा टिकवणे यासाठी राज्य सरकारांकडे पुरेसा निधी नाही. त्यामुळे या रस्त्यांची स्थिती नेहमी चांगली रहावी, यासाठी ठोस योजना पुरेशा निधी उपलब्धतेसह बनवणे आवशक आहे.

- ग्रामीण भागात रस्त्यांची निर्मिती करण्याचा खर्च सातत्याने वाढतोय, तसेच रस्ते बांधणीसाठी लागणारे साहित्यही दिवसेंदिवस महाग होत आहे. त्यामुळे आडगावांमध्ये रस्त्यांची कामे खर्चिक होत आहेत. यावर उपाय म्हणजे स्थानिक पातळीवर उपलब्ध असणारे साहित्य वापरून हा खर्च कमी करणे शक्य आहे. अर्थात स्थानिक स्तरावर चांगल्या दर्जाचे बांधकाम साहित्य मिळणे हा मोठा अडसर आहे.

- ग्रामीण भागात रस्त्यांची निर्मिती करण्याचा खर्च सातत्याने वाढतोय, तसेच रस्ते बांधणीसाठी लागणारे साहित्यही दिवसेंदिवस महाग होत आहे.. त्यामुळे आडगावांमध्ये रस्त्यांची कामे खर्चिक होत आहेत. यावर उपाय म्हणजे स्थानिक पातळीवर उपलब्ध असणारे साहित्य वापरून हा खर्च कमी करणे शक्य आहे. अर्थात स्थानिक स्तरावर चांगल्या दर्जाचे बांधकाम साहित्य मिळणे हा मोठा अडसर आहे.

- डोंगराळ भागात उंच- सखलपणामुळे रस्त्यांची निर्मिती करणे फार कठीण काम आहे. तसेच खर्चिकही आहे. पाणी निचऱ्याची व्यवस्था, अतिउतार यामुळेही घाटात रस्ते बांधणे अवघड आहे.

- ग्राम सडक योजनेमुळे रस्ते निर्माण झाले आणि वाहतूक प्रचंड वाढली. आता या वाढत्या नवे आव्हान निर्माण झाले. वाहतुकीमुळे अपघातांचे प्रमाणही वाढले. म्हणजेच वाढत्या अपघातांचे नवे आव्हान निर्माण झाले आहे.

**संदर्भ**


- लेखक - इर्शाद बागवान, विभागीय संपर्क अधिकारी. स्त्रोत – महान्युज
- Modak and Patekar, Selected Writing on Transport, Mumbai, Sumita Publications.
- Savadi A.B., Maharashtra Nirali Prakashan, Pune March, 1999
- Shrivastav S.K., Economics oftransport with special reference to transport development in India, Chand and company Ltd. New Delhi, 1981

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
*SPECIAL ISSUE ON MARATHI AARTHSHASHTRA PARISHED Nov. 2023*

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

# मानव संसाधन विकास मंत्रालयाची मानवी भांडवलातील भूमिका

**डॉ.जयश्री पंढरीनाथ जाधव**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
**एस.व्ही.के.टी.कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, देवळाली कॅम्प,**
**नाशिक – 422 401.**
**इमेल – jayashriskadam@gmail.com मोबाईल : ९८८१९३८८५८**

**प्रस्तावना**

*मानवी भांडवलात शिक्षण, संशोधन आणि मानव संसाधन विकासासाठी मानव संसाधन विकास मंत्रालयाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे.स्वातंत्र्यप्राप्तीपासून २१ व्या शतकापर्यंत भारताने अनेक क्षेत्रात उंच भरारी घेतली आहे. देशाच्या विकासासाठी सरकारचे सर्व विभाग कार्यरत आहेत. विविध क्षेत्रांचा विकास साध्य करण्यासाठी शासनाची विविध खाती सक्षमपणे कार्य करत आहे. भारतातील मानवी भांडवलाच्या विकासासाठी मानव संसाधन विकास मंत्रालय कार्यरत असून या मंत्रालयामार्फत मानवी भांडवलाचा विकास घडवून येत आहे. प्रस्तुत शोधनिबंधात मानव संसाधन विकास मंत्रालय शिक्षणावर करत असलेल्या खर्चाचा आढावा आणि अंदाजपत्रकातील शिक्षणासाठी असलेल्या खर्चाची तरतूद अभ्यासण्यात आली आहे.शोधनिबंध लिहितांना मानव संसाधन विकास मंत्रालयाद्वारे राबविण्यात येणारी विशिष्ट धोरणे, उपक्रम आणि कार्यक्रम तसेच मानवी भांडवलाच्या विकासावर घडून येणारा परिणाम.*

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

- मानव संसाधन विकास मंत्रालयाची भूमिका अभ्यासणे.
- मानवी भांडवलाची भूमिका अभ्यासणे.
- मानव संसाधन विकास मंत्रालयाने शिक्षणावर केलेल्या खर्चाचा अभ्यास करणे.

**संशोधनाचे गृहीतक :-** मानव संसाधन विकास मंत्रालयामुळे मानवी भांडवलाचा विकास झाला आहे.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम आधार सामग्रीचा वापर करण्यात आला आहे.

**संशोधनाची व्याप्ती**

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

मानवी भांडवलाच्या विकासासाठी मानव संसाधन विकास मंत्रालयाने शिक्षणावर केलेल्या खर्चाचा आढावा घेण्यात आला आहे.

**मानव संसाधन विकास मंत्रालयाची भूमिका**

भारतातील शिक्षणाशी संबंधित धोरणे तयार करणे आणि त्यांच्या अंमलबजावणीसाठी शिक्षण मंत्रालय कार्यरत आहे. मंत्रालयाची प्रमुख भूमिका आणि जबाबदाऱ्यांमध्ये प्रामुख्याने अनेक बाबी समाविष्ट आहे. मानव संसाधन विकास मंत्रालय मानवी भांडवलाच्या विकासासाठी प्रामुख्याने पुढील भूमिका बजावते

मानव संसाधन विकास मंत्रालयाची मुख्य भूमिका खालील क्षेत्रांमध्ये आहे.

**शिक्षण :** हे मंत्रालय शिक्षण क्षेत्रातील विकासाला प्रोत्साहन देते, जेणेकरून देशातील लोकांना उच्च शिक्षण,तांत्रिक शिक्षण, प्रशिक्षण तसेच आर्थिक शिक्षण मिळते.

**रोजगार आणि कौशल्य विकास** : रोजगार आणि कौशल्य विकासाच्या क्षेत्रात हे मंत्रालय काम करते, जेणेकरून लोकांना अधिक रोजगाराच्या संधी मिळतील आणि त्यांची कौशल्ये सुधारतील.

**आरोग्य :** आरोग्य सेवांचा विकास आणि सुधारणा करण्यास प्रोत्साहन देते जेणेकरून लोक निरोगी राहू शकतील.

**सामाजिक समृद्धी :** सामाजिक उत्कर्षाला चालना देण्यासाठी देखील त्याची प्रमुख भूमिका आहे, ज्यामुळे समाजात समानता आणि न्यायाचे वातावरण निर्माण होते.

**बाल विकास :** मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी कृती करणे, जसे की शिक्षण, आरोग्य सेवा आणि समृद्धीसाठी योजना चालवणे.

**देशाच्या विकासासाठी धोरण तयार करणे :-**

शिक्षण आणि मानव संसाधन विकासाशी संबंधित धोरणे तयार करणे. यामध्ये प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च शिक्षणाची धोरणे तसेच कौशल्य विकास उपक्रमांचा समावेश आहे. मंत्रालय शालेय शिक्षण, उच्च शिक्षण आणि व्यावसायिक शिक्षणाशी संबंधित धोरणे तयार करण्यात गुंतलेले आहे. लोकसंख्येच्या विविध गरजा पूर्ण करणारी सर्वसमावेशक आणि सर्वसमावेशक शिक्षण प्रणाली तयार करणे हे त्याचे उद्दिष्ट आहे.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

**संशोधन आणि नवोपक्रमाला चालना :-**

शिक्षण, वैज्ञानिक संशोधन आणि मानव संसाधन विकास क्षेत्रातील संशोधन प्रकल्पांसाठी मंत्रालय निधीचे वाटप करते. शैक्षणिक गुणवत्ता, कौशल्य विकास आणि नवनिर्मितीला प्रोत्साहन देणे यासह मानवी भांडवलाच्या विविध पैलूंवर संशोधन करणाऱ्या विद्वान आणि संस्थांसाठी हे आर्थिक सहाय्य महत्त्वपूर्ण आहे.

**अभ्यासक्रम विकास:-**

मानव संसाधन विकास मंत्रालय सामान्यत: शैक्षणिक अभ्यासक्रमाची रचना आणि अद्ययावत करण्यात गुंतलेले असते. यामध्ये शिक्षण कार्यक्रम,समाजाच्या सध्याच्या गरजा आणि नोकरीच्या बाजारपेठेशी सुसंगत आहेत याची खात्री करण्यासाठी संशोधनाची फलश्रुती ज्यामुळे मानवी भांडवलाच्या विकासास हातभार लागतो.

**शिक्षणातील गुणवत्ता हमी:-**

शिक्षणाची गुणवत्ता सुनिश्चित करणे आणि टिकवून ठेवणे ही प्रमुख जबाबदारी आहे. मानवी भांडवल संशोधनामुळे सुधारणेची गरज असलेले क्षेत्र ओळखण्यात मदत होते आणि मंत्रालय या निष्कर्षांचा उपयोग शिक्षणाची गुणवत्ता वाढवण्याच्या उद्देशाने धोरणे लागू करण्यासाठी करते.

**कौशल्य विकास उपक्रम:-**

रोजगारक्षमता वाढवण्यावर लक्ष केंद्रित करून, मंत्रालय कौशल्य विकास आणि व्यावसायिक शिक्षणाशी संबंधित उपक्रमांवर काम करते. मानवी भांडवल संशोधन विविध कौशल्यांची अंतर्दृष्टी देऊन प्राप्त माहितीचा उपयोग कर्मचाऱ्यांची रोजगारक्षमता वाढविण्यासाठी कौशल्य विकास कार्यक्रमांची रचना आणि अंमलबजावणी करण्यासाठी करते.

**देखरेख आणि मूल्यमापन :-**

विविध शैक्षणिक आणि कौशल्य विकास कार्यक्रमांच्या परिणामकारकतेचे परीक्षण आणि मूल्यमापन करण्यात मंत्रालयाची महत्त्वाची भूमिका असते. संशोधनाचे निष्कर्ष पुराव्यावर आधारित निर्णय घेण्यास आणि धोरण समायोजनामध्ये योगदान देतात.

**आंतरराष्ट्रीय सहकार्य:-**

शिक्षण क्षेत्रातील सर्वोत्तम पद्धती, ज्ञान आणि अनुभवांची देवाणघेवाण करण्यासाठी मंत्रालय आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि भागीदारीला महत्व देते.मानवी भांडवल विकासातील जगातील सर्वोत्तम पद्धती आणि व्यापाऱ्यामध्ये अंतर्दृष्टी

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

मिळविण्यासाठी मंत्रालयाद्वारे आंतरराष्ट्रीय संस्था आणि संशोधकांसह सहकार्य केले जाते. या सहकार्यामुळे संशोधनाची व्याप्ती समृद्ध होऊन प्रभावी धोरणांच्या विकासात वाढ होते.

**शैक्षणिक पायाभूत सुविधांचा विकास :-**

कार्यक्रमांची अंमलबजावणी करतांना सर्व स्तरांवर शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्याच्या उद्देशाने विविध शैक्षणिक कार्यक्रम आणि उपक्रम राबविण्यासाठी मंत्रालय जबाबदार आहे. यामध्ये पायाभूत सुविधांच्या विकासाशी संबंधित उपक्रम, शिक्षक प्रशिक्षण आणि नाविन्यपूर्ण शिक्षण पद्धतींचा समावेश आहे. लोकसंख्येच्या शिक्षण आणि कौशल्य विकासाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी पुरेशा सुविधा उपलब्ध आहेत याची खात्री करून शैक्षणिक पायाभूत सुविधांचे नियोजन आणि विकास करण्यात मंत्रालयाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे

**शैक्षणिक संस्थांचे नियमन:**

मंत्रालय देशभरातील शैक्षणिक संस्थांच्या कामकाजावर देखरेख ठेवते. हे दर्जेदार शिक्षण आणि एकसमान शैक्षणिक संरचना सुनिश्चित करण्यासाठी शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांसाठी मानके आणि मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करते.

मंत्रालय शिक्षण क्षेत्रातील विकासाला प्रोत्साहन देते, जेणेकरून देशातील लोकांना उच्च शिक्षण आणि तांत्रिक शिक्षण तसेच आर्थिक शिक्षण मिळू शकेल.रोजगार आणि कौशल्य विकासासाठी हे मंत्रालय काम करते जेणेकरून लोकांना अधिक रोजगाराच्या संधी मिळतील आणि त्यांची कौशल्ये सुधारतील.तसेच मनुष्यबळ विकास मंत्रालय आरोग्य सेवांचा विकास आणि सुधारणा करण्यास प्रोत्साहन देते जेणेकरून लोक निरोगी राहू शकतील.सामाजिक समृद्धी,सामाजिक उत्कर्षाला चालना देण्यासाठी देखील मंत्रालयाची प्रमुख भूमिका आहे, ज्यामुळे समाजात समानता आणि न्यायाचे वातावरण निर्माण होते.बाल विकासातर्गत मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी कृती करणे, जसे की उच्च शिक्षण, आरोग्य सेवा आणि समृद्धीसाठी योजना चालवणे.

अशा प्रकारे, मानव संसाधन विकास मंत्रालय सामाजिक आणि आर्थिक दृष्टीकोनातून देशाच्या मानव संसाधनांना समृद्धी आणि विकासासाठी मार्गदर्शन करते.

**मानवी भांडवल :-**

कोणत्याही देशाचा आर्थिक विकास त्या देशाजवळ असलेली यंत्रसामग्री, कारखाने, रेल्वे, बंदरे, औद्योगिक कच्चामाल इत्यादी वस्तू भांडवलाच्या साठ्यावर आणि त्यात होणाऱ्या वाढीच्या दरावर अवलंबून असतो असे गृहीत धरले आहे.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

मानवाकडे फक्त श्रमिकांचा पुरवठा एवढ्या मर्यादित अर्थानेच पाहिले गेले. परंतु अलीकडे मानवी भांडवलाचे महत्व वाढलेले आहे. मानवी भांडवलात गुणात्मक सुधारणा केल्यास वास्तव भांडवलाप्रमाणेच मानवी भांडवल आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत अधिकाधिक परिणामकारक भूमिका बजावतात. मानवी भांडवलात श्रमिकाची गुणवत्ता, श्रमिकाची काम करण्याची कुवत आणि ताकद मानवी कौशल्य वाढवण्यासाठी केलेली गुंतवणूक म्हणजे देशाच्या सर्व अर्थव्यवस्थेमध्ये केलेली अधिक गुंतवणूक होय. याचा अर्थ सर्व अर्थव्यवस्थेची कार्यक्षमता व उत्पादकता भावी काळात कायमची वाढणार आहे. मानवी भांडवल निर्मितीसाठी तीन महत्त्वाच्या बाबतीत गुंतवणूक अत्यावश्यक आहे. त्यात शिक्षण, आरोग्य सेवा आणि पौष्टिक अन्न धान्य या तीन बाबतीत देशात जी गुंतवणूक केली जाते त्यातून श्रमिकाची शारीरिक आणि बौद्धिक वाढ होते. कारण राहणीमान व आरोग्य उच्चस्तरावरील असते तेथे प्रमुख गुंतवणूक लोकांच्या विविध प्रकारच्या शिक्षणावर केली जाते.

शिक्षणावरील गुंतवणुकीमुळे घडवून येणारा दुसरा आणि महत्त्वाचा बदल म्हणजे परंपरावादी समाजाचे आधुनिक व प्रगतशील समाजात रूपांतर होते. म्हणूनच मानवी भांडवलात अधिकाधिक गुंतवणूक केली जाणे अत्यावश्यक आहे. कारण आधुनिक अर्थव्यवस्थेत विविध क्षेत्रातील तज्ञांची समाजाला गरज आहे. उदाहरणार्थ निरनिराळ्या शासकीय स्तरावरील नोकर, डॉक्टर, इंजिनीयर आणि शेती करणारे शेतकरी धातू काम करणारे हजारो विषयातील तज्ञांची आधुनिक आणि त्यांच्या संख्यात्मक व गुणात्मक बाबतीत सतत वाढ व सुधारणा आवश्यक आहे. आधुनिक समाज सुस्थितीत राहून प्रगतीपथावर सतत ठेवण्यासाठी आधुनिक शिक्षण हा आधुनिक समाजाचा विकसित अर्थव्यवस्थेचा मूलभूत पाया आहे. याचाच अर्थ शिक्षणावरील गुंतवणूक म्हणजेच मानवी भांडवल निर्मितीसाठी केलेली गुंतवणूक ही आर्थिक विकासाला दिशा देणारी आहे म्हणून ती अत्यावश्यक आहे. वाढत्या मानवी भांडवल निर्मितीसाठी अधिकाधिक संशोधन नवनवीन यंत्राचा शोध इत्यादी मार्गाने वास्तव भांडवलात सतत भर पडते, आणि अर्थव्यवस्था सतत वरच्या स्तराकडे उंचावते. त्यामुळे लोकांची सर्वांगीण जीवनमानाची पातळी ही सतत उंचावत असते, म्हणून चांगल्या मानवी भांडवलासाठी शिक्षणावरील गुंतवणूक वाढवणे आवश्यक आहे. मानव संसाधन विकास मंत्रालयाने शिक्षणावर केलेला खर्च.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

**केंद्रीय सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने दिलेला अर्थसंकल्पीय खर्च (महसूल खाते)**
(रुपये करोड)

| अ.नं. | | २०१८-१९ (वास्तविक) | २०१९-२० (सुधारित अंदाज) | २०२०-२१ (बजेट अंदाज) |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| **शालेय शिक्षण आणि साक्षरता विभाग** | | | | |
| १ | प्राथमिक शिक्षण | ३५५४७.११ | ४५९९१.१३ | ५००००.५० |
| २ | माध्यमिक शिक्षण | १२४५९.३३ | १०५२७.९७ | ९८१०.३० |
| ३ | प्रौढ शिक्षण | ५७.६६ | १२.२३ | २३.८० |
| | **एकूण** | **४८०६४.१०** | **५६५३१.३३** | **५९८३४.९०** |
| **उच्चशिक्षण विभाग** | | | | |
| १ | विद्यापीठ आणि उच्च शिक्षण | १३६७६.५३ | १६९०९.०१ | १७२६३.३१ |
| २ | भाषेचा विकास | ४५७.९१ | ४९४.३७ | ५३५.९३ |
| ३ | डिस्टन्स लर्निंग आणि टेक्निकल सक्षम शिक्षण | ५३२.०२ | ६६१ | ५७४ |
| ४ | नियोजन, प्रशासन, ग्लोबल एंगेजमेंट आणि बुक प्रमोशन | ३४६.७८ | ५१६.९७ | ६०१.०८ |
| ५ | विद्यार्थी आर्थिक मदत | २३४४.९५ | २७७६ | २७३२ |
| ६ | तांत्रिक शिक्षण | १२२९३.१२ | १४७७६.०४ | १५५३२.८० |
| | **एकूण उच्चशिक्षण** | **२९६५१.३१** | **३६१३३.३९** | **३७२३९.१२** |
| **शालेय शिक्षण,साक्षरता विभाग आणि उच्चशिक्षण एकूण रक्कम** | | **७७७१५.४१** | **९२६६४.७२** | **९७०७४.०२** |

वरील तक्ता नुसार २०१८-१९ (वास्तविक), २०१९-२० (सुधारित अंदाज) आणि २०२०-२१ (अर्थसंकल्पीय अंदाज) या तीन वर्षांसाठी केंद्रीय क्षेत्रातील शिक्षण विभागांद्वारे शिक्षणावरील अर्थसंकल्पीय खर्चाचे क्षेत्रनिहाय विभाजन आहे. त्यानुसार २०२०-२१ मध्ये रु. ५००००.८० कोटी किंवा शिक्षण विभागाच्या एकूण बजेटच्या ५१.५१% प्राथमिक शिक्षणासाठी तरतूद केली आहे. दुसरे प्राधान्य विद्यापीठ आणि उच्च शिक्षण (डीएल आणि स्टुडंट फायनान्ससह) यांना दिले रु.२०५६९.३१ कोटी किंवा २१.१९%. तिसरे प्राधान्य तांत्रिक शिक्षणाला दिले आहे ते रु.१५५३२.८० कोटी किंवा

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

१६.००% आहे. त्यानंतर माध्यमिक शिक्षणासाठी रु. ९८१०.३० कोटी किंवा १०.११% आणि रू.२३.८०.कोटी रू. ०.०२% प्रौढ शिक्षणासाठी आणि रु. ५३५.९३ कोटी किंवा ०.५५% भाषा विकास कार्यक्रमांसाठी आणि रू.६०१.०८ कोटी किंवा ०.६२% संशोधन आणि आंतरराष्ट्रीय सामान्य हेतूंसाठी सहकार्य प्रशिक्षणासह शिक्षणासाठी केंद्रीय अर्थसंकल्पीय तरतुदीचे मंत्रालय/विभागानुसार ही तरतूद २०२०-२१ मध्ये रु.२२३०५४.७३ कोटी होती ती एकूण

केंद्रीय अर्थसंकल्पाच्या ६.५३% होती. हे प्रमाण २०१८-१९ मध्ये ६.८२% आणि २०१९-२० मध्ये ६.३९%बजेट तरतुदीची टक्केवारी आहे. केंद्रीय अर्थसंकल्पात विविध उप-क्षेत्रांवर सापेक्ष भर देण्यात आला आहे

भारत सरकारच्या विविध मंत्रालयांमध्ये मानवी भांडवलाच्या कौशल्य विकासाच्या तसेच गुणवत्ता वाढीसाठी ज्या मंत्रालयाचा समावेश आहे त्यामध्ये प्रामुख्याने कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय , आयुष मंत्रालय , रसायने आणि खते मंत्रालय, नागरी विमान मंत्रालय , कोळसा मंत्रालय ,वाणिज्य आणि उद्योग मंत्रालय ,ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालय,सहकार मंत्रालय ,सांस्कृतिक मंत्रालय, पृथ्वी विज्ञान मंत्रालय ,पर्यावरण, वन आणि पर्यावरण बदल मंत्रालय, परराष्ट्र मंत्रालय , वित्त मंत्रालय , आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय,गृह मंत्रालय ,गृहनिर्माण आणि शहरी विकास मंत्रालय ,माहिती आणि प्रसारण मंत्रालय, जल मंत्रालय ,सुरक्षा आणि प्रशासन मंत्रालय ,कायदा आणि न्याय मंत्रालय,सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालय, खाण मंत्रालय ,अल्पसंख्याक व्यवहार मंत्रालय, पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालय ,ऊर्जा मंत्रालय , रेल्वे मंत्रालय ,जिल्हा आणि महामार्ग मंत्रालय ,ग्रामीण विकास मंत्रालय , विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालय, शिपिंग मंत्रालय ,सामाजिक न्याय आणि अधिकार मंत्रालय, सांख्यिक मंत्रालय, पोलाद मंत्रालय, वस्त्रद्योग मंत्रालय , आदिवासी कार्य मंत्रालय ,महिला आणि बालविकास मंत्रालय, युवा मंत्रालय ,एनआयटीआय कं ,अणुउर्जा विभाग ,डिपार्टमेंट ऑफ फूड प्रोसेसिंग इंड. ,अंतराळ विभाग इत्यादिच्या शिक्षण आणि प्रशिक्षणावर,संशोधनवर केलेला खर्च वर्ष २०१८ -१९ ते २०२०-२१ या कालखंडामध्ये केलेला आहे तो पुढीलप्रमाणे

सन २०१८-१९ मध्ये एकूण १अब्ज,७५७ दशलक्ष १४१ हजार,३८४ रुपये खर्च केला आहे.सन २०१९-२० मध्ये एकूण १ अब्ज,९५५ दशलक्ष,८१८ हजार, ६७० रुपये खर्च केला आहे. सन २०२०-२१ मध्ये एकूण २ अब्ज,१५० दशलक्ष, ४६० हजार, ९८३ रुपये खर्च केला आहे.

केंद्रात शिक्षण आणि प्रशिक्षणासाठी अंदाजपत्रकीय तरतूदीनुसार वरील विविध मंत्रालयात केलेला खर्च आहे. तीनही वर्षात खर्चात वाढ होत आहे.

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
*SPECIAL ISSUE ON MARATHI AARTHSHASHTRA PARISHED Nov. 2023*

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

**संशोधनाचे निष्कर्ष**

- मानव संसाधन विकास मंत्रालय मानवी भांडवलात गुंतवणूक वाढवत आहे.
- मानव संसाधन विकास मंत्रालया अंतर्गत येणाऱ्या विविध विभागांमध्ये खर्चाचे प्रमाण वाढले आहे.
- सन २०१८-१९ ते २०२०-२१ मध्ये कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय,आयुष मंत्रालय.सांस्कृतिक मंत्रालय. पर्यावरण, वन आणि पर्यावरण बदल मंत्रालय. आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय, अल्पसंख्याक व्यवहार मंत्रालय, रेल्वे मंत्रालय, ग्रामीण विकास मंत्रालय, विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालय,सामाजिक न्याय आणि अधिकार मंत्रालय, महिला आणि बालविकास मंत्रालय, अणुउर्जा विभाग, अंतराळ विभाग या विभागांमध्ये गुंतवणूक वाढलेली आहे.
- देशाच्या विकासासाठी मानव संसाधन मंत्रालयाने मानवी भांडवलात केलेली गुंतवणूक वाढत आहे पण त्यांच अंमलबजावणी योग्य करावी जेणेकरून प्रत्येक विभाग हा सक्षम होईल.

मानव संसाधन विकास मंत्रालय सामाजिक आणि आर्थिक दृष्टीकोनातून देशाच्या मानवी भांडवलाची गुणवत्ता वाढविण्यासाठी खर्च करत आहे. मानवी भांडवलावर केलेल्या खर्चमुळे देशाच्या विकासात प्रचंड वाढ होत आहे. मानवी भांडवलातील गुंतवणूक देशाचं उज्वल भविष्य आहे. मानव संसाधन विकास मंत्रालयामुळे मानवी भांडवलाचा सर्वांगीण विकास होत आहे. भविष्यात जगातल्या विकसित देशांच्या बरोबरीने भारताचा विकास हा झालेला दिसून येईल.

**संदर्भ ग्रंथ :-**

१) कै.डॉ.स.श्री.मु.देसाई आणि डॉ.सौ.निर्मल भालेराव(२०१९)भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन पुणे.
२) https://www.education.gov.in/statistics-new
३) https://www.education.gov.in/statistics-new?shs_term_node_tid_depth=387
४) https://www.education.gov.in/sites/upload_files/mhrd/files/statistics-new/budget_exp.pdf
५) https://en.wikipedia.org/wiki/Human_capital
६) https://www.wallstreetmojo.com/human-capital/
७) https://www.wallstreetmojo.com/human-capital/

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

# मानवी भांडवलाचे सैध्दांतिक विश्लेषण

**प्रा.डॉ. संजय पांडुरंग पाटील**
आजीवन सभासद क्रमाक – 1003
अर्थशास्त्र विभाग
वेस्ट खान्देश भगिनी सेवा मंडळ संचलित,
कला आणि वाणिज्य महिला महाविद्यालय, देवपुर , धुळे -424005
Mo. No. – 9421437570, Email Id : drsanjaykhairnar@gmail.com

**गोषवारा -**

*"मानवी भांडवल" ही संकल्पना सर्व प्रथम अर्थशास्त्राचे जनक ॲडम स्मिथ यांचा "राष्ट्रीय संपत्ती" या ग्रंथात सर्व प्रथम मांडलेली दिसुन येते . ॲडम स्मिथ यांनी श्रम, उत्पादकता आणि आर्थिक वृद्धी वाढवण्याचे साधन म्हणून शिक्षण आणि कौशल्यांमध्ये गुंतवणूक करण्याच्या महत्त्वावर जोर दिला. त्यांनी ओळखले की एखाद्या व्यक्तीचे कौशल्य आणि शोबा सुरी (मार्च 2023 ) मानवी भांडवल ही राष्ट्रांची संपत्ती आहे आणि ती आरोग्य, पोषण, कौशल्ये आणि लोकांच्या ज्ञानावर अवलंबून असते. निरोगी, उच्च कुशल कामगारांची निर्मिती आणि देखभाल करण्यासाठी, भारताने बाल आरोग्य आणि पोषण सुधारण्यासाठी किफायतशीर गुंतवणूक करणे आवश्यक आहे. ज्ञान ही मौल्यवान संपत्ती आहे. मानवी भांडवल ही संकल्पना अर्थशास्त्रज्ञ गॅरी बेकर आणि थिओडोर शुल्त्झ यांनी 20 व्या शतकाच्या मध्यात लोकप्रिय केली.*

*मानवी भांडवलाचे सैद्धांतिक विश्लेषण ही एक संकल्पना आहे जी अर्थशास्त्राच्या क्षेत्रात निर्माण झाली आहे आणि व्यक्तीकडे असलेली मौल्यवान मालमत्ता म्हणून शिक्षण, प्रशिक्षण, कौशल्ये आणि ज्ञान यांच्या भूमिकेवर जोर देते. ॲडम स्मिथ , मार्शल , गॅरी बेकर आणि थिओडोर शुल्त्झ या अर्थशास्त्रतज्ञांनी मानवी भांडवल निर्मितीसाठी किवा मानवी भांडवलाचा गुणवत्तेवर परिणाम करणाऱ्या शिक्षण , प्रशिक्षण आणि कौशल्य या घटकांसोबत कोणत्या घटकांचा मानवी भांडवल निर्मिती आणि गुणवत्तेवर परिणाम करणाऱ्या घटकांचा शोध घेण्याचा प्रयत्न या शोध निबंधात संशोधकाने केला.*

**प्रस्तावना –**

मानवी भांडवल हा अर्थव्यवस्थेच्या विकासावर परिणाम करणारा अत्यंत महत्वाचा घटक आहे. आजच्या आधुनिक काळात अर्थव्यवस्थेचा विकास हा मानवी भांडवलाच्या गुणवत्तेवर अवलंबुन आहे हे सिध्द झाले आहे. "मानवी भांडवल" ही संकल्पना सर्व प्रथम अर्थशास्त्राचे जनक ॲडम स्मिथ यांच्या "राष्ट्रीय संपत्ती" या ग्रंथात सर्व प्रथम मांडलेली दिसुन येते .

मानवी भांडवल हा श्रम या उत्पादन घटकाशी सबंधित आहे. श्रम उत्पादनाचा क्रियाशील घटक आहे. श्रम या उत्पादन घटकांची उत्पादकता वाढविण्यासाठी श्रमिकाला शिक्षण , प्रशिक्षण आणि आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात .मानवी भांडवल अर्थव्यवस्थेसोबतच सुक्ष्म पातळीवर उत्पादन संस्थेसाठी सुध्दा अत्यंत महत्वाचा घटक आहे .

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

म्हणुन उत्पादन संस्था सुध्दा आपल्या कर्मचाऱ्यासाठी शिक्षण, प्रशिक्षण आणि आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करुन भांडवल गुंतवणुक करत असतात.

महाराष्ट्रातील एकूण 40671 गावांपैकी आजही 175 गावे कोणत्याही प्रकारच्या रस्त्यांना जोडलेली नाहीत. महाराष्ट्र हे भारतातील रस्ते वाहतुकीतले प्रथम क्रमांकाचे राज्य मानले जाते परंतु येथील 175 गावे अजूनही कोणत्याही प्रकारच्या रस्त्यांना जोडलेली नाहीत ही अतिशय विचार करण्यासारखी बाब आहे. विदर्भातील सर्वाधिक 86 गावे, पश्चिम महाराष्ट्रातील 33 गावे, उत्तर महाराष्ट्रातील 41 गावे आणि कोकण या विभागातील 15 गावे कोणत्याही प्रकारच्या रस्त्यांना जोडलेली नाहीत. मराठवाडा या प्रदेशाच्या मागासलेपणा बाबत सातत्याने चर्चा होते परंतु मराठवाड्यातील जवळपास सर्वच गावे रस्त्यांनी जोडलेली आहेत. महाराष्ट्र राज्यात अजूनही 374 गावे अशी आहेत की, ज्या गावांना बारा महिने ये जा करण्यासाठी रस्त्यांची सुविधा उपलब्ध नाही. तर विदर्भातील सर्वाधिक 228 गावांना केवळ हंगामी स्वरूपाचे

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

रस्ते उपलब्ध आहेत. महाराष्ट्रातील हंगामी रस्ते व रस्त्यांना न जोडलेली गावे यांची एकत्रित संख्या 549 इतकी असून याचे एकूण गावांसोबतचे प्रमाण 1.3% इतके आहे. रस्ते वाहतूक ही आजच्या युगातली सगळ्यात महत्त्वाची वाहतूक व्यवस्था असून या व्यवस्थेचा सर्वत्र सारखा विकास होणे आवश्यक आहे.

**समारोप :-**

महाराष्ट्रातील रस्त्यांचे जाळे संख्यात्मक दृष्ट्या चांगल्या प्रकारे वाढत असले तरी गुणात्मक दृष्ट्या अजून सुधारण्याला भरपूर वाव आहे. रस्त्यांची स्थिती सर्व प्रादेशिक विभागांमध्ये सारखी नसून त्यात विषमता आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील 1.3 % गावात वर्षातील 12 महिने आपण प्रवास करू शकत नाही. महाराष्ट्रात विकासाच्या बाबतीत पश्चिम महाराष्ट्र हा प्रदेश आघाडीवर असून या प्रदेश्याच्या विकासात रस्ते वाहतूक महत्वाची भूमिका पार पडत असून तेथे शेती, उद्योग व व्यापार इतर प्रदेश्यांच्या तुलनेत विकसित झाले आहेत. विकासाच्या बाबतीत मागास असलेल्या मराठवाडा व विदर्भ या प्रदेशातील रस्ते वाहतूकीचा विकास होत असून तेथे रस्ते विकासाची गती वाढणे अपेक्षित आहे. महाराष्ट्रातील सर्व गावांची रस्ते जोडणी आवश्यक असून जो पर्यंत सर्वच गावे रस्ते वाहतूकीशी जोडले जात नाहीत तोपर्यंत सर्वसमावेशक विकास साध्य होणार नाही.

**संदर्भ :-**

1. *https://en.wikipedia.org/wiki/Roads_in_India*
2. *https://en.wikipedia.org/wiki/Transport_economics*
3. *https://www.britannica.com/money/topic/transportation-economics*
4. *Basic Road Statistics of India Report-2018-19, Government of India, Ministry of Road Transport research Wing New Delhi.*
5. ***महाराष्ट्राच्या समतोल प्रादेशिक विकासाच्या प्रश्नावरील उच्चस्तरीय समितीचा अहवाल, महाराष्ट्र शासन नियोजन विभाग ,ऑक्टोबर** 2013 **पृ**.404.*
6. *Infrastructure Statistics of Maharashtra State, (2010-11), Directorate of Economics and Statistics, Planning Department, Government of Maharashtra, Mumbai.*

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

# महिलांचा आर्थिक विकास आणि मानवी भांडवल

**ज्योती प्रविणचंद्र पाटील**
मुळजी जेठा महाविद्यालय,जळगाव
क. ब. चौ. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
email jyotiprakashchaudhari@gmail.com
मराठी अर्थशास्त्र परिषद आजीव सभासद क्रमांक 1971

**गोषवारा**

*मानवी भांडवल हे एखाद्या व्यक्तीमध्ये उत्पन्न निर्माण करण्याच्या संभाव्य क्षमतेद्वारे जन्मजात क्षमता आणि प्रतिभा तसेच प्रशिक्षण शिक्षण आणि एखाद्या व्यक्तीच्या व्यवहारिक क्रिया, कला, प्रक्रियेत प्राप्त झालेले ज्ञान आणि व्यावहारिक कौशल्यांवरती आधारित असते. मानवी भांडवला मध्ये प्रामुख्याने शिक्षण, आरोग्य, प्रशिक्षण, या सर्वांचा समावेश होतो. मानवी भांडवलाच्या साह्याने महिलांच्या आर्थिक विकासासाठी योगदान दिले गेले तर महिलांचे आर्थिक सबलीकरण होऊन निश्चितच याचा फायदा संपूर्ण अर्थव्यवस्थेला मिळू शकतो. विकसित देशाच्या मानाने भारतीय स्त्रीचा दर्जा आजही कुमकुमत आहे. त्यातल्या त्यात आर्थिक सबलीकरणाची स्थानिक आवश्यकता भारतीय स्त्रीला आहे. मानवी भांडवलाच्या साह्याने स्त्री मध्ये शिक्षण, आरोग्य सेवा, प्रशिक्षण, कौशल्य यांचा विकास करून भारतीय स्त्री जीवन नक्कीच सुधारले जाऊ शकते. स्त्रियांना आरोग्य विषयी सेवा पुरवणे, मुलींचा उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावणे, श्रमशक्ती मध्ये महिलांना सामावून घेणे, कौशल्य व प्रशिक्षणाच्या सहाय्याने त्यांचा मानव भांडवल निर्मितीवर भर देणे , या सर्व उपक्रमाच्या साह्याने साह्याने स्त्रियांच्या विविध उपक्रमामध्ये गुंतवणूक करून आपण त्याचे आर्थिक सबलीकरण करू शकतो . निश्चितच स्त्रियांच्या श्रमशक्तीचा फायदा देशाच्या आर्थिक विकासामध्ये होईल . मानवी भांडवलातील गुंतवणूक ही शाश्वत विकास या प्रक्रियेचचे एक महत्त्वाचे आवश्यक असे प्रमुख तत्व आहे . शाश्वत विकासा मध्ये दारिद्र निर्मुलन ,चांगले आरोग्य, दर्जेदार शिक्षण, लिंग समानता या सासारख्या अनेक ध्येयाचा सामावेश होतो हि ध्येय साध्य करण्यासाठी व भारताच्या च्या आर्थिक प्रगतीसाठी आणि सामाजिक उन्नतीसाठी आपल्यातील मानवी क्षमतांचा उपयोग करून दारिद्र्य, बेरोजगारी,शिक्षण,आरोग्य, स्त्री पुरुष असमानता यासारख्या समस्या सोडवण्यासाठी नक्कीच मानवी भांडवलाचा उपयोग महत्त्वाचा ठरू शकतो.आणि मानवी भांडवला च्या साह्याने महिला श्रमशक्ती चा उपयोग आर्थिक विकासासाठी होऊ शकतो.*

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

**प्रस्तावना**

मानवी भांडवला मुळे अर्थव्यवस्थेची थेट उत्पादकता वाढत असते. मानवी भांडवलामध्ये आरोग्य, कौशल्य, शिक्षण, प्रशिक्षण, ज्ञान, अनुभव, त्याचप्रमाणे माहिती या सर्वांचा समावेश होतो. मानवी भांडवल हे अनुभवावर सुद्धा अवलंबून असते. मानवी भांडवलाचा सिद्धांत असे म्हणतो की मानवाने घेतलेल्या अधिक अधिक शिक्षण, प्रशिक्षण, कौशल्यची प्राप्ती यामुळे तो आपली उत्पादन क्षमता वाढवून घेऊ शकतो. शिक्षण,प्रशिक्षणामुळे व कौशल्य मानवी भांडवलामुळे व्यक्तीची एकूण समाजाची कार्यक्षमता व उत्पादकता वाढवून येते. भारतामध्ये स्त्रियांचा रोजगारामध्ये फारसे प्रमाण कमी आढळते. याचा परिणाम थेट उत्पादकतेवरही होतो जर मानवी भांडवलाची गुंतवणूक समानतेने केली व विशेषत: महिला व मुली यांना समोर ठेवून मानवी भांडवलाची गुंतवणूक केली तर नक्कीच महिलांचा रोजगारांमध्ये सहभागाचा दर हा वाढेल आणि परिणामत:उत्पादकता आणि आर्थिक विकासाला याचा फायदा होईल भारताला महासत्ता होण्यासाठी नक्कीच मदत होऊ शकते .स्त्रीयाच्या आरोग्य, शिक्षण, प्रशिक्षण, कौशल्य,व तासेस त्यांचे सबलीकरण मुखत्वे करून आर्थिक सबलीकरणच्या यांच्या माध्यमातून जर मानवी भांडवलाची गुंतवणूक केली तर महिलांच्या लोकसंख्येला नोकरीच्या नवीन संधी प्राप्त होतील आणि सोबतच त्यांचा राहणीमानाचा दर्जा उंचावला जाईल व देशातील गरिबी दारिद्र्य बेरोजगारी दूर होण्यास मदत होईल.महिलांना शिक्षण आरोग्य क्षमता आणि कौशल्य यावर केलेली मानवी भांडवल गुंतवणूक निश्चितच भविष्यात चांगला परतावा देणारी ठरेल.

**संशोधन विषयाचे महत्व:**

भारतासारख्या विकसनशील देशाचा विकासाचा मार्ग नक्कीच आरोग्यसेवा, शिक्षणातील गुंतवणुक व लिंग समभाव याशी गंभीरपणे जोडलेला आहे. शाश्वत विकास साध्य करणे हे सुद्धा आपले ध्येयआहेत. सर्वसामावेश शाश्वत विकासाचे ध्येय साध्य करण्यासाठी मानवी भांडवल सर्वसामावेशक वाढीच्या गुंतवणुकीवर ठामपणे आधारित आहे .लोकसंख्या लाभांश जर मिळवायचा असेल तर सरकारने शिक्षण प्रशिक्षण आणि कौशल्य आरोग्य या सर्वांच्या माध्यमातूनच भारत नक्कीच लोकसंख्येचा लाभांश मिळवू शकतो व महासत्तेकडे नक्कीच जाऊ शकतो. यासाठी महिला या वर्गाला वगळून चालणार नाही. कारण जवळजवळ यांची लोकसंख्या निम्मी आहे म्हणून महिलांचे आरोग्य, शिक्षण, कौशल्य, क्षमता,आणि सर्वात महत्वाचे महिला सबलीकरण यावरही विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. तरच शाश्वत विकास व लोकसंख्या लाभांश भारताला मिळू शकतील आणि हे ध्येय साध्य होऊ शकते. कोणत्याही देशाचा अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा भक्कम पाया या देशाचा मानवी भांडवल असते .

**उद्दिष्टे-** 1 मानवी भांडवलाचे घटक अभ्यासणे

2 महिलांच्या आर्थिक विकासात मानवी भांडवलाची भूमिका अभ्यासणे

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

**गृहीतके-** 1 देशाच्या आर्थिक विकासामध्ये मानवी भांडवल अत्यंत महत्त्वाचे आहे.

2 महिलांच्या आर्थिक विकासात मानवी भांडवलाचे स्थान महत्त्वाचे आहे.

**मानवी भांडवलाचे घटक:** मानवी भांडवली संकल्पना आता केवळ सिद्धांतिक अर्थशास्त्रासाठी नाही तर खाजगी कंपन्यासाठी देशाच्या अर्थव्यवस्थांसाठीही खूप महत्त्वाची आहे. मानवी भांडवल म्हणजे सुरक्षित प्रशिक्षित व निरोगी मनुष्यबळ उत्पादन व उत्पादकता वाढवण्यासाठीअशी मनुष्य शक्ती जी मोठा हातभार लावते श्रमाची उत्पादकता वाढवण्यासाठी केलेली गुंतवणूक म्हणजेच मानवी भांडवल होय. जागतिक बँकेने केलेल्या वार्षिक मोजमापामध्ये मानवी भांडवल निर्देशांक HCI 2020 मध्ये 174 देशांमध्ये भारताचा क्रमांक 116 वा लागतो. सर्वात पहिला नंबर सिंगापूर मानवी भांडवल निर्देशांक 0.88 हॉंगकोंग दुसरा नंबर मानवी भांडवल निर्देशांक 0.81 तिसरा नंबर जपान मानवी भांडवल निर्देशांक 0.80 भारताचा नंबर 116 आणि मानवी भांडवल निर्देशांक आहे 0.49 या वरून ठरू शकते की मानवी भांडवल निर्देशांक मध्ये भारत अजूनही मागे आहे. अजूनही गुंतवणूक हव्या त्याप्रमाणे मानवी भांडवलावर भारतामध्ये केली जात नाही.पण वाखडण्यासारखी गोष्ट पाहिली आपण तर स्वातंत्र्य भारतापुढे अनेक आव्हाने समोर होती. या आव्हानांना सामोरे जात असताना मानवी भांडवलाची गुंतवणूक ही चांगल्या प्रमाणात केलेली आहे. पण अजूनही चांगल्या मोठ्या प्रमाणात भांडवल मानवी भांडवलावर गुंतवणूक करण्याची नितांत गरज आहे. भारताचा GDP अमेरिकन यूएस डॉलर 2.27 ट्रिलियन एवढा 2018 मध्ये होता आणि वार्षिक वृद्धी 7.3% होती. पण कामगारा मध्ये महिला सहभागाचा दर 27 टक्के आहे . हि आकडेवारी अतिक्षय कमी आहे .महिलांची हि आकडेवारी मोठ्या प्रमाणात प्रथमिक क्षेत्रात पहावयास मिळते त्यामानाने दुय्यम क्षेत्र व तृतिय क्षेत्र यासारख्या क्षेत्रांमध्ये महिलांचा प्रमाण हे अत्यंत कमी आहे. कमी उत्पन्न असणाऱ्या कुटुंबामध्ये महिला काम करताना दिसतात. आणि अधिक उत्पन्न निर्माण झाले असतात स्त्रिया घरीच राहणे पसंत करतात उत्पन्न वाढल्यास यांनी घरीच राहावे ही अपेक्षा उच्चभ्रू कुटुंबात पहावयास मिळते. कुटुंबातील जर एखादी स्त्री नोकरी करत असेल तर कमी उत्पन्न स्थितीचे सुचक म्हणून पाहिले जाते. नोकरदार महिलांना कुटुंबातील पुरुषाकडून घरगुती कामात मदत मिळत नाही म्हणून कुटुंबाची काळजी घेण्यासाठी त्यांना व्यवसायाचा त्याग करावा लागतो. बरेच क्षेत्र असे आहेत की यामध्ये स्त्रियांचा सहभाग नाही कारण ते क्षेत्रात काम करणे स्त्रियांना योग्य नाही ही मानसिकता भारतीय समाज व्यवस्थेमध्ये आपल्याला पाहायला पहावयास मिळते. औद्योगिक क्षेत्र, वित्त क्षेत्र यामध्ये सहसा स्त्रियांचा सहभाग हा अत्यंत कमी आहे. या क्षेत्रासाठी लागणारी लवचिकते लवचिकते पणाचा अभाव आक्रमकता हे गुण स्त्रियाकडे नाही त्यामुळे अनेक तेजस्वी आणि सक्षम महिला अनेक वर्षापासून या क्षेत्रापासून लांब आहे. अभियांत्रिकी मध्ये कुशल इंजिनियर जवळजवळ 30 टक्के एवढा सहभाग महिलांचा आहे मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल यासारख्या विषयांकडे महिलांनी पाठ फिरवलेली आहे . म्हणुनच कुशल कामगारांमध्ये हि महिलांचे प्रमाण फक्त 20 टक्के आहे. मूलभूत

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

अभियांत्रिकी अभ्यास करण्यासाठी महिलावर्ग मोठ्या सख्येने पुढे का येत नाही हा खरंच एक संशोधनाचा विषय होऊ शकेल. साक्षरता देशाच्या मानवी भांडवलाच्या गुणवत्तेची सर्वात आवश्यक सूचक आहे. भारतात गेल्या काही वर्षांमध्ये साक्षरता बाबत प्रगती केलेली आहे परंतु अजूनही 313 दशलक्ष लोक हे निरक्षर आहेत. त्यापैकी जवळजवळ 59 टक्के या महिला आहेत .महिलांचे प्रमाण निरक्षरतेमध्ये अत्याधिक आहे. मानवी भांडवलाची गुंतवणूक आरोग्य, शिक्षण,यात मोठ्या प्रमाणात करावी लागेल . तसेच महिलांना साक्षर करून कौशल्य व त्यांचा क्षमता आरोग्य या सर्वांचा विचार करून देखील महिलांना या मानव भांडवला सामावून घेणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. मुलींची संख्या वाढवणे हे मानवी भांडवलाला पोषक आहे.

Gross Enrollment ratio in higher education

| | Male | Female | Both |
|---|---|---|---|
| 2020-21 | 26.7 | 27.9 | 27.3 |
| 2019-20 | 24.8 | 26.4 | 25.6 |
| 2018-19 | 24.4 | 25.5 | 24.9 |
| 2018-17 | 24.5 | 24.6 | 24.6 |
| 2017-16 | 24.3 | 23.8 | 24.1 |

Source:AIHES Minstry of Education

उच्च शिक्षणामध्ये भारताचा सहभागाचा दर खूपच कमी पहावयास मिळतो 2016-17 याकडे आकडेवारी मध्ये तर मुले व मुली यांच्यामध्ये या दरामध्ये तफावत पहावयास उच्च शिक्षण हे क्षमता कौशल्य प्रशिक्षण देते. म्हणजेच काय तर उच्च शिक्षणामुळे मानवी भांडवलाची गुणवत्ता वाढीस लागते. उच्च शिक्षणाचा दर जितका अधिक असेल तितकीच मानवी गुंतवणूक ही अधिक असल्याचे प्रकर्षाने जाणवते.पण भारतामध्ये जर आपण पाहिले तर हा दर खूप कमी पहावयास मिळतो 2017 पासून ते 2021 पर्यंत अनुक्रमे 27.3 टक्के 25 .6 टक्के 24 .9 टक्के 24.6 टक्के आणि 28 टक्के असा पाहावयास मिळाला 2021 मध्ये GER 20.8 टक्के एवढाच होता. याचा अर्थ उच्च शिक्षणामध्ये मानवी भांडवलाची गुंतवणूक अत्यावश्यक आहे . त्याचा विचार करता अतिउच्च GER असलेला देश 2019 नुसार मेक्सिकोचा दर 100.1% आहे आहे त्यामानाने भारताचा GER खूपच कमी आहे. उच्च शिक्षणामध्ये भांडवलाची गुंतवणूक करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे यात मुलींचा सहभाग उच्च शिक्षणामध्ये वाढवणे ही सुद्धा तितकेच गरजेचे आहे.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

**महिलांच्या आर्थिक विकासात मानवी भांडवलाची भूमिका**

महिला कामगारांमध्ये महिलांचा समावेश झाल्यामुळे उत्पादन आणि उत्पादन विषयक निर्णय या सर्वांची गुणवत्ता सुधारते आणि कश 2016 च्या CFA इन्स्टिट्यूटने जो रिसर्च केला त्यानुसार जर स्त्री पुरुष वेगवेगळी मानवी भांडवलात वाढ जर केली तर यामध्ये उत्पादकता वाढून येते.कर्मचाऱ्यांमध्ये महिला कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे कार्यक्षमतेवर त्याचा परिणाम होतो आणि सरकारी उपक्रमांमध्ये जर व्यावसायिक कौशल्य वाढवायचे असेल तर नक्कीच महिला या महत्त्वाची भूमिका यात पार पडू शकतात. महिलांच्या सहभागामुळे कार्यक्षमतेवर नक्कीच चांगला परिणाम घडवून येत असतो. देशाचा सशक्त आणि शाश्वत भविष्य सुनिश्चित जर करायचे असेल तर संपूर्ण भारतातील लहान शहरे आणि या शहरांमधून महिलांच्या श्रमशक्तीमध्ये मोठ्या प्रमाणात सहभागात प्रोत्साहन द्यायला हवे. महिलांना श्रमशक्ती मध्ये सामावून घेणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. उद्योगधंदे वित्तीय संस्था किंवा वित्तीय क्षेत्र यासारखे वेगाने वाढणाऱ्या उद्योग क्षेत्रांमध्ये महिलांची नितांत आवश्यकता आहे. आणि हे संधी महिलांसाठी एक मोकळं भांडार आहे जेव्हा महिला अर्थव्यवस्थेत स्थान मिळवतील तेव्हाच त्या देशाची प्रगती व खरी क्षमता उघड होईल. म्हणून महिलांचा सहभागीतवा दर वाढवणे अत्यंत महत्त्वाचे आहे.लोकसंख्येमध्ये महिलांचे प्रमाण जवळजवळ निम्मी असून त्यांचा सहभागी दर हा कमी आहे जवळजवळ 17 टक्के महिला या काम करताना दिसतात. आता भारतीय कर्मचाऱ्यांमध्ये लोकसंख्येमध्ये अस्तित्वात असलेल्या विविधतचे प्रतिबंध असलेच पाहिजे. म्हणजेच महिलांचा सहभाग हा सर्व कर्मचाऱ्यांमध्ये असलास पाहिजे जेव्हा महिलांचा सहभाग वाढेल तेव्हाच देशाची खरी क्षमता प्रकट होईल. जेव्हा महिला अर्थव्यवस्थेत त्यांचे स्थान घेतील. येत्या दशकांमध्ये विकसनशील देश हे जगाच्या पाठीवर लोकसंख्येचा लाभांश मिळवून देणारे तरुण लोकांचे सर्वात मोठे समूह आहे. आणि त्यातच तरुण महिलांना योग्य प्रशिक्षण, कौशल्य, शिक्षण, देऊन त्यांचे आर्थिक सक्षमीकरणाला प्राधान्य देऊन मानवी भांडवलाची उभारणी जर केली तर निश्चितच जगातील या सर्वच देशांना याचा फायदा मिळू शकतो. विशेषतः स्त्रियांवर अधिक प्रमाणात केली गेली तर लोकसंख्येचा लाभांश भारतीय अर्थव्यवस्थेला चांगल्याच प्रमाणात मिळून त्याचा फायदा निश्चितच महासत्तेकडे नेणारा असू शकतो. वर्ल्ड बँक आणि सेंटर ऑफ मॉनिटरिंग इंडियन इकॉनोमी CMIE आणि तिरडी पीर्याडीक लेबर फोर्से सर्वे PLFS यांच्या अहवालानुसार भारताचा तीन दशकात मधला FLFPR यात तीव्र घसरल दर्शवत आहे. 30.2% आहे तर 2018 मध्ये 17.5% च्या सर्व नीचंक पातळीवर पोहोचलेला होता. सर्व वयोगटासाठी येत्या तीन वर्षात वाढलेल्या आहे. एका अहवालात भारतातील महिला कामगार सहभाग दर female labour for participation in India FLFPR यामध्ये लक्षणीय वाढ झालेली आहे. लक्षणीय सकारात्मक प्रवृत्ती असूनही पुरुषाच्या तुलनेने महिलांचा श्रम शक्तीचा सहभाग हा खूपच कमी आहे भारताच्या FLFPR वाढ होणाचे कारण म्हणजे महिला शिक्षणातील सुधारणा आणि जो संरचनात्मक बदल झालेला आहे यामुळे ही वाढ दिसून येत आहे. महिलांच्या बाबतीत झालेल्या शिक्षण, आरोग्य, व महिलाच्या बद्दल सकारात्मकता त्यामुळे हा सकारात्मक परिणाम या दरावर झालेला

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

पाहावयास मिळतो . अजून तरी पाहता महिलांच्या श्रमशक्तीचा सहभाग पुरुषाच्या तुलनेने खूपच कमी आहे. यावरून हे सिद्ध होते की महिला या त्यांच्या क्षमता व कौशल्य अजूनही पुरेशा प्रमाणात वापरत नाही किंवा ती वापरले जाऊ देत नाही सर्व भारतीय महिलांमध्ये जवळ जवळ 70 टक्के भारतीय महिला या श्रमशक्तीच्या बाहेर आहेत. आणि हा दर वाढण्याची सकारात्मकता आपल्याला दिसून येते यामध्ये श्रमशक्ती मध्ये महिलांचा जो वाटा वाढलेला आहे याचे प्रमुख कारण म्हणजे ग्रामीण स्त्रिया या स्वयंरोजगार कामगार म्हणून गरज नसताना कामगार दलात सामील झाल्यामुळे हा दर आपल्याला वाढवून आलेला दिसून येत आहे. महिलांना शिक्षण कौशल्य आणि उद्योजकतेच्या संधी देऊन त्यांना वेगवेगळ्या संधींना प्रोत्साहन देऊन सुरक्षित आणि सहाय्यक कामाचे वातावरण सुनिश्चित करून सरकारने अधिक अधिक महिला श्रमशक्तीचा समा वेश करून घेणे गरजेचे आहे .

**Share of participation at work across india from 2014 to 2023,by gender**

| characteristic | Male | Female |
|---|---|---|
| 2023 | 67% | 33% |
| 2022 | 67% | 33% |
| 2021 | 64% | 36% |
| 2020 | 77% | 23% |
| 2019 | 75% | 25% |
| 2018 | 77% | 23% |
| 2017 | 71% | 29% |
| 2016 | 68% | 32% |
| 2015 | 70% | 30% |
| 2014 | 71% | 29% |

कामगार शक्तीत महिलांची प्रतिनिधित्व कमी आहे याबद्दल शास्त्रज्ञ खरच खंत व्यक्त करतात. असंघटित क्षेत्रात पुरुषाच्या तुलनेने अधिक संख्येवर कामगार म्हणून महिलावर्ग कार्य करतात त्यातही पुरुषांच्या तुलनेने फार कमी मजुरी दर मिळतो . सरकार नेहमीच मानवी भांडवला प्रोत्साहन देण्यासाठी विविध योजना व उपक्रमांची घोषणा करत असते यात आयुष्यमान भारत योजना ,राष्ट्रीय शिक्षण एक धोरण, आत्मनिर्भर भारत समग्र शिक्षा, आणि अर्बन लर्निंग इंटरशिप प्रोग्राम, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व सुचित करण्यासाठी सरकारी उपक्रमांच्या वितरण यंत्रणा मजबूत करण्याची नितांत गरज आहे.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

महिलांची आर्थिक कार्यक्षमता वाढविण्यासाठी व महिलांना जागतिकीकरणाच्या प्रवाहात आणण्यासाठी ठोस रणनीती आखल्या गेल्या पाहिजेत. उत्पन्नातील असमनता कमी करण्यासाठी आणि शाश्वत सर्वसामावेशक आर्थिक विकास वाढीसाठी लोकांच्या आरोग्य शिक्षण आणि कौशल्यामध्ये गुंतवणूक करणे अत्यंत आवश्यक आहे. शाश्वत विकासाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी लोकसंख्या शास्त्रीय लाभांश घेण्यासाठी आणि पुढच्या पिढीतील नागरिकांचे मानवी भांडवल तयार करण्यासाठी योग्य गुंतवणूक करणे ही काळाची गरज बनलेली आहे. आणि या गुंतवणूक मध्ये महिलांचा समावेश वाढवून घेणे हे अत्यंत आवश्यक आहे.महिलांच्या अंगी अंगीभूत असलेले गुण, कौशल्य, बुद्धिमत्ता, निर्णय क्षमता, नेतृत्व, हे वेगवेगळेमहिलांच्या अंगी असतात आणि असलेल्या या सुप्त गुणांचा विकास करून याच्या माध्यमातून महिलांना आर्थिकआत्मनिर्भर बनवणे म्हणजेच महिलांचे आर्थिक सबलीकरण होईल. भारतातील महिला म्हणजेच भारतातील स्त्री शक्ती ही घरकामात गुंतलेली आहे या श्रमशक्तीचा योग्य उपयोग झाल्यास नक्कीच आर्थिक विकासला तरमदत होईल व आर्थिक विकासाबरोबर एकूण राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होऊन भारताच्या दारिद्र्य, बेरोजगारी या समस्या देखील दूर होऊ शकतात. तसे पाहता भारतात स्त्रियांची लोकसंख्येचा वाटा हा लोकसंख्याच्या निम्मीआहे. त्यामुळे विकासाच्या जर मुख्य प्राहावा मध्ये स्त्रियांची श्रमशक्ती आली तर समस्त महिलांना सत्ता,संपत्तीसंधी समानता जर दिली तर विकासाच्या मुख्य प्रवाहामध्ये स्त्री आल्यामुळे नक्कीच आर्थिक विकासाची गतीसाधली जाऊ शकते.

**निष्कर्ष:**

कोणत्याही देशाचा आर्थिक विकास व आर्थिक प्रगती होण्यासाठी मानवी भांडवलाची गुंतवणूक अत्यंत महत्वाची असते. महिलांच्या आरोग्य, कौशल्य, शिक्षण, प्रशिक्षण, ज्ञान, अनुभव, यावर मानवी भांडवलाची गुंतवणूक केल्यास व महिलांना आर्थिक प्रक्रियात सामाऊन घेतल्यास त्याचा फायदा मोठ्या प्रमाणात होईल . कोणत्याही देशाचा आर्थिक विकास व आर्थिक प्रगती होण्यासाठी महिलाचा अंतर्भाव आर्थिक प्रक्रियात होणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी महिला सबलीकरण होऊन महिलांना मुख्य प्रवाहात आणणे व देशाच्या राष्ट्रीय विकासामध्ये व राष्ट्रीय उत्पन्नात त्यांचा सहभाग वाढवणे ही महत्त्वाचे आहे.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

**संदर्भ सूची :**

**1** मानव पुंजी और सतत विकास मे निवेश सहजीवन की मिसाल ,शुभा सुरी
2 भारतीय अर्थव्यवस्था, वि.के.पुरी, एस. के. मिश्र,
3 The impact of women as human capital on receiving sustainable development of Egyptian industry, Safa shaaban
4 भारतीय अर्थव्यवस्था की प्रकृती एवं समस्याए, प्रो.बी. एल.ओझा
5 भारतीय अर्थव्यवस्था डॉ.एन. एल. चव्हाण.
6 https://www.orfonline.org/expert-speak/improving-indias-human-capital-by-enhancing-investment-in-the-early-years-of-childrens-development
7 https://www.indexmundi.com
8 labour force participant in India why is it is so low.by Sher veric lLO 2014 9 : economic survey2022-23
10 : Department of school education and literacy literacy and all Indians survey on higher education 2020
11 त्रिवेदी राकेश ,महिला- सशक्तिकरण चूनोतिया एवं रणनीती पूर्वाशा प्रकाशन
12 ग्रामीण महिलांचे आर्थिक सबलीकरण प्राध्यापक,अशोक देवकर JETIR 2020 VOLUME 7,ISSUE S
13 पुरा आशाराणी, भारतीय नारी दशा व दिशा.

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
*SPECIAL ISSUE ON MARATHI AARTHSHASHTRA PARISHED Nov. 2023*

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

# पायाभूत सुविधांमधील रस्ते वाहतूकीची सद्यस्थिती

**स्वाती विजय पाटील,** संशोधक विद्यार्थिनी
**डॉ .एन.जी.सूर्यवंशी,** मार्गदर्शक
मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव.
कवयत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव

**गोषवारा**

देशाच्या आर्थिक ,सामाजिक विकासासाठी देशातील प्राथमिक क्षेत्र,द्वितीय क्षेत्र तसेच तृतीय क्षेत्र यांचा विकास होणे महत्वाचे आहे .या तीनही शेती,व्यापार ,व सेवा क्षेत्रा च्या विकासात पायाभूत सुविधामधील वाहतूक सुविधेचे महत्व हे खूप मोलाचे आहे .रस्ते वाहतूक ही महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात मोलाची भर घालते ,आर्थिक ,सामाजिक तसेच प्रत्येक व्यक्तीच्या वयक्तिक विकासातही रस्ते वाहतूकीचे महत्व आहे .या मध्ये पायाभूत सुविधा म्हणजे काय ? वैशिष्ट्ये, महत्व तसेच पायाभूत सुविधामधील महत्वाचा भाग वाहतूक यातील रस्ते वाहतुकीचे महत्व ,महाराष्ट्रातील रस्त्यांची माहिती ,समस्या यात महामार्गाचे बांधकाम महानगरातील प्रमुख रस्त्यांची रुंदीकरण तसेच त्यांचा दर्जा सांभाळणे ते दुर्गम ग्रामीण वस्त्यांपर्यंत रस्त्यांचे जाळे पोहोचवणे या सर्वांचाच या पुनर्रचनेत अंतर्भाव होतो. वाढत्या औद्योगीकरणामुळे झपाट्याने शहरीकरण अनुभवणाऱ्या देशात रस्त्यांच्या अपुरे पणाची समस्या सर्वत्र भेडसावत आहे. शहरांतर्गत व शहरांमध्ये मधील वाहतूक दुथडी भरून वाहत असल्याने त्याचा प्रचंड ताण राष्ट्रीय अर्थव्यवस्थांवर पडतो तसेच त्यामुळे मनुष्यबळाचे उत्पादकता व राहणीमान ही खालावते घुसमट व प्रवासात जाणारा वेळ,निकृष्ट रस्त्यांमुळे वाहनांचे होणारी झीज व क्षती, अपघात व दुखापतींची मोठी संख्या यासारख्या दुष्परिणामांची झळ कोणत्याही महानगरीय रहिवाशांच्या नित्य परिचयाची आहे,या साठी उपाययोजना होणे महत्वाचे आहे .

प्रस्तावना

भारतातील पायाभूत सुविधांची सुरुवात ब्रिटिश प्रशासनाच्या काळात झालेली दिसते, परंतुत्यानंतरच्या काळात भारतात वाढत्या लोकसंख्येमुळे आर्थिक विकासाचा निश्चित दर वाढण्याच्या हेतूने पायाभूत सुविधांच्या विकासाकडे पाहिजे तितके लक्ष देता आलेले नाही असे दिसते. १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले त्यानंतर १९४८ मध्ये औद्योगिक धोरण राबविले १९५०मध्ये भारताने राज्यघटनेचास्वीकार केला परिणामी रीतसर रित्या आर्थिक विकासासाठी १९५१ पासून पंचवार्षिक योजनांचा स्वीकारकेला पंचवार्षिक योजना म्हणजे पायाभूत संरचनेच्या विकासाचा एक मोलाचा दगडच ठरलेला आहे. पंचवार्षिक योजनांच्या नियोजनामुळे आर्थिक विकासाला योग्य दिशा प्राप्त झाली.पायाभूत सुविधामध्ये वाहतूक घटका मध्ये रस्ते वाहतूक ,रेल्वे वाहतूक ,जल वाहतूक ,हवाई वाहतूक यांचा समावेश होतो.महाराष्ट्रा मध्ये रस्ते वाहतुकीचा जास्त वापर होताना दिसून येतो .

रस्त्यांचे महत्त्व स्पष्ट करताना अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉन एफ केनेडी एकेकाळे असे म्हणाले होते, की" अमेरिका श्रीमंत आहे म्हणून अमेरिकेत चांगले रस्ते नाहीत, तर अमेरिकेत चांगले रस्ते आहेत म्हणूनअमेरिका श्रीमंत आहे " ज्याप्रमाणे बैलगाडीच्या चाकाला केंद्रबिंदूशी जोडून केंद्रबिंदूशी सोडून विविध आऱ्या असतात अगदी त्याचप्रमाणे एखाद्या भागात मुख्य शहरांना जोडणारे विविध रस्ते गावपातळीपासूनअसतील तर त्या भागाचा विकास निश्चित

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

रित्या होतो निश्चितपणे होतो कोणत्याही प्रदेशाच्याविकासासाठी रस्त्यांचे स्थान महत्त्वाचे आहे रस्ते विकास ही विकासाची प्राथमिक अट आहे.

**उदिष्टे**

१.पायाभूत सुविधांची माहिती करून घेणे.
२.पायाभूत सुविधामधील वाहतूक व्यवस्थेमधील रस्ते वाहतुकीची माहिती घेणे.
३.रस्ते वाहतूक विषयक समस्या व उपाययोजनाचा अभ्यास करणे.

**गृहीतक**

१.महाराष्ट्रातील वाहतूक व्यवस्थेमधील रस्ते वाहतूकीमध्ये वाढ होत आहे.

पायाभूत सुविधा व्याख्या

पायाभूत सुविधा हा शब्द इंग्रजीतील Infra-structure या दोन शब्दापासून तयार झालेला आहे. Infra हालॅटिन शब्द असून त्याचा अर्थ पाया किंवा तळ असा घेतला जातो, तर Structure हा इंग्रजी शब्द असूनयाचा अर्थ रचना किंवा ढाचा असा घेतला जातो. इन्फ्रास्ट्रक्चर याचा अर्थ पायाभूत सुविधा होय.देशाचाआर्थिक सामाजिक राजकीय आणि सांस्कृतिक विकास ज्या घटकांवर अवलंबून असतो त्या सर्व घटकांचासमावेश पायाभूत क्षेत्रात केला जातो.

अल्बर्ट ओ हर्षमन- प्राथमिक दुय्यम व तृतीय क्षेत्रातील उत्पादक कार्य याशिवाय पार पाडले जाणार नाहीअशा मूलभूत सेवा म्हणजेच पायाभूत सुविधा होय व्यापक अर्थाने विचार करता कायदा सुव्यवस्था श्रोतापासून शिक्षण आणि सार्वजनिक आरोग्य ते वाहतूक दळणवळण वीज आणि पाणीपुरवठा अशा सर्वसार्वजनिक सेवा आणि शेती परिसेवा म्हणजे जलसिंचन व सांडपाणी व्यवस्था यांचा यात समावेश होतो.

मात्र या संकल्पनेचा कठीण गाभा वाहतूक आणि वीज या पुरताच मर्यादित असू शकतो.

**पायाभूत सुविधांची वैशिष्ट्ये**

- बाह्य बचतीचा स्त्रोत
- सार्वजनिक वस्तू या प्रकारात समावेश
- मोठ्या प्रमाणावर खर्चाची गरज
- नवनिर्मितीस प्रेरणा
- उत्पादक कार्यास प्रोत्साहन

**पायाभूत सुविधांचे महत्त्व**

- नवप्रवर्तनासाठी योग्य परिस्थिती
- उत्पादन वाढीला गती
- शेती उद्योग व सेवा क्षेत्राचा विकास
- उत्पादक कार्याला प्रेरणा
- औद्योगिक विकास
- समतोल प्रादेशिक विकास

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

- कृषी क्षेत्राचा विकास
- सामाजिक व सांस्कृतिक प्रगती
- आर्थिक विकासात सहाय्य
- कृषी प्रगती अपेक्षित वेळेत होते
- उद्योगांचा जलद विकास होतो
- अर्थव्यवस्थेत समतोल विकास साध्य करता येतो
- उत्पादन घटकांची गतिशीलता वाढते.
- देशाची सामाजिक व सांस्कृतिक प्रगती होते
- बाजारपेठांचा विस्तार होतो

| रस्त्यांचे प्रकार रस्ते (किमी) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्ष | राष्ट्रीय महामार्ग | प्रमुख राज्य महामार्ग | राज्य महामार्ग | प्रमुख जिल्हा रस्ते | इतर जिल्हा रस्ते | ग्रामीण रस्ते | एकूण |
| २०११ - १२ | ४,३७६ | उ .ना | ३४,१५७ | ५०,२५६ | ४७,५२९ | १,०६,६०१ | २,४२,९१९ |
| २०१२ - १३ | ४,३७६ | ६,६९४ | २७,५२८ | ५०,२५६ | ४७,५७३ | १,०६,७४५ | २,४३,१७२ |
| २०१३- १४ | ५,८५८ | ६,३३७ | ३३,९६३ | ५०,२३२ | ५२,७६१ | १,१४,५५७ | २,६३,७०८ |
| २०१४- १५ | ४,७६६ | ६,१६३ | ३३,८६० | ५०,५८५ | ५८,११५ | १,४५,८७९ | २,९९,३६८ |
| २०१५- १६ | ४,९०१ | ५,२४९ | ३३,६९५ | ५२,२७५ | ५६,५६४ | १,५३,४३५ | ३,०५,११९ |
| २०१६- १७ | ७,६८२ | ३,९७१ | ३०,७७६ | ५१,६२७ | ५६,३३६ | १,५३,९४६ | ३,०४,३३६ |
| २०१७- १८ | १०,१९५ | ३,२७२ | २९,१५१ | ५५,०३० | ५३,९२४ | १,५२,२७२ | ३,०३,८४३ |
| २०१८- १९ | १०,३०० | २,९६७ | २८,४६६ | ६०,५३१ | ४९,२०६ | १,५७,१२७ | ३,०८,५९७ |

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१९-२० | १७,७२६ | २,९६७ | २९,०३० | ६३,८८६ | ४७,३९८ | १,४८,३३५ | ३,०९,३४२ |
| २०२०-२१ | १८,०८९ | २,९०० | २९,३८८ | ६८,३५० | ४६,४०८ | १,५७,९८० | ३,२३,११५ |
| २०२१-२२ | १८,३६६ | २,६२२ | २९,२६५ | ६८,५३५ | ४५,३७१ | १,५९,७१४ | ३,२३,८७३ |

(संधर्ब स्त्रोत –महाराष्ट्राची आर्थिक पाहणी ) (उना – उपलब्ध नाही )

स्पष्टीकरण –

वरील तक्त्यावरून रस्त्यांची वर्ग निहाय लांबी (कि.मी) मध्ये अभ्यासताना २०११-१२ मध्ये राष्ट्रीय महामार्ग लांबी हि ४,३७६ (कि.मी) ,राज्य महामार्ग लांबी ३४,१५७कि.मी,मुख्य जिल्हा रस्ते ५०,२५६ कि.मी ,इतर जिल्हा रस्ते ४७,५२९ कि.मी ,तर गाव/ग्रामीण रस्ते लांबी १,०६,६०१ इतकी दिसते, आणि एकूण रस्ते लांबी हि २,४२,९१९ कि.मी दिसून येते .२०१२-१३ मध्ये राष्ट्रीय महामार्ग लांबी ४,३७६कि.मी ,प्रमुख राज्य महामार्ग लांबी ६,६९४ कि.मी ,राज्य महामार्ग लांबी २७,५२८ कि.मी ,मुख्य जिल्हा रस्ते लांबी ५०,२५६ कि.मी ,इतर जिल्हा रस्ते लांबी ४७,५७३ कि.मी ,तर गाव/ग्रामीण रस्ते लांबी १,०६,७४५ कि.मी ,आणि एकूण रस्ते लांबी हि २,४३,१७२ इतकी वरील तक्त्यावरून दिसून येते .एकूण रस्ते लांबी मध्ये २०१३-१४ मध्ये २,६३,७०८ कि.मी इतकी तर २०१४-१५ मध्ये २,९९,३६८ कि.मी दिसून येते तर २०१५-१६ मध्ये या मध्ये वाढ होऊन एकूण रस्ते लांबी हि ३,०५,११९ कि.मी इतकी दिसून येते,२०१६-१७ मध्ये एकूण रस्ते लांबी वरील तक्त्यावरून ३,०४,३३६ कि.मी दिसून येते.२०१७-१८ मध्ये रस्त्याची एकूण लांबी ३,०३,८४३ कि.मी इतकी वरील तक्त्यावरून दिसून येते.२०१८ -१९ मध्ये ३,०८,५९७ कि.मी रस्त्यांची एकूण लांबी दिसून येते.२०१९-२० मध्ये महाराष्ट्रातील रस्ते लांबी मध्ये एकूण रस्ते लांबी हि ३,०९,३४२ कि.मी दिसून येते.२०२०-२१ मध्ये एकूण रस्ते लांबी ३,२३,११५ कि.मी दिसून येते.तर २०२१-२२ या वर्षात राष्ट्रीय महामार्ग लांबी हि १८,३६६ कि.मी , प्रमुख राज्य महामार्ग लांबी २,६२२ कि.मी , राज्य महामार्ग लांबी २९,२६५ कि.मी , मुख्य जिल्हा रस्ते लांबी ६८,५३५ कि.मी इतर जिल्हा रस्ते ४५,३७१कि.मी तर ग्रामीण रस्ते लांबी १,५९,७१४ कि.मी आणि एकूण रस्ते लांबी हि ३,२३,८७३ कि.मी इतकी दिसून येते.

वरील तक्त्या वरून असे दिसून येते कि २०११-१२ मध्ये एकूण रस्ते लांबी हि २,४२,९१९कि.मी इतकी होती तर आता २०२१-२२ मध्ये रस्त्याच्या लांबी मध्ये वाढ होऊन २०२१-२२मध्ये एकूण रस्ते लांबी हि ३,२३,८७३कि.मी वाढलेली वरील तक्त्यावरून दिसून येते.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या सुरु असलेल्या प्रकल्पांची सद्यस्तिती

| प्रकल्पाचे नाव | सुरु झाल्याचे वर्ष | काम पूर्ण होण्याचे अपेक्षित वर्ष |
|---|---|---|
| हिंदू ह्दयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग | २०१६-१७ | २०२१-२२ |
| पुणे चक्राकार मार्ग | २०१६-१७ | २०२४-२५ |

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

| | | |
|---|---|---|
| ठाणे-घोड बंदर उन्नत मार्ग | २०१६-१७ | उना |
| भिवंडी-कल्याण –शिळफाटा उन्नत मार्ग | २०१६-१७ | २०२१-२२ |
| विदर्भातील रेल्वे वरील पूल | २०१६-१७ | उना |
| ठाणे खाडी पूल-टप्पा तीन | २०१६-१७ | २०२३-२४ |
| मुंबई-पुणे जुन्या –राष्ट्रीय महामार्ग -४ चे ६ पदरी रुंदीकरण | २०१६-१७ | २०२०-२१ |
| मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गचे आवर्धन | २००९-१० | २०२२-२३ |
| सीमा तपासणी नाक्याचे आधुनिकीकरण | २००८-०९ | उना |
| वर्सोवा-वांद्रे सागरी सेतू प्रकल्प | २००७-०८ | २०२३-२४ |
| विक्रीकरभवन(ठेवी तत्वावरील प्रकल्प ) | २०१२-१३ | उना |
| राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (ठेवी तत्वावरील प्रकल्प ) | २०१६-१७ | उना |

(संधर्ब स्त्रोत –महाराष्ट्राची आर्थिक पाहणी ) (उना – उपलब्ध नाही )

स्पष्टीकरण – वरील तक्त्यावरून दिसून येते कि महाराष्ट्रात रस्ते प्रकल्प सुरु आहेत,काही प्रकल्प चालू आहेत तर काही पूर्ण होण्याचा मार्गावर आहे,मात्र असे ही काही प्रकल्प आहेत कि ज्यांचे सुरु झाल्याचे वर्ष आधीचे असून काम पूर्ण होण्याचे अपेक्षित वर्ष संपून हि पूर्ण झालेले दिसून येत नाही.

रस्ते वाहतूक विषयक समस्या –

रस्ते वाहतूक हि देशाच्या आणि आपल्या महाराष्ट्राच्या विकासात हातभार लावणारी महत्वाची वाहतूक व्यवस्था आहे ,ज्या प्रमाणे अन्न,वस्त्र,निवारा,आरोग्य,शिक्षण या मानवाच्या मुलभूत गरजा आहेत त्या प्रमाणे अर्थीक गरज पूर्ण करण्याचे महत्वाचे साधन म्हणजे रस्ते वाहतूक आहे असे मला वाटते .कारण मानवाला कामासाठी घराबाहेर पडावे लागते. रस्ते वाहतुकी विषयक अनेक समस्या दिसून येतात काही शहरी भागात रस्त्यांची दुरावस्था झाली आहे ,खराब रस्त्यामुळे वाहनाचे नुकसान होते ,वाहनाचे अपघात होतात,माणसांचे अपघात होतात त्यात काही वेळा माणसे जखमी होतात तर काही वेळा माणसे मृत्युमुखी पडतात तसेच अजूनही ग्रामीण भागात पक्के रस्ते नाहीत, आदिवासी दुर्गम पाडे तर आसे आहेत कि तिथे रस्तेच नाही ते लोक डोंगर दर्यातून मार्ग काढून त्याचे कामे करताना दिसून येतात तरी रस्ते वाहतुकीच्या या समस्या सोडवण्यासाठी उपाय करयला पाहिजे .

काही ठिकाणी चागल्या प्रतीचे रस्ते आहेत उदा. हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग तरीही या महामार्गावर अपघात घडून येताना दिसून येत आहेत या मध्ये मानवी चुका मुळे अपघात होताना दिसून येत आहे .या मध्ये मद्यपान करून वाहने चालवणे,वाहन चालवताना धूम्रपान करणे,पुढे जाणार्या वाहनाची स्पर्धा करणे,आक्रमक मानसिकता असणे अशा अनेक कारणामुळे हि रस्ते अपघात होताना दिसून येत आहेत. या साठी उपायकरणे हे आवश्यक आहे .

समारोप

मला असे वाटते कि , महाराष्ट्रा मध्ये राज्य सरकार विकासासाठीच्या अनेक योजना राबवत असते,योजनासाठी अर्थ सहाय्य पुरवत असते,त्यात पायाभूत सुविधांसाठी अनेक उपक्रम राबवले जातात. रस्ते वाहतुकीच्या संदर्भात

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

महाराष्ट्रात अनेक नवनवीन योजना सुरू केल्या आहेत त्यात हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग तसेच विविध धार्मिक स्थळांचे नवीनकरण, रस्ते बांधणी इत्यादी कार्यक्रम राबवताना दिसून येतात हे कार्यक्रम राबवत असताना सुरुवातीचे रस्ते प्रकल्प सुरळीत चालू आहेत का? त्यांची डागडुजी होते का? लोकांना त्यापासून अपाय होतो आहे का? हे देखील पाहणे गरजेचे आहे नवीन योजना,नवीन उपक्रम राबवणे ही महाराष्ट्राच्या दृष्टीने चांगली बाब /कामगिरी आहे मात्र पूर्वीच्या प्रकल्पाकडे पाठ न फिरवता सिंहावलोकन करण्याची नितांत आवश्यकता आहे.

**INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES**
***SPECIAL ISSUE ON MARATHI AARTHSHASHTRA PARISHED Nov. 2023***

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

# जळगांव तालुक्यातील शेतकऱ्यांच्या सामाजिक,आर्थिक स्थितीवर कृषी शासकीय योजनाच्या परिणामांचा अभ्यास.

**प्रा.डॉ. मनोजकुमार राम गायकवाड**
संशोधक मार्गदर्शक
अर्थशास्त्र विभाग, वसंतराव नाईक कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय शहादा जिल्हा–नंदुरबार
सभासद क्रमांक १४३५- ,मो.नं९९२१४७३२९९-

**श्री.निलेश रविंद्र कोळी**
संशोधक विद्यार्थी
अर्थशास्त्र विभाग, कवयित्री बहिणाबाई चौधरी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव
सभासद क्रमांक -१८६४ , मो.नं-८७६६४२२७४७

**गोषवारा:- (Abstract)**

भारतीय कृषी क्षेत्र भारतीय अर्थव्यवस्थेचे विकास इंजिन आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीची भूमिका जगातील आजच्या प्रगत देशांनी प्रगतीच्या मार्गावर येण्यापूर्वीच भारतीय शेती विकासाच्या आणि परिपक्वतेच्या टप्प्यावर पोहोचली होती. त्याकाळी शेती आणि उद्योग यांच्यात योग्य समतोल होता आणि दोन्ही बाजूने भरभराट साधली जात होती. ही परिस्थिती अठराव्या शतकाच्या मध्यापर्यंत कायम होती. मात्र परकीय ब्रिटीश सरकारचा हस्तक्षेप अर्थाव्यवस्थेत वर आला आणि ग्रामीण भागातील हस्तकला आणि कुटीर उद्योगांची गळचेपी करण्याची जाणीवपूर्वक धोरणामुळे संतुलनाचा पाया असंतुलनाकडे वळला.आणि देशाच्या अर्थव्यवस्थेची दुरावस्था होऊ लागली. ब्रिटीशांनी भारतात एक विशिष्ट वसाहतवादी धोरण अवलंबले आणि देशातील साधन संपत्तीचा स्वः हितासाठी वापर केला. मात्र शेतीचा विकास करण्यासाठी कोणतेही महत्वाचे विकासात्मक धोरण त्यावेळी स्वीकारले नाही. त्याऐवजी, त्यांनी मध्यस्थांचा एक वर्ग तयार केला ज्यांना जमीनदार म्हणून ओळखले गेले, ज्यांनी ग्रामीण भागातील गरिबांचे रक्त शोषले. उत्पादनाचा बराचसा भाग या परजीवी वर्गाने काढून घेतला आणि वास्तविक शेतकरी केवळ उदरनिर्वाहाच्या उत्पन्नावर जीवन जगत राहीला आणि दारिद्र्याची खाईत ढकलला गेला. शेती करणाऱ्यांकडे शेतीत गुंतवणुकीसाठी संसाधने, भाडवल नव्हते. म्हणून, स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतीय शेतीचे वर्णन 'निर्वाह' व्यवसाय म्हणून केले जाऊ लागले. आपल्याला स्वात्यंत्र मिळाल्यानंतर आपण वेगाने विकास साधण्यासाठी १९५०-५१ पासून नियोजनाला सुरुवात केली. आणि पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून शेतीक्षेत्र, उद्योगक्षेत्र, सेवाक्षेत्र आणि देशालीत मुलभूत समस्या यावर लक्ष केंद्रित केले. मात्र आज आपण जी विकसनशीलतेकडून विकसिततेकडे वाटचाल वेगाने करीत आहोत या स्वातंत्र्य प्राप्तीच्या ७५ वर्षाच्या कालावधी नंतर सुद्धा आपण कृषी क्षेत्राच्या प्रमुख समस्यांवर ठोस असे उपाय केलेले नाही. आपण जागतिक स्तरावर लोकसंख्येच्या बळावर साहजिकच नुकतेच प्रथम क्रमांकावर पोहचलो आहोत, मात्र देशातील दारिद्र्य, उपासमार, बेरोजगारी जीवनमानाचा दर्जा,

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

या मुलभूत समस्या आज आपल्या समोर खरी आव्हाने घेऊन उभ्या आहेत. आज आपण यांच्याकडे लक्षपूर्वक लक्ष देणे काळाची गरज आहे अन्यथा वाढती लोकसंख्या त्यानुसार जमिनीचे होणारे विभाजन/अपखंडन, कामाची मागणी करणाऱ्याची संख्या, देशातील अन्नाची गरज, आणि देशातील जीवनमानाचा स्तर टिकवून ठेवणे कठीण होईल.म्हणून या सर्व समस्यांची प्रमुख दोरी हि कृषी क्षेत्राशी निगडीत आहे. म्हणून आज कोणत्याही सुधारणा अजेंडा किंवा नियोजन प्रक्रियेच्या केंद्रस्थानी शेतीलाच ठेवावे लागेल.

**१.प्रस्तावना-(Introduction of Research)**

भारतीय कृषी क्षेत्र भारतीय अर्थव्यवस्थेचे विकास इंजिन आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीची भूमिका जगातील आजच्या प्रगत देशांनी प्रगतीच्या मार्गावर येण्यापूर्वीच भारतीय शेती विकासाच्या आणि परिपक्वतेच्या टप्प्यावर पोहोचली होती. त्याकाळी शेती आणि उद्योग यांच्यात योग्य समतोल होता आणि दोन्ही बाजूने भरभराट साधली जात होती. ही परिस्थिती अठराव्या शतकाच्या मध्यापर्यंत कायम होती. मात्र परकीय ब्रिटीश सरकारचा हस्तक्षेप अर्थाव्यवस्थेत वर आला आणि ग्रामीण भागातील हस्तकला आणि कुटीर उद्योगांची गळचेपी करण्याची जाणीवपूर्वक धोरणामुळे संतुलनाचा पाया असंतुलनाकडे वळला.आणि देशाच्या अर्थव्यवस्थेची दुरावस्था होऊ लागली. ब्रिटीशांनी भारतात एक विशिष्ट वसाहतवादी धोरण अवलंबले आणि देशातील साधन संपत्तीचा स्वः हितासाठी वापर केला. मात्र शेतीचा विकास करण्यासाठी कोणतेही महत्वाचे विकासात्मक धोरण त्यावेळी स्वीकारले नाही. त्याऐवजी, त्यांनी मध्यस्थांचा एक वर्ग तयार केला ज्यांना जमीनदार म्हणून ओळखले गेले, ज्यांनी ग्रामीण भागातील गरिबांचे रक्त शोषले. उत्पादनाचा बराचसा भाग या परजीवी वर्गाने काढून घेतला आणि वास्तविक शेतकरी केवळ उदरनिर्वाहाच्या उत्पन्नावर जीवन जगत राहीला आणि दारिद्र्याची खाईत ढकलला गेला. शेती करणाऱ्यांकडे शेतीत गुंतवणुकीसाठी संसाधने, भाडवल नव्हते. म्हणून, स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतीय शेतीचे वर्णन 'निर्वाह' व्यवसाय म्हणून केले जाऊ लागले. आपल्याला स्वात्यंत्र मिळाल्यानंतर आपण वेगाने विकास साधण्यासाठी १९५०-५१ पासून नियोजनाला सुरुवात केली. आणि पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून शेतीक्षेत्र, उद्योगक्षेत्र, सेवाक्षेत्र आणि देशालीत मुलभूत समस्या यावर लक्ष केंद्रित केले. मात्र आज आपण जी विकसनशीलतेकडून विकसिततेकडे वाटचाल वेगाने करीत आहोत या स्वातंत्र्य प्राप्तीच्या ७५ वर्षाच्या कालावधी नंतर सुद्धा आपण कृषी क्षेत्राच्या प्रमुख समस्यांवर ठोस असे उपाय केलेले नाही. आपण जागतिक स्तरावर लोकसंख्येच्या बळावर साहजिकच नुकतेच प्रथम क्रमांकावर पोहचलो आहोत, मात्र देशातील दारिद्र्य, उपासमार, बेरोजगारी जीवनमानाचा दर्जा, या मुलभूत समस्या आज आपल्या समोर खरी आव्हाने घेऊन उभ्या आहेत. आज आपण यांच्याकडे लक्षपूर्वक लक्ष देणे काळाची गरज आहे अन्यथा वाढती लोकसंख्या त्यानुसार जमिनीचे होणारे विभाजन/अपखंडन, कामाची मागणी करणाऱ्याची संख्या, देशातील अन्नाची गरज, आणि देशातील जीवनमानाचा स्तर टिकवून ठेवणे कठीण होईल.म्हणून या सर्व समस्यांची प्रमुख दोरी हि कृषी क्षेत्राशी निगडीत आहे. कारण राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा पहिल्या महायुद्धाच्या वेळी राष्ट्रीय उत्पन्नात

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

शेतीचा वाटा दोन तृतीयांश होता. हे औद्योगिक विकास आणि पायाभूत सुविधांच्या व्यावहारिक नसल्यामुळे होते. तथापि, भारतात नियोजन सुरू केल्यानंतर, अर्थव्यवस्थेतील दुय्यम आणि तृतीयक क्षेत्रांच्या विकासामुळे कृषी क्षेत्राचा वाटा सातत्याने घसरला आहे.१९५०-५१ मध्ये ५३.१ टक्क्यांवरून, घटक खर्चावर GDP मध्ये कृषी आणि संबंधित क्रियाकलापांचा वाटा (शेती, वनीकरण आणि मासेमारी यांचा समावेश आहे) १९९०-९१ मध्ये २९.६ टक्के आणि पुढे (२०१३-१४) मध्ये १३.९ टक्के पर्यंत घसरला. (२००४-०५ किमतीनुसार). नवीन मालिकेनुसार (आधारभूत वर्ष.२०११-१२),मूळ किमतींवर GVA (सकल मूल्यवर्धित) मधील कृषी आणि संलग्न क्रियाकलापांचा वाटा १०१९-२० मध्ये १४.८ टक्के आणि २०२०-२१ मध्ये १६.४ टक्के होता. राष्ट्रीय उत्पन्नातील शेतीचा वाटा अनेकदा आर्थिक विकासाचे सूचक म्हणून घेतला जातो. तसेच सर्वात मोठे रोजगार देणारे क्षेत्र म्हणून आज सुद्धा कृषी क्षेत्रच आहे,१९७२-७३ मध्ये, ७३.९ टक्के लोकसंख्या शेती आणि संलग्न कामांमध्ये गुंतलेली होती. ही टक्केवारी १९९३-९४ मध्ये ६४.८ टक्के, २०११-१२ मध्ये ४८.९ टक्के आणि २०२० मध्ये ४१ टक्के झाला. लोकसंख्येत झपाट्याने वाढ झाल्यामुळे, शेतीमध्ये गुंतलेल्या लोकांची पूर्ण संख्या खूप मोठी झाली आहे. अर्थव्यवस्थेच्या इतर क्षेत्रांचा विकास हा रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी पुरेसा नाही, त्यामुळे कार्यरत लोकसंख्येमध्ये वाढ होत आहे. जमिनीवर त्यांची किरकोळ उत्पादकता शून्य किंवा जवळपास असली तरीही त्यांना शेतीवर मागे पडण्यास भाग पाडले जाते. यामुळे अल्प बेरोजगारी आणि प्रच्छन्न बेरोजगारीची परिचित समस्या उद्भवत आहे. वाढत्या लोकसंख्येसाठी अन्नाची गरज पूर्ण करण्याची जिम्मेदारी कृषी क्षेत्राकडे असल्यामुळे आज लोकसंख्येचा प्रचंड दबाव असल्याने भारतासारख्या अंतरबाह्य अतिरिक्त अर्थव्यवस्था आणि त्यात झपाट्याने वाढ होत असल्याने अन्नाची मागणी झपाट्याने वाढत आहे. देशांतील अन्नाच्या वापराची विद्यमान पातळी खूपच कमी आहे आणि दरडोई उत्पन्नात थोडीशी वाढ झाल्याने अन्नाची मागणी प्रचंड वाढते आहे. त्यामुळे, जो पर्यंत कृषी क्षेत्राला अन्नधान्यांचे मार्केटिंग केलेले अधिशेष वाढवता येत नाही, तोपर्यंत असे संकट उभे राहण्याची शक्यता आहे. जगातील गरीब आणि कुपोषित लोकांची सर्वात मोठी संख्या, कृषी क्षेत्राला उच्च प्राधान्य दिल्यास गरिबी आणि कुपोषण कमी करणे तसेच सर्वसमावेशक विकास साधण्याचे उद्दिष्ट साध्य करणे सोपे होईल. म्हणून आज कोणत्याही सुधारणा अजेंडा किंवा नियोजन प्रक्रियेच्या केंद्रस्थानी शेतीलाच ठेवावे लागेल.

**२.संशोधनाची उद्दिष्ट्ये- (Objective of Research)**

१. शेतकऱ्यांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.
२. शेतकऱ्यांवर शासकीय योजनाच्या परिणामांचा अभ्यास करणे.

**३.संशोधनाची गृहीतके- (Hypothesis of Research)**

१. शेतकऱ्यांची आर्थिक आणि सामाजिक स्थिती कमकुवत आहे.
२. शेतकऱ्यांना शासकीय योजनाचा लाभ पुरेसा मिळालेला नाही.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

- **शेतकरी व्याख्या-**

१.“ज्याची उपजीविका शेतीवर अवलंबून आहे तो शेतकरी होय’’

**५.विषयाची निवड- (Choice of Research Subject)**

कृषी अर्थव्यवस्था ही खऱ्या अर्थाने देशाच्या आर्थिक विकासाला गती देणारी अत्यंत महत्त्वाची अशी व्यवस्था आहे आणि असे असून देखील आजही देशातील शेतकऱ्याला शेतीत पाहिजेत्या सुधारणा करता येत नाही परिणामी उत्पादनात वाढ होत नाही त्यामुळेच शेतकऱ्याचे समाजातील सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या मागासलेपण सातत्याने वाढतानाच दिसत आहे. शेतकऱ्यांविषयी अनेक प्रश्न निर्माण झाले असल्याकारणाने संशोधनाच्या मार्गे ते सोडविण्याचा प्रयत्न संशोधकाने केलेला आहे.

**६.नमुना निवड पद्धती - (Sample of Research)**

संशोधकाचे अभ्यास क्षेत्र जळगांव तालुका असल्याने संपूर्ण तालुक्याचे प्रतिनिधीत्व करू शकेल या हेतूने याद्दच्छिक नमूना निवड पध्दतीच्या आधारे संशोधन केलेले आहे.

| निवड केलेले तालुका - | तालुक्यांतील एकूण गावे- | निवडलेली गावे- १०% | नमुना निवड शेतकरी सरासरी प्रमाण- | एकूण नमुना शेतकरी- |
|---|---|---|---|---|
| **जळगाव** | ८६ | ९ | ५ | ४५ |

**७.संशोधन पद्धती- (Methodology of Research)**

- संशोधक विद्यार्थ्याने संशोधन करण्यासाठी प्राथमिक आणि दुय्यम या दोन्ही प्रकारच्या संकलन पद्धतीचा वापर केलेला आहे.

**८.संशोधनाची मर्यादा - (Limitations of Research )**

संशोधक विद्यार्थ्याने जळगाव तालुक्यातील शेतकऱ्यांवर कृषी विषयक शासकीय योजनाच्या परिणामांचे अध्ययन केलेले आहे. शेतकऱ्यांच्या उत्पादनात तसेच सामाजिक,आर्थिक स्थिती यांच्यावर कृषी विषयक शासकीय योजनांच्या परिणामांचा कृषी क्षेत्रात कोणता बदल झाला आहे याचा अभ्यास संशोधकाने आपल्या संशोधनात केलेला आहे. याकरिता संशोधक विद्यार्थ्याने जळगाव तालुक्यातील ०९,गावांची निवड केलेली आहे. प्रत्येक गावातून ०५, शेतकरी कुटुंबांकडून प्रश्नावली,अनुसूची,मौखिक पद्धतीने माहिती मिळवली आहे.

**९.कृषी विषयक योजना - (Agricultural Schemes)**

१. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना २. कृषी यांत्रिकीकरण उप-अभियान ३. केंद्र पुरस्कृत कडधान्य, गळीत धान्यविकास कार्यक्रम ४. केंद्र पुरस्कृत ऊस विकास कार्यक्रम ५. कृषी यांत्रिकीकरणास प्रोत्साहन ६. पीक संरक्षण योजना ७. राष्ट्रीय कृषि विमा योजना ८.राष्ट्रीय कृषी विमा योजना ९.रोजगार हमी योजना १०.शेतीमाल तारण कर्ज योजना.

**१०.संशोधनाचे विश्लेषण - (Research Analysis)**

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

**तक्ता क्र:-१**

**शेतकऱ्यांकडे असणाऱ्या शेतजमिनीचे प्रमाण:-**

| अ.क्र. | असल्यास किती | | |
|---|---|---|---|
| | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
| १ | १ ते २ एकर | १८ | ४० % |
| २ | २ ते ३ एकर | १२ | २६.६६ % |
| ३ | ३ ते ४ एकर | ८ | १७.७७ % |
| ४ | ४ ते ५ एकर | ४ | ८.८८ % |
| ५ | ५ एकर पेक्षा जास्त | ३ | ६.६६ % |
| **एकूण** | | **४५** | **१०० %** |

आधार स्त्रोत- प्राथमिक माहिती प्रश्नावली

ग्रामीण भागातील शेतकऱ्याकडे असणाऱ्या जमिनीचे क्षेत्र किती आहे असा प्रश्न विचारला असता ४०% शेतकऱ्यांकडे १ ते २ एकर क्षेत्र आहे तर २ ते ३ एकर क्षेत्र असलेले शेतकरी हे २६.६६ % आहेत.यातून असे लक्ष्यात येते कि जळगाव तालुक्यात सीमांत आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांचे प्रमाण आपल्याला जास्त दिसून येते.

**तक्ता क्र:-२**

**शेतीतील पिकांचे स्वरूप:-**

| अ.क्र. | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | खरीप | १८ | ४०% |
| 2 | रब्बी | २७ | ६०% |
| **एकूण** | | **४५** | **१००%** |

आधार स्त्रोत- प्राथमिक माहिती प्रश्नावली

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

जळगाव तालुक्यातील शेतकरी कोणते पिक जास्त घेतात असे विचारले असता असे लक्ष्यात आले कि ४०% शेतकरी हे खरीप आणि ६०% शेतकरी हे रब्बी पिक घेतात.

**तक्ता क्र:-३**
**साधने उपलब्ध:-**

| अ.क्र. | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २७ | ६०.००% |
| २ | नाही | १८ | ४०.०० % |
| **एकूण** | | **४५** | **१००%** |

आधार स्त्रोत- प्राथमिक माहिती प्रश्नावली

जळगाव तालुक्यातील शेतकऱ्यांकडे शेती व्यवसाय करण्यासाठी पुरेशी कृषी साधने आहेत का? असे विचारले असता असे लक्ष्यात आले कि,६०% शेतकरी म्हणतात कि आमच्याकडे पुरेशी साधने आहेत.तर ४०.००% शेतकरी म्हणतात पुरेशी साधने नाही.

**तक्ता क्र:-४**

| **अ.क्र.** | **वर्षाला अंदाजित खर्च:-** | | |
|---|---|---|---|
| | **तपशील** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
| १ | १० ते ३० हजार | २४ | ५३ .३३ % |
| २ | ३१ ते ५० हजार | १६ | ३५.५५ % |
| ३ | ५० हजार पेक्षा जास्त | ५ | ११.११ % |
| **एकूण** | | **४५** | **१०० %** |

आधार स्त्रोत- प्राथमिक माहिती प्रश्नावली

जळगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना साधारण कृषी उत्पादन घेण्यासाठी वर्षाला अंदाजित खर्च किती येतो यात ५३.३३ % शेतकरी म्हणतात कि, १० ते ३० हजार दरम्यान अंदाजित वर्षाला खर्च येतो.आणि ३५.५५% शेतकरी सागतात ३१ ते ५० हजार व ११.११% शेतकऱ्यांना कृषी उत्पादन घेण्यासाठी अंदाजित खर्च ५० हजारापेक्षा जास्त येतो.

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
*SPECIAL ISSUE ON MARATHI AARTHSHASHTRA PARISHED Nov. 2023*

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

**तक्ता क्र:-५**

**कुटुंब गरजा:-**

| **अ.क्र.** | **तपशील** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | होय | ११ | २४.४४ % |
| २ | नाही | ०९ | २०.०० % |
| ३ | काहीप्रमाणात | २५ | ५५.५५ % |
| **एकूण** | | **४५** | **१००%** |

आधार स्त्रोत- प्राथमिक माहिती प्रश्नावली

शेतकऱ्यांना शेतीतून मिळणारे उत्पन्न तुमच्या कुटुंबाच्या गरजा पूर्ण होण्यासाठी पुरेसे आहेत का यात २४.४४% शेतकरी होय तर २०.००% शेतकरी नाही व ५५.५५% शेतकरी असे म्हणतात कि, काहीप्रमाणात आमच्या कुटुंबाच्या गरजा या उत्पन्नातून पूर्ण होतात.

**तक्ता क्र:-६**

**स्वतचे घर:-**

| **अ.क्र.** | **तपशील** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | होय | ३८ | ८४.४४ % |
| २ | नाही | ७ | ८ .८८ % |
| **एकूण** | | **४५** | **१००%** |

आधार स्त्रोत- प्राथमिक माहिती प्रश्नावली

शेतकऱ्यांना तुमचे स्वतःचे घर आहेत का असे विचारले असता ८४.४४% शेतकरी म्हणतात कि आमचे स्वतचे घर आहे.यात कच्चे घर आहे असे शेतकरी हे ७१.११ % तर पक्के घर असलेले २८.८ % शेतकरी आहे.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

**तक्ता क्र:-७**

**घरातील वस्तू विषयक :-**

| अ.क्र. | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | टीव्ही | ३७ | ८२.२२ % |
| २ | फ्रीज | २६ | ५७.७७ % |
| ३ | कुलर | २२ | ४८.८८ % |
| ४ | पंखा | ३९ | ८६.६६ % |
| ५ | गॅस | ३९ | ८६.६६ % |
| ६ | संगणक | ०० | ००.०० % |
| ७ | मोबाईल | ४५ | १०० % |
| ८ | एसी | ०० | ००.०० % |
| ९ | मोटारसाईकल | ३२ | ७१.११ % |
| १० | इतर | ०० | ००.०० % |

आधारस्त्रोत- प्राथमिक माहिती प्रश्नावली

जळगाव तालुक्यातील शेतकऱ्यांकडे घरामध्ये कोणकोणत्या वस्तू आहे असे विचारले असता यात असे लक्ष्यात येते कि, बहुतांश शेतकऱ्यांकडे घरात टीव्ही,८२.२२% पंखा ८६.६६% गॅस, ८६.६६%फ्रीज,५७.७७% आणि मोबाईल,१००% तर मोटारसाईकल,७१.११% अश्या प्रमाणात ह्या वस्तू/ साधने त्यांच्याकडे जास्तीत- जास्त प्रमाणात आहेत.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

**तक्ता क्र:-८**

**कृषी विषयक शासकीय योजना:-**

| **अ.क्र.** | **तपशील** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | होय | १७ | ३७.७७ % |
| २ | नाही | २८ | ६२.२२ % |
| **एकूण** | | **४५** | **१००%** |

आधार स्त्रोत- प्राथमिक माहिती प्रश्नावली

केंद्रसरकार आणि राज्य सरकार यांच्या मार्फत शेतकऱ्याच्या कृषी उत्पादनात वाढ व्हावी तसेच शेती व्यवसायावर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे व त्यांच्या सामाजिक, आर्थिक स्थितीत बदल व्हावा म्हणून केंद्रसरकार आणि राज्य सरकार यांच्या मार्फत कृषी विषयक विविध योजना राबविल्या जातात. मात्र शेतकऱ्यांना या योजनाची माहिती आहे किंव्हा नाही असे विचारले असता होय म्हणणारे ३७.७७ % व नाही म्हणणारे ६२.२२ % शेतकरी आहेत.

**तक्ता क्र:-९**

**योजनाची माहिती**

| **अ.क्र.** | **तपशील** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | होय | १३ | २८.८८% |
| २ | नाही | ३२ | ७१.११% |
| **एकूण** | | **४५** | **१००%** |

आधार स्त्रोत- प्राथमिक माहिती प्रश्नावली

केंद्रसरकार आणि राज्य सरकार यांच्या मार्फत कृषी विषयक विविध योजना राबविल्या मात्र शेतकऱ्यांना या योजनांची माहिती वेळेवर मिळते का असे विचारले असता २८.८८ % शेतकरी होय म्हणतात तर ७१.११ % शेतकरी हे नाही असे सांगतात.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

**तक्ता क्र:-१०**

**योजनाची माहिती प्राप्त**

| अ.क्र. | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | तलाठी | १६ | ३५.५५% |
| २ | ग्रामसेवक | १० | २२.२२% |
| ३ | सरपंच | ८ | १७.७७% |
| ४ | पंचायत समिती | ५ | ११.११% |
| ५ | आकाशवाणी | ४ | ८.८८% |
| ६ | कृषी सेवक/अधिकारी | १२ | २६.६६% |
| ७ | स्वत: | १३ | २८.८८% |
| ८ | दूरदर्शन | ४ | ८.८८% |

आधार स्त्रोत- प्राथमिक माहिती प्रश्नावली

जळगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना कृषी विषयक योजनांची माहिती कशी प्राप्त होते हे जाणून घेण्यासाठी प्रश्न केला असता त्यात असे निदर्शनास येते की,३५.५५% तलाठी,२२.२२% ग्रामसेवक,१७.७७% सरपंच २६.६६% कृषी सेवक/अधिकारी,२८.८८% स्वत: अश्या माध्यमातून जास्तीत-जास्त कृषी विषयक योजनांची माहिती शेतकऱ्यांनपर्यंत पोहचते.

**तक्ता क्र:-११**

**कृषी विषयक शासकीय योजनाचा लाभ**

| अ.क्र. | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २१ | ४६.६६ % |
| २ | नाही | २४ | ५३.३३ % |

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

| | | |
|---|---|---|
| **एकूण** | **४५** | **१००%** |

आधार स्त्रोत- प्राथमिक माहिती प्रश्नावली

केंद्रसरकार आणि राज्य सरकार यांच्या मार्फत विविध कृषी विषयक योजना राबविल्या जातात मात्र जळगाव तालुक्यातील किती शेतकऱ्यांना या योजनांचा लाभ मिळाला आहे कि नाही हे जाणून घेण्यासाठी प्रश्न केला असता त्यात ४६.६६% शेतकऱ्यांनी होय तर ५३.३३% शेतकऱ्यांनी नाही असे म्हटले.

**तक्ता क्र:-१२**

**कोणत्या कृषी विषयक शासकीय योजनाचा लाभ**

| अ.क्र. | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | केंद्रसरकार | १६ | ३५.५५% |
| २ | राज्यसरकार | १० | २२.२२% |
| ३ | दोन्ही | १ | २.२२% |
| ४ | लाभ घेतलेला नाही | १८ | ४०.००% |
| **एकूण** | | **४५** | **१०० %** |

आधार स्त्रोत- प्राथमिक माहिती प्रश्नावली

जळगाव तालुक्यातील शेतकऱ्यांनी कोणत्या कृषी विषयक योजनांचा लाभ घेतलेला आहे असे विचारले असता ३५.५५% केंद्रसरकार,२२.२२% राज्यसरकार आणि दोन्ही योजनांचा लाभ घेतलेले शेतकरी २.२२% व योजनांचा लाभच घेतला नाही असे ४०.००% शेतकरी आहेत.यात सर्वाधिक लाभ हा पिक विमा योजना २२.२२% आणि १७.१७% पी.एम किसान योजना या योजनांचा लाभ जास्तीत-जास्त शेतकऱ्यांनी घेतलेला आहेत.

**शेतकऱ्यांनी लाभ घेतलेल्या कृषी योजनाची नावे:-**

१.पिक विमा योजना-२२.२२% २.किसान विमा योजना-२.२२ ३.P.M. किसान योजना-१७.१७%
४.सौर ऊर्जा योजना-४.४४% ५.विहीर अनुदान योजना-२.२२ ६.जैन ठिबक योजना-४.४४%

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
*SPECIAL ISSUE ON MARATHI AARTHSHASHTRA PARISHED Nov. 2023*

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

**तक्ता क्र:-१३**

**योजनांमार्फत दिला जाणार आर्थिक मोबदला**

| अ.क्र. | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २९ | ६४.६६ % |
| २ | नाही | १६ | ३५.५५ % |
| **एकूण** | | **४५** | **१००%** |

आधार स्त्रोत- प्राथमिक माहिती प्रश्नावली

केंद्रसरकार आणि राज्य सरकार यांच्या मार्फत विविध कृषी विषयक योजनाचा लाभ शेतकऱ्यांना मिळत असतो मात्र योजनेची पूर्ण रक्कम / मोबदला शेतकऱ्यांपर्यंत पोहचतो का तर ६४.६६% शेतकरी होय व ३५.५५% शेतकरी नाही असे सांगतात.

**तक्ता क्र:-१४**

**कृषी उत्पादनात वाढ**

| अ.क्र. | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १० | २२.२२ % |
| २ | नाही | १३ | २८.८८ % |
| ३ | काहीप्रमाणात | २२ | ४८.८८ % |
| **एकूण** | | **४५** | **१००%** |

आधार स्त्रोत- प्राथमिक माहिती प्रश्नावली

केंद्रसरकार आणि राज्य सरकार यांच्या मार्फत राबविल्या जाणाऱ्या कृषी योजनांचा लाभ घेतल्या नंतर शेतकऱ्याच्या कृषी उत्पादनात वाढ झाली का असे विचारले असता २२.२२% होय व २८.८८% नाही आणि ४८.८८% काही प्रमाणात उत्पादनात वाढ होते असे सांगितले.

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
*SPECIAL ISSUE ON MARATHI AARTHSHASHTRA PARISHED Nov. 2023*

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

**तक्ता क्र:-१५**

**शेतकऱ्याची सामाजिक, आर्थिक स्थिती**

| अ.क्र. | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २० | ४४.४४ % |
| २ | नाही | ०३ | ६.६६ % |
| ३ | काहीप्रमाणात | २२ | ४८.८८ % |
| **एकूण** | | **४५** | **१००%** |

आधार स्त्रोत- प्राथमिक माहिती प्रश्नावली

कृषी विषयक शासकीय योजनाचा लाभ घेतल्यानंतर शेतकऱ्याच्या सामाजिक, आर्थिक स्थिती बदल होतो का असे विचारले असता ४४.४४% शेतकरी होय व ६.६६% नाही आणि ४८.८८% शेतकरी काही प्रमाणात बदल होतो असे म्हणतात.

**तक्ता क्र:-१६**

| **अ.क्र.** | **वर्षाला वार्षिक उत्पन्न :-** | | |
|---|---|---|---|
| | **तपशील** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
| १ | २० ते ३० हजार | ९ | २०.००% |
| २ | ३१ ते ५० हजार | १६ | ३५.५५ % |
| ३ | ५० हजार पेक्षा जास्त | २० | ४४.४४ % |
| **एकूण** | | **४५** | **१०० %** |

आधार स्त्रोत- प्राथमिक माहिती प्रश्नावली

शेतकऱ्यांची आर्थिक समजून घेण्यासाठी शेतकऱ्यांचे वार्षिक उत्पन्न किती आहे याबाबत विचारले असते असे लक्ष्यात येते कि,२० ते ३० हजार उत्पन्न हे २०.००% शेतकऱ्यांचे असल्याचे निदर्शनास आले,आणि ३१ ते ५० हजार उत्पन्न हे ३५.५५% तर ५० हजारपेक्षा जास्त उत्पन्न हे ४४.४४% शेतकऱ्यांचे आहे.

**११.संशोधनाचे निष्कर्ष- ( Conclusion of Research)**

१.जळगाव तालुक्यातील ६०% शेतकऱ्यांकडे पिक उत्पादन घेण्यासाठी पुरेशी साधने उपलब्ध नाही.

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
*SPECIAL ISSUE ON MARATHI AARTHSHASHTRA PARISHED Nov. 2023*

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

२.५५.५५% शेतकरी म्हणतात कौटुंबिक गरजा शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नापासून काही प्रमाणात पूर्ण होतात.
३. जळगाव तालुक्यातील ६२.२२% शेतकऱ्यांना कृषी विषयक शासकीय योजनांची माहिती नाही.
४. कृषी विषयक योजनांची माहिती वेळेवर प्राप्त होते का असे विचारले असता ७१.११% शेतकरी असे म्हणतात की, वेळेवर कृषीविषयक शासकीय योजनांची माहिती आमच्यापर्यंत पोहोचत नाही.
५. कृषी विषयक शासकीय योजनांचा किती प्रमाणात लाभ घेतलेला आहे असे विचारले असता ५३.३३% शेतकऱ्यांनी आतापर्यंत कोणत्याही कृषी विषयक शासकीय योजनेचा लाभ घेतलेला नाही.
६. कृषीविषयक योजनांचा लाभ घेतलेला असेल तर तो लाभ राज्य सरकार की केंद्र सरकार मार्फत चालविल्या जाणाऱ्या कृषीविषयक योजनांचा लाभ घेतलेला आहे असे विचारले असता ३५.५५% शेतकऱ्यांनी केंद्र सरकारच्या कृषीविषयक योजनांचा लाभ घेतलेला आहे.
७. सर्वाधिक कोणत्या योजनांचा लाभ मिळालेला आहे तर यात असे लक्षात आले की पिक विमा योजना आणि पी एम किसान योजना या योजनांचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत जास्तीत-जास्त  प्रमाणात पोहोचलेला दिसून येतो.
८. ४६.६६%  शेतकरी असे म्हणतात कोणत्याही योजनेचा लाभ शेतकऱ्यापर्यंत पुरेशा प्रमाणात पोहोचत नाही.
९.शासकीय योजनांचा लाभ घेतल्यानंतर उत्पादनात काही प्रमाणात वाढ झाली ४८.८८% शेतकरी म्हणतात.
१०.४८.८८% शेतकरी म्हणतात की, कृषी शासकीय योजनांचा लाभ घेतल्यानंतर काही प्रमाणात सामाजिक आणि आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होते.

**१२.उपाय-योजना-(Suggestions)**

१.कृषीविषयक शासकीय योजनांचा परिणाम पाहिजे त्या प्रमाणात कृषी क्षेत्राला मिळत नाही यासाठी सरकारने विविध शासकीय कायदे किंवा नियम अमलात आणावे.
२.कृषी विषयक शासकीय योजनांमध्ये सरकारने कृषी विषयक आवश्यक साधनसामग्रीवर विशेष अनुदान जाहीर करावे.
३.शेतकरी फक्त शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नावर अवलंबून न राहावे म्हणून सरकारने शेती पूरक व्यवसायासाठी विशेष अर्थसाह्य किंवा मदत करावी.
४.शेतकऱ्यांना विविध कृषीविषयक योजनांची माहिती त्यांच्यापर्यंत सहज पोहोचेल अशी सरकारने यंत्रणा राबवावी.
५.केंद्र सरकार व राज्य सरकारच्या बहुतांश कृषी विषयक योजना असून सुद्धा त्या योजनांची अंबलबजावणी योग्य पद्धतीने होत नाही ती योग्य पद्धतीने व्हावी यासाठी सरकारने प्रयत्न करावे.
६.शेतकऱ्यांनी कृषी विषयक शासकीय योजनेचा लाभ घेतल्यानंतर त्यांच्या कृषी उत्पादनामध्ये वाढ झाली किंवा नाही यासाठी योजनेचा लाभ घेतल्यानंतर शेतकऱ्याकडून त्याचा आढावा घ्यावा.
७.कोणत्या शेतकऱ्यांना कृषिविषयक योजनेचा लाभ द्यावा किती प्रमाणात द्यावा त्याचे गट आवश्यकतेनुसार निश्चित करावे व त्यानुसार योजनांचा लाभ शेतकऱ्यांना द्यावा.
८.राज्य सरकार व केंद्र सरकार वेगवेगळे सरकार असेल तर राज्य व केंद्र यांनी शासकीय योजनांच्या अंमलबजावणीमध्ये राजकीय बाजू आणू नये.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

**१३.संदर्भ सूची- (References)**

१)प्रश्नावली
२) कृषी अर्थशास्त्र –डॉ. मनोजकुमार गायकवाड ,प्रो.डॉ. एन एल चव्हाण
३) कृषी व ग्रामीण अर्थशास्त्र- डॉ.विजय कविमंडन
४) संशोधन पद्धती-डॉ.वा.भा.पाटील
५) दत्त एव सुंदरम भारतीय अर्थव्यवस्था-गौरव दत्त,अश्विनी महाजन
६) जनगणना अहवाल-२०११,भारत सरकार censusindia.gov.in, census2011.co.in
७) संशोधन पद्धत्ती व तंत्रे-डॉ.प्रदीप आगलावे
८) केंद्र व राज्य शासनाच्या संपूर्ण शासकीय योजना-मनोज जावळे
९) शासकीय योजनाचा खजिना-प्रा.पुरुषोत्तम भापकर
१०) Commissioner ate of Agriculture.com
११) कृषी विभाग महाराष्ट्र शासन-http://krishi.maharashtra.gov.in
१२) आर्थिक सर्वेक्षण -२०२०-२१-pib.gov.in
१३) https://vishwakosh.marathi.gov.in
१४) महाराष्ट्र वार्षिकी -२०१८,२०१९,२०२०

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
*SPECIAL ISSUE ON MARATHI AARTHSHASHTRA PARISHED Nov. 2023*

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

# "भारतामधील मानवी भांडवलातील कंत्राटी कामगार: आव्हान आणि उपाय"

**डॉ. बी. एस. पाटील**
प्राध्यापक आणि विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग,
चांगु काना ठाकूर कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय , (स्वायत्त) नवीन पनवेल ४१०२०८
आजीव सभासद क्रमांक : ११७८
bspatil1977@gmail.com, (9221579781)

**डॉ. के. बी. ढोरे**
सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग
चांगु काना ठाकूर कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय , (स्वायत्त) नवीन पनवेल ४१०२०८
आजीव सभासद क्रमांक :१९२२
ram.unipune@gmail.com, (9604294908)

**गोषवारा:**

भारतातील प्रत्येक अर्थव्यवस्थेच्या क्षेत्रातील कंत्राटी कामगार हा महत्त्वाचा भाग आहे. ते प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे आपल्या अर्थव्यवस्थेला मदत करत आहेत. कंत्राटी कामगारांचे शोषण हे सध्याचे सर्वात मोठे आव्हान आहे. उदाहरणार्थ: कामाचे स्वरूप, कामाची स्थिती, किमान वेतन आणि सरकारी योजनांची अंमलबजावणी इ.भारतातील कंत्राटी कामगार पद्धतीची उत्क्रांती, सध्याच्या कायद्याचे विश्लेषण आणि अंतर्गत विविध त्रुटींवर लक्ष केंद्रित करणे हा उद्देश आहे. तसेच विविध समित्यांच्या शिफारशींचे विश्लेषण करने तसेच कंत्राटी कामगार प्रतिबंद आणि निर्मूलन कायदा, 1970 च्या काही महत्त्वाच्या समस्यांवरील न्यायालयीन व्याख्या देखील स्पष्ट केली आहे. कंत्राटी कामगार हे कर्मचारी आहेत जे कंपनीद्वारे थेट कामावर न ठेवता तृतीय-पक्ष कंत्राटदाराद्वारे कंपनी किंवा संस्थेसाठी काम करतात. भारतात, कंत्राटी कामगार सामान्यत: उत्पादन, बांधकाम आणि सेवा यासारख्या उद्योगांमध्ये काम करतात. या कामगारांना तात्पुरत्या स्वरूपात कामावर घेतले जाते आणि त्यांना नियमित कर्मचाऱ्यांपेक्षा कमी वेतन दिले जाते. कंत्राटी कामगार कंपनीच्या आवश्यकतेनुसार, अकुशल कामा पासून ते तांत्रिक कामापर्यंत अनेक कामे करू शकतात. ते पूर्णवेळ किंवा अर्धवेळ काम करू शकतात आणि त्यांचा रोजगार निश्चित मुदतीसाठी असू शकतो. कंत्राटी कामगारांचा वापर नियोक्त्यांद्वारे सहसा पसंत केला जातो कारण ते कामावर ठेवण्याच्या आणि काढून टाकण्याच्या बाबतीत लवचिकता प्रदान करते आणि त्यांना नियमित रोजगाराशी संबंधित काही कायदेशीर आवश्यकता टाळण्याची परवानगी देते.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

**बिजसंज्ञा** : सरकारी योजना, कंत्राटी कामगार, कंत्राटी कामगारांची आव्हाने आणि समस्या, उद्योग, नियमित रोजगार.

**प्रस्तावना :**

कंत्राटी कामगार हा सर्व उद्योगांचा एक महत्त्वाचा भाग आहे आणि अर्थव्यवस्थेतील राष्ट्रीय उत्पन्नातही ते योगदान देतात. दरवर्षी ठराविक खर्चापेक्षा मजुरीच्या खर्चाला परिवर्तनीय मानणे हे उद्योगांनी कंत्राटी कामगारांना प्राधान्य देण्याचे काही अंशी कारण आहे. कंत्राटी मजुरांना उद्योग आणि समुदायामध्ये अनेक समस्या आणि आव्हानांचा सामना करावा लागला, कंत्राटी कामगार (नियमन आणि निर्मूलन) कायदा १९७० ची प्रभावीपणे अंमलबजावणी केली नाही. भारत सरकारने कंत्राटी कामगार (नियमन आणि निर्मूलन) कायदा, १९७० तयार केला, मुख्य उद्देश या कायद्यात सामाजिक सुरक्षा, आरोग्य, कल्याणकारी उपाय, किमान वेतन, कंत्राटी कामगारांची कामाची स्थिती, नोकरीची सुरक्षा, कंत्राटदार आणि कंत्राटी कामगार यांच्यातील संबंध, त्यानंतर कंत्राटदार आणि मुख्य नियोक्ता यांचा करार इ. या कायद्यात स्पष्ट केलेली मते आहेत. सर्वोच्च न्यायालयाने कंत्राटी कामगारांबाबत अनेक मुद्द्यांवर गंभीर कारवाई/निवाडा दिल्याने, एक म्हणजे कंत्राटी कामगारांना कायम कामगारांप्रमाणेच वेतन मिळावे असा सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला, दुसरे म्हणजे समानतेच्या तत्त्वाला नकार देण्याचा तात्विक मुद्दाही न्यायालयाने मांडला. समान कामासाठी मोबदला देणे हे मानवी प्रतिष्ठेचे उल्लंघन आहे इ. कंत्राटी कामगार (नियमन आणि निर्मूलन) कायदा, १९७०, भारतातील कंत्राटी कामगारांच्या रोजगाराचे नियमन करणारी कायदेशीर चौकट प्रदान करते. हा कायदा 20 किंवा त्याहून अधिक कंत्राटी कामगार असलेल्या आस्थापनांना लागू होतो आणि कंत्राटी कामगारांच्या रोजगाराचे नियमन करणे आणि त्यांच्या हितांचे संरक्षण करणे हे त्याचे उद्दिष्ट आहे.

**कंत्राटी कामगारांची व्याख्या आणि अर्थ:**

कंत्राटी कामगार हा शब्द सामान्यत: विशिष्ट कामासाठी आणि मर्यादित कालावधीसाठी नियुक्त केलेल्या कामगारांना सूचित करतात. हे कामगार अनेकदा विविध यंत्रणांद्वारे कंत्राटदाराला बांधील असतात आणि त्यामुळे त्यांच्या हालचालींचे स्वातंत्र्य प्रतिबंधित केले जाऊ शकते.

कंत्राटी कामगार म्हणजे रोजगार संबंधांचा एक प्रकार ज्यामध्ये विशिष्ट कालावधीसाठी विशिष्ट कार्य करण्यासाठी एखाद्या व्यक्तीला नियुक्त केले जाते. या प्रकारची रोजगार व्यवस्था बहुतेकदा बांधकाम किंवा माहिती तंत्रज्ञानासारख्या उद्योगांमध्ये वापरली जाते, जेथे केले जाणारे काम प्रकल्प-आधारित असते आणि त्यासाठी विशेष कौशल्ये आवश्यक असतात.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

**भारतातील कंत्राटी कामगार विषयक कायदे :**

कंत्राटी कामगार नियमन आणि निर्मूलन कायदा १९७० भारतातील कंत्राटी कामगारांना संरक्षण प्रदान करतो. "कंत्राटी कामगार" ची व्याख्या अशी व्यक्ती म्हणून केली जाते जी एखाद्या उद्योगसंस्थेच्या कामाच्या संबंधात मुख्य नियोक्ताद्वारे किंवा कंत्राटदाराद्वारे नियुक्त केली जाते. करार संस्थेला कंत्राटी मजुरांचा पुरवठा करत असताना, मुख्य नियोक्ता हा संस्थेवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रभारी व्यक्ती असतो. त्याचप्रमाणे, हा कायदा विशिष्ट व्यवसायांमध्ये कंत्राटी कामगारांच्या वापरावर नियंत्रण ठेवण्यासाठी, तो कोणत्या परिस्थितीत रद्द केला जाऊ शकतो याची रूपरेषा देण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित कोणत्याही समस्यांचे निराकरण करण्यासाठी संमत करण्यात आला. हे 20 किंवा त्याहून अधिक कंत्राटी कामगारांना कामावर ठेवणाऱ्या सर्व व्यवसायांना तसेच असे काम करणाऱ्या सर्व स्वतंत्र कंत्राटदारांना लागू आहे. कायद्यांतर्गत, मुख्य नियोक्ता कंत्राटी कामगारांना गुंतवून ठेवण्यासाठी योग्य सरकारी प्राधिकरणाकडून परवाना मिळविण्यासाठी जबाबदार आहे. मुख्य नियोक्त्याने हे देखील सुनिश्चित केले पाहिजे की कंत्राटदार कायद्याच्या विविध तरतुदींचे पालन करतो, जसे की वेतन, सामाजिक सुरक्षा लाभांची तरतूद, कामाचे तास आणि इतर कामाच्या परिस्थिती. कायद्यानुसार कंत्राटदाराने योग्य सरकारी प्राधिकरणाकडे नोंदणी करणे आणि मुख्य नियोक्ता आणि कंत्राटदार यांच्यातील कराराची प्रत प्रदान करणे आवश्यक आहे. कायद्याच्या व्यतिरिक्त, इतर कायदे आणि नियम आहेत जे भारतातील कंत्राटी कामगारांच्या रोजगारावर नियंत्रण ठेवतात. यामध्ये औद्योगिक विवाद कायदा १९४७, किमान वेतन कायदा १९४८, वेतन देय कायदा १९३६ आणि कर्मचारी भविष्य निर्वाह निधी आणि विविध तरतुदी कायदा १९५२ यांचा समावेश आहे. या कायद्यांमध्ये कंत्राटी कामगारांच्या रोजगाराशी संबंधित विविध तरतुदी निश्चित केल्या आहेत. जसे की किमान वेतन, कामाचे तास आणि इतर फायदे.

**कायद्याची व्याप्ती आणि त्याचे उपयोग:**

१. कंत्राटी कामगार वापरणाऱ्या व्यवसायांसाठी नोंदणी प्रक्रियेसाठी मार्गदर्शक तत्त्वे स्थापित करणे.
२. पूर्वतयारी आणि करार परवाना प्रक्रियेचे वर्णन करण्यासाठी.
३. कायद्याविरुद्धच्या गुन्ह्यांसाठी शिक्षेची मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करणे.
४. योग्य आणि राहण्यायोग्य कामाची परिस्थिती प्रदान करणे.
५. कंत्राटी कामगार वापरून आस्थापनांसाठी कायद्यांतर्गत नोंदणी.
६. आस्थापनाच्या प्रमुख नियोक्त्याने आस्थापनाच्या नोंदणीसाठी नोंदणी अधिकाऱ्याकडे कंत्राटी कामगारांना कामावर ठेवण्यासाठी अर्ज सादर करणे आवश्यक आहे.
७. अर्ज फी भरण्यासाठी डिमांड ड्राफ्टसह अर्ज पाठवणे आवश्यक आहे.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

८. फॉर्म जो नोंदणीचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी वापरला जातो
९. जर मूळ नोंदणी प्रमाणपत्र हरवले, खराब झाले किंवा अनावधानाने नष्ट झाले, तर डुप्लिकेट जारी करणे आवश्यक आहे.

**साहित्याची समीक्षा:**

**श्री नागेश सावंत**, एप्रिल 2015, त्यांच्या अभ्यासात भारतातील कंत्राटी कामगार: समस्या आणि आव्हाने, भारत जगातील महासत्ता बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. महासत्ता बनण्यासाठी, सरकारने कार्यक्रम सुरू केले आहेत आणि उद्योगांना त्यांचा व्यवसाय सुरू करण्यासाठी बाजारपेठ खुली केली आहे. इतर देशांच्या तुलनेत भारतीय कामगार बाजारपेठ स्वस्त आहे हे सर्वज्ञात सत्य आहे. त्यामुळे उद्योगांसाठी भारत हे व्यवसाय उघडण्यासाठी योग्य ठिकाण बनले आहे. शिवाय, फारशी जबाबदारी न घेता कंत्राटी कामगारांमध्ये गुंतणे वेदनारहित आहे. केवळ खाजगी संस्थाच नाही तर सरकारी संस्था देखील कंत्राटी कामगारांना कामाला लावत आहेत.

**परमिता रे, २०१६** मध्ये तिने भारतातील कंत्राटी कामगार प्रणाली: समस्या आणि दृष्टीकोन, विविध प्रकारच्या उद्योगांमध्ये कंत्राटी कामगार हा रोजगाराचा एक महत्त्वाचा आणि वाढणारा प्रकार आहे. जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरणाच्या काळात कंत्राटी कामगारांचे शोषण ही सर्वात मोठी समस्या आहे. भारतातील कंत्राटी कामगार पद्धतीचे विहंगावलोकन, उत्क्रांती, अलीकडील कायद्याचे विश्लेषण आणि कायद्यातील विविध त्रुटींवर लक्ष केंद्रित करणे हा उद्देश आहे.

**करीबसम्मा एन आणि पवित्र आर अलूर, 2016**., कंत्राटी कामगार हा रोजगाराचा एक महत्त्वाचा आणि वाढणारा प्रकार आहे. कंत्राटी कामगारांची नियुक्ती करण्याची प्रथा जगभर पाळली जाते आणि ती प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. करार प्रणाली वापरकर्ता उपक्रमांमधील त्रिकोणी संबंधांवर आधारित आहे. कामगारांची भरती बाहेरील एजन्सी किंवा व्यक्तीद्वारे केली जाते आणि ते एखाद्या आस्थापनाला पुरवले जातात किंवा त्यांच्या कामात गुंतलेले असतात. थेट मजुरांच्या विपरीत, ते मुख्य नियोक्ता/आस्थापनेच्या मस्टर रोलमध्ये दिसत नाहीत किंवा त्यांना थेट पैसे दिले जात नाहीत.

**कंत्राटदाराची जबाबदारी:**

१. त्याने महिन्याच्या पहिल्या दिवसापासून पूर्ण केलेल्या कामाच्या देयकाच्या बदल्यात फर्मचे छापलेले मासिक बीजक प्रदान करणे आवश्यक आहे.
२. मस्टर रोल, मजुरी, कपात, ओव्हरटाइम, दंड आणि आगाऊ देयके यासाठी कलम 29 द्वारे आवश्यक असलेली नोंदी ठेवणे.

३. प्रत्येक महिन्याच्या सात तारखेपूर्वी कलम 21 नुसार आवश्यक असलेले वेतन अदा करण्यासाठी जबाबदार असावे.
४. 100 पेक्षा जास्त कामगार असल्यास, कलम 19 नुसार कल्याणकारी आणि आरोग्य सुविधा, जसे की कॅन्टीन, तसेच पिण्याचे पाणी, मूत्रालये, शौचालये आणि प्रथमोपचार प्रदान करणे आवश्यक आहे.
५. आर्थिक वर्ष संपल्यापासून ३० दिवसांनंतर, सुरुवातीच्या अर्ध्या वर्षाचे रिटर्न (जून आणि डिसेंबर) फॉर्ममध्ये पाठवा.
६. काम सुरू झाल्यापासून तीन दिवसांच्या आत प्रत्येक कर्मचाऱ्याला नोकरीसाठी ओळखपत्रे प्रदान करणे.

**संशोधन उद्दिष्ट:**

१. कंत्राटी कामगारांची आव्हाने आणि त्यावरील उपाय समजून घेणे.
२. कंत्राटी कामगारांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीचे विश्लेषण करणे.
३. कंत्राटी कामगार कायदा (नियमन आणि निर्मूलन) 1970 ची अलीकडील परिस्थिती जाणून घेणे.

**संशोधन गृहीतके:**

१ .कंत्राटी कामगार (नियमन आणि निर्मूलन) कायदा 1970 अजूनही प्रभावीपणे अंमलात आणलेला नाही (दुरुस्तीसह).
२ .सातत्यपूर्ण नोकरी, समान वेतन समान काम, सुरक्षा आणि कल्याणकारी उपाय इत्यादींबाबत अनेक आव्हानांना सामोरे जाणारे कंत्राटी कामगार.
३ .कंत्राटी मजुरांची सामाजिक आणि आर्थिक स्थिती नियमित मजुरांच्या तुलनेत कमी आहे.

**संशोधन कार्यप्रणाली:**

निव्वळ दुय्यम डेटावर आधारित सध्याच्या अभ्यासात वापरलेली साधने, वेबसाइटवरील संशोधन,

जर्नल्स ऑनलाइन प्रवेश करतात, पुस्तके आणि प्रकाशने, वर्तमानपत्र, अहवाल, लायब्ररी इ.

**भारतातील कंत्राटी कामगारांच्या समस्या:**

या समस्यांमुळे कंत्राटी कामगारांना उद्योग आणि समाजात विविध समस्यांचा सामना करावा लागतो.

१. नियमित मजुरांच्या तुलनेत कंत्राटी कामगार अधिक असुरक्षित असतात.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

२. कंत्राटी कामगार हे सामान्यतः समाजातील दुर्बल घटकातील असतात आणि नियमित कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या लाभांपासून वंचित राहतील.

३. कामाचे तास वारंवार मोठे असतात कारण मोबदला आउटपुट आणि कार्य पूर्ण होण्याशी जोडलेला असतो.

४. कंत्राटी कामगारांमध्ये संघीकरणाचे प्रमाण कमी आहे.

५. कंत्राटी मजुरांकडे सौदेबाजीची शक्ती कमी असते, सामाजिक सुरक्षा असते आणि ते अनेकदा कमी सुविधा आणि सुरक्षितता असलेल्या धोकादायक उद्योगांमध्ये गुंतलेले असतात.

६. नोकरीत कंत्राटी मजुरांचे होणारे शोषण ही सरकारची सर्वात मोठी चिंता आहे

**भारतातील कंत्राटी कामगारांच्या समस्येवरील प्रमुख उपाय :**

भारतात कंत्राटी कामगारांसमोर अनेक आव्हाने आहेत. यात समाविष्ट:

१. नैतिक आचरणांना प्रोत्साहन देणे: नियोक्त्यांनी नैतिक पद्धतींचा अवलंब केला पाहिजे आणि कंत्राटी कामगारांना आरोग्य विमा आणि सेवानिवृत्ती लाभ यांसारख्या फायद्यांमध्ये प्रवेश प्रदान करण्यासह त्यांना योग्य वागणूक दिली पाहिजे. नियोक्त्यांनी हे देखील सुनिश्चित केले पाहिजे की कंत्राटी कामगारांना कामाच्या मूलभूत परिस्थिती आणि सुरक्षा मानके प्रदान केली जातात.

२. कायदेशीर फ्रेमवर्क मजबूत करणे: सरकारने कायद्याचे पालन सुनिश्चित करण्यासाठी प्रभावी देखरेख आणि अंमलबजावणी यंत्रणेसह भारतातील कंत्राटी कामगारांना नियंत्रित करणारी कायदेशीर चौकट मजबूत करणे आवश्यक आहे. सरकारने कायद्याचे पालन न केल्यास दंड आणि तुरुंगवासाची शिक्षा लागू करण्याचाही विचार करावा.

३. संघीकरणाला चालना देणे: कंत्राटी कामगारांना त्यांच्या हक्कांसाठी संघटित होण्यासाठी आणि एकत्रितपणे सौदेबाजी करण्यास प्रोत्साहित केले पाहिजे. हे त्यांना एक मजबूत आवाज आणि सौदेबाजीची शक्ती प्रदान करेल, ज्यामुळे कामाच्या परिस्थितीमध्ये सुधारणा होईल आणि नोकरीची सुरक्षा होईल. नियमित रोजगाराला चालना देणे: कंत्राटी कामगारावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी, नियोक्त्यांना नियमित रोजगाराकडे जाण्यासाठी प्रोत्साहित केले पाहिजे. यामुळे कामगारांना नोकरीची अधिक सुरक्षितता आणि फायद्यांमध्ये प्रवेश मिळेल, त्यांची शोषण आणि गैरवर्तनाची असुरक्षा कमी होईल.

४. जागरुकता वाढवणे: कंत्राटी कामगारांना त्यांच्या हक्कांबद्दल जागरुक असणे आवश्यक आहे आणि ते त्यांना सांगण्यास सक्षम असणे आवश्यक आहे. कंत्राटी कामगारांना त्यांच्या कायदेशीर हक्कांबद्दल आणि त्यांना उपलब्ध संरक्षणांबद्दल माहिती देणारे जागरूकता मोहिमा आणि शैक्षणिक कार्यक्रम असावेत.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

**भारतातील कंत्राटी कामगारांच्या समस्येवरील इतर उपाय :**

१. कंत्राटी कामगारांसाठी कंत्राटी कामगार (नियमन आणि निर्मूलन) कायदा, 1970 प्रभावीपणे अंमलात आणणे.

२. कामाच्या ठिकाणी विशिष्ट कामगारांना योग्य कौशल्ये आणि प्रशिक्षण देणे.

३. कंत्राटी कामगारांना नियमित नोकरी, सामाजिक सुरक्षा आणि सर्व कल्याणकारी उपाय प्रदान करणे.

४. सर्व समान आहेत आणि समान संधी प्रदान करणे (कंत्राटी कामगार आणि नियमित कामगार) ही संकल्पना तयार करणे.

५. कंत्राटी कर्मचाऱ्यांना देखील काही कल्याणकारी सुविधांचा विस्तार करणे, परंतु नियमित कामगारांना प्रदान केलेल्या सुविधांपेक्षा कमी.

६. कंत्राटी कामगारांचे हित जपण्यासाठी समर्पित सामाजिक कार्यकर्त्यांचे स्थान.

**निष्कर्ष:**

कंत्राटी कामगारांचा वापर हा भारतातील एक गुंतागुंतीचा मुद्दा आहे, ज्याचा परिणाम कामगार आणि नियोक्ता दोघांवरही होतो. कंत्राटी कामगारांचे शोषण किंवा गैरवर्तन होणार नाही याची खात्री करण्यासाठी कंत्राटी कामगारांना नियंत्रित करणारी कायदेशीर चौकट मजबूत करणे आणि त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. नियोक्त्यांनी नैतिक पद्धतींचा अवलंब करणे आणि कंत्राटी कामगारांना न्याय्य वागणूक दिली जाईल याची खात्री करणे आवश्यक आहे आणि कामगार संघटना कामगारांना त्यांच्या हक्कांबद्दल शिक्षित करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतात. कंत्राटी कामगारांचा वापर जबाबदार आणि नैतिक पद्धतीने केला जाईल याची खात्री करण्यासाठी सर्व भागधारकांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे. कंत्राटी कामगार (नियमन आणि निर्मूलन) कायदा, 1970 कंत्राटी कामगारांच्या आव्हानांना समजून घेण्यास सक्षम नाही. कंत्राटी कामगारांची सामाजिक, आर्थिक आणि राजकीय स्थिती सुधारण्यासाठी त्यात संपूर्ण बदल होणे आवश्यक आहे. कंत्राटी मजुरांना सामाजिक सुरक्षा आणि कल्याणकारी उपाय योजनांच्या जाळ्यात आणून त्यांच्याकडे योग्य लक्ष दिले पाहिजे. पक्षाचे कंत्राटदार आणि कंत्राटी कामगार या दोघांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी हा कायदा संसदेने तयार केला आहे. कायद्यामध्ये परिभाषित केलेल्या तरतुदी दोन्ही पक्षांचे कर्तव्य आणि दायित्व स्पष्टपणे परिभाषित करतात. कराराचा भंग झाल्यास, कायदा दंड आणि शिक्षेची व्याख्या देखील करतो. तथापि, कायदेमंडळाने कायद्यातील त्रुटींचे विश्लेषण केले पाहिजे आणि त्या लागू करण्यापूर्वी आवश्यक त्या सुधारणा कराव्यात.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

**संदर्भ :**


- कॅकर, एल. मोहसिन, एन. आणि दीक्षित, ए. (2007) - बाल शोषणावर अभ्यास - "भारत 2007. नवी दिल्ली: महिला आणि बाल विकास मंत्रालय, भारत सरकार"
- "श्रीवास्तव एन, श्रीवास्तव आर. ग्रामीण भारतातील महिला, काम आणि रोजगार परिणाम. FAO-IFAD-ILO कार्यशाळेत कृषी आणि ग्रामीण रोजगाराच्या लिंग परिमाणांमधील अंतर, ट्रेंड आणि सध्याचे संशोधन: गरिबीतून वेगळे मार्ग" रोम - 31 मार्च - 2 एप्रिल 2009- p. 14.
- कार्सन, डी. फॉस्टर. जे. आणि त्रिपाठी, एन. (2013) - "भारतातील बाल लैंगिक शोषण वर्तमान समस्या आणि संशोधन मानसशास्त्रीय" अभ्यास, 58(3), 318-325.
- द टाइम्स ऑफ इंडिया. (2013). "अल्पवयीन मुलासोबत संमतीने लैंगिक संबंध ठेवणे गुन्हा नाही, असे दिल्ली न्यायालयाने म्हटले आहे", २६ ऑगस्ट. http://timesofindia.indiatimes.com/city/delhi/Consensual- sex-with-minor-not-a-crime-Delhi-court-says/articleshow/22056783.cms.
- जयवीर सिंग, et al, 2015, कायदा, कौशल्ये आणि भारतातील 'कंत्राटी' कार्य म्हणून नोकऱ्यांची निर्मिती: कामगार कायद्यासाठी निष्कर्ष काढण्यासाठी सर्वेक्षण डेटा एक्सप्लोर करणे, JEL वर्गीकरण: J08, J21, J50, आणि J53.
- करिबसंमा एन आणि पवित्र आर अलूर, 2016, जेएसडब्ल्यू स्टीलकंपनी प्रा. मधील कंत्राटी कामगार पद्धतींचा अभ्यास. कर्नाटक राज्यातील बल्लारी जिल्ह्याचे लि., PARIPEX - इंडियन जर्नल ऑफ रिसर्च, खंड, 5, अंक, 10, पीपी, 291-293.
- के.आर. श्याम सुंदर, 2007, कंत्राटी कामगार: द नीड फॉर 'कम्युनिटी ऑफ इंटरेस्ट' दृष्टीकोन, इंडियन जर्नल ऑफ लेबर इकॉनॉमिक्स, खंड. 50, क्रमांक 4, पीपी, 807-8017.
- मीनाक्षी राजीव, 2010, भारतातील कंत्राटी कामगार कायदा: एक व्यावहारिक दृष्टिकोन, उदयोन्मुख अर्थव्यवस्थांमध्ये आर्थिक धोरणाचे आंतरराष्ट्रीय जर्नल •
- नागेश सावंत, एप्रिल-2015, भारतातील कंत्राटी कामगार: समस्या आणि आव्हाने, ग्लोबल जर्नल फॉर रिसर्च ॲनालिसिस खंड-4, अंक-4, पीपी, 1-2.
- पारमिता रे, 2016, भारतातील कंत्राटी कामगार प्रणाली: मुद्दे आणि दृष्टीकोन, कायदा आणि कायदेशीर न्यायशास्त्र अभ्यासाचे आंतरराष्ट्रीय जर्नल: ISSN: 2348-8212: खंड 3 अंक 3, पीपी 297-307.
- करिबसंमा एन आणि पवित्र आर अलूर, 2016, जेएसडब्ल्यू स्टील कंपनी प्रा. कर्नाटक राज्यातील बल्लारी जिल्ह्याचे लि., इंडियन जर्नल ऑफ रिसर्च, खंड: 5 अंक 10, पीपी, 291-293.
- 'भारताचे संविधान'.
- External Link:

https://taxguru.in/corporate-law/contract-labour-india.html

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

https://www.unicef.org/india/what-we-do/child protect#:~:text=The%20core%20child%20protection%20legislation,Prohibition%20and%20Regulation)%20Act%20(1986).

https://www.google.com/search?q=contract+labour&rlz=1C1CHBD_enIN841IN841&oq=contract+labour+&aqs=chrome..0j69i57j69i59j69i60l3.8204j0j8&sourceid=chrome&sourceid=chrome.

https://clc.gov.in/clc/acts-rules/contract-labour-act.

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
*SPECIAL ISSUE ON MARATHI AARTHSHASHTRA PARISHED Nov. 2023*

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

# केंद्रीय ग्रामीण विकास योजना आणि रोजगार व आर्थिक स्वावलंबनाचे साधन

**प्रा. डॉ. सुदाम वसंतराव पवार,**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, सरस्वती संगीत कला महाविद्यालय, लातूर
अजीव सदस्य क्रमांक १ ९ ५३
मो.न. ९ ४२१४४८१२८, ईमेल sudampawar१ ९ ७६ @ gmail.com

प्रस्तावना

ग्रामीण भागातील लोकांच्या जीवनमानाचा स्तर उंचावण्याच्या दृष्टीने लोकांनी पारंपरिक आणि अकार्यक्षम पध्दतीसोडून देवून विज्ञानावर आधारित पध्दतीचा स्वीकार करणे आणि भौतिक, सामाजिक आणि मानसिक दृष्टीकोनातून प्रगती साधने याला ग्रामीण विकास म्हणता येईल. भारतात स्वातंत्र्य चळवळीच्या काळात ग्रामीण विकासाचा विचार चालू झाला होता. स्वांतत्र्योत्तर काळातील ग्रामीण विकासाच्या व्युव्हरचनेत ग्रामीण भागात पारंपरिक • व्यवसायाचे आधुनिकीकरण, शेतीमध्ये संस्थात्मक सुधारणा, सहकारी तत्त्वावर ग्रामीण अर्थव्यवस्थेची उभारणी, नियोजनाचे विकेंद्रीकरण आणि ग्रामीण भागात पायाभूत संरचना निर्माण करणे या प्रमुख बाबी होत्या यासाठी सन १ ९ ७० नंतर विविध ग्रामीण विकास योजनांची सुरुवात करण्यात आली. गेल्या कित्येक वर्षापासून केंद्र आणि राज्य सरकार ग्रामीण भागाच्या विकासासाठी प्रयत्नशील आहे.

- केंद्र पुरस्कृत ग्रामीण विकास योजना व आर्थिक विकास

1. सुवर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना ( १ ९९९ ) :

सहाव्या पंचवार्षिक योजनेत सुरु झालेल्या एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम ट्रायसेम, बाक्रा, सिट्रा, गंगा कल्याण योजना व दशलक्ष विहीर योजना हे कार्यक्रम एकत्रित करून ०१ एप्रिल १ ९९९ पासून सुवर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना सुरु केली आहे. यामध्ये खालील बाबीवर भर देण्यात आला आहे.

- सामुहिक दृष्टिकोन निर्माण करणे शक्यतोवर प्रत्येक संपर्कासह मुख्य सामाजिक कार्याची ओळख करणे
- सामुहिक कार्याना चालना देणे.
- ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील जनतेस स्वयंरोजगाराचे साधन उपलब्ध करून देऊन त्यांचे राहणीमान ऊंचावण्याच्या हेतूने ही योजना राबविली जाते.

स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना ही पत संबंधी असून येथे कर्ज हा महत्त्वाचा घटक असून सबसिडी हा संभाव्य घटक आहे, " यामध्ये ५० हजार रुपयापर्यंतच्या वैयक्तीक आणि पाच लाख रुपया पर्यंत स्व-सहायता समूहाला दिल्या जाणाऱ्या कर्जासाठी कोणतीही वस्तू गहाण ठेवण्याची गरज नाही. या योजने अंतर्गत प्रकल्प किंमतीच्या ३० टक्के व जास्तीत जास्त रु. ७५०० /-अनुदान देता येते. अनुसूचित जाती जमातीसाठी ५० टक्के व जास्तीत जास्त रु. १०,०००

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
*SPECIAL ISSUE ON MARATHI AARTHSHASHTRA PARISHED Nov. 2023*

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

/-अनुदान देता येईल. स्वयंरोजगाराच्या गटसमुहासाठी ही मर्यादा प्रकल्प किंमतीच्या ५० टक्के व जास्तीत जास्त रु. १.२५ लाख अनुदान इतकी आहे. सिंचन प्रकल्पासाठी सदर आर्थिक मर्यादा लागू राहणार नाही ". या योजना खर्चामध्ये केंद्र आणि राज्य सरकारचा वाटा ७५:२५ असा असतो. " दारिद्र्य निर्मुलनासाठी देशामध्ये सुरु असलेल्या एकात्मिक विकास कार्यक्रम, ट्रायसेम इवाक्रा, सिट्रा, गंगा कल्याण योजना व दशलक्ष विहीर योजना या सर्व योजना एकत्र करून १ एप्रिल १ ९९९ पासून सुवर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेस सुरुवात झाली. या योजने अंतर्गत दारिद्र्य रेषेखालील कुटूंबासाठी स्वयंरोजगार निर्माण करून त्यांचे उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न केला आहे. यासाठी स्वयंरोजगार करणाऱ्यांना एकत्रित आणून त्यांना प्रशिक्षण, पतपुरवठा, मुलभूत सुविधा, बाजारपेठ उपलब्धतता अशा आवश्यक बाबींचा विचार या योजनेतर्गत करण्यात आला आहे ".

सुवर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना ही केंद्र पुरस्कृत आहे. केंद्राचा ७५ टक्के तर राज्य शासनाचा २५ टक्के निधी या योजनेत प्राप्त होतो. " स्वंयरोजगारी पैकी ५० टक्के अनुसूचित जाती-जमातीच्या ४० टक्के स्त्रिया व ३ टक्के विकलांगाना प्राधान्य देण्यात येते. या योजनेस एकूण प्राप्त निधी पैकी ६० टक्के अनुदानावर २० टक्के मुलभूत सुविधांवर, १० टक्के प्रशिक्षणावर खर्च केला जातो. "

सुवर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेची उद्दिष्टे :

१. ग्रामीण भागातील लोकांना स्वयंरोजगाराचे साधन उपलब्ध करून देणे.

२. लोकांच्या उत्पन्न वाढीतून राहणीमान दर्जा सुधारणे.

३. ग्रामीण भागातील लोकांकडे असणाऱ्या अंगभूत कौशल्ये व क्षमतेस कर्ज व अनुदान यांचा समतोल साधून प्रोत्साहीत करणे.

४. ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील महिला स्वयंरोजगारीचे स्वयंसहाय्यता गट स्थापन करणे.

५. उद्योगांसाठी शासनाकडून अनुदान उपलब्ध करून देणे.

अनुदान व फायदे :

१. ससुवर्णजयंती ग्राम स्वंयरोजगार योजनेतून स्वयंसहाय्यता बचत गट, क्षमता तंत्रज्ञान साधन सामग्रींची उभारणी व कर्ज आणि व्यवस्थापन अशा विविध लघु उद्योगांची उभारणी केली आहे.

२. योजनेंतर्गत प्रकल्पास किंवा लाभार्थ्यांस ३० % अनुदान प्राप्त होते. ७५००० रु. ही अनुदानाची मर्यादा आहे. अनुसूचित जाती जमातीसाठी ५० % अनुदान व १०००० ही मर्यादा आहे. तर एस.एच.जी. अनुदान ५० % व मर्यादा १.२५ लाख रु. व जलसिंचन प्रकल्पासाठी अनुदानास कोणतीही मर्यादा नाही .

२ ) प्रधानमंत्री ग्राम सडक योजना ( २००० ) :

नवीन २०००-०१ मध्ये सर्व गावांना बारमाही रस्त्याने जोडण्यासाठी ' प्रधानमंत्री ग्रामसडक योजना सुरु केली. ग्रामसडक या योजनेचा उद्देश १.७० लाख वस्त्यातील ५०० किंवा त्याहून अधिक पहाडी, वाळवंटी व आदिवासी

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

भागात २५० किंवा त्याहून अधिक लोकसंख्या असलेल्या वस्त्यांना बारमाही मुलभूत सुविधा प्रदान करणे हा आहे. या योजनेचे अंगभूत उद्दिष्ट म्हणजे ग्रामीण भागातील रस्त्यांची संपर्क व्यवस्था सुधारणे हे आहे. ही योजना ग्रामविकास विभागामार्फत राबविण्यात येते. ग्रामीण रस्त्यांचा विस्तार आणि रस्त्यांचे नवीकरण यामुळे कृषी उत्पादन, ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी यामध्ये वाढ होईल तसेच आरोग्य, शिक्षण आणि इतर लोकोपयोगी सेवा जनतेला सुलभतेने पुरविता येतील आणि ग्रामीण भागातील लोकांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावेल याबरोबरच ग्रामीण शहरी ही दरी कमी होईल अशी अपेक्षा करण्यात आली आहे. राष्ट्रीय ग्रामीण रस्ते विकास एजन्सी द्वारे त्रिस्तरीय निरीक्षण समिती स्थापन करण्यात येते. यात स्वतंत्र राष्ट्रीय गुणवत्ता निरीक्षक नियुक्त करण्याचा समावेश आहे. याद्वारे रस्त्याचे बांधकाम उच्च दर्जाचे झाले की नाही हे सुनिश्चित करण्यात येते. यात निगरानी करण्यासाठी लागणारा निधी राज्य शासनाकडून पुरविला जातो.

3 इंदिरा आवास योजना :

ग्रामीण भागातील लघुउद्योगातून निर्माण झालेल्या उत्पादनाचा प्रचार व विपणन करण्यासाठी विपणन कौशल्य, बाजारपेठेचा विकास, लघुउद्योगांसाठी सल्ला इ. बाबींच्या सोयी ससुवर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेकडून करून दिल्या जातील. स्वयंसहाय्यता गटासाठी कर्जाच्या ५० % किंवा प्रति सदस्य १०००० रु. प्रमाणे १,२५,००० रु. च्या मर्यादित असेल. " १ जानेवारी १ ९९ ६ पासून इंदिरा आवास योजना जवाहर रोजगार योजनेतून स्वतंत्र अस्तित्वात आली. परंतु या योजनेची सुरुवात इ.स. १ ९ ८५ मध्ये करण्यात आली होती. अनुसूचित जाती-जमाती, मुक्त वेठबिगार, अनुसूचित जाती जमातीत नसलेले परंतु दारिद्र्य रेषेखाली असणाऱ्या कुटुंबाना घरे बांधून देणे. तसेच असलेल्या जुन्या घरांचा दर्जा सुधारण्यासाठी अनुदानाच्या स्वरुपात मदत करणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे ". " इंदिरा आवास योजनेचे सर्व प्रकारचे कामकाज प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणे मार्फत होते. यात लाभार्थी स्वतःच्या जागेवर किंवा ग्रामपंचायतीच्या उपलब्ध गावठाणाच्या जागेवर घरकुल स्वतः बांधून घेतात ". इंदिरा आवास योजनेस मिळणारे अनुदान अनुक्रमे केंद्र व राज्य सरकार कडून ७५:२५ अशा स्वरुपात असते. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पुढील काही अटींची पुर्तता अनिवार्य आहे.

- लाभार्थी हा ग्रामीण भागाचा रहिवाशी असावा.
- लाभधारकाने इतर कोणत्याही पुनर्वसन योजनेचा लाभ घेतलेला नसावा.
- लाभधारक बेघर किंवा असलेल्या निवासास पुनर्बांधणीची गरज असावी.

4 संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना ( SGRY ) :

संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना २५ सप्टेंबर २००१ रोजी रोजगार हमी योजना आणि जवाहर ग्राम समृध्दी योजना या दोन चालू असलेल्या योजनांना समाविष्ट करून सुरु करण्यात आली. " संपूर्ण ग्रामीण भागातील बेरोजगारांना किमान शंभर दिवस रोजगार पुरविणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे. ग्रामीण भागात टिकावू अशी सामुहिक सामाजिक व आर्थिक मालमत्ता निर्माण करणे नैसर्गीक साधनसंपत्ती विकास करणे, जल व मृदसंधारण

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

कामांना प्राधान्य देणे, प्रतिव्यक्ती ७ किलो धान्याचे वाटप करून त्याद्वारे अन्न सुरक्षितता निर्माण करणे हा या योजनेचा उद्देश आहे ". या कार्यक्रमाची अंमलबजावणी जिल्हा, तालूका आणि ग्रामपंचायत स्तरावर पंचायतीराज संस्थामार्फत करण्यात येते. जिल्हा, तालूका आणि ग्रामपंचायत स्तरावर संसाधनाचा वाटा हा २०:३०:५० असा प्रमाणात विभागण्यात येतो.

सन २००६ मध्ये राष्ट्रीय ग्रामीण हमी योजनेस सुरुवात झाली व संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेत विलीनीकरण इ आले. संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेस ७५ : २५ अशा प्रकारे निधी उपलब्ध होतो. सुरुवातीस म्हणजेच सन २००१-०२ ते सन २००२-०३ पर्यंत या योजनेसाठी प्राप्त निधी व खर्च अधिक आहे. परंतु सन २००२-०३ मध्ये मात्र पहिल्या टप्प्यात ३३६१.६३ कोटी रु. निधी उपलब्ध असतानाही खर्च मात्र २०७३.८३ कोटी रु. म्हणजे फक्त ६१.६ ९ टक्के खर्च झालेला आहे. तर दुसऱ्या टप्प्यात ३२०२.९ ३ कोटी रु. उपलब्ध निधी पैकी २०५४.४६ कोटी रु. म्हणजेच ६४.१४ टक्के खर्च करण्यात आला आहे. यानंतरच्या काळात सन २००७-०८ पर्यंत सन २००६-०७ चा अपवाद वगळता उपलब्ध निधीच्या प्रमाणात खर्चाचे प्रमाण मात्र घटतच गेले आहे. सन २००६-०७ मध्ये मात्र ८३.७ ९ टक्के एवढे खर्च प्रमाण वाढले आहे. राष्ट्रीय बायोगॅस विकास योजना : " कमीत कमी खर्चात इंधनाची कायमस्वरूपी सोय उपलब्ध करून देणे, शेतीसाठी उत्तम सेंद्रीय खतांची निर्मिती करण्याच्या हेतूने ही योजना पंचायत समितीच्या माध्यमातून राबविण्यात येते. ग्रामीण भागात इंधनासाठी होणारी वृक्षतोड़ थांबविणे व प्रदुषण रोखणे हा या योजनेचा प्रमुख हेतू आहे. या योजनेअंतर्गत घराशेजारी बायोगॅस प्रकल्प उभारणीसाठी सयंत्रासाठी रु. ३५०० /-शौचालयासाठी रु .५०० /- असे एकूण ४००० /-रुपयाचे अनुदान दिले जाते " .

5 रमाई आवास योजना :

रमाई आवास योजनेचे मुख्य उद्दिष्ट अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी घरकुले बांधणे आहे. " दारिद्र्य रेषेखालील यादीत असणा-या परंतु इंदिरा आवास योजनेच्या मुळ प्रतिक्षा यादीत ज्यांची नावे नाहीत आणि जे बेघर आहेत अशा अनुसूचित जाती, नवबौध्द लाभार्थ्यांना घर बांधण्यास गावामध्ये जागा आहे अशा लाभार्थ्यांना घरकुलासाठी अनुदान उपलब्ध करून देण्यात येते. अनुदानाची रक्कम रु. 180000 /-असते. या देण्यात आलेल्या अनुदानातून किमान २६९ चौ. फुट क्षेत्रफळाचे बांधकाम लाभार्थ्याने करणे बंधनकारक आहे ". रमाई आवास योजनेचे सर्व प्रकारचे कामकाज प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांच्यामार्फत होते. हे लाभार्थी स्वतःच्या जागेवर किंवा ग्रामपंचायतीच्या उपलब्ध गावठाणाच्या जागेवर घरकुल स्वतः बांधून घेतात.

6 राष्ट्रीय सामाजिक सहाय्यता कार्यक्रम ( NSAP ) :

" राष्ट्रीय सामाजिक सहाय्यता कार्यक्रमाचा १५ ऑगस्ट १ ९९ ५ मध्ये सन १ ९९ ५-९ ६ साठी केंद्रीय अंदाजपत्रकात समावेश करण्यात आला ". या कार्यक्रमात राष्ट्रीय वृध्दावस्था पेंशन योजना ( NOAPS ), राष्ट्रीय कुटूंब लाभ योजना ( NFBS ) या योजनांचा समावेश करण्यात आला. वृध्द, दारिद्र्य रेषेखालील घरकत्यांचा मृत्यू झालेले कुटूंब आणि प्रसुति यासाठी सामाजिक सहाय्यता देणे हे या कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे. " १ एप्रिल २००० मध्ये

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

अन्नपूर्णा योजना सुरुवात झाली या योजनेद्वारे राष्ट्रीय वृध्दावस्था पेंशन योजनेतून सुटलेल्या पात्र नागरिकांसाठी अन्न सुरक्षा प्रदान करते. लाभार्थ्यास प्रति महिना १० कि.ग्रा. खाद्यान्न मोफत दिले जात ".

7 भारत निर्माण कार्यक्रम ( २००५ )

" १६ डिसेंबर २००५ रोजी भारत निर्माण कार्यक्रमाची घोषणा केली गेली. या कार्यक्रमाद्वारे ग्रामीण भारतीय समाजरचना बदलण्यासाठी ज्या ठिकाणी, रस्ते, घर, पाणी, वीज आणि दुरसंचार सारख्या मुलभूत सहा क्षेत्रासाठी १.७६ कोटी रुपयांची मंजुरी दिली गेली. सन २००६-०७ च्या बजेटमध्ये या कार्यक्रमासाठी १८.६ ९ करोड रुपयांची तरतूद केली होती त्यामुळे ग्रामीण भारताचा चेहरा मोहरा बदलण्यास मदत झाली आहे ".

8 राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजना ( २००५ ) :

या योजनेचा प्रारंभ ४ एप्रिल २००५ रोजी झाला. सर्व गावात तसेच प्रत्येक घरात वीज पोहचविण्यासाठी ही योजना चालू केली. इ.स. २०१२ पर्यंत देशातील सर्व ग्रामीण भागात विद्युतीकरण घरा-घरात पोहचवण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. तसेच दारिद्र्य रेषेखालील लोकांना १६.८१ % घरात मोफत विद्युत जोडणी देण्याची सोय करण्यात आली. सन २००६-०७ या काळातील वार्षिक अंदाजपत्रक केले आहे. यामुळे ग्रामीण भाग प्रकाशमय होण्यास मदत झ आली आहे.

निष्कर्ष :

1. शासनाने ग्रामीण विकासाची गरज व दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण व त्यांच्यातील विषमता लक्षात घेवून शासकीय यंत्रणेत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेची स्थापना केली आहे.
2. जिल्ह्यातील इंदिरा आवास योजनेअंतर्गत प्राप्त निधी पैकी २०० ९ -१० चा अपवाद वगळता २००३-०४ ते २०१२-१३ कालावधीत झालेला खर्च दरवर्षी वाढतच आहे.
3. स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेअंतर्गत २०११-१२ व २०१२-१३ मध्ये अनुक्रमे ५१६.६३ व ४८२.१३ लाख रूपये निधी उपलब्ध झाला आहे. तसेच त्याच वर्षी ५११.७ ९ व ४०४.५ लाख रूपये खर्च झाला आहे. हा प्राप्त निधी व खर्च प्रमाण २००३-०४ते २०१०-११ पर्यंत प्राप्त निधी व खर्चापेक्षा कमी आहे.
4. जिल्ह्यातील ग्रामीण विकासात संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेमुळे रस्ते, शेततळे, तलाव, बंधारे व तळे इत्यादी कामे अधिक प्रमाणात झालेली आहेत.
1. स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेअंतर्गत बचत गटांची स्थापना होऊन व्यवसायासाठी कर्ज पुरवठा केला आहे.
5. शासकीय योजनेमुळे बचत गटामध्ये ५० व १०० रूपये महिना अशी ग्रामीण लोकांनी बचतीस सुरवात केली आहे.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

सारांश :

देशाच्या विकासात राष्ट्र व राज्य स्तरावर विविध योजनांची निर्मिती व अंमलबजावणी होत असते. यामध्ये काही योजना प्रत्यक्ष आर्थिक विकासासाठी तर काही अप्रत्यक्ष अर्थिकविकासासाठी राबविल्या जातात. यामध्ये विशेषतः ग्रामीण विकास, कृषी विकास, औद्यागिक विकास, नागरी विकास या सर्वांच्या माध्यमातून देशातील बेरोजगारांना रोजगार प्राप्त करून देणे. वाहतूकीची व्यवस्था अधिक प्रमाणात वाढवून आर्थिक विकासास गती देण्याचे कार्य प्रधानमंत्री सडक योजना आदीसारख्या योजनांच्या साह्याने देशाने विकसित राष्ट्रांकडे वाटचाल केल्याचे दिसून येते. परंतु यामध्ये येणाऱ्या समस्या आव्हाने याचा विचार करता या योजना अंमलात आणताना तेवढयाच कार्यक्षम व गतीने आणणे आवश्यक आहे. ज्यामुळे काही काळातच भारत हे विकसित राष्ट्र बनू शकेल.

संदर्भ ग्रंथ :

1. राज्य कृती आराखडा, सुवर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना, प्रकाशन यशदा, पुणे .
2. संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना ग्राम विकासाची दिशा आणि पंचायत राज प्रशासन, यशदा पुणे.
3. संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना, नागरिकांसाठी केंद्र व राज्य शासनाच्या विकास योजना, चौधरी लॉ पब्लिशर्स.
4. वार्षिक अंक, 'पाऊल ग्राम विकासाचे', लातूर जिल्हा. ग्रामीण विकास वार्षिक अहवाल
5. ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार.
6. www.maharashtra.gov.in
7. www.mahadesh.gov.in

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
*SPECIAL ISSUE ON MARATHI AARTHSHASHTRA PARISHED Nov. 2023*

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

# भारतीय शेती आणि केंद्र पुरस्कृत विकास योजना

**प्रा.डॉ.अनिल दि.वाडकर**
अर्थशास्त्र विभागप्रमुख,
श्री कुमारस्वामी महाविद्यालय औसा, जिल्हा- लातूर .
अजीव सदस्य क्रमांक-1934. भ्रमणध्वनी क्रमांक-9822411978.

**सारांश**

*"भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासात कृषी क्षेत्राचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. भारतीय शेती ही केवळ लोकांच्या उपजीविकेचेच साधन नसून ते द्वितीय आणि तृतीय क्षेत्राचा प्रमुख मुलाधार आहे. देशातील बेसुमार वाढत्या लोकसंख्येला अन्नधान्य पुरवठा करणे, रोजगार देणे, कृषी आधारित उद्योगांना कच्च्या मालाचा पुरवठा करणे, कृषी मालाची निर्यात करणे, पशुधनापासून उत्पन्न व रोजगार पुरवठा करणाऱ्या भारतीय शेती क्षेत्राचे अर्थव्यवस्थेच्या विकासात अनन्यसाधारण योगदान राहिलेले आहे. हवामान बदल ,सिंचनाच्या अपुऱ्या सोयी, नैसर्गिक आपत्ती, संस्थात्मक वित्तपुरवठ्याचा अभाव,उत्पादन खर्चावर आधारित कृषी मालाला किमती न मिळणे, या व यासारख्या अनेक कारणामुळे भारतीय शेती क्षेत्रात अनेक आव्हाने निर्माण झालेली आहेत हे निदर्शनास येते"*

**प्रस्तावना**

देशाच्या बहूआयामी विकासात प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या भारतीय शेतीचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण राहिलेले आहे. देशाच्या सखल राष्ट्रीय उत्पन्नामध्ये कृषी व संलग्न क्षेत्राचा वाटा जवळपास 20 टक्के आहे. तर रोजगार निर्मितीमध्ये सुमारे 55 टक्के वाटा आहे. सुमारे 142 कोटी लोकसंख्येला अन्नधान्य पुरवठा करणाऱ्या शेती क्षेत्रात 2020 21 मध्ये 334.603 व 2021 22 मध्ये 342 . 329 मिलियन टन अन्नधान्याचे उत्पादन झाले. भारतीय शेतीचा सरासरी विकास दर हा 4 टक्के राहिला आहे. अर्थव्यवस्थेच्या विकासात इतके महत्त्वपूर्ण स्थान असलेल्या कृषी क्षेत्रात मात्र, 'जगाचा पोशिंदा बळीराजा' याच्या आत्महत्या वाढतच आहेत. त्याची अनेक कारणे शोधली असता, शेतीचे मोसमी अवलंबित्व पर्जन्याचा अनियमितपणा, संस्थात्मक वित्त पुरवठ्याचा अभाव, सिंचन, वीज, सदोष बाजारपेठा, कृषी मालाला उत्पादन खर्चावर आधारित हमीभाव नसणे,यासारख्या सुविधांचा अभाव ,याचबरोबर कृषी आदानांच्या (बी- बियाणे, खते, कीटकनाशके, कृषी अवजारे) वाढलेल्या भरमसाठ किमती, यामुळे भारतीय शेती व्यवसाय हा कायम नुकसानीत चालत आहे. परिणामी शेतकरी वर्ग उदाशिनतेतून आत्महत्या करत आहे. किंबहुना शेती करण्याची त्यांची इच्छाशक्तीच नष्ट होत आहे. यावर उपाय म्हणून केंद्र सरकार व राज्य सरकारने विविध विकास योजना राबवण्याचा प्रयत्न केला आहे. त्यापैकी मी प्रस्तुत शोधनिबंधामध्ये शेती विकासाच्या केंद्र पुरस्कृत विकास योजनेचा आढावा घेणार आहे.

भारत हा भौगोलिक दृष्ट्या विभिन्न वैशिष्ट्ये असलेला देश आहे. केंद्र सरकारने केंद्र पुरस्कृत कृषी विकासाच्या योजना, कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय , नाबार्ड, ग्रामीण विकास मंत्रालय, सहकार मंत्रालय इत्यादी मार्फत राबवल्या आहेत. त्यापैकी कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या योजना आपण अभ्यासणार आहोत. यामध्ये काही योजना 100% अनुदानित आहेत तर काही योजना 90: 10 तर काही योजना 60: 40 अशा अनुदानित आहेत. केंद्र पुरस्कृत विविध विकास योजनेमधून शेती क्षेत्राला शेतकऱ्याला काही उभारणी मिळते का? त्यांच्या जीवन मनात सुधारणा झाली आहे का? या अनुषंगाने

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

मी हा शोधनिबंध मांडला आहे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये प्रामुख्याने द्वितीय सामग्रीचा आधार घेण्यात आला आहे. यामध्ये विविध शासकीय व निमशासकीय प्रकाशनाद्वारे प्रकाशित अहवालातील माहितीचा समावेश आहे. यामध्ये विविध ग्रंथ, मासिके, पाक्षिके, साप्ताहिके, वर्तमानपत्रे, कृषी विभागाचे विविध अहवाल, इत्यादीचा आधार घेण्यात आला आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे**

प्रस्तुत शोधनिबंधाला योग्य दिशा मिळण्यासाठी,काही उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत ती पुढील प्रमाणे

1) भारतीय अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्राचे योगदान अभ्यासणे

2) भारतीय शेती व्यवसाय समोरील विविध आव्हानांचा शोध घेणे

3) केंद्र पुरस्कृत विविध विकास योजनांचा आढावा घेणे

4) महत्वपूर्ण निष्कर्ष काढणे व शिफारशी करणे

**शोधनिबंधाची गृहिते**

1) शोधनिबंधामध्ये उपयोजित केलेली सांख्यिकीय माहिती विविध शासकीय व निमशासकीय दस्तऐवजामध्ये बदलणारी असू शकते.

2) प्रस्तुत शोधनिबंधाच्या अभ्यासातून काढलेले निष्कर्ष संपूर्ण भारतीय शेती क्षेत्राला लागू होतीलच असे नाही.

**1) भारतीय अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्राचे योगदान:-**

देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नामध्ये वर्ष 2020 21 मध्ये शेती क्षेत्राचा वाटा 18.8 टक्के होता. कृषी व संलग्न क्षेत्राचा एकत्रित विकासदर 3.9% राहिला आहे. शेती क्षेत्रातून वर्ष 2020 -21 मध्ये 342.329 मिलियन टन अन्नधान्याचे उत्पादन झाले आहे. 2020 -21 या वर्षात देशात दुधाचे उत्पादन 209.96 मिलियन टन झाले आहे. देशातील सुमारे 55 टक्के लोकसंख्येला रोजगार पुरवठा करण्याचे कार्य शेती क्षेत्राने केले आहे. तसेच सुमारे 142 कोटी लोकांना अन्नधान्य निर्माण करून दिले आहे. कृषी व संलग्न क्षेत्रातून देशाच्या एकूण निर्यातीमध्ये जवळपास 16 टक्के योगदान मिळाले आहे. यामुळे आपणास दुर्मिळ विदेशी चलन प्राप्त झाले आहे.

**2) भारतीय शेती समोरील आव्हाने**

भारतीय शेती ही मोसमी पर्जन्यमानावर अवलंबून आहे. देशाच्या स्वातंत्र्याला 75 वर्षे पूर्ण झाली. तरी परंतु, आपण अजूनही 40 ते 45% शेतीपेक्षा अधिकची शेती सिंचनाखाली आणू शकलो नाही ही शोकांतिका आहे. भारतीय शेतकरी शेती क्षेत्रात अधिकचे उत्पादन प्राप्त करण्यासाठी अहोरात्र कष्ट करतात. परंतु मोसमी पर्जन्यमान ,बदलते हवामान, रोगराई, संस्थात्मक वित्तपुरवठाचा अभाव, अखंडित वीज पुरवठ्याचा अभाव, खते, बी- बियाणे, कीटकनाशके, कृषी आदाने यांचा अपुरा पुरवठा, आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव, कृषी आदानाच्या बेसुमार वाढत्या किमती, सदोष बाजारपेठा, कृषीमाल विपणनामध्ये दलालांची साखळी, कृषी मालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव/दर न मिळणे, सरकारचे शेतीसंबंधीचे उदासीन धोरणे, कृषी मालाच्या निर्यातीवर जाचक बंधने, देशात कृषिमाल उपलब्ध असताना इतर राष्ट्राकडून कृषी मालाची व तत्सम पदार्थाची बेसुमार आयात, यामुळे भारतीय कृषी क्षेत्र पूर्णतः कोलमडत आहे. या व यासारख्या विविध समस्यांना भारतीय शेती क्षेत्र सातत्याने तोंड देत आहे.

**3) केंद्र पुरस्कृत विकास योजना**

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

भारतातील सुमारे 60 टक्के लोकसंख्या प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे शेतीवर अवलंबून आहे. यासोबतच भारतीय अर्थव्यवस्थेला बळकट करण्यात कृषी क्षेत्राचाही मोठा वाटा आहे. देशाची अर्थव्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी सरकार वेळोवेळी शेतीच्या कामातील गैरसोय दूर करण्यासाठी योजना राबवत असते, जेणेकरून या योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवता येतील. त्या योजना पुढील प्रमाणे आहेत.

1. किसान ट्रॅक्टर योजना 2. किसान मित्र योजना 3. कृषी उडान योजना4. पशु किसान क्रेडिट कार्ड योजना 5. पंतप्रधान किसान सन्मान निधी योजना 6. पंतप्रधान पीक विमा योजना 7. पंतप्रधान कृषी सिंचन योजना 8. पंतप्रधान किसान मानधन योजना 9. किसान क्रेडिट कार्ड योजना 10. पशुधन विमा योजना 11. प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजना 12. मेरी फसल मेरा ब्योरा योजना 13. कुसुम सौर पंप वितरण योजना 14. कृषी निविष्ठा अनुदान योजना 15. स्मॅम किसान योजना 16. राष्ट्रीय कृषी बाजार योजना 17. मृदा आरोग्य कार्ड योजना 18. कृषी यंत्रसामग्री अनुदान योजना 19. चारा व चारा विकास योजना 20. राष्ट्रीय कृषी विकास योजना 21. पारंपारिक कृषी विकास योजना 22. अल्पकालीन पीक कर्ज योजना 23. खेत तलाई अनुदान योजना 24. सिंचन पाइपलाइन अनुदान योजना 25. किसान विकास पत्र 26. मृदा आरोग्य कार्ड योजना 27. राष्ट्रीय गोकुळ मिशन 28. डेअरी उद्योजकता विकास योजना 29. राष्ट्रीय फलोत्पादन अभियान 30. शाश्वत शेतीसाठी राष्ट्रीय मिशन (NMSA) 31. राजीव गांधी किसान न्याय योजना 32. किसान सूर्योदय योजना 33. मुख्यमंत्री किसान सहाय्य योजना 34. मुख्यमंत्री कृषी आशीर्वाद योजना 35. मुख्यमंत्री शेतकरी कल्याण योजना36. त्वरित वीज जोडणी योजना 37. मुख्यमंत्री शेतकरी अपघात कल्याणकारी योजना 38. मुख्यमंत्री सौर पंप योजना 39. यूपी कृषी उपकरण योजना (अनुदान) 40. बीज गाव योजना 41. सेंद्रिय शेती योजना 42. राष्ट्रीय सुरक्षा अभियान योजना 43. डेअरी उद्योजकता विकास योजना (DEDS) इत्यादी योजना कृषी विकासासाठी विविध राज्यांमध्ये वेगवेगळ्या केंद्र आणि राज्य यांच्या अनुदानाच्या प्रमाणात चालविल्या जातात.

1.**राष्ट्रीय कृषी विकास योजना 2023**

राष्ट्रीय कृषी विकास योजना सरकारने 2007 मध्ये उत्तर पूर्व देशात सुरू केली होती. त्यामुळेच ही योजना 15 वर्षांहून अधिक काळ सुरू आहे. ही योजना प्रामुख्याने देशातील कृषी आणि कृषी संबंधित क्षेत्राच्या विकासासाठी सरकारद्वारे चालवली जाते. हीच योजना 11 व्या पंचवार्षिक योजना आणि 12 व्या पंचवार्षिक योजनेत लागू करण्यात आली आहे. 11 व्या पंचवार्षिक योजना किंवा योजनेसाठी 22408.76 कोटी रुपयांचे बजेट जाहीर केले गेले असते, तर 12व्या पंचवार्षिक योजनेसाठी 3148.44 कोटी रुपयांचे बजेट दिले गेले असते. किंवा ही योजना आपल्या भारत देशात कृषी क्षेत्रात खाजगी क्षेत्राचा विकास करेल. किंवा नियोजित कृषी आणि फळ उत्पादन, पशुसंवर्धन आणि मत्स्यपालन, दुग्धव्यवसाय विकास, कृषी सुधारणा आणि शिक्षण, वनीकरण आणि वन्यजीव, वृक्षारोपण आणि कृषी विपणन, अन्न कापणी आणि पीक उत्पादन, मृद आणि जलसंधारण, कृषी वित्तीय संस्थांचा नियोजित सरकारमध्ये समावेश आहे.

राष्ट्रीय कृषी विकास योजना 2023 चा विस्तार

खर्च वित्त समितीच्या शिफारशीनुसार, 2022-23 पासून RKVY ची RKVY कॅफेटेरिया योजना म्हणून पुनर्रचना करण्यात आली आहे, त्यानंतर कृषी आणि शेतकरी कल्याण विभागाच्या काही योजना किंवा योजना विलीन केल्या जात आहेत, ज्यामध्ये मृदा आरोग्य आणि क्षारता, कृषी क्षेत्राचा समावेश आहे. विकास, पारंपारिक कृषी विकास योजना (PKVY योजना) मध्ये प्रति ड्रॉप मोअर क्रॉप, कृषी यांत्रिकीकरण (कृषी यांत्रिकीकरण आणि पीक रेसिड्यू मॅनेजमेंट (CRM), ग्राम हाट आणि GRAMS आणि पीक डायव्हर्सिफिकेशन प्रोग्राम यांचा समावेश आहे. RKVY

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

कॅफेटेरिया योजनेमध्ये तीन महत्त्वाचे घटक आहेत, एक योजना (AAP), तपशीलवार प्रकल्प अहवाल (DPR) आणि स्टार्टअप सोबत प्रशासन, देखभाल आणि मूल्यमापन. RKVY च्या एकूण वाटपांपैकी किमान 70% वार्षिक कृती योजना (AAP) घटकांसाठी वाटप केले जाईल ज्यात प्रशासन, देखभाल आणि मूल्यमापन यांचा समावेश आहे.एकूण वाटपाच्या एकूण 30% आरकेव्हीवायच्या तपशीलवार प्रकल्प अहवालासाठी वाटप केले जाईल .

**राष्ट्रीय कृषी विकास आराखड्याचे मुख्य उद्दिष्ट**

1.आर्थिक क्रियाकलापांचे मुख्य स्त्रोत म्हणून शेती विकसित करणे आहे. 2.जोखीम कमी करून, कृषी पायाभूत सुविधा निर्माण करून आणि कृषी-व्यवसाय उद्योग चालवून शेतकऱ्यांच्या प्रयत्नांना बळ देणे. 3.सर्व राज्यांना त्यांच्या स्थानिक गरजांनुसार नियोजनात स्वायत्तता आणि लवचिकता प्रदान करणे. 4.उत्पादकता वाढवून आणि मूल्य शृंखला जोडलेल्या उत्पादन मॉडेलला प्रोत्साहन देऊन शेतकऱ्यांना त्यांचे उत्पादन वाढविण्यात मदत करणे. 5.मशरूम लागवड, एकात्मिक शेती, मशागत इत्यादीद्वारे उत्पादित केलेल्या पिकाची भरपाई करून शेतकऱ्यांना धोका कमी करणे. 6.विविध कौशल्य विकास, नवकल्पना आणि कृषी-व्यवसाय मॉडेलद्वारे तरुणांना सक्षम करणे.

**2. सेंद्रिय शेती योजना**

सध्या उत्पादकता वाढवण्यासाठी शेतकरी अधिकाधिक रासायनिक खतांचा वापर करत आहेत. त्यातून तयार होणारे धान्य आणि भाजीपाला खाल्ल्यानंतर लोक आजारी पडतात. ही समस्या लक्षात घेऊन केंद्र सरकारकडून सेंद्रिय शेती योजनेला चालना देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत.सेंद्रिय शेती अंतर्गत पारंपारिक कृषी विकास योजना सुरू करण्यात आली, त्याअंतर्गत शेतकऱ्यांना नैसर्गिक पद्धतीने शेती कशी करायची आणि त्या वेळी धान्य व भाजीपाला उत्पादन कसे करायचे हे सांगण्यात आले. सेंद्रिय शेती करणाऱ्या शेतकऱ्यांनाही सरकारकडून बक्षीस दिले जाते. कृषी मंत्रालयाकडून मिळालेल्या माहितीनुसार, सध्या देशभरात 27.10 लाख हेक्टर जमिनीवर सेंद्रिय शेती केली जात आहे.

**3. राष्ट्रीय सुरक्षा अभियान योजना**

आपल्या देशाची लोकसंख्या सातत्याने वाढत आहे. अशा परिस्थितीत सर्वांना अन्नसुरक्षा मिळावी यासाठी केंद्र सरकारने शेतीला चालना देण्यासाठी राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान योजना सुरू केली आहे. गहू, तांदूळ आणि डाळींची उत्पादकता वाढवणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे, जेणेकरून देशातील अन्न सुरक्षा स्थिती सुनिश्चित करता येईल.या योजनेअंतर्गत तांदूळ राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान, गहू राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान आणि कडधान्य राष्ट्रीय सुरक्षा अभियानाचा समावेश करण्यात आला आहे. या योजनेंतर्गत तांदळासाठी 14 राज्ये, गहूसाठी 9 राज्ये आणि डाळीसाठी 16 राज्यांचा समावेश करण्यात आला आहे.

**4. पंतप्रधान किसान मानधन योजना**

केंद्रातील मोदी सरकारने कष्टकरी माणसाप्रमाणे शेतकऱ्यांना पेन्शन योजनेची भेट दिली आहे. या योजनेंतर्गत वयाची 60 वर्षे पूर्ण केल्यानंतर शेतकऱ्यांना किमान 3000 रुपये पेन्शन दिली जाते.योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना वयाच्या ६० वर्षांपर्यंत दरमहा ५५ ते २०० रुपये जमा करावे लागतील. शेतकऱ्याचे वयाची ६० वर्षे पूर्ण होताच त्याला पेन्शन मिळू लागते. या योजनेतील सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे या योजनेत शेतकरी जेवढा हातभार

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

लावतो तेवढाच सरकारचाही वाटा आहे. शेतकऱ्याचा कोणत्याही कारणाने मृत्यू झाल्यास शेतकऱ्याच्या पत्नीला पेन्शनच्या 50 टक्के रक्कम कौटुंबिक पेन्शन म्हणून मिळते.

**5. पंतप्रधान किसान सन्मान निधी योजना**

पंतप्रधान किसान सन्मान निधी ही भारत सरकारची एक महत्त्वाची योजना आहे. ही योजना 2018 च्या रब्बी हंगामात सुरू करण्यात आली होती. या योजनेंतर्गत, शेतकऱ्याला तीन हप्त्यांमध्ये वर्षाला 6,000 रुपये मिळतात आणि ही मदत रक्कम थेट त्याच्या बँक खात्यात येते. दर चार महिन्यांनी शेतकऱ्याला 2,000 रुपयांची मदत मिळते. या योजनेंतर्गत सरकारने 8 हप्ते जारी केले आहेत आणि आता शेतकऱ्यांना 9वा हप्ता मिळण्याची शक्यता आहे. या योजनेद्वारे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मोठी मदत मिळते. पंतप्रधान किसान सन्मान निधी योजना ही शेतकऱ्यांसाठी अतिशय फायदेशीर योजना आहे.

**6. पंतप्रधान पीक विमा योजना**

ही महत्त्वाची योजना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 18 फेब्रुवारी 2016 रोजी सुरू केली होती. वादळ, गारपीट, अतिवृष्टी या नैसर्गिक आपत्तींमुळे अनेकदा शेतकऱ्यांची तयार पिके नष्ट होतात. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांसमोर उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होतो, त्यामुळे शेतकरी आत्महत्याही करतात.अशा समस्या लक्षात घेऊन सरकारने पंतप्रधान पीक विमा योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत पेरणीपूर्वीपासून पीक काढणीपर्यंत विमा संरक्षण दिले जाते. पीक विमा योजनेंतर्गत रब्बी व खरीप पिकांबरोबरच व्यावसायिक व बागायती पिकांचाही समावेश करण्यात आला आहे. आम्ही तुम्हाला सांगतो की शेतकऱ्याला खरीप पिकांसाठी 2 टक्के आणि रब्बी पिकांसाठी 1.5 टक्के प्रीमियम भरावा लागतो.

**7. किसान क्रेडिट कार्ड योजना**

किसान क्रेडिट कार्ड (KCC) भारत सरकारने 1998 मध्ये सुरू केले. या कार्डच्या मदतीने शेतकऱ्यांना पुरेसे कर्ज सहज मिळते. ज्याद्वारे शेतकरी खते, बियाणे, कीटकनाशके इत्यादी शेतीशी संबंधित साहित्य खरेदी करू शकतात. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे या कार्डवरून तुम्ही 5 वर्षांत 3 लाख रुपयांपर्यंत कर्ज घेऊ शकता.या कार्डवर घेतलेल्या कर्जाची शेतकऱ्यांनी 1 वर्षाच्या आत परतफेड केल्यास त्यांना व्याजदरात 3 टक्के सूट मिळते. याशिवाय शेतकऱ्यांना अचानक पैशांची गरज भासल्यास ते या योजनेद्वारे तत्काळ मिळू शकतात.

**8. स्मॅम किसान योजना**

आधुनिकतेच्या या युगात देशात असे अनेक शेतकरी आहेत जे आजही शेतीच्या कामात जुन्या यंत्रांचा वापर करतात. पैशाअभावी ते नवीन उपकरणे खरेदी करू शकत नाहीत. शेतकऱ्यांची ही समस्या लक्षात घेऊन केंद्र सरकारने स्ममा किसान योजना सुरू केली आहे. या योजनेद्वारे शेतकरी शेतीची साधने सहज खरेदी करू शकतात.सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे उपकरणांच्या खरेदीवरही सवलत दिली जाते. शेतकऱ्यांना शेती करताना कोणतीही अडचण येऊ नये आणि चांगले पीक घेऊन त्यांचे जीवनमान उंचावेल हा सरकारची ही योजना सुरू करण्याचा मुख्य उद्देश आहे.

**9.PM कुसुम योजना**

भारतातील ग्रामीण भागात विजेचा प्रश्न अजूनही गंभीर आहे. शेतकऱ्यांच्या शेताला पाण्याची गरज असताना त्यांना वेळेवर वीज मिळत नाही. पाण्याअभावी त्यांच्या पिकांचे नुकसान होत आहे.शेतकरी बांधवांना अखंडित वीज देण्याच्या उद्देशाने पीएम कुसुम योजना सरकार राबवत आहे. या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना अनुदानावर सौर पॅनेल मिळतात,

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

ज्याद्वारे ते वीज निर्मिती करून त्यांचा गरजेनुसार वापर करू शकतात आणि नंतर उर्वरित रक्कम विकून अतिरिक्त उत्पन्न मिळवू शकतात.

**10. डेअरी उद्योजकता विकास योजना (DEDS)**

शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे आणि त्यांचे जीवनमान सुधारणे या उद्देशाने केंद्र सरकारद्वारे दुग्धउद्योजकता विकास योजना (DEDS) चालवली जात आहे. आपल्या देशातील जवळपास सर्वच शेतकरी पशुपालन करतात. हे काम मोठ्या प्रमाणावर झाल्यास मोठ्या प्रमाणात दुधाचे उत्पादन होऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढू शकेल, असा सरकारचा विश्वास आहे.या योजनेचा लाभ घेऊन शेतकरी किंवा पशुपालक नवीन डेअरी स्थापन करू शकतात, जर ते आधीच दुग्धव्यवसाय चालवत असतील तर ते त्याचा आणखी विस्तार करू शकतात. या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना अनुदान देण्याची तरतूद करण्यात आली असून, यासोबतच शेतकऱ्यांना प्रशिक्षणही घेता येईल.

**11. पशुधन विमा योजना**

ही योजना प्रामुख्याने दोन उद्देश ठेवून सुरू करण्यात आली आहे. शेतकरी किंवा पशुपालकांना त्यांच्या जनावरांचा आकस्मिक मृत्यू होतो पण त्यांचे मोठे आर्थिक नुकसान होते. या प्रकारच्या नुकसानभरपाईसाठी केंद्र सरकारकडून पशुधन विमा योजना राबविण्यात येत आहे. योजनेंतर्गत, दुभत्या गायी आणि म्हशींचा त्यांच्या कमाल वर्तमान बाजार मूल्यावर विमा उतरवला जातो.विमा प्रीमियम 50 टक्के पर्यंत सबसिडी आहे. अनुदानाचा संपूर्ण खर्च केंद्र सरकार उचलते. अनुदानाचा लाभ जास्तीत जास्त तीन वर्षांच्या पॉलिसीसाठी प्रति लाभार्थी जास्तीत जास्त 2 जनावरांना उपलब्ध आहे. यासोबतच, या योजनेअंतर्गत, जर एखाद्या शेतकऱ्याने आपली जनावरे विकली आणि विमा पॉलिसीचा कालावधी संपला नसेल, तर विमा पॉलिसीच्या उर्वरित कालावधीचा लाभ नवीन मालकाला हस्तांतरित केला जाईल.

**12. मृदा आरोग्य कार्ड योजना**

शेतकरी आपल्या शेतात उत्पादन वाढवण्यासाठी असंतुलित खतांचा वापर करत आहेत. त्यामुळे जमिनीची उत्पादकता सातत्याने घटत आहे, यासोबतच पिकांवर विविध प्रकारचे नवनवीन रोग दिसून येत आहेत. शेतमालाची उत्पादकता वाढण्याऐवजी सातत्याने घटत आहे.दुसरीकडे, रोगांसाठी खत आणि कीटकनाशकांचा अधिक वापर केल्यामुळे शेतीवरील खर्चही वाढत आहे. या प्रकारच्या समस्येला तोंड देण्यासाठी केंद्र सरकारकडून सॉईल हेल्थ कार्ड योजना राबविण्यात येत आहे. ज्यामध्ये शेतकऱ्यांची माती परीक्षणही मोफत केले जाते. शेतातील माती परीक्षण करताना शेतकऱ्याच्या शेतात काय कमतरता आहे हे कळते.

**निष्कर्ष:**

1.स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने नियोजनाचा स्वीकार केला. देशाच्या स्वातंत्र्याला 75 वर्ष पूर्ण झाली. त्याचबरोबर देशाची लोकसंख्या 36 कोटी वरून आज 142 कोटी झाल्याची दिसून येते. जगाच्या एकूण भू-क्षेत्रफळाच्या केवळ 2.4 टक्के भारताकडे आहे. जागतिक एकूण लोकसंख्येच्या सुमारे 18 टक्के लोकसंख्या देशांमध्ये वास्तव्यास आहे. सुमारे 55 टक्के लोकसंख्येची उपजीविका ही शेती क्षेत्रावरच अवलंबून असल्याचे निदर्शनास येते.

2.भारतीय शेती क्षेत्र हे पूर्वीपासूनच मोसमी पर्जन्यमानावर अवलंबून आहे. नियोजनाचा स्वीकार केल्यापासून पंचवार्षिक योजनेच्या माध्यमातून लागवडीखालील शेतजमीन सिंचनाखाली आणण्याचा सरकारच्या सिंचन योजनेतून प्रयत्न केल्याचे दिसून येते.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

3. वाढत्या लोकसंख्येला अन्नधान्य पुरवठा आवश्यक प्रमाणात व्हावा यासाठी, अन्नधान्य उत्पादन वाढीसाठी, हरितक्रांतीच्या माध्यमातून भरघोस प्रयत्न सरकारद्वारे केल्याचे निदर्शनास येते.वाढत्या लोकसंख्येला अन्नधान्याचा पुरवठा करणे हे अन्न सुरक्षिततेच्या दृष्टीने खूप मोठे आव्हान आहे. हे यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी सरकारने शेती क्षेत्रात आधुनिक बी-बियाणे, कृषी यांत्रिकीकरण, आधुनिक शेती कसण्याच्या पद्धती विकसित करण्यासाठी शेती क्षेत्राला अंदाजपत्रकाच्या माध्यमातून आर्थिक तरतुदी करण्यावर भर दिला.

4. शेती क्षेत्राबरोबरच, ग्रामीण विकासावर ही अधिक भर देऊन, शेतीला पूरक अशा योजना राबविणे तसेच सहकार क्षेत्र,राष्ट्रीय शेती व ग्रामीण विकास बँक ,कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय,ग्रामीण मंत्रालय याच्या माध्यमातून विविध योजना पूरक स्वरूपात वापरून शेती क्षेत्राच्या विकासावर भर दिल्याचे लक्षात येते.

5. सरकारद्वारे मागील 75 वर्षात विविध योजना शेती विकासासाठी राबिण्यात येत असल्या तरी, अजूनही भारतीय शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबलेल्या नाहीत.कारण सरकारद्वारे राबविल्या जाणाऱ्या योजनेमधून, अंतिम लाभार्थ्यापर्यंत त्याचे लाभ पूर्णपणे अजूनही पोहोचत नसल्याचे निदर्शनास येते.

6. सरकार एकीकडे विविध योजना राबवत असले तरी दुसरीकडे शेती क्षेत्रामध्ये शेती आदानांच्या किमती कित्येक पटीने वाढलेल्या आहेत. त्या तुलनेत शेतीमालाच्या किमतींना उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळत नाही .त्यामुळे शेती व्यवसाय करण्याची इच्छाच नष्ट होत आहे व शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत.

**शिफारशी**

भारतीय शेती व्यवसायाचा विकास करण्यासाठी सरकार द्वारे अनेक प्रयत्न केले असले तरी योजनेच्या अंमलबजावणीमध्ये अनेक दोष असल्याचे निदर्शनास येते.

1. प्रगत राष्ट्राच्या तुलनेत भारतीय शेती क्षेत्रातील उत्पादन व उत्पादकता खूपच कमी आहे ती वाढत आहे. पण वाढण्याचा वेग मंद आहे.उत्पादन व उत्पादकता वाढवण्यासाठी विशेष प्रयत्न करणे काळाची गरज आहे

2. भारतीय क्षेत्राच्या विकासासाठी ,शेती क्षेत्राला योग्य वेळेमध्ये अत्यंत अल्प व्याज दराने संस्थात्मक वित्तपुरवठा करणे खूप गरजेचे आहे.

3. भारतीय शेती क्षेत्राच्या विकासासाठी सरकारद्वारे पायाभूत संरचना उभा करण्यात येत असली तरी, ती तुटपुंजी व अत्यंत निकृष्ट दर्जाचे आहे. यासाठी नव्याने सिंचनाच्या सुविधा, कृषीमाल साठवणुकीच्या सुविधा,चांगली रस्ते,चांगल्या सुविधा असलेल्या बाजारपेठा, अखंडित वीज पुरवठा,कृषी आदानाची पुरेशा प्रमाणात वाजवी दरात उपलब्धता करणे अत्यंत गरजेचे आहे. अन्यथा शेती ही कंपन्यांच्या घशात जाईल हे निश्चितच आहे.शेती क्षेत्राला दिली जाणारी विविध अनुदानेही अत्यंत तुटपुंजी स्वरूपाची आहेत. त्यामध्ये बरी वाढ होऊन,अंतिम लाभार्थ्यापर्यंत ते अनुदाने मिळाली पाहिजेत.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

**संदर्भसूची**

1. दत्त /महाजन, इंडियन इकॉनोमी, 71 वी आवृत्ती, एस चांद अँड कंपनी प्रायव्हेट लिमिटेड नवी दिल्ली.
2. देसाई /भालेराव, भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन पुणे.
3. डॉक्टर विजय कवी मंडन, कृषी अर्थशास्त्र,प्रथम आवृत्ती 2006, श्री मंगेश प्रकाशन नागपूर
4. मनोज आवाळे, शेतकऱ्यांसाठी शासकीय अर्थसाहयाच्या विविध योजना, सुधारित आवृत्ती 2015.चौधरी लॉ पब्लिशर्स पुणे.
5. डॉक्टर पुरुषोत्तम भापकर, योजनाचा खजिना, पहिली आवृत्ती 2019, साकेत प्रकाशन,पुणे.
6. आर्थिक समीक्षा 2021 22, भारत सरकार वित्त मंत्रालय आर्थिक कार्य विभाग नवी दिल्ली.
7. प्रतियोगिता दर्पण, भारतीय अर्थव्यवस्था 2023, अतिरिक्त अंक.
8.शेतकरी व कृषी कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचा वार्षिक अहवाल 2021 22.
9. योजना, कुरुक्षेत्र, बळीराजा, मासिकाचे विविध अहवाल.

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
*SPECIAL ISSUE ON MARATHI AARTHSHASHTRA PARISHED Nov. 2023*

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

# सामाजिक चिंतेच्या श्रेणीत – वंचित घटक

**डॉ. अनिता एस.फापाळे**
(MVP, Art's, Com. & Sci. College
Manamad, Tal. Nonagon, Dis. Nashik)
Lifetime Membership No. 1471
Mobil No. 9423737619, Mail ID anitaphapale24@gmail.com

**गोषवरा**

"नवी दिल्लीच्या भारत मंडपम येथे 09-10 सप्टेंबर 2023 रोजी 18 व्या G20 शिखर परिषदेचे आयोजन करताना भारताला आनंद होत आहे. भारताकडून आयोजित करण्यात आलेली ही पहिली G20 शिखर परिषद आहे. G20 एक शाश्वत आणि न्याय्य 'एक भविष्य', 'एक कुटुंब' सारखे, निरोगी ***'एक पृथ्वी'*** साठी दृष्टी सामायिक करतील.

G20 शिखर परिषद मानव केंद्रित आणि सर्वसमावेशक विकासात एक नवीन मार्ग तयार करेल असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला आहे. भारताचे G20 अध्यक्षपद हे सर्वसमावेशक, महत्त्वाकांक्षी, निर्णायक आणि कृती-केंद्रित आहे, जेथे ग्लोबल साउथच्या "**विकासात्मक चिंता**" सक्रियपणे मांडल्या गेल्या आहेत.

वंचितांची सेवा करण्याच्या गांधीजींच्या ध्येयाचे अनुकरण करण्याचे महत्त्व अधोरेखित करताना, पंतप्रधानांनी अधोरेखित केले की,

***"भारत प्रगतीच्या मानव-केंद्रित मार्गावर अधिक भर देतो. 'एक पृथ्वी', 'एक कुटुंब' आणि 'एक भविष्य' या विषयावरील सत्रांचे अध्यक्षपद भूषवणार आहेत, ज्यात मजबूत, शाश्वत, सर्वसमावेशक आणि संतुलित विकासासह जागतिक समुदायाच्या प्रमुख चिंतेचे विषय समाविष्ट आहेत. G20 शिखर परिषद मानव-केंद्रित आणि सर्वसमावेशक विकासासाठी एक नवीन मार्ग तयार करेल."***

मानवी संसाधने हा व्यक्तींचा समूह आहे जे एखाद्या संस्थेचे, व्यवसायाचे क्षेत्र किंवा अर्थव्यवस्थेचे कर्मचारी बनवतात. "मानवी भांडवल" मानवी संसाधनांसाठी समानार्थी वापरले जाते, त्याचप्रमाणे "मनुष्यबळ", "प्रतिभा", "श्रम" किंवाफक्त "लोक" यासं कल्पनाचा देखील समावेश होतो. जरी 'मानवी भांडवल' सामान्यत: अधिक व्यापाक दृश्याचा संदर्भदेते; म्हणजेच, व्यक्ती ज्या ज्ञानाला मूर्त रूप देते आणि देशाच्या आर्थिक विकासा मध्ये योगदान देऊ शकते.

जगातील लोकांच्या जीवनात *'वंचित'* हा एक वेगळा घटक आहे. मागासवर्गीय, आदिवासी, अनाथ, बेघर, अंध, अपंग, मंदबहिरे, मूकबधिर, वृद्ध, कुष्ठरोगी, देवदासी, हुंडाबळी, विधवा, कुमारीमाता, बालविधवा, भिकारी, अल्पवयीन गुन्हेगार त्यांचे प्रश्न सोडवून त्यांना इतरांप्रमाणे जगण्यास मदत करणे म्हणजे त्यांचा विकास करणे, मात्र तरीही हे घटक उपेक्षित जीवन जगत आहेत.

**मुख्यशब्द:**

दिव्यांग व्यक्ती, वंचित, मानव संसाधन व्यवस्थापन, अपंग कल्याणकारी, रोजगार परिस्थिती,

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

**प्रस्तावना**

*"ज्या व्यक्तीला स्थानिक व्यवस्थेकडून योग्य रोजगार, चांगले शिक्षण, कमी खर्चात आरोग्यसेवा, मूलभूत सुविधा सहज उपलब्ध होत नाहीत, तो वंचितांच्या श्रेणीत येतो."*

“गरज ही शोधाची जननी तर गरजांची अपूर्णता ही **समाजक चिंतेचा** स्त्रोत”

शाश्वत, दर्जेदार, निरोगी, सुरक्षित आणि फायदेशीर रोजगाराचा सन्मानाने प्रदान करणे.

सामाजिक चिंता ही कोणतीही समस्या, समस्या किंवा संघर्ष आहे ज्याचे निराकरण करणे किंवा प्रतिबंध करणे हे समाजासाठी प्रथम प्राधान्य आहे. अमेरिकन समाजात, सामान्य सामाजिक चिंतांमध्ये बेघरपणा, मादक पदार्थांचा वापर आणि पर्यावरण यांचा समावेश होतो. सर्व सामाजिक चिंता समान किंवा सार्वत्रिक नसतात.

1990 च्या दशकात अपंग आणि अपंग नसलेल्या लोकांमधील रोजगारातील दरी वाढली आहे, जी एक मोठी चिंतेची बाब आहे. दिव्यांग लोकांना त्यांच्या लिंगानुसार रोजगारासाठी वेगवेगळ्या अडथळ्यांना सामोरे जावे लागते. ते ग्रामीण किंवा शहरी भागात राहतात. बहुतांश भागांमध्ये, अपंग लोकांच्या नोकरीच्या संभाव्यतेवर शिक्षणाचा मर्यादित प्रभाव पडतो, असे दिसून येते की अपंग लोकांची बहुतेक त्यांची "रोजगार तूट" स्पष्ट करत नाहीत, शिक्षण, रोजगार, पुनर्वसन सुविधा इत्यादींसह मूलभूत सेवांपर्यंत मर्यादित प्रवेशासह अपंग लोक अनेक वंचितांना सामोरे जातात. व्यापक सामाजिक कलंक त्यांच्या सामान्य सामाजिक आणि आर्थिक जीवनात अडथळा आणण्यात मोठी भूमिका बजावते. जागरूकता आणि धोरणात्मक कृती करून सर्वसमावेशक, अडथळामुक्त समाजाच्या दिशेने कार्यकरण्यासाठी, अपंग लोक आणि त्यांच्या सामाजिक-आर्थिक परिस्थितींबद्दल सर्वसमावेशक विश्वसनीय आकडेवारी असणे आवश्यक आहे.

अपंगांना वंचित स्थितीतून रोजगाराच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सामाजिक आरोग्यासाठी ते आवश्यक आहे. वंचित गट हे एकना एक प्रकारे समाजासाठी अपायकारक ठरू शकतात हे लक्षात घेऊन सरकार आणि नागरिकांनी वैयक्तिक पातळीवर वंचितांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले पाहिजेत.

**भारताची राज्यघटना**

आपल्या जीवनात व्यक्ति म्हणून समाजाचे सदस्य म्हणून कामाची/रोजगाराची महत्वाची भूमिका असते. हे पुढील मुद्यांवरून स्पष्ट होईल.

1. लोक स्वत:च्या तसेच आपल्या कुटुंबाच्या उपजीविकेसाठी काम करतात.
2. रोजगारामुळे स्वमुल्याची आणि आत्मसन्मानची भावना निर्माण होते.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

3. प्रत्येक कार्यरत व्यक्ति राष्ट्रीय उत्पन्नात तसेच देशाच्या विकासात भर घालत असतो.

२१व्या शतकात अपंग व्यक्तीची सामाजिक स्थिती समाधानकारक नाही. अपंग असलेले लोक हे देशातील सर्वात मोठे अल्पसंख्याक गट आहेत. 2011 च्या जनगणनेचा हवाला देऊन, अहवालात असे म्हटले आहे की भारतात 26.8 दशलक्षअपंग व्यक्ती आहेत, जे एकूण लोकसंख्येच्या 2.21 टक्के आहेत. सुमारे 18 दशलक्ष अपंग व्यक्ती (अपंगलोकसंख्येच्या 69 टक्के) ग्रामीण भारतात राहतात आणि सुमारे 8 दशलक्ष (31 टक्के) शहरी भागात राहतात. भरतात अपंग लोकसंख्येचा वाढीचा दर (2001-2011)17.70 % आहेत. साक्षरता दर 74.04 %महाराष्ट्रत अपंग लोकसंख्येचा वाढीचा दर (2001-2011)15.99%आहेत. साक्षरता दर 82.34%

अपंगानी अनेक मर्यादा असून उल्लेखनीय कामगिरी बजावलेली आहे. याउल्लेखनीय कामगिरीचा आढावा घेणे गरजेचे आहे. अर्थपूर्णपद्धतीने उल्लेखनीय कामगिरी मांडणी झाली पाहिजे. अपंग लोकसंख्येच्या सक्षमीकरणासाठी, शिक्षणाची प्राप्ती आणि आर्थिक क्रियाकलापांमध्ये सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. अपंग व्यक्तींची कामाची स्थिती, लिंग, निवासस्थान आणि अपंगत्वाच्या प्रकारानुसार आणि आर्थिक क्रियाकलापांमधील त्यांच्या सहभागाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकणे गरजेचे आहे.

अपंगव्यक्ती (PwDs) भारताच्या लोकसंख्येची लक्षणीय टक्केवारी बनवतात, तथापि, रोजगार क्षमकौशल्ये विकसित करण्याचा आणि अर्थपूर्ण रोजगार मिळविण्यासाठी त्यांना अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो. त्यांना श्रमिकबाजार पेठेत अडचणींचा सामना करावा लागतो. एकूण लोकसंख्येच्या तुलनेत ग्रामीण भागात दिव्यांगांची संख्या जास्त आहे. ग्रामीण PwD आहेत
192 कौशल्ये आणि बाजारपेठेपासून लक्षणीयरीत्या डिस्कनेक्ट केलेले. अपंगव्यक्तींसाठी व्यावसायिक प्रशिक्षण आणि रोजगाराच्या संधी सुधारणे हे अपंगत्व असलेल्या व्यक्तींसाठी, त्यांच्या कुटुंबांसाठी जीवनाचा दर्जा वाढविण्यासाठी एक महत्त्वपूर्ण घटक आहे; व्यापक अर्थव्यवस्थेसाठी भरीव नफा देखील आहेत. अपंग व्यक्तींसाठीया निकृष्ट रोजगार परिणामांशी संबंधित व्यक्ती आणि समाजासाठी भरीव खर्च आहे. वैयक्तिक आणि कौटुंबिक फायद्यांव्यतिरिक्त, श्रमशक्तीचा सहभाग वाढवण्यासाठी एक मजबूत आर्थिक अत्यावश्यकता देखील आहे जी देशातील कुशल कामगारांची कमतरता दूर करण्यास मदत करेल, त्याचवेळी कल्याणकारी अवलंबित्वाशी संबंधित वित्तीय दबाव कमी करेल.
दिव्यांगजनांना किंवा दिव्यांगजनांच्या गटांना, आर्थिक आणि आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य योजना आणि प्रकल्पांसाठी कर्ज आणि आगाऊ रक्कमेद्वारे सरकारने वेळोवेळी विहित केलेल्या उत्पन्नाच्या आणि/ किंवा आर्थिक निकषांच्या अधीन राहून मदत करणे.

**अपंग व्यक्तींचे आर्थिक पुनर्वसन:**

अपंग व्यक्तींच्या आर्थिक पुनर्वसनामध्ये संघटित क्षेत्रातील वेतन रोजगार आणि स्वयंरोजगार या दोन्हींचा समावेश होतो. शहरी आणि ग्रामीण भागातील दिव्यांग व्यक्तींना उत्पादक आणि फायदेशीर रोजगाराच्या संधी वाढवण्याची खात्री करण्यासाठी व्यावसायिक पुनर्वसन केंद्रे आणि व्यावसायिक प्रशिक्षण केंद्रांद्वारे सेवांची सहाय्यक संरचना विकसित केली गेली आहे. अपंगव्यक्तींच्याआर्थिकसक्षमीकरणासाठीच्याधोरणांमध्ये

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

(i) सरकारी आस्थापनांमध्ये रोजगार ठळकपणे दिसून येतो. पीडब्ल्यूडी कायदा, 1995 भारत सरकार आणि सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम (पीएसयू) च्या आस्थापनांमध्ये ओळखल्या जाणाऱ्या पदांवर नोकरीमध्ये 3% आरक्षणाची तरतूद करतो,

(ii) खाजगी क्षेत्रातील वेतन रोजगार अपंग व्यक्तींमध्ये योग्य कौशल्यांच्या विकासासाठी प्रोत्साहित केले गेले आहे. खाजगी क्षेत्रातील त्यांची रोजगार क्षमता, व्यावसायिक पुनर्वसन आणि प्रशिक्षणकेंद्रे अपंग व्यक्तींमध्ये त्यांची क्षमता आणि क्षमता लक्षात घेऊन योग्य कौशल्ये विकसित करण्यात गुंतलेली आहेत. सेवा क्षेत्रातील रोजगाराच्या संधींची झपाट्याने वाढ लक्षात घेऊन, अपंग व्यक्तींना बाजाराच्या गरजेनुसार कौशल्य प्रशिक्षण घेण्यास प्रोत्साहित केले गेले आहे,

(iii) प्रोत्साहन देण्यासाठी प्रोत्साहन, पुरस्कार, कर सवलत इत्यादी सारख्या सक्रिय उपायांचा विचार केला गेला आहे. खाजगीक्षेत्रात अपंग व्यक्तींना रोजगार. स्वयंरोजगार संघटित क्षेत्रातील रोजगाराच्या संधीं मधील वाढीची मंद गती लक्षात घेऊन, अपंग व्यक्तींच्या स्वयंरोजगाराला चालना दिली जाईल. हे व्यावसायिक शिक्षण आणि व्यवस्थापन प्रशिक्षणाद्वारे केले गेले आहे. पुढे, प्रक्रिया करण्याच्या पारदर्शक आणि कार्यक्षम प्रक्रियेसह सुलभतेने सुलभकरण्यासाठी NHFDC कडून सौम्य अटींवर कर्ज उपलब्ध करून देण्याची विद्यमान प्रणाली सुधारित केली जात आहे.

उपलब्ध डेटावरून असे दिसून आले आहे की संपूर्ण श्रमिक बाजारपेठेत अपंग व्यक्तींपेक्षा अपंग व्यक्तींचे जीवन अधिक वाईट आहे. अपंग व्यक्ती - विशेषत: स्त्रिया, तरुण आणि ग्रामीण रहिवासी – बेरोजगारी आणि आर्थिक निष्क्रियतेचा उच्चदर अनुभवतात आणि त्यांना असुरक्षित रोजगार आणि अपंग नसलेल्या इतरांपेक्षा अपुरे सामाजिक संरक्षण यांचा जास्त धोका असतो. आर्थिक लवचिकतेच्या कमतरतेमुळे दीर्घकाळापर्यंत सार्वजनिक आरोग्य आणि सामाजिक आर्थिक संकटेने त्यांना आणखी जटिल असुरक्षाजात आहे.

अपंग व्यक्तींच्या रोजगार स्थितीचे प्रादेशिक पुनरावलोकन करते. कामाच्या जगात नवीनतम घडामोडी लक्षात घेऊन भागधारकांना कृतीत आणणे आणि प्रभावी आणि नाविन्यपूर्ण उपायांना प्रेरित करणे हा हेतू आहे. युनायटेड नेशन्स इकॉनॉमिक अँड सोशल कमिशन फॉर आशिया अँड द पॅसिफिक (ESCAP) या प्रकाशनाद्वारे अपंग व्यक्तींच्या रोजगार स्थितीचे प्रादेशिक पुनरावलोकन ऑफर करते. कामाच्या जगात नवीनतम घडामोडी लक्षात घेऊन भागधारकांना कृतीत आणणे आणि प्रभावी आणि नाविन्यपूर्ण उपायांना प्रेरित करणे हा हेतू आहे.

## निरीक्षणे

बेरोजगार अपंग प्रतिसादकर्त्यांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करण्याची गरज आहे कारण आम्हाला आढळून आले आहे की कार्यरत वयोगटातील बरेच लोक अजूनही बेरोजगार आहेत ज्यामुळे आपण आपला लोकसंख्याशास्त्रीय लाभांश गमावत आहोत.पैशांच्या समस्येमुळे डॉक्टरांनी सुचविल्याप्रमाणे, टक्केवारीतील अपंग लोक अपंगत्व दूर करण्यासाठी उपाययोजना करत नाहीत, म्हणून सरकारी यंत्रणांना योग्य उपाययोजनांची व्यवस्था करणे आवश्यक झाले आहे अपंगत्वामुळे अपंगणमधिलक्षमतावाया जाऊ शकतो ज्याचा उपचार केला जाऊ

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

शकतो.प्रतिसादकर्त्यांसाठी शिक्षणाची पातळी सुधारण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे. अपंग प्रतिसाद देणारे जितके चांगले शिक्षित आहेत, त्यांना योग्य रोजगाराची संधी मिळणे तितके सोपे आहे.

- समाजातील अदृश्य अपंगसाठीचे विचार-चांगले जीवन जगण्यास नाकारणे.येथे सक्षतांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते तर अपंगसाठी वेगळे असे काय करायचे ?
- देशात अपंगांचा प्रकर आणि तीव्रते नुसार अपंगाची वर्गवारी लावली जाते.
- अपंगांनामधील स्वत:मध्ये असलेल्या क्षमताच माहित नसतात. सूरक्षित जीवन जगण्यासाठी असलेल्या क्षमतामध्ये सुधारणांची गरज.
- ज्ञान आणि उत्पादक कौशल्यविकसित करण्याचे उपाय, आव्हाने, अपंगत्व प्रकारा नुसार समजावून घेणे.
- शिक्षणातून अपंग बाहेर पडला की स्पर्धात्मक जगात टिकाव लागत नाही.
- शिक्षण प्रशिक्षण देणारा संस्थानीच इतर संस्थाशी संपर्कात राहून रोजगारासाठी सोय उपलब्ध करून द्यावी.
- जीवनमान, राहणीमान दर्जा हा प्रश्न फार दूर आहे. जीवन जगण्याचीच लढाई सुरु आहे.
- अन्न, वस्त्र, निवारा ह्याच मुख्य गरजा आहे. शिक्षण, आरोग्य, मनोरंजन, प्रवास ह्या गरजा रोजगार मिळालेले अपंग पूर्ण करू शकतात.
- तीव्र अपंगत्व असणारे अपंग सर्वचबाबतीत दुसा-यावर अवलंबून असतात.
- निम्मे वय उलटून गेल्यावरही अपंग जीवनात स्थिर स्थावर होण्यासाठी झगडत असतो.
- जस जसे अपंगांचे वय वाढत जाते तसतसे अपंगांच्या क्षमता कमी व्हयला लागतात. वयानुसार अपंगाच्या अपंगत्वाची तीव्रता वाढून शकते.
- योजनांमध्ये मुख्यत्वे कर्ज धोरण, नोकरी व्यावसाय सवलती, रेशनकार्ड वार आधरित विविध योजना असतात.

**योजना**

कोणत्याही विशेष योजना अटी शर्तीच्या आधीन राहून देण्यापेक्षा कोणत्याही योजना नका देवू फक्त जीवन जगण्याच्या प्रकियेत समाविष्ट करून घेण्यासाठी पूरक वातावरणाची निर्मिती करणे गरजेचे आहे. तुम्ही आमच्याबरोबर चालू नका हा पण तुमच्यासारखे चालण्यासाठी बळ निर्माण होण्यासाठी पूरक व सुदृढ मानसिकता तसेच अडथळा विरहित वातावरणाची निर्मिती करा. दया दाखविण्यापेक्षा विश्वास वाटेल अशी परिस्थिती निर्माण करा. धोरणाची अमंलबजावणीसाठी नेमकेपणाने सक्षम यंत्रणा कशी उभारली जाणार? योजनाचां लाभ सहजासहजी मिळत नाही. उदा. अपंगना मानधन , संत गाडगेबाबा घरकुल योजना, महानगरपालिका भरती प्रक्रिया

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

- धोरण अतिशय उत्तम असतात परंतू अमलबजावणी करण्यातील येणाऱ्या अडचणी तपासणे गरजेचे.
- धोरण राबवण्यात येत असताना वेगवेगळया प्रकारचे अपंगत्व असणाऱ्या व्यक्तिच्या नेमक्या अडचणी यंत्रणेपर्यंत पोहोचण्याचा पूल तयार करणे गरजचे आहे.
- विकसित करण्याचे आव्हानाचा आभ्यास करणे रोजगार बेरोजगार अपंग आर्थिक स्थिती
- योजना राबविणारा विभागाबाबत जास्त जास्त अपंगाच्याविविध योजनाच्या बाबत असे मत आहे की, 'भिक नको पण कुत्र आवर आशी अपंग योजानाबाबत धारणा आहे.'

**निष्कर्ष**

शिक्षण प्रशिक्षणाने क्षमतामध्ये वाढ करता येते. शिक्षत व अशिक्षत अपंगांची संख्या,योजना परिणामांचा अभ्यास,अपंग क्षमता सुधारणा, समस्येची तीव्रता, प्रमाण अभ्यासने,अपंग कार्यक्षमता वाढीसाठी कोणत्या प्रकारच्या शिक्षण व प्रशिक्षणाची गरज,अपंगसाठीचे रोजगार संधीची उपलब्धता? रोजगार व बेरोजगार जीवनमान तपासणे,रोजगार व बेरोजगार तुलना जीवन जगतांना कोणत्या आडचणी येतात ? कोठे ?,शिक्षित अशिक्षित किती?,रोजगार बेरोजगार किती?,अपंग कार्यक्षमतापूर्तता कशी ? ,आर्थिकेतर कार्य कोणते कोणते? उत्पादन कार्य करूशकतील?,बेरोजगारसाठी बुडीत कर्ज, कर्ज प्रकरणे, कर्ज माफी, मानवी हक्काबद्दल ,समाजापासुन अलिप्त ? की विकासात योगदान?,कोणत्या प्रकारचे शिक्षण अपंग घेतात? परिणाम काय?, अपंग रोजगार मिळविण्यासाठी अटी शर्ती कोणत्या?, अपंग रोजगारी राखण्याचे उपाय. अभ्यास आणि संशोधनाची गरज आहे.

- अपंगांसाठी MNC मध्येच सर्व प्रकारच्या अपंगांसाठी शारीरिक असक्षमता लक्षात घेता एकसुत्री शैक्षणिक धोरण असायला हवे.
- अपंग हा सामाज्यापासुन अलिप्त आहे.
- दोशात अपंगाचे 'उत्पादक कार्यात आर्थिक सहभागीत्व किती?' आहे याची मोजदाद हेत नाही.
- बेरोजगार अपंगापेक्षा रोजगार असलेल्या अपंगाची स्थिती चांगली आहे .
- जीवन जगतांना राहणीमान दर्जा हा प्रश्न फार दूर आहे आणि जीवना जगन्याचीच लढाई सुरू आहे. मुळात समस्या काय आणि उपाय काय? व ते कोठे व कोणते करावे? आधुनिक काळाशी समरस होणे दूरच राहते. अपंग हा मुळात माणूस आहे आणि त्यास भावनिक, शारिरीक, आर्थिक गरजा पुर्ण होणे गरजेचे आहे.
- व्यक्ति जरी एकता येतो आणि एकटाच जातो परंतु मध्यळ्या काळात तो एकटा जगू शकत नाही. त्यास हजारो लाखो कोरोडो वस्तू राहतो हाताळत असतो
- बेरोजगार अपंगांना जाणीव जागृती नाही कारण त्यांना शिक्षण प्रशिक्षण हेतुपुरस्कर मिळत नाही.
- अपंगांसाठी काम करणारे संस्थामध्ये एकसंधता , सुसूत्रता नाही. समस्या काय? उपाय काय? शोधता शोधता वेळ निघून जाते.
- शोकांतिका उत्तम पात्रता असूनही नोकरी मिळत नाही. पात्रतेसोबत कामास आवश्यक कौशल्य हवीत परंतू कौशल्यसाठी पोषक घटकां निमार्ण होणे गरजेचे आहे.

**शिफारसी**

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

- धोरणकर्त्यांना हेतुपुरस्सकर अपंगाच्या विकासाकडे लक्ष द्यावे लागणार आहे. अपंगाच्या विकासासाठी योजनांची उपयुक्तता काय आहे याचा परत एकदातांत्रिकजगात अभ्यास करणे गरजेचे आहे. वतर्मानात उपजीविका साधनांचा अभ्यास जागतिकीकरणाला अनुसार असायला पाहिजे.
- 'life cycle' लक्षात घेऊन अपंगच्यां क्षमताचां विकार करता येईल.
- उत्पादक कार्यात पूरवठा कधीही अनीश्चित कधीही नसतो तो नेहमी ठरलेला असतो.
- अपंगाचे आर्थिक सहभागीत्व वाढण्यासाठी अपंगांच्या क्षमता वाढीविणे गरजेचे आहे. त्यासाठी अपंगांच्या विकासासाठी योग्यवेळी गुंतवणूक करून अपंगांमध्ये असणाऱ्या अमर्याद ऊर्जेचां वापर देशाच्या आर्थिक विकासासाठी होवू शकतो. अपंगानी आपली बलस्थाने, ताकद ओळखणे.
- कौशल्य विषयक त्रूटी, कमतरता या प्रशिक्षणाने दूर करणे. अत्मिविश्वासात वाढ करणे. विचार प्रवृतीत विधायक बदल घडवून आणणे. आवश्यक कौशल्य हस्तग करून यशस्वी जीवन जगणे.
- नोकरी किंवा व्यावसायिकेतेस पात्र होणे वेगळे आणि रोजगारासाठी साजेशी पात्रता असणे वेगळे. गुणांची जोड असल्यास नोकरी किंवा व्यावसायिकेतेस पात्र नाही तर योग्य ठरतो. पात्रता, कौशल्य, सक्षमता याहीपेक्षा क्षमतेचा शोध घेणे गरजेचे आहे. अपंगांमधील उत्पाद क्षमतेचा होणारा ऱ्हास थांबविने गरजेचे आहे.
- कौशल्य विकासाचे शिक्षण अपंगांनां देणे गरजेचे आहे.
- नोकरी किंवा व्यावसायिकेतेतून यशस्वी कारकीर्द घडविता येते.
- नोकरी, व्यवसाय हे साध्य नसून साधन आहे असे मूल्यमापन करता येईल. जीवन जगतांना या साधनाची गरज असते.
- वेतन, अधिकारीचे पद, निर्णय क्षमते वाव हे घटक नोकरी, व्यवसायात खूप महत्वाचे आहे.
- अपंगविद्यार्थीपूर्णपणेकिंवामुख्यप्रवाहातअसलेल्यावातावरणातसार्वजनिकशिक्षणघेण्यासपात्रआहेत.
- अपंगांसाठी व्यावसायिक शिक्षणाला प्रोत्साहन दिले पाहिजे. त्यांना नोकरी न मिळाल्यास त्यांचा स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यात मदत करेल.
- अपंग लोकांसाठी कौशल्य विकासाशी संबंधित कार्यक्रम आयोजित केले पाहिजेत कारण यामुळे त्यांची रोजगार वाढविण्यात मदत होईल.
- अपंग विद्यार्थ्यांशी संवाद साधणे आणि त्यांना एकत्रकरणे यासाठी शिक्षकांना नेहमीच आजीवन शिक्षणाचा सराव करणे आवश्यक असते.
- आम्ही कुठे सुरू करू शकतो? क्षमतांना कमी लेखू नका. निधी देणे अत्यावश्यक आहे आणि आम्हाला आणखी बरेच काही हवे आहे.

अपंगांना वंचित घटक मानून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सामाजिक आरोग्यासाठी ते आवश्यक आहे. वंचित गट हे एकना एक प्रकारे समाजासाठी अपायकारक ठरू शकतात हे लक्षात घेऊन सरकार आणि नागरिकांनी वैयक्तिक पातळीवर वंचितांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले पाहिजेत.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

**संदर्भ:**


1. G-20, भारत, नवी दिल्ली, 08 सप्टेंबर 2023
2. भारतातील अपंग व्यक्ती (दिव्यांगजन) – एक सांख्यिकी प्रोफाइल : 2021, भारत सरकार सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय सामाजिक सांख्यिकी विभाग
3. www.mospi.gov.in
4. फापाळे ए. एस.(फेब्रु.2022): "नाशिक महानगर पालिका क्षेत्रातील अपंग व्यक्तींच्या रोजगाराचे विश्लेषण (2001 ते 2011)" पी एच डी प्रबंधाचा अहवाल, नाशिक
5. फिंकेलस्टीन, व्ही. 1980. वृत्ती आणि अक्षम लोक. न्यूयॉर्क: जागतिक पुनर्वसन निधी.
6. एबरलीपी. 1999. अपंग लोकांच्या नागरिकत्वासाठी कार्याचे महत्त्व, युनिव्हर्सिटी कॉलेज डब्लिनयेथे सादर केलेला पेपर.
7. थॉमस, एम. 2000. बांग्लादेशातील बचत आणि क्रेडिट कार्यक्रमांमध्ये अपंग लोकांना एकत्रित करण्याची व्यवहार्यता. एशियापॅसिफिक अपंग पुनर्वसन जर्नल
8. .https://prahaar.in/वंचितांच्या-जगाचा-आढावा/
9. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

# केंद्र पुरस्कृत विकास योजना आणि भारतीय शेती

**प्रा. राजेंद्रकुमार रामराव गव्हाळे**
पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
गो. से. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय,खामगाव, जि. बुलडाणा (महाराष्ट्र)

**उज्वला रामचंद्र महाजन**
आजीव सदस्य क्र. १९१७
इंदूगिरी निवास, आनंदा भोळे नगर, रिंगरोड, भुसावळ, जि. जळगाव - ४२५२०१

**गोषवारा**

प्रस्तुत शोधनिबंधात केंद्र पुरस्कृत विकास योजना व भारतीय शेती यांचे विवेचन केलेले आहे. शासनाने योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या शेतीच्या संबंधीत असणाऱ्या समस्या दूर करण्याचा प्रयत्न केलेला आहे. प्रस्तुत शोध निबंधात केंद्र पुरस्कृत सात योजना अभ्यासल्या आहेत.

१) प्रधानमंत्री किसान मानधन योजनेच्या माध्यमातून अल्पभूधारक शेतकऱ्याला वयाच्या ६० वर्षानंतर ३००० रू. पेंशन देऊन आर्थिक सहाय्य दिले जाते.
२) पंतप्रधान कुसूम योजनेच्या माध्यमातून सरकार शेतकऱ्यांना चोवीस तास वीज मिळावी म्हणून २०२१ साली ही योजना सुरू करण्यात आली. तसेच सौर पॅनल ही देण्यात येत आहे. त्यामुळे पिकांना वेळेवर पाणी मिळू लागले आहे.
३) प्रधानमंत्री फसल बिमा योजना १८ फेब्रुवारी २०१६ रोजी सुरू करण्यात आली असून शेतकऱ्याला कमी दरात पिकांचा विमा काढून उत्पादनातील जोखीम कमी करता येते, तसेच होणारे नुकसान टाळता येते.
४) प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत नवीन जलस्रोत शोधणे, पाणी साठवून ठेवण्याच्या पध्दती, मोठा जलसाठा तयार करणे, अशी कामे केली जातात. तसेच तुषार सिंचन व ठिबक सिंचनाच्या माध्यमातून पाण्याचा अपव्यय टाळून जलवापर क्षमतेत वाढ करता येते.
५) प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना ही महाराष्ट्रात २०१८ पासून राबविण्यात येत आहे. या योजनेच्या माध्यमातून अल्पभूधारक शेतकऱ्याचे उत्पन्न वाढविण्यासाठी दरवर्षी ६००० रू. शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होतात.
६) किसान क्रेडिट कार्ड योजना १९९८ साली शेतकऱ्यांना अल्पकालीन कर्ज देण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आली आहे. उपकरणे खरेदी करण्यासाठी शेतकऱ्याच्या इतर खर्चासाठी क्रेडिट मर्यादा प्रदान करते.
७) ग्रामीण भंडारण योजना ही २००१-०२ सालापासून सुरू करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना आपला मान शास्त्रोक्त पध्दतीने साठवणूक करता यावा, शेतकऱ्याचे नुकसान टाळावे तसेच आपल्या उत्पादनाचा दर्जाही टिकून राहावा यासाठी ग्रामीण भंडारण योजना सुरू करण्यात आली आहे की, जेणेकरून शेतकऱ्याला आपला माल दीर्घकाळापर्यंत साठविता येऊन मालाला योग्य भाव मिळेल.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

## केंद्र पुरस्कृत विकास योजना आणि भारतीय शेती

**प्रस्तावना :-**

आपला भारत देश खेड्यांचा असून बहुसंख्य जनता ही ग्रामीण भागात राहत आहे. ग्रामीण भागात मुख्य व्यवसाय हा शेती आहे. जोपर्यंत ग्रामीण भागाचा विकास होत नाही तोपर्यंत देशाचा विकास होणार नाही.

"सन २०११ च्या जनगणनेत ग्रामीण समुदायाची लोकसंख्या ६९ टक्के होती. याचाच अर्थ भारतातील बहुसंख्य लोक ग्रामीण भागात राहतात. शेती आणि ग्रामीण विकास यांचे परस्परसंबंध आहे. उदा. – भारतातील शेतीक्षेत्राचा सर्वांगीण विकास झाला तर त्यावर अवलंबून असणाऱ्या ६९ टक्के लोकांच्या आर्थिक व सामाजिक विकासाची प्रक्रिया घडून येईल. शेती विकासातून ग्रामीण विकास घडवून आणता येईल. भारतामध्ये नियोजनाच्या पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून नियोजनकारांनी शेती विकासावर भर देऊन ग्रामीण विकारण घडवून आणण्याकरिता विविध तरतुदी केल्या आहेत." [१]

शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी केंद्र व राज्य सरकारकडून विविध योजना राबविल्या जातात. तसेच शेतीसाठी सुधारित यंत्रसामुग्री, रासायनिक खते, बी-बियाणे यासाठीही अनुदान दिले जाते. प्रस्तुत शोधनिबंधात केंद्र सरकारच्या शेती विकासाकरिता राबविल्या जाणाऱ्या योजनांचा अभ्यास करणार आहोत.

**१) प्रधानमंत्री किसान मानधन योजना :-**

"केंद्र सरकारने प्रधानमंत्री किसान मानधन योजना ३१ मे २०१९ रोजी सुरू केली. ही योजना लहान आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांना लक्षात घेवून सुरू करण्यात आलेली आहे. या योजनेद्वारे १८ ते ४० वयोगटातील व्यक्तींना ज्यांची २ हेक्टरपेक्षा कमी जमीन आहे त्यांना ६० वर्षानंतर पेंशन दर महिन्याला दिले जाते. पेंशन घेणाऱ्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यास ५०% रक्कम शेतकऱ्याच्या पत्नीला मिळते. प्रधानमंत्री किसान मानधन योजना ही खूप फायदेशीर अशी योजना आहे. या योजनेमुळे गरीब शेतकऱ्याला आर्थिक पाठबळ मिळणार आहे.

या योजनेचा मुख्य उद्देश देशातील अल्पभूधारक शेतकऱ्यांना वयाच्या ६० वर्षानंतर ३००० रू. महिन्याला देवून आर्थिक सहाय्य करणे आणि त्यांच्या वृध्दापकाळात आर्थिक गरजा पूर्ण करणे हा आहे. प्रधानमंत्री किसान मानधन योजना २०२२ अंतर्गत देशातील शेतकऱ्यांना वृध्दपकाळात स्वावलंबी बनविले आणि भूमिहीन शेतकऱ्यांना सक्षम करणे तसेच शेतकऱ्यांना सामाजिक सुरक्षा प्रदान करणे आणि त्याचे भविष्य सुरक्षित करणे आणि हरित देशातील शेतकऱ्यांचा विकास करणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे." [२]

**२) पंतप्रधान कुसूम योजना :-**

आपला भारत हा कृषिप्रधान देश आहे. देश जरी कृषिप्रधान असला तरी शेतकऱ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. केव्हा पाऊस जास्त तर केव्हा कमी पडतो. दुष्काळामुळे अनेक वेळा पिकेही जळून जातात. निसर्ग साथ देत नाही. पिकांना वेळेवर पाणी देण्यासाठी वीज मिळत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना चोवीस तास वीज मोफत मिळावी म्हणून केंद्र सरकारने पंतप्रधान कुसूम योजना २०२१ साली सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांच्या शेतात सौर ऊर्जा पॅनेल बसवून शेतातील पंप सौर ऊर्जेवर चालतात. यामुळे शेतकऱ्यांना पाहिजे तेव्हा वीज उपलब्ध होते. ज्या शेतकऱ्यांकडे पेट्रोल, डिझेल वर चालणारे इंजिन आहे. त्यांना आता सौर पॅनल देण्यात येत आहेत. या योजनेतून दुर्गम भागातील शेतकऱ्यांनाही वीज पुरवठा होवू लागला आहे. पिकांना वेळेवर पाणी मिळू लागले आहे.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

"पंतप्रधान कुसूम योजना ही शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी केंद्र सरकारच्या योजनांपैकी ही एक योजना आहे. शेतकऱ्यांना सोलर पंप आणि ग्रीड जोडलेले सौर आणि ऊर्जा प्रकल्प स्थापित करण्यासाठी मदत करते. यासाठी शेतकऱ्यांना सोलर प्लँट बसविण्यासाठी ६० % सबसिडी मिळते. या योजनेला किसान ऊर्जा सुरक्षा उत्थान महाअभियान म्हणूनही ओळखले जाते." [३]

**३) प्रधानमंत्री फसल बिमा योजना :-**

"प्रधानमंत्री फसल बिमा योजना १८ फेब्रुवारी २०१६ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सुरू करण्यात आली. जीवन विमा ज्याप्रमाणे आपल्यासाठी महत्वाचा आहे. त्याचप्रमाणे शेती करणाऱ्या शेतकऱ्यांसाठीही पीक विमा महत्वाचा आहे. पिकांच्या नापिकीमुळे शेतकऱ्यांवर संकटे येवून मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असते. अनेक शेतकरी आत्महत्येसारखे पाऊल उचलतात. शासनाकडून वेळोवेळी शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी विविध योजना राबविल्या जातात. त्यातील एक पिकाच्या विम्यासाठी प्रधानमंत्री फसल विमा योजना सुरू केली आहे. यासाठी शेतकरी कमी दरात पिकांचा विमा काढून आपले नुकसान कमी करण्यासाठी मदत होते.

या योजनेसाठी सर्व शेतकरी अर्ज करू शकतात. याअंतर्गत ज्या शेतकऱ्यांची स्वत:ची जमीन नाही पण तो दुसऱ्याच्या जमिनीवर कामे करतो अश्यांना देखील या योजनेचा फायदा मिळतो. शेतकऱ्यांना नवीन आणि आधुनिक शेती पध्दतीचा अवलंब करण्यास प्रोत्साहित करणे, शेतकऱ्यांच्या उत्पादनातील जोखीम कमी करणे, कृषी क्षेत्राला पतपुरवठा सुनिश्चित करणे हे प्रधानमंत्री फसल बिमा योजनेचे उद्दिष्ट आहे. प्रधानमंत्री फसल बिमा योजना, देशातील शेतकऱ्यांना पिकांच्या नुकसानीपासून विमा संरक्षण देण्यासाठी सुरू करण्यात आली आहे. ही योजना २७ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशामध्ये कार्यरत आहे." [४]

**४) प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना :-**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जुलै २०१५ रोजी ही योजना सुरू केली. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेचा उद्देश प्रत्येक शेतकऱ्याच्या शेतात पाण्याची उपलब्धता करून देते. प्रत्येक शेतकऱ्याच्या शेतीस पाणी मिळणे, त्या पाण्यातून पिकाला जास्तीत-जास्त फायदा कसा होईल या योजनेचे उद्दिष्ट आहे. थोडक्यात या योजनेमध्ये नवीन जलस्त्रोत, पाणी साठवून ठेवण्याच्या पध्दती मोठा जलसाठी तयार करणे, अशी कामे केली जातात. तसेच अनेक प्रकारच्या सिंचनासाठी सरकारकडून अनुदान ही दिले जाते.

"शेतकऱ्यांना शेतीच्या सिंचनामध्ये आधुनिक पध्दतीचा वापर करण्यासाठी प्रोत्साहन देत आहे. ही योजना प्रति थेंब अधिक पीक हे ब्रीद वाक्य घेवून राबविली जाते. या योजनेचा लाभ अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना प्राधान्याने दिला जातो. सिंचनाखालील लागवडीयोग्य क्षेत्र वाढविणे, पाण्याचा अपव्यय टाळून जलवापर क्षमतेत वाढ करणे, तुषार व ठिबक सिंचन अशा पाणी वाचवणाऱ्या सिंचन पध्दतीच्या वापरात वाढ करणे शक्य झाले आहे. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेचा लाभ देतांना अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना ५५% तर इतर शेतकऱ्यांना ४५% अंशदान द्यावे असा निकष आहे. ५ हेक्टरपेक्षा कमी जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळतो. सन २०१९-२० मध्ये प्रधानमंत्री कृषिसिंचन योजनेचा लाभ महाराष्ट्रातील १ लाख ६४ हजार ६९२ शेतकऱ्यांना मिळाला आहे." [६]

**५) प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना :-**

ही योजना महाराष्ट्र राज्यात १ डिसेंबर २०१८ पासून राबविण्यात सुरुवात झाली. अल्प व अत्यल्प जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी केंद्र शासनाने ही योजना सुरू केली आहे. या योजनेतंर्गत पात्र

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

शेतकऱ्यांना शेतीसाठी वापरण्यासाठी दरवर्षी ६००० रूपये दिले जाते. हे ६००० रूपये शेतकऱ्यांना तीन टप्प्यात म्हणजे प्रत्येक टप्प्यात २००० रूपये दिले जातात. भारतातील रहिवाश्यांनाच या योजनेचा लाभ मिळतो. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना बँक खाते असणे आवश्यक आहे. ज्या कुटूंबाकडे २ हेक्टरपेक्षा कमी जमीन असेल त्यांनाच या योजनेअंतर्गत आर्थिक मदत मिळते.

"सरकारने पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत शेतकऱ्यांच्या बँक खात्यात १३ वा हप्ता जमा केला आहे. २०२३ पासून ज्या शेतकऱ्यांची के.वाय.सी. झाली आहे त्यांनाच हप्त्याची रक्कम दिली जाते. हे पैसे थेट शेतकऱ्यांच्या बँकेत हस्तांतरित केले जाते. शेतकऱ्यांना इकडे-तिकडे भटकावे लागत नाही. जे शेतकरी कर्जाची वेळेवर परतफेड करतील त्यांना शासनाकडून पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. जेणेकरून उर्वरित शेतकऱ्यांनीही कर्जाची वेळेत परतफेड करण्यास प्रोत्साहन मिळेल." [६]

**६) किसान क्रेडिट कार्ड योजना :-**

"किसान क्रेडिट कार्ड योजना ही भारत सरकारची महत्वपूर्ण योजना आहे. जी शेतकऱ्यांना वेळेवर कर्ज उपलब्ध करून देते. किसान क्रेडिट कार्ड योजना १९९८ मध्ये शेतकऱ्यांना अल्पकालीन औपचारिक कर्ज देण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आली. ही योजना कृषी आणि ग्रामीण विकासासाठी राष्ट्रीय बँकेद्वारे तयार करण्यात आली आहे. कृषी, मत्स्य व्यवसाय आणि पशुपालन क्षेत्रातील शेतकऱ्यांसाठी कर्जाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी योजना सुरू करण्यात आली आहे. ही योजना अल्प मुदतीचे कर्ज मिळवून देण्यासाठी आणि उपकरणे खरेदी करण्यासाठी तसेच त्यांच्या इतर खर्चासाठी क्रेडिट मर्यादा प्रदान करून मदत करते. शेतकऱ्यांना बियाणे, खते, कीटकनाशके तसेच उत्पादन गरजांसाठी रोख काढणे यासाठी किसान क्रेडिट कार्डचा वापर करता येतो. शेतकऱ्यांना पुरेशा आणि वेळेवर कर्ज मिळण्याची प्रक्रिया सुलभ करण्याच्या उद्देशाने आणली गेली आहे. किसान क्रेडिट कार्डच्या मदतीमुळे व्याजदर २ % इतका कमी आणि सरासरी ४ % पासून सुरू झाल्यामुळे बँकाद्वारे ऑफर केल्या जाणाऱ्या नियमित कर्जाच्या उच्च व्याजदरांपासून शेतकऱ्यांना सूट मिळते. या योजनेच्या माध्यमातून शेतकरी त्यांच्या पीक काढणीच्या कालावधीनुसार कर्जाची परतफेड करू शकतात. ही योजना वाणिज्य बँका, लघुवित्त बँका आणि सहकारी संस्थांद्वारे राबविण्यात येते." [७]

"किसान क्रेडिट कार्ड योजनेद्वारे शेतकरी कुटूंबांच्या वापराच्या गरजा पूर्ण करणे, शेतातील मालमत्तेच्या देखभालीसाठी खेळते भांडवल, शेतीशी निगडित जसे की दुग्धजन्य प्राणी, मत्स्यपालन तसेच फुलशेती, फलोत्पादन इत्यादी आवश्यक भांडवल उपलब्ध करून देते.

भारत हा प्रामुख्याने कृषिप्रधान देश मानला जातो. देशातील मोठी लोकसंख्या अजूनही शेतीतून उदरनिर्वाह करत आहे. देशाच्या जीडीपीमध्ये शेतीचा वाटा १७ ते १८ टक्क्यांपर्यंत आहे. अश परिस्थितीत सरकार शेतकऱ्यांच्या मदतीसाठी विविध योजना आणत असते. यापैकी महत्वाची एक योजना किसान क्रेडिट कार्ड योजना आहे. कृषी उत्पादन अनेक गोष्टीवर अवलंबून असते. ज्यामध्ये हवामान हा प्रमुख घटक आहे. अनेक वेळा वादळ, पूर, अतिवृष्टी आदिमुळे पिकांचे नुकसान होते आणि यासाठी शेतकऱ्यांना कर्ज काढावे लागते. अशा परिस्थितीत शेतकऱ्याची ही अडचण दूर करण्यासाठी ही योजना सुरू केलेली आहे. किसान क्रेडिट कार्ड मिळविण्यासाठी वय किमान १८ वर्ष असणे आवश्यक आहे. त्याचबरोबर वय ७५ वर्षापर्यंतचे शेतकरी या योजनेचा लाभ घेवू शकतात."[८]

**७) ग्रामीण भंडारण योजना :-**

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

"भारताची अर्थव्यवस्था शेतीप्रधान असून अन्नधान्य, डाळी, तेलबिया, ज्यूट, ऊस इ. पिकांचे उत्पादन होते. अन्नधान्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर वाढत असूनही शेतकऱ्याला उत्पादीत मालाला किफायतशीर किंमतही मिळत नाही कारण उत्पादित माल साठवण्याच्या अभावामुळे यासाठीच भंडारणाची आवश्यकता असते. शेतकरी घरात, खळयावर धान्य ठेवत असल्याने उंदीर, पक्षी, कीड यांच्यापासून धान्याचे नुकसान होते. मालाचा दर्जा घसरतो म्हणून उत्पादनाला योग्य किंमत मिळत नाही. शेतकऱ्याजवळ उत्पादन साठवणूकीची क्षमता नसल्याने तो आपला माल, काढणीनंतर लगेच बाजारात नेवून बाजारात असलेल्या भावानुसार आपला माल विकतो. मालाला योग्य किंमतही मिळत नाही. या सर्व गोष्टी लक्षात घेवून केंद्र सरकारने सन २००१-०२ पासून ग्रामीण भंडार / गोदाम योजना संपूर्ण देशासाठी लागू केली आहे. देशामध्ये कृषी उत्पादनाच्या साठवणूकीच्या पुरेशा सुविधा नसल्याने केंद्र शासनाने ग्रामीण भंडारण योजनेच्या माध्यमातून गोदामांचे जाळे संपूर्ण देशामध्ये पसरविण्याचे ठरविले आहे." [१]

ग्रामीण भागात अन्नधान्याच्या शास्रोक्त पध्दतीने साठवणूक क्षमतेत वाढ करण्यासाठी ग्रामीण भंडारण योजना असून या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांची धान्य प्रक्रिया केलेले शेती उत्पादन ग्राहकोपयोगी वस्तू तसेच कृषी उत्पादनांशी निगडीत आवश्यक साधन सामुग्री साठवणूकीची गरज भागविणे, शेती उत्पादनाचे प्रतवारी, प्रमाणीकरण यांना उत्तेजन देवून विक्री व्यवस्थेला चालना देणे तसेच कृषी उत्पादनाच्या सुगीच्या काळात कमी बाजारभावाने होणाऱ्या विक्रीस आळा घालणे हे या योजनेचे उद्दिष्ट सांगता येते. केंद्र सरकारच्या या योजनेतून शेतकऱ्यांना गोदामे बांधण्यासाठी कर्जही उपलब्ध करून दिले जाते. अनुदानाची सुविधाही दिली जाते. या योजनेतंर्गत उपलब्ध असलेल्या गोदामांचा लाभ घेवून शेतकरी आपला उत्पादीत माल दीर्घकाळ सुरक्षित ठेवून शकतात. जेणेकरून त्यांचे धान्य खराब होणार नाही. लाभार्थी शेतकरी गोदामे बांधण्यासाठी या योजनेअंतर्गत नियुक्त बँकांकडून कर्ज मिळवू शकतात. या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदार भारताचा नागरिक असून कायमचा रहिवासी असणे आवश्यक आहे. तसेच अर्जदार शेतकऱ्याकडे स्वत:ची शेतजमीन असणे आवश्यक आहे.

**समारोप :-**

वरील विवेचनावरून हे सांगता येते की, योजना व भारतीय शेती यांचा परस्परसंबंध दिसून येतो. भारतातील शेती ही निसर्गावर अवलंबून असल्याने शेतकऱ्याचे उत्पादन कधी कमी तर कधी जास्त येते. पूर, दुष्काळ, वादळ, भूकंप यामुळेही उत्पादनाचे नुकसान होते. शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर ही परिणाम होतो. शेतीसाठी आवश्यक असणारी खते, बियाणे, पंप, पाणी यासारख्या योजनांच्या माध्यमातून दूर करता येतात. तसेच भंडारण योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्याला आपला माल व्यवस्थित ठेवता येतो. आपल्या मालाचे नुकसान ही होत नाही. प्रस्तुत शोधनिबंधात केंद्र पुरस्कृत विकास योजनांचा भारतीय शेतीसाठी उपयोग सांगता येतात तसेच योजनांमुळे शेतकऱ्याचे उत्पादन वाढीलाही चालना मिळते. शासनाने शेतकऱ्यांसाठी योजनांच्या माध्यमातून शेतीसाठी विविध सुविधाही पूरविलेल्या दिसून येतात.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

**संदर्भ :-**

१) डॉ. नारखेडे व्ही. पी., डॉ. पाटील ए. एन, डॉ. शिंदे व्ही. एन., प्रा. पाटील के. एस., प्रा. खातळे व्ही. टी. – कृषी अर्थशास्त्र, अथर्व पब्लिकेशन्स, प्रथमावृत्ती 2015, पृ. 20

२) https://businessideasmarathi.in

३) https://www.mahayojanaa.in

४) https://businessideasmarathi.in

५) https://www.tv9marathi.com

६) https://www.adda247.com

७) https://www.mahayojanaa.in

८) https://maharashtratimes.com

९) https://mr.vikaspedia.in

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
*SPECIAL ISSUE ON MARATHI AARTHSHASHTRA PARISHED Nov. 2023*

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

# केंद्र सरकारच्या प्रमुख कृषी विकास योजना आणि भारतीय शेती व शेतकरी...

**डॉ प्रशांत एन. देशमुख,**
सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,
पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालय, औरंगाबाद
आजीवन सभासद क्रमांक 1605
मो.नो.8007393339, ई.मेल Prashantdeshmukh67@gmail.com

**प्रस्तावना**

2022 पर्यंत देशातील शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याची घोषणा मा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 2016 मध्ये केली होती त्यासाठी त्यांनी अंतर मंत्रालियन समिती स्थापन केली या समितीने काही शिफारशी देखील सुचवल्या होत्या त्यानंतर 2019 मध्ये पुन्हा समिती स्थापन केली गेली. या समितीने अभ्यासाअंती शेतकऱ्याचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी सात स्त्रोत्र सुचविले. त्यामध्ये त्यांनी पिकांची उत्पादकता वाढ, पशुधनाची उत्पादकता वाढविणे, शेतीच्या उत्पादन खर्चात कपात करणे, पिकांची घनता वाढविणे,अधिक उत्पादन व किंमत देणारी पिके, शेतकऱ्यांना मिळणाऱ्या शेतमालाच्या किमतीत वाढ करणे, तसेच शेतकऱ्यांचे शेती व्यवसायातून इतर व्यवसायात स्थलांतर करणे इत्यादी उपाय सुचवल्याचे दिसून येते. आता 2023 वर्ष संपत येत आहे आगामी काळात देश निवडणुकांना सामोरे जाणार आहे त्यामुळे उपरोक्त घोषणा व त्या अनुषंगाने सरकारने राबवलेल्या कृषी विकास योजना योग्य दिशेने आहेत का?केंद्र सरकारच्या कृषी योजनांची योग्य पद्धतीने अमलबजवणी  होते का? सरकारच्या योजनांचा लाभ सामान्य शेतकरी व शेतमजूर यांना होतो का? जगातील सर्वात मोठी पंतप्रधान पिक विमा योजना यशस्वी आहे का? शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या दृष्टीने सरकार राबवत असलेल्या विविध कृषी विकास योजना यातून भारतीय शेती व शेतकरी यांना फायदा होत आहे का? एकूनच शासकीय ध्येय व धोरणे हे देशातील कृषी विकासाच्या दृष्टीने पूरक आहेत का या व अशा अनेक प्रश्नांचा शोध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधातून केला गेल आहे.

2016 मध्ये स्थापन केलेल्या अशोक दलवाई समितीच्या शिफारशी नुसार 2022 पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी वार्षिक वाढीचा दर 10.4 टक्के असणे गरजेचे आहे.यानुसार नॅशनल सॅम्पल सर्वेंहेच्या अहवालात नमूद

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

केल्याप्रमाणे देशात एक हेक्टर पेक्षा कमी शेती असलेल्या कुटुंबाच्या उत्पन्नात वार्षिक वाढ 10.4% होती. परंतु राज्य निहाय त्यात तफावत असल्याचे दिसून येते. शिवाय यामध्ये वाढत जाणाऱ्या महागाईचा देखील विचार केला गेला नसल्याचे आढळते.देशातील शेतकरी कुटुंबाच्या जमीन धारण क्षेत्राचा विचार केल्यास 2018-19 मध्ये 86% कुटुंब ही अल्पभूधारक असल्याचे आढळते. याचाच अर्थ देशात जमिनीचे तुकडीकरण वाढल्याने शेती व शेतकऱ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे या अनुषंगाने केंद्र सरकारने कृषी विकासाच्या ज्या योजना राबवल्या त्याचे प्रमुख उद्दिष्ट व उद्दिष्ट पूर्ती यात आंतर असल्याचे दिसून येते. कृषी तज्ञ देवेंद्र शर्मा यांनी सांगितले की 2016 मध्ये 2022 पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याची घोषणा झाली तेव्हा त्यांच्या खऱ्या उत्पन्नाबाबत कुणालाच कल्पना नव्हती, तर आर्थिक पाहणी अहवालानुसार देशातील सतरा राज्य अशी होती की ज्यांचे वार्षिक सरासरी उत्पन्न 20000 रुपये होते. यात शेतीतून मिळणारे प्रतिदिन उत्पन्न केवळ 27 रुपये असल्याचेही त्यांनी नमूद केल्याचे दिसून येते.

केंद्र सरकारच्या प्रमुख कृषी योजना

भारतातील बहुतांश लोकसंख्या ही जीवन जगण्यासाठी शेती आणि संबंधित कामावर अवलंबून आहे. अर्थव्यवस्थेच्या जीडीपी मध्ये देखील कृषी क्षेत्राचा मोठा वाटा असल्याचे दिसून येते. शेतकऱ्यांना चांगले आणि शाश्वत जीवन जगता यावे इतर क्षेत्राप्रमाणेच कृषी क्षेत्राचा विकास व्हावा, कृषी क्षेत्रात जास्तीत जास्त उत्पादन आणि रोजगार निर्मिती करून शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे. शेतकऱ्यांसाठी राबवलेल्या कृषी विकास योजनातून शेतकरी समुदायाचे त्यांच्या शेतीविषयक ध्येय धोरणांचे नियोजन करण्यास मदत करताना या अनुषंगाने केंद्र सरकारने कृषी विकासाचा दृष्टीने राबवलेल्या काही निवडक योजनांच्या येथे आढावा घेतला आहे

**1. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना**

केंद्र सरकारने 2015 मध्ये सुरू केलेली ही योजना अत्यंत महत्त्वाची असून शेतीचे उत्पादन वाढवणे, जलस्त्रोत्रांच्या कार्यक्षमतेने वापर सुनिश्चित करणे, सिंचना खालील क्षेत्र वाढवणे आणि पाण्याची कार्यक्षमता सुधारणे हे या योजनेचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

प्रत्येक शेतासाठी पाणी हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून शेतीला खात्रीशीर सिंचन प्रदान करणे तसेच उपलब्ध असलेल्या पाण्याचा योग्य वापर करणे यावर केंद्र सरकारने भर दिल्याचे दिसून येते. पाण्याचा उच्चतम वापर व कृषी उत्पादकता वाढवण्यासाठी ठिबक सिंचन, स्प्रिंकलर आणि अचूक सिंचन यासारख्या सिंचन तंत्राचा वापर करून पाण्याचे सुयोग्य नियोजन व व्यवस्थापन यावर देखील या योजनेला भर दिल्याचे दिसून येते. 2017- 18 मध्ये 687.64 कोटी रुपये 2018 -19 मध्ये 415.95 कोटी तर 2019- 20 मध्ये 402.14 कोटी रुपयांची मदत या योजनेअंतर्गत केल्याचे दिसून येते. 2019- 20 मध्ये महाराष्ट्रातील 1 लाख 64 हजार 692 शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ झाला. तसेच या योजनेद्वारे 1 लाख 23 हजार 300 हेक्टर क्षेत्र नव्याने सूक्ष्म सिंचनाखाली आणले गेल्याचे आढळते. केंद्र सरकारने 2021 ते 2026 पर्यंत या योजनेस मुदतवाढ देऊन या योजनेसाठी 93068 कोटी रुपयांची तरतूद केल्याचे दिसून येते.

**2) परंपरागत कृषी विकास योजना**

केंद्र सरकारने 2015 मध्ये शेतकऱ्यांसाठी ही योजना सुरू केली. भारतातील सेंद्रिय शेतीस प्रोत्साहन देणे, जमिनीची सुपीकता वाढवणे, शाश्वत शेतीला चालना देणे, पौष्टिक कृषी मालांचे उत्पादन सुनिश्चित करणे. थोडक्यात म्हणजे दीर्घकालीन जैविक शेतीचे मॉडेल विकसित करणे जे पारंपारिक ज्ञान व आधुनिक विज्ञान यास जोडेल असा या योजनेचा उद्देश आहे.सरकार परंपरागत कृषी विकास योजना आणि मिशन ऑरगॅनिक व्हॅल्यू चेन डेव्हलपमेंट फॉर नॉर्थ ईस्ट रिजन या दोन योजनांद्वारे सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देत आहे. नोव्हेंबर 2022 पर्यंत ईशान्य भारतात 6.4 लाख हेक्टरवर 32384 समूह आणि 16.1 लाख शेतकऱ्यांचा या योजनेमध्ये समावेश करण्यात आला आहे. एवढेच नाही तर सरकारने या योजनेद्वारे आठ राज्यांमध्ये 4.09 लाख हेक्टर जमीन नैसर्गिक शेती खाली आणली असल्याचे दिसून येते.

**3) प्रधानमंत्री पीक विमा योजना**

जानेवारी 2016 मध्ये प्रधानमंत्री पिक विमा योजना देशभरात सुरू करण्यात आली नैसर्गिक आपत्ती, कीटक, रोगराई इत्यादीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना वीमा संरक्षण व आर्थिक आधार देणे. शेतीमध्ये टिकून

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

राहण्यासाठी शेतकऱ्यांचे उत्पन्न स्थिर करणे, नवीन व आधुनिक शेतीसाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणे व एकूणच देशातील शेतकऱ्यांच्या जीवनात स्थिरता आणण्याचा प्रयत्न करणे हे या योजनेचे उद्दिष्ट होते. खरीप पिकांसाठी 2 टक्के प्रीमियम, रब्बीसाठ 1.5 टक्के तर व्यापारी पिकांसाठी 5 टक्के प्रीमियम आकारला जातो. देशातील तत्कालीन गृहमंत्री राजनाथ सिंह यांनी "कम प्रीमियम और बडा बिमा" असा या योजनेचा उल्लेख करून ही योजना शेतकऱ्यांसाठी केवळ सुरक्षा कवच म्हणून काम करणार नाही, तर शेतकऱ्यांच्या कुटुंबातील आर्थिक अनिश्चितता दूर करेल त्यांच्या जीवनात बदल घडवेल असे म्हटले होते. या योजने अंतर्गत 2016 ते 2019 या चार हंगामात सरकारने शेतकऱ्यांसाठी 55 हजार कोटी प्रीमियम भरल्याचा दावा केल्याचे दिसून येते. एवढेच नाही तर देशातील 12 कोटी शेतकऱ्यांना 42 हजार कोटी रुपये या योजनेमार्फत वाटले गेल्याचेही म्हटले आहे. देशाच्या अर्थमंत्री निर्मला सीतारमन यांनी आर्थिक सर्वेक्षण अहवालात सांगितले की,ही योजना जगातील सर्वात मोठी पीक विमा योजना आहे.या योजनेसाठी दरवर्षी सरासरी 5.5 कोटी अर्ज प्राप्त होतात या योजनेत 2022 पर्यंत शेतकऱ्यांनी 25186 कोटी प्रीमियम भरला तर 1.2 लाख कोटीचे दावे प्राप्त केल्याचे त्यांनी आर्थिक सर्वेक्षण अहवालात नमूद केल्याचे दिसून येते.

असे असले तरीही या योजनेतील काही त्रुटींमुळे या योजनेबद्दल शंका व्यक्त केली जाते. पीक विमा योजना ही शेतकऱ्यांसाठी नाही तर कंपन्यांच्या फायद्यासाठी आहे असा आरोप शेतकरी व अभ्यासक करत असल्याचे आढळून येते. जेष्ठ पत्रकार पी. साईनाथ यांच्या मते गेल्या दोन वर्षात पीक विमा योजनेत सहभागी कंपन्यांना 15795 कोटीचा नफा झाला जो एक दिवसासाठी 11 कोटी एवढा आहे. ते पुढे म्हणतात की केंद्र व राज्य सरकारने 2016 ते 2019 या तीन वर्षात 67 हजार कोटी प्रीमियम भरला जो मूळ राफेल कराराच्या किमतीपेक्षा (58 कोटी) खूप जास्त आहे म्हणून ही पीक विमा योजना राफेल पेक्षा मोठा घोटाळा असल्याचे त्यांनी म्हटल्याचे दिसून येते. पीक विमा योजना ही आधारशी लिंक केल्याने यातील सहभाग खालांवत जात असल्याची कबुली कृषी राज्यमंत्री पुरुषोत्तम रुपाला यांनी संसदेत दिल्याचे आढळते. शिवाय शेतकऱ्यांना मिळणारा लाभ हा फार उशिराने मिळतो त्यांच्या पैशाची आडवणुक होते.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

याबद्दल शेती प्रश्नाचे अभ्यासक राजन क्षीरसागर म्हणतात की. 'पीक कापणीनंतर दोन महिन्यात विमा लाभ शेतकऱ्यांना मिळायला हवा असा नियम आहे असे असतानाही पिक विमा कंपन्या महिनो महिने शेतकऱ्यांचे पैसे अडवून ठेवतात' त्यामुळे सध्या या योजनेस जास्त शेतकरी सहभागी होत नसल्याचे मत त्यांनी नोंदवल्याचे दिसून येते. याचाच अर्थ असा की पीक कापणी नंतर दोन महिन्यात विमा दावा क्लिअर करणे हा नियम असतानाही शेतकऱ्यांच्या पदरात मात्र योग्य वेळी रक्कम पडत नाही म्हणजेच या योजनांची योग्य प्रकारे अंमलबजावणी होत नसल्याचे दिसून येते. यावर कृषी मंत्री राधा मोहन सिंह यांनी जुलै २०१८ मध्ये संसदेत एका प्रश्नाचे उत्तर देताना म्हटले होते की ज्या विमा कंपन्या शेतकऱ्यांना पीक विम्याचा दावा दोन महिन्याच्या आत क्लियर करणार नाहीत अशा कंपन्यांना 12 टक्के व्याजासह विम्याची रक्कम संबंधित शेतकऱ्यांना द्यावी लागेल. एकूणच प्रधानमंत्री पिक विमा योजनेत काही त्रुटी होत्या यासाठी महाराष्ट्र शासनाने नुकताच केवळ एक रुपयात शेतकऱ्यांना पीक विमा ही योजना खरीप हंगाम 2023 पासून सुरू केल्याचे दिसून येते. एवढेच नव्हे तर महाराष्ट्र शासनाने 2023-24 ते 2025-26 या तीन वर्षाचा पिक विमासाठी 1265 कोटी रुपये पिक विमा कंपन्यांना वितरित केल्याचे आढळून येते.याचाच अर्थ एका नव्या स्वरूपात व कमी खर्चात ही योजना शेतकऱ्यांना मिळू शकते,जर तिची अंमलबजावणी योग्य पद्धतीने झाली तर ही योजना शेतकऱ्यांसाठी फायद्याची ठरू शकते.

**4) पंतप्रधान शेतकरी सन्मान योजना**

ही योजना केंद्रातील क्षेत्रीय योजना असून याची सुरुवात 24 फेब्रुवारी 2019 ला अल्पभूधारक शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य प्रधान करण्याच्या उद्देशाने झाली होती.या योजनेनुसार पात्र शेतकऱ्यांना प्रतिवर्षी 6000 रुपये उत्पन्न उपलब्ध करून दिले जाते. हे उत्पन्न शेतकऱ्यांना 2000 रुपये प्रति तीन समान हप्त्यात वितरित केले जातात. सुरुवातीस केवळ अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी असणारी ही योजना में 2019 पासून सर्वच शेतकऱ्यांसाठी लागू करण्यात आली. या योजनेमुळे केंद्र सरकारवर वर्षाला 75000 करोड रुपयांचा भार पडत असल्याचे दिसून येते. ही योजना सुरू झाल्यापासून 2021 पर्यंत 1,10000 कोटी रुपये वितरित करण्यात आले असून 10.59 कोटी शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेतल्याचे दिसून येते. असे असले तरीही मोठमोठे शेतकरी, नोकरदार यांच्या खात्यावर देखील पैसे जमा होऊन या योजनेमध्ये मोठा भ्रष्टाचार झाल्याचे बोलले जात आहे.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

5) **पंतप्रधान शेतकरी मानधन योजना**

केंद्र सरकारने लहान शेतकरी व अल्पभूधारक शेतकऱ्यांना सामाजिक सुरक्षितता मिळवून देण्यासाठी पंतप्रधान शेतकरी मानधन योजना सुरू केलेली आहे. 2019 पासून ही योजना राबवली जाते शेतकऱ्यांना वृद्धकाळात सामाजिक सुरक्षितता प्राप्त व्हावी त्यांचे जीवन सुकर व्हावे म्हणजेच त्यांना सामाजिक सुरक्षितता आणि आर्थिक स्वातंत्र्य प्राप्त व्हावे,या उद्देशाने ही योजना सुरू केलेली आहे. भारतीय जीवन विमा निगम (एलआयसी) सोबत भागीदारी करून ही पेन्शन योजना कार्यान्वित केली गेली आहे. ही योजना ऐच्छिक पेन्शन योजना आहे ज्यात 18 वर्षे ते 40 वर्षापर्यंतच्या शेतकऱ्यांना सहभागी होता येते. शेतकऱ्याला वय वर्ष साठ पर्यंत 55 रुपये ते 200 रुपये पर्यंत प्रीमियम स्वतः भरावां लागतो तेवढेच सरकार देखील भरते. वय वर्ष साठ पर्यंत गेल्यावर शेतकऱ्याला दरमहा 3000 रुपयाची रक्कम प्राप्त होते.

ज्यांच्याकडे दोन हेक्टर पेक्षा कमी धारण क्षेत्र आहे असे शेतकरी या योजनेत सहभागी होऊ शकतात. देशात 2019 च्या अंतिम अहवाला नुसार 1829469 शेतकरी या योजनेत सहभागी झाल्याचे आढळते. भारतातील सुमारे तीन कोटी लहान व अल्पभूधारक शेतकऱ्यांची जीवन सुरक्षित करणे हा खरा या योजनेचा गाभा आहे. प्रश्न एवढाच आहे की शेतकऱ्यांना मिळणारे पेन्शन हे वय वर्ष साठ नंतर मिळते भारतातील सरासरी आयुर्मानाचा व त्यातल्या त्यात कष्टकरी शेतकऱ्यांच आयुष्य साठीनंतर किती असू शकते? याचा शासनाने गांभीरपणे विचार करणे गरजेचे आहे.

**6) राष्ट्रीय कृषी बाजार किंवा इ-नाम**

मध्यस्तांच्या शोषणापासून नफेखोरीपासून शेतकऱ्यांना मुक्त करणे, ज्यामुळे ते आपला शेतमाल वाजवी दरात विकू शकतील. हा उद्देश समोर ठेवून केंद्र सरकारने राष्ट्रीय कृषी बाजार अर्थात इ-नाम योजना राबवली. ई – नाम हे ऑनलाईन ट्रेडिंग पोर्टल आहे याच्या माध्यमातून शेतकरी घरबसल्या देशाच्या कोणत्याही भागात आपला शेतमाल विकू शकतो. ऑनलाइन नोंदणी व विक्री केल्याने साठवणूक व वाहतूक खर्चातून शेतकऱ्यांची मुक्ती होते. शिवाय बाजारातील अडते व व्यापारी यांच्या शोषणापासून शेतकऱ्यांची मुक्तता होते. 2021 पर्यंत देशातील 18 राज्यात

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

आणि तीन केंद्रशासित प्रदेशांमध्ये 1000 बाजारांचे इ-नाम मंचामध्ये एकीकरण करण्यात आल्याचे आढळते 1.68 कोटी शेतकरी व 1.52 लाख व्यापाऱ्यांनी या मंचामध्ये नोंदणी केल्याचे दिसून येते. 2021 पर्यंत या पोर्टलच्या माध्यमातून 1.15 लाख कोटी रुपये मूल्याच्या 3.94 कोटी मॅट्रिक टन मालांची विक्री झाल्याचे आढळते.

एकूणच केंद्र सरकार व राज्य सरकार शेतकऱ्यांसाठी विविध विकास योजना राबवते प्रधानमंत्री कुसुम योजना, कुपनलिका योजना ,आत्मनिर्भर भारत अभियानांतर्गत कृषी पायाभूत सुविधा निधी योजना सूक्ष्म सिंचन निधी योजना किसान क्रेडिट कार्ड अशा अनेक योजनांचा उल्लेख येथे करता येईल. अशा बहुतांश कृषी विकास योजना राबवल्या जात असल्या तरी शेतकऱ्यांची सर्वात मोठी समस्या म्हणजे त्यांच्या शेतमालाला मिळणारा कमी भाव. नुकत्याच झालेल्या एका अभ्यासातून असे दिसून आले आहे की उत्पादनाच्या उर्जेवर आधारित योग्य किंमत आणि शेतीच्या मजुरीचे औद्योगिक वेतनाशी समीकरण करणे शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरू शकते. भारतात कोल्ड स्टोरेजचा अभाव आणि कापणी खराब होण्यामुळे 30% पेक्षा जास्त शेतकऱ्यांचे उत्पादन वांया जाते.

जी. ओ. आई. च्या अलीकडील आकडेवारीनुसार जवळपास 100 दशलक्ष लोक भारतात असे आहेत ज्यांची शेती दोन हेक्टर पेक्षाही कमी आहे. 2020 पर्यंत भारतात एकूण श्रमांपैकी जवळपास 41.49% श्रम हे शेतीशी निगडित आहेत तर एकूण आत्महत्यापैकी 11.2% आत्महत्या शेतकरी आत्महत्या असल्याचे आढळते. शेतकरी आत्महत्याचे कारणांचा विचार केल्यास शेतकरी विरोधी कायदे, अतिरिक्त कर्जाचा बोजा, सरकारचे धोरण, अनुदानातील भ्रष्टाचार, मानसिक, वैयक्तिक आणि कौटुंबिक समस्या पीक अपयश असे वेगवेगळे कारण निदर्शनास येतात. 2013 ते 2019 दरम्यान शेतकऱ्याचे उत्पन्न 30 टक्क्यांनी तर त्यांचे कर्ज सुमारे 58 टक्क्यांनी वाढल्याचे एनसीआरबीच्या अहवालात नमूद केल्याचे दिसून येते. ज्या देशात 50 टक्के जनता शेतीवर अवलंबून आहे तिथं शेतीच्या समस्यांचे मूळ शोधण्यात प्रश्नाचे निवारण करण्यात आजवर एकही सरकारने पुढाकार घेतल्याचे दिसत नाही.साऱ्याच राजकीय पक्षांनी शेतकऱ्यांसाठी फक्त तात्पुरता स्वरूपात मदतीच्या गोष्टी केल्या आणि शेतकऱ्यांना झुलवत ठेवले. सरकार शेतकऱ्यांना अन्नदाता संबोधते त्यांच्या करता योजना जाहीर करते खरे मात्र मूळ समस्येला हात न घालता केवळ सवलतीची खैरात केल्याने शेतकऱ्याचे सरकार वरील अवलंबित्व वाढत असल्याचे दिसून येते.स्वाभिमानाने पैसे

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
*SPECIAL ISSUE ON MARATHI AARTHSHASHTRA PARISHED Nov. 2023*

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

कमवणाऱ्या शेतकऱ्यांना हक्क हिरावून घेत शेतकऱ्यांना पंगू करण्यातच प्रत्येक सरकारला स्वारस्य असल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष**:

केंद्र सरकार पुरस्कृत कृषी विकास योजनांचा आढावा घेतल्यानंतर भारतीय शेती व शेतकरी यांच्या संदर्भात काही महत्त्वाचे निष्कर्ष आढळून येतात. केंद्र सरकारच्या कृषी योजना शेतकऱ्यांसाठी असल्या तरीही त्या योग्य दिशेला आहेत असे आढळत नाही, केवळ योग्य अमल बजावाणी मुळे योजना सामान्य शेतकऱ्या पर्यंत पोहचत नाहीत व शेतकरी लाभापासून वंचित राहत असल्याचे दिसून येते. पंतप्रधान पिक विमा योजनेसारखी महत्त्वाकांक्षी योजना महाराष्ट्र सरकारच्या धरतीवर देशभर लागू केल्यास तिची यशस्वीता वाढू शकते. त्यामध्ये ज्या त्रुटी आहेत त्या दूर करून शेतकऱ्यांसाठी ती योजना एक आधार ठरू शकते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे शासकीय ध्येय धोरणे हे शेतकऱ्यांसाठी अनुकूल असावे शेतकऱ्यांच्या मालाला जास्त भाव, भावाची हमी आणि योग्य वेळेला त्याला कर्जाची उपलब्धता अशा काही दूरगामी उपाय योजनातून खऱ्या अर्थाने शेतकऱ्याचे हित साध्य करता येऊ शकत. शेतकरी सन्मान योजनेची पुनर मांडणी करून बोगस लाभार्थ्यांना यातून वगळले गेले पाहिजे. शेतकऱ्यांना मिळणारी पेन्शन ही देशातील सरासरी आयुर्मानाचा विचार करून दिली जावी जर ही शेतकऱ्यांना वय वर्ष 50 पासून मिळाली तरच तिचा फायदा शेतकऱ्यास घेता येऊ शकतो यावरही शासनाने विचार करणे गरजेचे असल्याचे दिसून येते. आज घडीला शेतकऱ्यांचे आर्थिक सबलीकरण करण्याची वेळ आली असून त्यासाठी एकूणच कृषी विषयक धोरणाची पुनः मांडणी करून योग्य योजना व त्यांची अंमबजावणी करण्याची गरज असल्याचे आढळते.

**समारोप**

भारत हा कृषिप्रधान देश आहे देशातील कृषी क्षेत्रावर अवलंबून असणाऱ्यांच प्रमाण मोठ आहे. मुळात देशातील शेती व शेतकऱ्यांचा मूळ प्रश्न समजून घेणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांना उत्पादन खर्चावर आधारित किंमत मिळाली, त्याच्या शेतमालाचे योग्य बाजार मूल्य मिळाले तर अनेक प्रश्न सुटू शकतात. शेतीचा वाढता उत्पादन खर्च (पिक काढणीनंतरचा सुद्धा ) आणि त्याला एमआरपी ऐवजी एम एस पी (किमान आधारभूत किंमत) मिळणारी किंमत यात

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

मोठी तफावत आढळते. म्हणून आधारभूत किमत काढताना उत्पादन खर्च अधिक काढणीनंतरचा खर्च अधिक शेतकऱ्याची स्वतःची मेहनत अधिक महागाईचा दर इत्यादी बाबींवर अभ्यास करून शेतमालाच्या योग्य किमती ठरल्या पाहिजे. शेतकऱ्यांचे जीवन समृद्ध करण्यासाठी सरकारने कृषी धोरणात बदल करणे अत्यंत गरजेचे आहे. शेतकऱ्यांचे आर्थिक सबलीकरण करण्यासाठी शेतकऱ्यांना सवलती देण्यापेक्षा त्यांना स्वाभिमानाने जगण्याचे बळ देणारी यंत्रणा उभारणे ही काळाची गरज आहे तरच या देशातील शेतकरी सुखाने जीवन व्यतीत करेल. आणि सामाजिक आर्थिक समानतेचे स्वप्न साकारले जाईल.

**संदर्भ** :


- ॲग्रोवन 13 फेब्रुवारी 2022
- कृषी योजना डिसेंबर 26, 2021
- श्रीकांत बंगाळे यांचा बी. बी. सी. न्यूज मराठी वरील लेख पिक विमा योजनेचा फायदा कोणाला अधिक होते शेतकऱ्यांना किंवा कंपन्यांना 17 ऑगस्ट 2019
- ॲग्रो स्टार कृषी ज्ञान 19 सप्टेंबर 2022
- सुचिता देशपांडे, ओब्झरव्ह रिसर्च फाउंडेशन, शेतकरी आजही आर्थिक पारतंत्र्यातच 18 सितंबर 2019
- दैनिक लोकमत 21 जुलै 2018
- http://pib.gov.in
- NCRB Government of India report
- भारत सरकारचा आर्थिक पाहणी अहवाल 2022 23

**INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES**
***SPECIAL ISSUE ON MARATHI AARTHSHASHTRA PARISHED Nov. 2023***

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

# मानवी भांडवलाच्या विकासात श्रमिकाचे योगदान: सैद्धांतिक विश्लेषण

**प्रा.डॉ .रमेश तुकाराम काशिदे**
अर्थशास्त्र विभाग
पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे आण्णासाहेब वाघिरे महा. ओतूर आजीव सभासद क्रमांक - १४९३
**प्रा.समीर महादेव कुंभारकर**
अर्थशास्त्र विभाग
पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे वाघिरे महा.सासवड, आजीव सभासद क्रमांक – १८९८

**गोषवारा**

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेमध्ये मानव हा विकासाचा महत्त्वाचा घटक समजला जातो एकूणच जगाच्या पाठीवर विकासाची प्रक्रिया सुरू करणारा व सजीव सृष्टी मध्ये बुद्धिगुणांक चांगला असल्यामुळे विकासाच्या प्रक्रियेला वृद्धीकडे नेण्यासाठी प्रयत्नशील असणारा घटक म्हणजे मानव होय. मानवांप्रमाणे इतर प्राण्यांकडे बुद्धिगुणांक नाही का तर तो आहे.पण मानव आपले श्रम वापरून संघटन उभे करतोमाणूस जेव्हा उत्पादन तंत्राचा वापर करून स्वत .चा विकास साधतो इतरांना तो करता येत नाही . मानव गरजा पूर्ण करतो तेव्हा तो संघटन कौशल्याबरोबरच श्रमिक बनूनही उभा असतो मानवी भांडवलाला पैसामानवी श्रमाचे . देय म्हणून न पाहता आर्थिक विकासाच्या व बुद्धीच्या प्रक्रियेचे केंद्र म्हणून पाहिला हवे .मानवी श्रमाचे जेव्हा शिक्षण आणि प्रशिक्षण, आणि त्याचबरोबर कौशल्यपूर्ण सुशिक्षित मनुष्यबळ तयार करणे हे हे घटक महत्वाचे ठरतात. नोबेल पारितोषिक विजेते गॅरी बेकर यांनी मानवी भांडवलाच्या औपचारिक सिद्धांत मांडणी अतिशय व्यवस्थित पणे केली असे मला वाटते १९६० च्या दशकात गॅरी बेकर यांनी या विषयाची अतिशय विस्तृतपणे मांडणी करताना आर्थिक परिणाम निश्चित करताना शिक्षण, प्रशिक्षण आणि मानव भांडवलाच्या इतर प्रकारांमध्ये गुंतवणुकीवर भर दिला वैयक्तिक आणि सामाजिक संपत्ती बरोबरच ज्यांच्यामुळे उत्पादकता प्रभावीत होते अशा विस्तृत घटकांचा विचार करून अर्थशास्त्राचा विकास करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. देशाच्या आर्थिक विकासात श्रमिकाच्या कौशल्याच्या व बुद्धिमत्तेच्या जोरावर त्याने प्राप्त केलेल्या ज्ञानाच्या जोरावर प्रगती केली आहे हा महत्त्वाचा भाग व त्याच्याकडे असलेल्या चांगल्या आरोग्याच्या जोरावर मानवी भाडवलाच्या मदतीने जगातील बहुतांश देशाचा आर्थिक विकास झालेला आहे.व्यवसाय संस्थांनी मानवी भांडवला केलेले गुंतवणूक त्यांच्या विकासात महत्त्वाची भूमिका पार पडतात .उदाहरणार्थ दगड खाणीत काम करणाऱ्या कामगाराला चांगल्या प्रतीचे प्रशिक्षण दिले गेलं त्याला आरोग्याच्या चांगल्या सुविधा उपलब्ध करून दिल्या तर यामुळे त्या व्यवसाय संस्थेची नक्कीच उत्पादनाची पातळी सुधारेल.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

**प्रस्तावना :**

जगातील विकसित राष्ट्रांमध्ये व अल्पविकसित राष्ट्रांमध्ये सामाजिक व आर्थिक अभ्यास करण्यासाठी विविध निर्देशांक वापरले जात आहेत. त्या निर्देशांकाच्या आधारे मानवी श्रमाला महत्त्व प्राप्त करून देणे. त्याच्या बौद्धिक कौशल्यांना संधी उपलब्ध करून देणे. निर्देशांकाची संकल्पनेत शिक्षण आरोग्य आणि कौशल्य इत्यादी घटकांचा पूर्ण क्षमतेने वापर करून घेणे हे मानवी भांडवलाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. गॅरी बेकर यांच्या मते तरुण व्यक्ती जास्त वेळा नोकरी बदलू शकते त्याच बरोबर अनेक योग्य प्रशिक्षण घेवू शकतात.पण श्रमाची विभागणी बाजाराच्या व्याप्ती नुसार मर्यादित असते . एखाद्या घटकाचा सामाजिक विकास होताना त्याच्यासाठी विकासाच्या संधी उपलब्ध करून देणे महत्त्वाचा भाग ठरतो. 2018 मध्ये जागतिक बँकेने मानव विकास निर्देशांकाची संकल्पना मांडली शिक्षणा आरोग्य आणि कौशल्याच्या क्षेत्राला महत्त्वाचे स्थान प्रदान केले. या सर्व घटकांच्या साह्याने चांगल्या प्रतीचा श्रमिक वर्ग तयार करणे आणि त्या श्रमिक वर्गाचा वापर चांगल्या प्रकारच्या उत्पादनासाठी करणे महत्त्वाचे ठरते. जर तो खनिज काम करणारा असंघटित कर्मचारी असेल तर त्याच्या विकासाचे द्वारे त्याच्यासाठी भौतिक सुविधा उपलब्ध करून देऊन उघडणे शक्य आहे. त्याचबरोबर तो करीत असलेल्या श्रमाचा हिस्सा म्हणजेच त्याच्या श्रमाचा मोबदला त्याला प्राप्त व्हायला हवा. श्रमिकाने उत्पादन वाढीसाठी मदत करावी असे जर व्यवसाय संस्थांना वाटत असेल तर श्रमिकाला आवश्यक असणाऱ्या भौतिक सुविधा उपलब्ध करून द्यायला हव्यात.मानवी भांडवल सिद्धांत या संकल्पनेचे श्रेय अनेकदा अर्थशास्त्राच्या संस्थापक असणाऱ्या ॲडम स्मिथ यांना दिले जाते.ॲडम स्मिथ ने याविषयी असे सुचवले आहे की संबंधित नोकऱ्या करण्यात सापेक्ष सुलभतेवर किंवा अडचणीवर आधारित आहे.

कार्ल मार्क्स यांनी श्रमशक्ती असे संबोधन करून मानवी भांडवलाची कल्पना सुचवली त्यांच्या मते भांडवालशाही व्यवस्थेत लोक उत्पन्नाच्या बदल्यात त्यांची श्रमशक्ती मानवी भांडवल विकतात.यावरून असे म्हणता येईल की खाणीत काम करणारा कर्मचारी त्याचे त्याचे श्रम विकून उत्पन्न प्राप्त करून घेत असतो. आणि त्या मिळालेल्या उत्पन्नातूनच त्याच्या भौतिक गरजांची पूर्तता होते.

या संशोधन लेखाचा उद्देश मानवी श्रमाचा वापर भांडवल निर्मितीसाठी कसा होतो आणि त्याच श्रमाचा वापर करून भौतिक गरजा कश्या पूर्ण केल्या जातात या कडे लक्ष केंद्रित करण्याबरोबरच मानवी भांडवल सक्षम करण्यासाठी श्रमा बरोबरच मानवाचे आरोग्य ,शिक्षण ,प्रशिक्षण आणि त्याची संधी शाश्वत स्वरुपात कशी प्राप्त होईल याचा विचार करणे आहे .

**संशोधन पद्धतीचा वापर :**

सादर केलेल्या संशोधन साहित्यात दुय्यम साधन सामग्रीचा वापर केला आहे . यामध्ये अर्थशास्त्रात अभ्यासले जाणारे अर्थशास्त्रीय सामाजिक अध्ययन, सामाजिक व आर्थिक तर्क व तत्वाचा वापर केला असून मानवी भांडवल संकल्पना तसेच त्या संदर्भात सामाजिक व आर्थिक समस्येबाबत विश्लेषण केले आहे .. संशोधांसाठी संशोधन पुस्तके, संशोधन लेख, वृत्तपत्रे ,मासिके , इंटरनेट व उपलब्ध असणाऱ्या अहवालांचा अभ्यास केला आहे.तसेच अर्थशास्त्रीय आर्थिक विचार यांचा देखील वापर केला आहे .

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

**संदर्भ साहित्याचा आढावा:**

प्रस्तूत लेखासाठी गतकालीन संदर्भ साहित्याचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे घेण्यात आलेला आहे.

१) Gary S Becker यांनी लिहिलेल्या Human Capital या third Ad मध्ये मानवी भांवालामधील सामान्य गुंतवणूकदार हा अधिक आवेग पूर्ण असतो आणि अशा वेळी त्यांनी केलेली गुंतवणुक जास्त धोक्याची असते.श्रामिकाची क्षमता आणि त्याची काम करण्याची गुणवत्ता तपासून पाहणे महत्वाचे ठरते.त्याच्या श्रमाची विभागणी हि बाजाराच्या व्याप्तीवर अवलंबून असते .

२) Phillip Brown, Hugh Lauder and Sin Yi Cheung यांनी लिहिलेल्या The death of Human Capital या ग्रंथात मानवी भांडवलाच्या सिधान्तिक विकासासाठी एकविसाव्या शतकात निर्माण निर्माण झालेली नोकरीची कमतरता आणि त्याचे मानवी जीवनावरील परिणाम विचारात घेणे महत्वाचे आहे. लोक मोठे प्रयत्न करून रोजगार निर्मितीचे साधन शोधतात .

३) John F Tomer यांनी लिहिलेल्या Integrating Human Capital With Human Development या पुस्तकात आवश्यक प्रकारच्या अमूर्त भांडवलामध्ये योग्य गुंतवणूक द्वारे कमतरता दुआर करणे हा एक उपायाचा भाग आहे सामाजिक आर्थिक समस्यांचे निराकरण झाल्यानंतर किवा लक्षणीय रित्या कमी झाल्यानंतर राहणीमानाचा दर्जा वाढणे अपेक्षित आहे .

४) Martin Patrick and Vishakha Varma यांनी लिहिलेल्या पुस्तकाच्यामते मानवी भांडवलाच्या विश्लेषणनातून असे दिसून आले आहे कि लोक स्वतामध्ये शिक्षण नोकरी प्रशिक्षण आणि इतर मार्गाने गुंतवणूक करतात .आधुनिक अर्थव्यवस्थेत ज्ञानाचे महत्व हे सूचित करते कि अर्थव्यवस्थेसाठी मानवी भांडवल हे महत्वाचे रूप आहे .

**उद्दिष्टे :**

१) मानवी भांडवल संकल्पना अभ्यासने .
२) मानवी भांडवलाच्या विकासात मानवी श्रमाच्या योगदानाचा अभ्यास करणे .
३) मानवाच्या विकासात शिक्षण आरोग्य व प्रशिक्षण यांच्या योगदानाचा अभ्यास करणे
४) मानवी भांडवलात असंघटीत श्रमिक आणि त्याच्या भौतिक योगदानाचा अभ्यास करणे .

**मानवी भांडवल**

भविष्यात जास्त प्रमाणात उत्पनाची क्षमता वाढावी आणि ती क्षमता वाढविण्यासाठी मनुष्याला किवा मानवाला तशा प्रकारचे शिक्षण सुविधा उपलब्ध करून देणे प्रशिक्षण उपलब्ध करून देणे त्याच बरोबर त्याच्यासाठी भौतिक सुविधा

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

तयार करणे याला मानवी भांडवलातील प्रत्यक्ष गुंतवणूक म्हणता येईल . स्मिथ यांच्या मते मानवी भांडवल हि संकल्पना अमूर्त स्वरुपाची आहे .त्यांच्या मते मानवाच्या अधिग्रहित आणि उपयुक्त क्षमता म्हंजे मानवी भांडवल होय .

बेकर यांच्या मते शिक्षण आरोग्य आणि प्रशिक्षण यांसारख्या घटकांचा वापर उत्पादन घेण्यासाठी करणे म्हणजे मानवी भांडवल होय .

शोभा सुरी यांच्या मते ज्ञान कौशल्य आणि आरोग्य या क्षेत्रातील गुंतवणूक म्हणजे मानवी भांडवलातील गुंतवणूक होय .

रिचर्ड हफ यांच्या मते प्रशिक्षण आणि विकासामध्ये उच्च स्तरावरील खर्च, विकेंद्रित निर्णय घेण्याच्या अधिकारासह कामगारांना सक्षम करणे आणि सहभागास प्रोत्साहन देणे, कार्यक्षमतेसाठी मोबदला, स्वयंव्यवस्थापित कार्य - संघांचावापर आणि लवचिक जॉब डिझाईन्स, सामान्यतसुधारित कामगिरीशी संबंधित आहेत :.

**मानवी भांडवल निर्देशक**

**मानव विकास निर्देशांक** (Human Development Index) – मानव विकास अहवाल 1990). **U**nited **N**ations **D**evelopment **P**rogramme) ने पहिल्यांदाच जाहीर केला. मानव विकास निर्देशांकाची संकल्पना महबुब उल हक आणि अमर्त्य सेन यांची होतीमहबुब उल हक यांना मानव विकास निर्देशांकाचे जनक . .न ओळखले जातेम्हणूश्री .भरत फाटक यांच्या मते भारताला पायाभूत सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ घडवून आणावी लागेल त्यासाठी कौशल्य विकासाचा कार्यक्रम हाती घ्यावा लागेल .
भारताचा पायाभूत विकास साध्य करावयाचा असेल तर आपल्याला मानवी विकास कशातून साध्य होणार आहे त्या कडे लक्ष द्यावे लागेल असंघटीत असणाऱ्या खाणीतील कामगाराला देखील कौशल्य पूर्ण श्रमिक म्हणून विकसित करावे लागेल .त्याला उत्पादन वाढीची तंत्र उपलब्ध करून देवून त्याचे प्रशिक्षण द्यावे लागेल तेव्हा तत्याच्या उत्पन्नाचा स्त्रोत सुधारेल. व तो उत्पादन वाढीस मदत करून पायाभूत विकास साधला जाईल .

जगातील देशांचे विकसित, विकसिनशील व अविकसित असे वर्गीकरण करण्यासाठी मानवी विकास निर्देशांक वापरला जातो निर्देशांक तयार करण्यासाठी देशातील नागरिकांचे सरासरी आयुर्मान, शिक्षण व दरडोई उत्पन्न हे तीन घटक वापरले जातात .याच निर्देशांकात भारताचे स्थान जगातील एकूण देशात १३२ स्थानावर आहे.आर्थिक मागासले पण मोठ्या प्रमाणात पाहायला मिळते .उत्पन्न वाटपात असमानता ,कौशल्य कमी , शिक्षणाचा अभाव ,रोजगार संधी ,पायाभूत सुविधा यांची मोठ्या प्रमाणात कामतरता जाणवते .

**मानवी भांडवलात श्रमाचे योगदान**

देशाचा आर्थिक विकास करण्यासाठी श्रमिक महत्वाचा असतो देशातील विकसित आणि विकास न झालेली उत्पादन तंत्रे चालाविनाऱ्यासाठी हा श्रमिक काम करत असतो कधी त्याचे संघटन आसते तर कधी तो त्याचा भाग नसतो त्यावेळी

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

त्याला प्रशिक्षित करणे आणि जास्तीत जास्त उत्पादन घेणे व्यवसाय संस्थेला गरजेचे वाटायला हवे तरच आर्थिक बाबतीत प्रगती होणे शक्य आहे .

**शिक्षण आरोग्य आणि प्रशिक्षण**

श्रमिकाला आरोग्याच्या सुविधा उपलब्ध झाल्या पाहिजेत .त्याचा बरोबर तो प्रशिक्षित झाला पाहिजे त्यातून उत्पादन वाढ घडवून आणता येईल .

**मानवी भांडवलात असंघटीत कामगार व त्याच्या उत्पन्नाचे स्त्रोत**

भारतासारख्या खंडप्राय देशात असंघटीत कामगारांचे प्रमाण मोठ्या प्रमाणत पहिला मिळते .खाणीत काम करणारा कामगार हा त्यातीलच एक भाग आहे .आरोग्याच्या कोणत्याही सुविधा त्याला मिळत नाहीत खाण मालक हुकुमशाहीने वागवतात .उत्पन्नाचा कोणताही दुसरा मार्ग नसल्याने शिक्षण प्रशिक्षण यांची कमतरता असल्याने हा कामगार उत्पादन घेतो खरा पण त्याची मानसिकता ते काम करण्याची नसते त्यामुळे उत्पादनावर परिणाम होतो. परिणामी देशाच्या व्यवस्थेला चालवणाऱ्या रस्त्यानचा इमारतींचा विकास थांबतो .भारतासारख्या देशात आजही अशा कामगाराची आकडेवारी उपलब्ध नाही हि मोठी शोकांतिका म्हणवी लागेल .मुलभूत सुविधा शिक्षण ,आरोग्य या पासून आजही ७६ वर्षानंतर हा समाज दूर आहे . इतक्या मोठ्या प्रमाणात मानवी श्रम वाया जाते .

**संदर्भ साहित्य**

१) Gary S Becker- Human Capital 2009 (Book) chapter 1. page no.30 and Page no 50 (The University of Chicago Press Published)

२) Phillip Brown, Hugh Lauder and Sin Yi Cheung - The death of Human 2020 (Book) Part 3 page no .137 (Oxford Published)

३) John F Tomer - Integrating Human Capital With Human Development 2016 (Book) Chapter 7 page no.135 (Palgrave Macmillan published )

४) Martin Patrick and Vishakha Varma – An Economic Approach to social integration 2007 (Book) Page no.3 ( educational published and distributer Published ).

५) Shobha suri- research paper 2023 ORF Foundation
https://www.orfonline.org/marathi/investing-in-human-capital

6) Richard Huff - research paper 2001
https://www.britannica.com/money/human-capital

7)श्री.भरत फाटक –सकाळ पेपर २०१९

**INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES**
***SPECIAL ISSUE ON MARATHI AARTHSHASHTRA PARISHED Nov. 2023***

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

# भारत सरकारच्या कृषी क्षेत्र विकासासाठी अंमलात आणलेल्या शीतगृह साखळी विकास धोरणांची चिकित्सा

**डॉ. कारभारी भालचंद्र काशिनाथ**
सहाय्यक प्राध्यपक, अकबर पीरभॉय कॉलेज ऑफ कॉमर्स अँड इकॉनॉमिक्स, मुंबई
bk5682@gmail.com

**गोषवारा :**
भारतीय शीत साखळी उद्योग अजूनही नवजात अवस्थेत आहे. मोठ्या प्रमाणात नाशवंत कृषी उत्पादन होत असले तरी, एकाच उत्पादनाचा शीतगृह साठवणुकीत जास्त हिस्सा असल्याने शीतसाखळीची क्षमता इतर कृषी उत्पादनासाठी अप्रयुक्त राहते. याची मुख्य कारणे म्हणजे उच्च प्रारंभिक गुंतवणूक खर्च, सक्षम आणि पायाभूत सुविधांचा अभाव, कृषी उत्पादने हाताळण्याची जागरूकता नसणे आणि साठवणूकदार किंवा वाहतूकदार यांच्याकडून अनियमित शीत साखळी सेवा यामुळे निकृष्ट दर्जाचे कृषी उत्पादन होते. भारताने १९७१ च्या हरित व नंतरच्या धवल, निल, पिवळी क्रांती इत्यादींच्या सहाय्याने एकूण कृषी उत्पादन व प्रति हेक्टरी उत्पादनात सातत्यपूर्ण वाढ नोंदवली आहे , मात्र या वाढीव उत्पादन वेगानुसार साठवणूक व शीतगृहांच्या क्षमतेत वाढ झाली नाही. परिणामी कृषी माल मागणी व पुरवठा यामध्ये विसंगती निर्माण होऊन किंमत चढउतार आणि महागाई यांचा सामना करावा लागतो. या अनुषंगाने संशोधन लेखात भारतातील कृषी शीतगृह सुविधा विकसित करण्यासाठी सरकारने केलेल्या प्रयत्नांचे विविचेन केले आहे.

**मुख्य शब्द :** शीत साखळी उद्योग, कृषी उत्पादन, वातानुकूलित वाहन,

## 1. प्रस्तावना :

साठवणूक व शीतगृहांच्या अपुऱ्या सुविधेमुळे भारतात कापणीनंतर अन्नधान्याचे नुकसान दरवर्षी १२ ते १६ दशलक्ष मे.ट. होते, जे जागतिक बँकेच्या अंदाजानुसार भारतातील १/३ गरीबांना अन्न पुरवू शकते. या नुकसानीचे आर्थिक मूल्य प्रति वर्ष ₹५०,००० कोटीपेक्षा जास्त आहे. इंडियन ग्रेन स्टोरेज मॅनेजमेंट अँड रिसर्च इन्स्टिट्यूटच्या अहवालानुसार कापणी, मळणी, वाहतूक आणि साठवणूकी दरम्यान धान्याचे नुकसान जवळपास १०% इतके आहे. सरकार विविध योजना राबवून साठवणूक व शीतगृह क्षमतेत वाढ करण्यासाठी पायाभूत सुविधांचा विकास करत आहे.

## 2. संशोधन पद्धती :

**उद्दिष्टे :**

**अ**. भारत सरकारच्या शीतगृह साखळी विकास धोरणाचा अभ्यास करणे

**ब.** शेती क्षेत्र व शीतगृह उद्योग धोरण यांमधील परस्पर संबंधांचा अभ्यास करणे .

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

**गृहीतक :**

**अ**. कृषी क्षेत्राच्या गरजेनुसार शीतगृह उद्योगांचा विकास होत आहे .

**नमुना निवड पद्धती :**

**शीतगृह व्याख्या :** NCCD नुसार शीतगृह साखळी म्हणजे "नियंत्रित तापमानातील पुरवठा शृंखला, ज्यामध्ये साठवणूक आणि वितरण क्रियाकलापांचा समावेश होतो व जे उत्पादनाला ठराविक तापमानात सांभाळून ठेवते ". या व्याख्येनुसार संशोधन लेखात भारतातील शीतगृह साखळी प्रकल्पांची निवड केली गेली आहे.

**तथ्य संकलन :**

संशोधनासाठी दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. नॅशनल सेंटर फॉर कोल्ड चेन डेव्हलपमेंट (NCCD ) चे अहवाल, शीतगृह साखळी प्रकल्प टास्क फोर्स अहवाल, भारत सरकारचे अहवाल, विविध संशोधन लेख इत्यादींचा वापर करण्यात आला आहे.

**3. शीतगृह शृंखलेची आवश्यकता :**

राष्ट्रीय कृषी विज्ञान अकादमीच्या अहवालानुसार, भारतात कापणीनंतर नासाडीचे मुख्य कारण म्हणजे अपुरी साठवणूक व शीतगृह क्षमता आहे. या नासाडीमध्ये सर्वात जास्त प्रमाण फळे आणि भाज्या यांचे आहे. योग्य शीतगृह सुविधा नसल्यामुळे ३०-४०% फळे आणि भाज्या वाया गेल्याचा अंदाज आहे.

**तक्ता क्र. ३. १. भारतात धान्याची होणारी नासाडी**

| अन्नधान्याचा प्रकार | | वार्षिक नुकसान (%) |
|---|---|---|
| धान्य | तृणधान्ये | ४.६ - ६ % |
| फळे आणि भाज्या | | ४.६ - १५.९ % |
| दुग्ध उत्पादने | | ०.९० % |
| मांस | | २.७ % |
| पोल्ट्री | मांस | ७.२ % |
| | अंडी | ६.७ % |
| मासे | अंतर्देशीय | ५.२% |
| | सागरी | १०. ५% |

स्रोत: राष्ट्रीय कृषी विज्ञान अकादमी

२०२० मधील हंगर वॉच सर्वेनुसार कोविड-१९ दरम्यान २७% भारतीय उपाशीपोटी झोपत होते. म्हणजेच सरकारने अनेक अन्न पुरवठा योजना आखून सुद्धा गरजू लोकांना अन्न पुरवठा झाला नाही. याचे मुख्य कारण साठवणूक व

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

शीतगृह साखळी अभावामुळे होणारी अन्नाची नासाडी. भारताचे २०३० पर्यंत 'भूकबळी निर्मूलन' लक्ष्य पूर्ण करण्यात शीतगृह मोलाची भूमिका बजावतील.

२०१९-२० मध्ये भारतात अंदाजे २९१.९५ दशलक्ष टन धान्याचे उत्पादन झाले. यापैकी सुमारे ६% धान्याचे नुकसान झाले जे १८ दशलक्ष टन आहे. दरवर्षी उत्पादित होणाऱ्या १००० लाख मेट्रिक टन गव्हापैकी सुमारे १०% अयोग्य साठवण पद्धतीमुळे वाया जातो. बराचसा गहू अश्या गोदामांमध्ये ठेवला जातो,ज्यात गळती, उंदरांचे आक्रमण, पक्ष्यांची विष्ठा, चोरी, लुट यासह अनेक कारणांमुळे नुकसान होते. त्यामुळे धान्य साठवणुकीच्या आधुनिक साधनांकडे लक्ष देणे आवश्यक आहे. हे नुकसान नियंत्रित केल्यास आणीबाणीच्या परिस्थितीत राखीव साठा उपलब्ध होण्यास मदत होईल व सर्व प्रदेशांमध्ये वेळेवर अन्न पुरवठा उपलब्ध करणे सोपे जाईल.

साठवणुक सुविधेअभावी शेतकरी अनेकदा शेतमाल माल कवडीमोल भावाने विकतात ज्याला "अनैच्छिक विक्री" असे संबोधले जाते. परिणामी शेतकऱ्यांना नुकसान सहन करावे लागते. याशिवाय भारतीय अन्न महामंडळाकडे साठवणुक क्षमतेच्या अभावामुळे राखीव मानकांपेक्षा जास्त अन्नसाठा आहे, ज्यामुळे साठवणुकी दरम्यान अन्नाचे नुकसान होते. जानेवारी २०२० मध्ये FCI कडे तांदळाच्या राखीव साठयाच्या गरजेच्या (७.६ मे. ट. ) तुलनेने २१ मे.ट. इतका अतिरिक्त साठा होता. तसेच वाढता साठवणुक खर्च कमी करण्यासाठी FCI तात्पुरत्या साठवणुकीच्या सुविधा ( कव्हर अँड प्लिंथ व भाडेतत्त्वावर गोदामे) वापरत आहेत ज्यामध्ये नासाडीचे प्रमाण अधिक आहे .

आंतराष्ट्रीय बाजारपेठेत कृषी उत्पादनांच्या आयातीसाठी कठोर मार्गदर्शक तत्त्वे आहेत. भारतीय निर्यातदारांना या नियमांनुसार पुरवठा साखळी व्यवस्थापित करावी लागते, तरच आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध होते. परंतु यामुळे निर्यातदारांना अतिरिक्त खर्च सहन करावा लागतो परिणामी निर्यात लाभत घट होते.

राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाच्या शीतगृह प्राथमिक सर्वे २०१४ नुसार, १२१९ शीतगृहे कायमस्वरूपी बंद आहेत व कार्यरत शीतगृहांची एकूण संख्या ५३६७ आहेत, ज्यांची एकूण साठवणूक क्षमता २६.८५ दशलक्ष टन आहे. तसेच ७९% शीतगृहांकडे स्वतःची वाहतूक सुविधा नाही. भारतात नाशवंत वस्तूंसाठी देशांतर्गत वातानुकूलित वाहतूक व वातानुकूलित रेल्वे डब्यांचा पर्याय कमी आहे. बरेचसे शीतगृह सेवा देणारे खाजगी मालक आहेत आणि फक्त मोजकेच शिवार ते बाजार अशी सुविधा पुरवतात.

वरीलप्रमाणे स्पष्ट होते की भारतात शीतगृह साखळी विकासाची नितांत गरज आहे.

**4. शीतगृह साखळीचा भारतातील विकास :**

भारतात शीतगृह साखळीची सुरुवात १८९२ मध्ये कोलकाता येथे पहिल्या शीतगृह साठवणूक स्थापनेपासून झाली. तथापि, शास्त्रोक्त पद्धतीने या उद्योगाचा विकास स्वातंत्र्यानंतर "कोल्ड स्टोरेज ऑर्डर, १९६४ पासून सुरू झाला.

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
*SPECIAL ISSUE ON MARATHI AARTHSHASHTRA PARISHED Nov. 2023*

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

**आलेख क्र. 4. 1. शीतगृह साखळीचा भारतातील विकास**




**स्रोत** : All India Cold-chain Infrastructure Capacity Assessment of Status & Gap, 2015

१९९७ नंतर भारतात शीतगृहांच्या स्थापनेत मोठ्या वाढ झाली. भारतातील शीतगृह साखळीचा विकास पुढीलप्रमाणे आहे. शीतगृह साखळी उद्योग वाढीसाठी सरकारने १९९८ मध्ये जे. श्रीवास्तव यांच्या अध्यक्षतेखाली तज्ञ समिती नियुक्त करून पहिले पाऊल उचलेले होते. राष्ट्रीय फलोत्पादन मंडळानुसार फलोत्पादन व कृषी आधारित उत्पादने एकूण शीतगृह क्षमतेचा जास्त वापर करतात.

शीतगृह साखळीच्या विकासामध्ये काही प्रमुख पायाभूत सुविधा घटकांचा समवेश होतो. त्यांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे केले आहे .

**तक्ता क्र. ४.४.**
**शीतगृह साखळील प्रमुख पायाभूत सुविधा**

| अ. क्र. | पायाभूत सुविधा घटक | अपेक्षित बांधणी स्थान | वर्तमान वापर |
|---|---|---|---|
| १ | आधुनिक पॅक-हाउस (PH) | उत्पादनामध्ये पूर्वस्थिती ताजेपणा निर्माण करण्यासाठी शिवराजवळ पोहोचणे | निर्यातदारांसाठी |
| २ | लांब पल्ल्याची वाहतूक (T) | पॅक-हाऊस पासून मंडी किंवा घाऊक खरेदीदार" | संपूर्ण देशभरात |
| ३ | कोल्ड स्टोरेज हब (CH) | उपभोग व वितरण केंद्राजवळ | संपूर्ण देशभरात |
| ४ | कोल्ड स्टोरेज बल्क (CS) | शिवराजवळ/अन्न प्रक्रिया केंद्र | शिवराजवळ / अन्न प्रक्रिया केंद्र |
| ५ | राईपनिंग चेंबर (RC) | उपभोग व वितरण केंद्राजवळ | उपभोग केंद्राजवळ |
| ६ | अंतिम वाहतूक (t) | शहरामध्ये वितरण | प्रमुख शहरे |
| ७ | रिटेल/ फ्रंट-एंड (FE) | शेवटच्या टप्प्यातील व्यवहार | फ्रंट एन्ड |
| ८ | अन्न प्रक्रिया युनिट (PU) | स्त्रोत बिंदू म्हणून कारखान्यातील अन्न उत्पादन प्रेषण | क्लस्टर पार्क, उत्पादन क्षेत्र |

स्रोत :राष्ट्रीय फलोत्पादन मंडळ

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

शीतगृह साखळीच्या विकासासाठी वर नमूद केलेले पायाभूत घटक निर्माण करणे आवश्यक आहे.

**5. शीतगृह साखळी विकसित करण्यासाठी सरकारने राबविलेल्या योजना :**

सरकारने शीतगृह साखळी उदयोग विकासासाठी पुढील योजना राबविल्या आहेत.

**प्रत्यक्ष परकीय गुंतवणूक सुविधेला प्रोत्सहन :** शीतगृह उद्योगात प्रत्यक्ष परकीय गुंतवणुकीला चालना देण्यासाठी स्वयंचलित मार्गाने १००% परवानगी व २०१२ पासून पायाभूत सुविधांचा दर्जा देण्यात आला आहे. तसेच प्रकल्प खर्चाच्या ४०% पर्यंत व्यवहार्यता अंतर निधीला मान्यता देण्यात आली आहे. अन्न आणि कृषी आधारित प्रक्रिया उद्योग आणि शीतगृहांना देण्यात येणाऱ्या कर्जाचे वर्गीकरण कृषी उपक्रमांतर्गत प्राधान्य क्षेत्र कर्ज सुविधेमध्ये करण्यात आले आहे. शीतगृह यंत्रे किंवा वातानुकूलित वाहनांच्या बांधणीसाठी वापरली जाणारी यंत्रे आणि सुटे भाग यांना उत्पादन शुल्कातून सूट देण्यात आली आहे. शीतगृह प्रकल्प बाह्य व्यावसायिक कर्जासाठी पात्र करण्यात आले आहेत. सरकारने २०२० मध्ये, ६८६५ कोटी रू. एकूण अंदाजपत्रकीय तरतूद करून १०००० शेतकरी उत्पादक संघटना योजना तयार करण्याच्या उद्देशाने केंद्रीय क्षेत्र योजना सुरू केली आहे.

**शीतगृह बांधकाम व आधुनिकीकरणासाठी भांडवली गुंतवणूक अनुदान योजना :** राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाकडून हि योजना राबविण्यात येते. या योजनेत खर्चाच्या ३५% अनुदान देण्यात येते व योजेनचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र. ५.१.**

| स्टोरेज प्रकार | निधीची उपलब्धता |
|---|---|
| > २५० MT सह मोठे कोल्ड चेंबर | ५००१-६५०० मे.ट. क्षमतेसाठी ₹ ७६००/मे.ट.<br>६५०१-८००० मे.ट. क्षमतेसाठी ₹७२००/मे.ट.<br>८००१-१०००० मे. ट. क्षमतेसाठी ₹ ६८००/मे.ट. |
| < २५० MT सह बहु-तापमान कक्ष | ५००१-६५०० मे.ट. क्षमतेसाठी ₹ ९५००/मे.ट.<br>६५०१-८००० मे.ट. क्षमतेसाठी ₹ ९०००/मे.ट.<br>८००१-१०००० मे.ट. क्षमतेसाठी ₹ ८५००/मे.ट. |
| वातानुकूलित वाहन सहाय्य | ₹ ६ दशलक्ष /९००० मे. ट. युनिट |
| **स्रोत :राष्ट्रीय फलोत्पादन मंडळ** | |

**मिशन फॉर इंटिग्रेटेड डेव्हलपमेंट ऑफ हॉर्टिकल्चर :**

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय या योजनेची अंमलबजावणी करते. या योजनेत खर्चाच्या ३५% अनुदान देण्यात येते व योजेनचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र. ५.२.**

| स्टोरेज प्रकार | निधीची उपलब्धता |
|---|---|
| एकात्मिक पॅकहाऊस | ₹५ दशलक्ष प्रति युनिट |
| प्री-कूलिंग युनिट | ₹ २.५ दशलक्ष प्रति युनिट ६ MT |
| कोल्ड रूम (स्टेजिंग) | ₹ १. ५ दशलक्ष प्रति ३० MT |
| युनिट मोबाइल प्री-कूलिंग युनिट | ₹ २.५ दशलक्ष प्रति युनिट |
| प्राथमिक प्रक्रिया युनिट | प्रति युनिट ₹ २.५ दशलक्ष |
| राईपनिंग चेंबर्स | ₹ १०००००/MT \| कमाल ३००MT |
| स्रोत :कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय | |

**नोंदणीकृत निर्यातदारांसाठी योजना :**

हि योजना कृषी आणि प्रक्रिया अन्न उत्पादने निर्यात विकास प्राधिकरणामार्फत राबविली जाते.

| तक्ता क्र. ५.3. | |
|---|---|
| **स्टोरेज प्रकार** | **निधीची उपलब्धता** |
| वातानुकूलित वाहन सहाय्य | कमाल ₹ ७५००००/ वाहन |
| स्टोरेज क्षेत्रे | कमाल. ₹ १ दशलक्ष |
| हाताळणी प्रणाली; प्री-कूलिंग आणि इतर सुविधा | कमाल. प्रत्येकी ₹२.५ दशलक्ष |
| एकात्मिक पोस्ट-हार्वेस्ट हँडलिंग सिस्टम्स | कमाल. ₹ ७.५ दशलक्ष |
| स्रोत : कृषी आणि प्रक्रिया अन्न उत्पादने निर्यात विकास प्राधिकरण | |

या योजनेत घटक आधारित अनुदान दिले जाते. पात्र प्रकल्प खर्चाच्या ४०% अनुदान प्राप्त होते.

**INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES**

***SPECIAL ISSUE ON MARATHI AARTHSHASHTRA PARISHED Nov. 2023***

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

### भारतातील शीतगृह विकास मदतीचे निकष :

**तक्ता क्र. ५.४.**

| अ. क्र. | संस्था | प्रकार | खर्चाचे नियम |
|---|---|---|---|
| १ | नाबार्ड | तंत्रज्ञान अद्यावत करणे | भांडवली खर्चाच्या १२% ते १५% |
| २ | राष्ट्रीय फलोत्पादन अभियान (NHM) | प्रकार १: मोठ्या खोलीसह सिंगल टेंप झोन (>250 MT) | एकूण भांडवली खर्चाच्या ३५% पर्यंत |
| | | प्रकार २: एकाधिक तापमान क्षेत्र > ६ चेंबर (<२५० मे. ट.) | ₹८००० प्रति मे. ट्. ( कमाल ५००० मे.ट.) |
| | | प्रकार २ : CS युनिट्स नियंत्रित वातावरणासाठी तंत्रज्ञानासह | ₹ १०००० प्रति मे. ट. ( कमाल ५००० मे. ट.) |
| ३ | राष्ट्रीय फलोत्पादन मंडळ (NHB) | प्रकार 1: एकल तापमान क्षेत्र सह मोठे शीतगृह (>२५० मे. ट) | एकूण भांडवली खर्चाच्या ३५% पर्यंत |
| | | | ₹ ८००० प्रति मे. ट. ( ५००० - १०००० मे. ट.) |
| | | प्रकार २: एकाधिक तापमान क्षेत्र > ६ चेंबर (<२५० मे. ट) | ₹ १०००० प्रति मे. ट. ( ५०००- १०००० मे. ट.) |
| | | प्रकार २ : CS युनिट्स नियंत्रित | अतिरिक्त ₹ १०००० प्रति मेट्रिक टन |
| ४ | एकीकृत बागवानी विकास मिशन (MIDH) | NHB चे नियम | NHB चे नियम |
| | | सौरऊर्जेवर चालणारे शीतगृह | ₹ १५ x $१०^{५}$/युनिट्स (५ मे. ट) किंवा एकूण खर्चाच्या ५० % |
| | | प्रीकूलिंग संच | ६ मे. ट. च्या क्षमतेसह ₹ २५.० x$१०^{५}$/ युनिट |
| ५ | नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय (MNRE) | सौर शीतगृह (४ - ५ मे. ट. ) | ₹ १५ x $१०^{५}$/युनिट्स (५ मे. ट) किंवा एकूण खर्चाच्या ५० % |
| | | उत्पादन प्रकार: ऊर्जा बचत/सौर पॉवर्ड/हायब्रिड (पवन+सौर) | |
| ६ | कृषी सहकार विकास (DAC) | NHM चे नियम | कमाल साठवण क्षमता ५००० मे. ट. प्रति प्रकल्प ₹६०००/मे. ट. |
| | | | नियंत्रित वातावरण गृहासाठी ५००० मे. ट. साठी ₹३२०००/मे. ट. |
| ७ | कृषी आणि प्रक्रिया अन्न उत्पादने निर्यात विकास प्राधिकरण (APEDA) | शीतगृह | उपकरणांच्या खर्चाच्या ४०% कमाल मर्यादेसह ₹ २५ x १०५ |

स्रोत : कृषी आणि प्रक्रिया अन्न उत्पादने निर्यात विकास प्राधिकरण, राष्ट्रीय फलोत्पादन मंडळ

### भांडवल गुंतवणूक अनुदान योजना :

a. **फलोत्पादनासाठी भांडवली गुंतवणूक अनुदान योजना:**

पिक काढणीनंतरचे नुकसान कमी करण्यासाठी, फलोत्पादन उत्पादनांसाठी शीतगृहे आणि साठवणूक गृहांचे बांधकाम व आधुनिकीकरण यासाठी हि योजना सुरू करण्यात आली. १२ लाख टन नवीन शीतगृह क्षमता निर्मिती आणि ८ लाख टन विद्यमान क्षमता असलेल्या शीतगृहांचे आधुनिकीकरण आणि पुनर्वसन करणे हि या योजनेची उद्दिष्टे आहेत. राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाच्या या योजनेसाठी सहकारी संस्था, कंपन्या,

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
*SPECIAL ISSUE ON MARATHI AARTHSHASHTRA PARISHED Nov. 2023*

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

APMC बोर्ड, भागीदारी संस्था आणि ऍग्रो इडस्ट्रीज आणि उत्पादक संघ हे पात्र आहेत. योजनेअंतर्गत कमाल अनुदान ₹ ५० लाख प्रति प्रकल्प आहे. परंतु ईशान्येकडील राज्यांमध्ये ते खर्चाच्या ३३.३३% दराने ₹ ६० लाख आहे.

**b. कृषी विपणन पायाभूत सुविधा योजना :**

२०१४ मध्ये कृषी विपणनासाठी हि योजना अंमलात आणली गेली. साठवणुकीसह कृषी विपणन पायाभूत सुविधा विकसित करणे व कृषी उत्पादनांचे विक्रीयोग्य व्यवस्थापन करण्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करणे, पिक काढणीनंतर व हाताळनीदरम्यान नुकसान कमी करणे, प्रक्रिया केलेले शेतमाल आणि कृषी निविष्ठा इत्यादीसाठी वैज्ञानिक साठवण क्षमता निर्माण करणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. कृषी उत्पादनांची प्रतवारी व गुणवत्ता प्रमाणीकरणासाठी पायाभूत सुविधा प्रदान करणे, तारण वित्तपुरवठा व विपणनासाठी भांडवल दिले जाते.

**c. राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाची भूमिका :**

शेतकरी सहकारी संस्थां विकसित करणे, निविष्ठांचा पुरवठा, प्रक्रिया, साठवणूक, कृषी उत्पादन व ग्राहक यादरम्यान विपणनासाठी सहकारी संस्थांच्या उपक्रमांना मदत करणे, यासाठी वित्तपुरवठा करण्यासाठी या महामंडळाची संस्था स्थापन केली आहे.

## ६.भारताची शीतगृह साठवणूक क्षमता (मेट्रिक टन) :




स्रोत : Task force on Cold-chain Projects – MoFPI (DMI, DAC & MoFPI)

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

**प्रमुख राज्यांमधील शीतगृह साठवणूक क्षमता :**

भारतात ~६१% शीतगृह क्षमता पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश आणि बिहार या राज्यांमध्ये केंद्रित आहे. महाराष्ट्र, गुजरात व दक्षिणेकडील राज्यांमध्ये दुग्ध उत्पादने, फळे, प्रक्रिया केलेले मासे, मांस उत्पादने आणि हंगामी भाज्या यासारख्या उत्पादनांसाठी शीतगृहांची स्थापना केली गेली आहे

**तक्ता क्र. ६.१.**

| राज्य | शीतगृह साठवणूक क्षमता (दशलक्ष मे. ट.) | भारताच्या एकूण क्षमतेपैकी (%) |
|---|---|---|
| उत्तर प्रदेश | १४. ७ | ३९. ३ |
| पश्चिम बंगाल | ५. ९ | १५. ९ |
| गुजरात | ३. ८ | १०. २ |
| पंजाब | २.३ | ६. २ |
| आंध्र प्रदेश | १. ६ | ४. २ |
| **भारत** | **३७. ४** | **१००** |

Source: Task force on Cold-chain Projects – MoFPI (DMI, DAC & MoFPI)

नॅशनल स्टॉक एक्सचेंज लिमिटेडने केलेल्या अभ्यासानुसार २०१० मध्ये, भारतात २४.२९ दशलक्ष मे. ट. उपलब्ध शीतगृह क्षमतेच्या तुलनेत ६१.१३ दशलक्ष मे.ट. गरज होती, म्हणजेच ३६.८६ दशलक्ष मे.ट.एवढी कमी क्षमता होती .

**प्रमुख राज्यांमधील शीतगृह साठवणूकीची असलेली कमतरता ( लाख मे. ट. ) :**

भारतातील ~३६ % शीतगृहांची क्षमता १००० मे.ट. पेक्षा कमी आहे. ते पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

तक्ता क्र. ६.२.

| राज्य | शीतगृह साठवणूकीची गरज | सद्यस्थितीतील क्षमता | शीतगृह साठवणूकीची कमतरता |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र | ६२.७३ | ५.४७ | ५७.२६ |
| हिमाचल प्रदेश | ४.८७ | ०.२० | ४.६७ |
| पंजाब | १३.१८ | १३.४५ | ०.०० |
| हरियाणा | ८.०४ | ३.९३ | ४.११ |
| राजस्थान | ३.९१ | ३.२४ | ०.६७ |
| गुजरात | २७.४८ | १२.६७ | १७.८१ |
| कर्नाटक | २४.०४ | ४.०७ | १९.९७ |
| केरळ | २७.७१ | ०.५८ | २७.१३ |
| आंध्र प्रदेश | २३.२४ | ९.०१ | १४.२३ |
| तामिळनाडू | ७९.०६ | २.३९ | ७६.६७ |
| छत्तीसगड | ५.४३ | ३.४२ | २.०१ |
| मध्य प्रदेश | १२.१३ | ८.०८ | ४.०५ |
| पश्चिम बंगाल | १०५.६६ | ५६.८२ | ४८.८४ |
| बिहार | ४२.४१ | ११.४७ | ३०.९४ |
| उत्तर प्रदेश आणि उत्तरांचल | १२२.२८ | १०१.८७ | २०.४७ |
| जम्मू आणि काश्मीर | ७.३७ | ०. ४३ | ६.९४ |
| भारत | ६११.३० | २४२.९८ | ३६८.३२ |

Source: NCCD 2012

वरील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे फक्त पंजाब व राजस्थान या दोनच राज्यमध्ये शीतगृह क्षमता गरजेप्रमाणे विकसित झाली आहे. इतर राज्यात जसे की, महाराष्ट्र, तामिळनाडू, बिहार, उत्तर प्रदेश व केरळ या राज्यात शीतगृह क्षमतेचा विकास झाला नाही. २०१७ पर्यंत, भारतात ३४.९५ दशलक्ष टनांची एकूण क्षमता असलेली ७६४५ शीतगृहे होती. यापैकी ७५% शीतगृह क्षमता फक्त बटाट्यांसाठी वापरली जाते.

**भारतातील विद्यमान शीतगृह साखळी पायाभूत सुविधा:**

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

तक्ता क्र. ६.३.

| अ. क्र. | पायाभूत सुविधा घटक | संख्या | सरासरी क्षमता (मेट्रिक टन) |
|---|---|---|---|
| १ | आधुनिक पॅक-हाउस (PH) | २४९ | NA |
| २ | कोल्ड स्टोरेज हब (CH)<br>कोल्ड स्टोरेज बल्क (CS) | ५३६७ | ५००३ |
| ३ | राईपनिंग चेंबर (RC) | ८१२ | NA |
| ४ | अंतिम वाहतूक (t) | ९००० | < ४टन |
| ५ | वातानुकूलित वाहन | | 6 ते 15 टन |
| ६ | रिटेल/ फ्रंट-एंड (FE) | १९६८ (दशलक्ष दुकाने) | NA |

स्रोत : बेसलाइन सर्वेक्षण (डीएसी)

शीतगृह साखळी प्रोजेक्ट्स टास्क फोर्स (२०१४) नुसार देशात एकूण ३१.८२ दशलक्ष मे.ट. शीतगृह तयार केले गेले आहेत. यापैकी, केंद्र सरकारच्या सहाय्याने एकूण १०.५८ दशलक्ष टन शीतगृहे तयार करण्यात आली.

## पायाभूत सुविधांच्या घटकांची कमतरता :

भारतात शीतगृह साखळी पायाभूत सुविधांच्या गरजेचा अंदाज पुढीलप्रमाणे आहे.

तक्ता क्र. ६.४.

| पायाभूत सुविधा घटक | भारतातील आवश्यकता | |
|---|---|---|
| | साठवणूक क्षमता (मेट्रिक टन) | संख्या |
| पॅकिंग गृहे | ११,२१,२७४ | ७००८० |
| मोठे शीतगृह | ३४१,६४,४११ | - |
| शीतगृह केंद्र | ९,३६,२५१ | - |
| वातानुकूलित वाहन | ४,९४,६०८ | ६१,८२६ |
| राईपनिंग चेंबर | ९१,३०६ | ९,१३१ |
| कांदा साठवण रचना | ७०,०६,०२८ | २,८०,२४१ |

स्रोत: NCCD.2015.All India Cold-chain Infrastructure Capacity (Assessment of Status & Gap)

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
*SPECIAL ISSUE ON MARATHI AARTHSHASHTRA PARISHED Nov. 2023*

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

तक्ता क्र. ६.५.

| पायाभूत सुविधेचा प्रकार | भारतातील आवश्यकता | भारतातील उपलब्धता | कमतरता | कमतरता (%) |
|---|---|---|---|---|
| पॅकिंग गृहे (संख्या) | ७०,०८० | २४९ | -६९,८३१ | ९९.६ % |
| मोठे शीतगृह (मेट्रिक टन) | ३४१,६४,४११ | ३१८२३७०० | - ३२,७६,९६२ | ६.३ % |
| शीतगृह केंद्र (मेट्रिक टन) | ९,३६,२५१ | | | |
| वातानुकूलित वाहन (संख्या) | ४,९४,६०८ | ९०००० | -५२,८२६ | ८५ % |
| राईपनिंग चेंबर (संख्या) | ४,९४,६०८ | ८१२ | -८३१९ | ९१ % |

स्रोत: NCCD.2015.All India Cold-chain Infrastructure Capacity (Assessment of Status & Gap)

वरील तक्त्यावरून लक्षात येते कि, भारतात सर्व प्रकारच्या शीतगृह पायाभूत सुविधांचा अभाव आहे. त्यामुळे तातडीने शीतगृह साखळीसाठी प्रमुख पायाभूत सुविधांची गरज आहे. भारतात अन्नधान्य उत्पादन २००६ मध्ये २०८.०६ दशलक्ष टन पासून २०२० मध्ये २९५.६७ दशलक्ष टन इतका वाढला, परंतु शीतगृह साखळी उद्योगाची साठवणूक क्षमता त्या प्रमाणात वाढत नाही. यामुळे, शीतगृह साखळीचा अभाव हे एक गंभीर आव्हान भारतापुढे आहे.

**७. शीतगृह उद्योगाच्या समस्या :**

**उच्च परिचालन खर्च :** भारतीय शीतगृह उद्योगाचा परिचालन खर्च महिन्याला अंदाजे १०० रुपये प्रति घनफूट आहे तर पाश्चिमात्य देशात तो निम्मा आहे. याचे कारण त्यांचा इंधन खर्च फक्त १०% आहे मात्र भारतात तो परिचालन खर्चापैकी सुमारे ४५% आहे. शीतकरण संचासाठी डिझेल वापरामुळे परिचालन खर्च २०% ने वाढतो.
शीतगृह शृंखला विकासासाठी सरकार शीतगृह प्रकल्पांना सीमा-शुल्कमधून सूट देते. तरीही, प्रकल्प बांधणीनंतर परिचालन करण्यासाठी काही घटक आवश्यक असतात उदा. ऊर्जा बचत प्रणाली, विदा संकलन व संवर्धन आणि इतर यंत्रणा. परंतु या घटकांच्या आयातीवर सीमा-शुल्क सवलत नसल्याने अशा उपयुक्त प्रणालींचा व तंत्रज्ञानाचा वापर कमी होतो, परिणामी शीतगृह परिचालन खर्च वाढतो.

**वातानुकूलित वाहन समस्या :** उत्पादन स्थान व बाजारपेठ यांमधील वितरण व्यवस्था वतुनुकूलीत वाहन यंत्रणेशिवाय अप्रभावी आहे. कमी किंतीतीत वाहन खरेदी कर्ज उपलब्ध असतानासुद्धा वातुनुकूलित वाहनासाठी लागणारे सुटे भाग उदा. चेसिस, उष्णतारोधक आणि शीतकरण भागांसाठी वेगवेगळे वित्तीय मानदंड आहेत. बाजारदराने मुख्य चेसिससाठी ८०- १०० % खर्चाच्या ८- १३% व्याजाने, तर शीतकरण घटकांना ५०-७५ खर्चाच्या १०-१५% व्याजाने निधी पुरवला जातो. प्रत्यक्षात, सामान्य व्यावसायिक वाहन प्रकारांपेक्षा शीतकरण वाहनाचा खर्च जास्त असतो. याखेरीज वातुनुकूलित वाहनांना उत्पादन शुल्कामधून सूट आहे. परंतु या वाहनांसाठी लागणाऱ्या सुट्या भागांना हा लाभ मिळत नाही. केंद्रीय उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांच्या मते "कॅब चेसिस" हे एक पूर्ण उत्पादन असल्याने त्याच्यावर उत्पादन शुल्क लागू होते.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

वातुनुकूलीत वाहनांना राज्यांमध्ये प्रवास करण्यासाठी राष्ट्रीय परवाना आवश्यक आहे. ही परवानगी दरवर्षी लागते व ८ वर्षांनंतर ती दिली जात नाही, त्यानंतर वाहनांना केवळ राज्यांतर्गत परवानगी असते. अशा परवान्यांसाठी प्रक्रिया व शुल्क इतर सामान्य वाहनांच्या बरोबर आहे. काही विशेष व्यावसायिक उपयोगिता वाहनांना २५ वर्षांपर्यंत दीर्घ कालावधीसाठी परवाने दिले जातात, परंतु वातुनुकूलित वाहनांना असा परवाना दिला जात नाही. ८ वर्षानंतर वातुनुकूलित वाहनांवरील खर्च वाढत असल्याने खर्चात वाढ होते. वाहन कायदा १९८८ अंतर्गत वातुनुकूलित वाहनांसाठी कोणतेही विशिष्ट नियम नसताना अश्या कायद्यामुळे वातानुकूलित वाहनांचे संचालन आणि आयुष्य मर्यादित होते.

वातुनुकूलीत वाहतुकीच्या अभावामुळे शीतगृह साखळीच्या सर्वांगीण विकासावर मर्यादा येतात. यासाठी एकाधिक पर्यायांसह वाहतुकीवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

**तंत्रज्ञानाचा अवलंब :** पाश्यात्य देशांनी कृत्रिम बुद्धिमत्ता, मशिन लर्निंग आणि इंटरनेट यांसारखे तंत्रज्ञान शीतगृह उद्योगात प्रभावीपणे वापरले आहे. परंतु भारत या बाबतीत खुप मागे आहे. स्वदेशी वातानुकूलीत नियंत्रण प्रणाली विकसित करण्याऱ्या देशी उत्पादकांना मर्यादा आहेत. त्यामुळे, बरीचशी आधुनिक शीतगृह उपकरणे आणि तंत्रज्ञान परदेशी पुरवठादारांकडून आयात केली जाते. परंतु देशांतर्गत करांचा भार व सांभाळ खर्च कमी करण्यासाठी विक्रेते व आयातदार मर्यादित प्रमाणात उपकरणांची साठवणूक करतात. त्यामुळे शीतगृघ प्रकल्पांना उपकरण खरेदी आणि जोडणी यांसाठी विलंब लागतो परिणामी शीतगृह उद्योग साखळी खंडित होऊन पर्याप्त उत्पादकतेपासून वंचित राहून मालक व शेतकरी दोघांचेही नुकसान होते.

**यांत्रिक बिघाड :** विज पुरवठा चढउतारांमुळे शीतकरण संच खराब होऊन देखभाल खर्च वाढणे, शीतकरण प्रक्रिया ठप्प होणे व खराब शीतकरण परिसंचरण यामुळे नाशवंत उत्पादनांची नासाडी होते. कारण दीर्घकाळ उष्णतेच्या संपर्कात राहिल्याने उत्पादनाची गुणवत्ता आणि नफा कमी होतो. उत्पादनाच्या मापदंडानुसार तापमान नियंत्रित करण्यासाठी शीतगृहांना आंतरिक ऊर्जा स्त्रोताची आवश्यकता असते. यासाठी असणारी बॅक-अप सिस्टीम सामान्यत: डिझेल इंधनावर आधारित असते जी खार्चिक स्वरूपाची आहे. वाढत्या ऊर्जा खर्चाचा शीतगृह साखळीच्या सर्व पैलूंवर परिणाम होत आहे म्हणून पर्यायी तंत्रज्ञानाच्या वापरास प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. यामध्ये चुंबकीय उत्सर्जन, मीठ-आधारित शीतकरण, अपारंपरिक (सौर यंत्रणा) किंवा संकरित ऊर्जा इत्यादी सारख्या प्रणाली आहेत.

**असंघटित उद्योग :** भारतात ~९० % शीतगृह साखळी उद्योग असंघटित असून, ९२% खाजगी क्षेत्रा मार्फत चालवला जातो. परंतु हि बाजारपेठ हळूहळू संघटित होत आहे अनेक राज्यांमध्ये हा उद्योग एकतर खूप विखुरलेला तर काही राज्यात अस्तित्वातच नाही. परिणामी शीतगृहांच्या अभावामुळे अनेक राज्यातील उत्पादनांची नासाडी होते.

**जमीन वापरातील बदल :** शीतगृह साखळी केंद्रे हि बहुतेक वेळा शेतजमिनींच्या जवळ असतात व अश्या जमिनींचा वापर औदयोगिक कारणासाठी करता येत नाही. त्यामुळे शीतगृह साखळी स्थापन करण्यासाठी कृषी जमीन औद्योगिक वापरात घेण्यासाठी जमीन वापर बदल परवानगी घेणे आवश्यक आहे. तसेच शीतगृह प्रकल्पांसाठी लागणाऱ्या परवानग्यांसाठी कोणतीही प्राधान्य प्रक्रिया प्रणाली उपलब्ध नाही. नगर नियोजन संचालनालय, प्रदूषण

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

नियंत्रण मंडळ, अग्निशमन दल व इतर विभागांकडून परवानग्या घेताना वेळ व पैसा दोन्हींचा अपव्यय होतो. परिणामी प्रकल्प खर्च वाढतो व नफाक्षमता बाधित होते.

**मर्यादित वित्तपुरवठा पर्याय :** परिचालनाच्या दृष्टिकोनातून शीतगृह प्रकल्प हे नवोदित प्रकल्प असल्याने बँका आणि इतर वित्तीय संस्था शीतगृह प्रकल्पांसाठी प्राधान्याने निधी पुरवत नाहीत. तसेच नाबार्डसारख्या कृषी क्षेत्राला समर्पित असलेल्या संस्थां सुद्धा पुनर्वित्त किंवा खाजगी वित्तीय संस्थांना थेट निधी देण्याची परवानगी देत नाही.

वित्त कायद्यांतर्गत, सेवा कर (कलम ५ ) मधील व्याख्येनुसार, साठवणूक केंद्रांनी द्रव व वायूंची केलेली साठवणूक म्हणजे सेवा उद्योगात समाविष्ठ होते. परंतु कृषी उत्पादनांची साठवणुक किंवा शीतगृह सुविधा सेवा या प्रकारात येत नाही. परिणामी कृषी उत्पादन शीतगृह सुविधांवर सेवा कर लागू केला जातो.

**निष्कर्ष :** शीतगृह साखळी उद्योगाच्या साठवणूक क्षमतेचा विकास न झाल्याने धान्याची नासाडी , शेतकऱ्यांचे नुकसान , कृषी मालाचा दर्जा कमी होणे इ. परिणाम दिसून येतात. तसेच शीतगृह साखळी विकासासाठी सरकारने केलेले उपाय गरजेच्या मानाने अपुरे आहेत.

**शिफारशी :**

**अ**. पॅक-हाऊस आणि वाहतूक यांसारख्या इतर पायाभूत सुविधांचा विकास करणे आवश्यक आहे.

**ब.** आधुनिक पुरवठा शृंखला प्रणालीचा भाग म्हणून शीतगृह साखळीला उद्योगाने नवीन बाजारपेठांमध्ये जाऊन नुकसानीची व्याप्ती कमी करावी .

**क.** शीतगृह उदयोगाला कृषी आधारित प्राधान्य कर्ज व व्याजदर सवलत उपलब्ध करून दयावी.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

**संदर्भ :**

१. All India Cold storage Capacity and Technology Baseline Survey, NHB 2015.

२. Alok Kumar, (2022), Challenges of Agri-Start-ups in Post-Harvest Cold Storage Technologies, Vol. 58 No. 1 : Indian Journal of Extension Education .

३. Ananth, S. (2015). MoFPI Scheme for Cold Chain Infrastructure Development.ISHRAE.https://ishrae.in/newsdetails/MoFPI-Scheme-for-Cold-Chain-Infrastructure-Development-/376 .

४. Cold Chains and the Demographic Dividend, Dearman Report, April 2015.

५. M. Nagpal, A. Kumar, Spet. 2012. Grain losses in India and government policies.https://www.researchgate.net/publication/264331651_Grain_losses_in_India_and_government_policies.

६. National Center for Cold Chain Development (NCCD) News Letter (ISSN 2395-4515), Issue No.12, February 2015.

७. National Center for Cold Chain Development (NCCD) News Letter (ISSN 2395-4515), Issue No.2, April 2014.

८. NCCD.2015.All India Cold-chain Infrastructure Capacity (Assessment of Status & Gap).

९. Report of the Task Force on Cold Chain Projects (TFCP), MoFPI/ DMI. DAC., GoI.

१०. Usha. J C, Yashaswini. P, Bhavana N., Rani R., Shreyas. R, Srikanth. A study on Challenges in Adoption of Cold storage Facilities in India. Asian Journal of Management. 2018; 9(4):1215-1220. doi: 10.5958/2321-5763.2018.00195.6

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
*SPECIAL ISSUE ON MARATHI AARTHSHASHTRA PARISHED Nov. 2023*

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

# संस्थात्मक कामगिरीवर मानवी भांडवल व्यवस्थापनाचा प्रभाव

**रुपाली प्रकाश शेंडकर, स्वाती बाबुराव शिंदे**
मामासाहेब मोहोळ महाविद्यालय. पौड रोड पुणे

**गोषवारा**

हा शोध निबंध बँकिंग व्यवसायांच्या संस्थात्मक कामगिरीवर मानवी भांडवलाच्या पडणाऱ्या प्रभावावर आधारित असून यामध्ये संशोधकाने संशोधन अभ्यासासाठी दोन प्रमुख प्रश्न डोळयासमोर ठेवून संशोधन केलेले आहे. तसेच संशोधन करताना सहसंबंधावर आधारित संशोधनाची रचना निर्माण केलेली आहे. संशोधनासाठी नमुना म्हणून 12 सार्वजनिक बँकांपैकी 6 बँकांमधील प्रत्येकी 10 अशा 60 कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांकडून माहिती गोळा करण्यात आली. या माहितीचे विश्लेषण करताना गणितीय आणि सांख्यिकीय साधनांचा वापर करण्यात आला. या विश्लेषणावरून असे दिसून आले की मानवी भांडवल व्यवस्थापनाचा बँकांच्या संस्थात्मक कामगिरीवर महत्वपूर्ण आणि सकारात्मक प्रभाव पडतो बँकिंग क्षेत्रामध्ये प्रशिक्षण आणि विकास कार्यक्रमांच्या द्वारे कर्मचाऱ्यांना जास्तीतजास्त अभिप्रेरित करून त्यांच्या कार्यक्षमतेवरती सकारात्मक प्रभाव पडतो. कर्मचाऱ्यांना नोकरी मधील स्थैर्य सुरक्षितता याबाबत खात्री मिळते त्यामुळे त्यांच्या वैयक्तिक विकासाबरोबर बँकांचा विकास होतो.

## 1. प्रस्तावना:

मानवी भांडवलाच्या कार्यक्षम व्यवस्थापनासाठी व्यवस्थापकाने प्रभावी व्यवस्थापन करणे आवश्यक असते. यासाठी सर्व समावेशक योजना आखणे, स्पष्ट संघटन रचनेचे तक्ते तयार करणे, यश मिळवण्यासाठी व स्पर्धेमध्ये उतरण्यासाठी व्यवस्थापकीय डावपेच आखणे, अत्याधुनिक कार्य नियंत्रणाची तंत्र वापरणे, योग्य जागी योग्य व्यक्तीची नेमणूक करणे, अभिप्रेरण देऊन त्यांच्या विकासासाठी आणि पर्यायाने बँकांच्या विकासासाठी सातत्यपूर्ण मूल्यांकनाच्या योजना राबवणे इत्यादी ची आवश्यकता असते.

बाजारपेठेतील विविध बँकांचा विकास हा प्रामुख्याने अपुऱ्या भांडवलामुळे थांबलेला दिसून येत नाही. त्यामागे अकार्यक्षम मानवी गुंतवणूक हेच कारण प्रामुख्याने दिसून येते. याच कारणामुळे मानवी भांडवल व्यवस्थापनाचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

## 2. संशोधनाची पार्श्वभूमी:

आधुनिक काळात अनेक संशोधकांचे लक्ष मानवी भांडवलाच्या संकल्पनेकडे आकर्षित झालेले आपल्याला दिसून येते. अनेक संशोधनांनी मानवी घटक गृहीत धरून संशोधन केलेले दिसून येते. यामध्ये प्रामुख्याने एकत्रित बुद्धिमत्ता कौशल्य विकासाला प्राधान्य दिलेले दिसून येते.ज्ञान कौशल्य क्षमता आणि व्यक्तिमत्व तसेच व्यक्तिमत्वामध्ये अंतर्भूत असलेली

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

गुणवैशिष्ट्य जी वैयक्तिक, सामाजिक आणि आर्थिक कल्याणाच्या निर्मितीसाठी महत्त्वाची ठरतात. मानवी भांडवलाचे असे पैलू जे संस्थांच्या कार्यक्षमता आणि उत्पादकतेसाठी सर्वात महत्त्वाचे आहेत. औपचारिक शिक्षण म्हणजे पात्रतेकडे नेणाऱ्या किंवा व्यक्तींमध्ये पात्रता निर्माण करणाऱ्या शिक्षण हे प्रामुख्याने कार्यक्षमतेसाठी महत्त्वपूर्ण असते. प्रत्यक्ष कामावरील प्रशिक्षण, कामाचा अनुभव किंवा इतर शिक्षणामुळे औपचारिक पात्रता प्राप्त होत नाहीत.

थोडक्यात औपचारिक शिक्षण, पायाभूत कौशल्य, व्यवस्थापन कौशल्य आणि नेतृत्व कौशल्य कर्मचाऱ्यांचे ज्ञान आणि कौशल्य मानवी भांडवल म्हणून ओळखले जाते.थोडक्यात औपचारिक शिक्षण हा बौद्धिक भांडवलाचा गाभा आहे.अनेक संशोधकांच्या मते मानवी भांडवल ही सर्वात मोठी संपत्ती आहे. जी बौद्धिक भांडवलाची निर्मिती करते तसेच कार्यामध्ये विविधता व कामाच्या मूल्यांमध्ये वाढ करते. त्याचबरोबर संशोधकांच्या मते मानवी भांडवलाची आर्थिक उत्पादन घटक म्हणून देखील गणना होऊ शकते कारण व्यवसाय संस्थेच्या कामगिरीमध्ये वाढ करण्यासाठी मानवी मेंदू तसेच मानवी श्रमाचा मोठा वाटा आहे. ज्या मधून मोठ्या प्रमाणावर नाविन्य निर्माण केले जाते तसेच उत्पादकते मध्ये वाढ होते.

संशोधकांच्या मते मानवी भांडवल प्रभावीपणे वापरण्यासाठी कर्मचाऱ्यांमधील आवश्यक कौशल्य गुणवैशिष्ट्य तसेच त्यांचे ज्ञान याचा संस्थेसाठी जास्तीत जास्त सर्जनशीलतेने वापर करून घेतल्यास संस्थेच्या आर्थिक मूल्यांमध्ये वाढ होते. याचाच परिणाम वैयक्तिक पणे कर्मचाऱ्यांना त्यांच्या आर्थिक मोबदल्यामध्ये वाढ करण्यासाठी होतो त्याचबरोबर व्यवसाय संस्थेचा परिणामी राज्याच्या आणि देशाच्या आर्थिक सामाजिक आणि सांस्कृतिक विकासाला चालना मिळते. बहुतांश व्यवसाय संस्थांमध्ये वस्तू व सेवांचे उत्पादन आणि त्यासाठी केल्या जाणाऱ्या तरतुदीमध्ये मानवी बुद्धी, कौशल्य आणि मानवी क्षमता यांचा वापर केलेला दिसून येतो म्हणजेच मानवी भांडवल हे व्यक्तीचे ज्ञान आणि कौशल्य दर्शवते थोडक्यात मानवी भांडवल हे व्यवसाय संस्थेच्या मालकीचे नसते परंतु योग्य मोबदला घेऊन त्याचा वापर करता येतो. मानवी भांडवलाला चिरंतन काल अस्तित्व नसते कारण प्रत्येक व्यक्तीच्या अस्तित्वावर मानवी भांडवलाचे अस्तित्व अवलंबून असते.

व्यवसाय संस्थेचा विकास साधायचा असेल तर मानवी भांडवलाचा विकास करण्यासाठी विविध प्रकारची धोरणे आखून त्याची अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. अनेक संशोधन अभ्यासातून असे सिद्ध झाले की कर्मचाऱ्यांच्या समाधानाचा व कर्मचाऱ्यांच्या कामगिरीची महत्त्वपूर्ण संबंध आहे. कोणताही समाधानी असणारा कर्मचारी कठोर परिश्रम करण्यास सहज तयार होतो तसेच व्यवसाय संस्थेसाठी अतिरिक्त काम करण्यास देखील इच्छुक असतो. म्हणजेच कर्मचाऱ्यांच्या समाधानाचा आणि मानवी भांडवल व्यवस्थापनाचा अत्यंत जवळचा संबंध आहे. मानवी भांडवल व्यवस्थापन करत असताना व्यवस्थापकांनी कर्मचाऱ्यांच्या मानसिक आर्थिक आणि शारीरिक गरजांचा अभ्यास करून योग्य प्रकारे अभिप्रेरणाच्या योजना आखून त्याची अंमलबजावणी केल्यास उत्तमरीत्या मानवी भांडवलाचे व्यवस्थापन होऊ शकते.

प्रभावीपणे मानवी भांडवल व्यवस्थापन केल्यास व्यवसाय संस्थेच्या कार्याची पातळी उंचावते. व्यवसाय संस्थेचे उद्दिष्ट गाठण्यासाठी कर्मचाऱ्याच्या क्षमतांचे व्यवस्थापन आणि विकास करण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे स्पष्ट होते. प्रामुख्याने

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

व्यवसाय संस्थांच्या गरजांवरती व्यवस्थापकांचे लक्ष केंद्रित असते. परंतु त्या गरजा पूर्ण करून घेण्यासाठी आवश्यक असणाऱ्या मनुष्यबळाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. कर्मचाऱ्यांच्या क्षमता वाढवण्यासाठी त्यांच्या गरजांकडे लक्ष देणे देखील आवश्यक आहे कारण कर्मचारी म्हणजेच मनुष्यबळ ही व्यवसाय संस्थेची मानवी भांडवलाच्या स्वरूपातील गुंतवणूक असते जिला विविध प्रकारच्या एककांचा वापर करून मोजता येते. तसेच तिचे भविष्यातील गुंतवणुकीचे मूल्य वाढविता येते परंतु मालकीचे भांडवल म्हणून हक्क दाखवता येत नाही. थोडक्यात जोपर्यंत मानवी भांडवल अस्तित्वात आहे तोपर्यंत उपलब्ध कर्मचाऱ्यांचे नियोजन करून कर्मचारी विषयक धोरणे आखून त्यांची भरती, बदली,बढती, प्रशिक्षण, कार्य मूल्यमापन, कार्य विश्लेषण अहवाल इत्यादी बाबींकडे देखील विशेष लक्ष दिले पाहिजे.

संघटना म्हणजे विशिष्ट उद्दिष्ट असलेल्या व्यक्तींचा समूह होय.एखादे कार्य किती यशस्वीपणे पार पाडले जाते यादृष्टीकोनातून केलेली क्रिया म्हणजेच कार्यप्रदर्शन होय. थोडक्यात एखाद्या विशिष्ट उद्देशाने लोकांचा समूह एखादे कार्य किती यशस्वीपणे पार पाडतो यावर व्यवसाय संस्थेची कामगिरी अवलंबून असते. मूलतः जेव्हा आपण संघटनात्मक कामगिरी आणि यशस्वी परिणामांची पूर्तता याचा संदर्भ घेतो तेव्हा आपण संस्थात्मक कार्य प्रदर्शनामध्ये संस्थेची वास्तविक उत्पादकता किंवा त्याचा परिणाम यांचा समावेश होतो तेव्हाच व्यवसाय संस्थेचे उद्दिष्ट किती प्रमाणात पूर्ण झाले ते मोजता येते.

**संस्थात्मक कार्यक्षमतेमध्ये तीन घटकांचा समावेश होतो:**

1. आर्थिक कामगिरी: म्हणजेच नफा, मालमत्तेवरील परतावा, गुंतवणुकीवरील परतावा इत्यादी.
2. उत्पादन बाजारातील कामगिरी: म्हणजेच विक्री, बाजारपेठेतील वाटा इत्यादी.
3. भागधारकांचा परतावा:एकूण भागधारक परतावा आर्थिक मूल्यवर्धित इत्यादी.

कोणतीही व्यवसाय संस्था त्यांच्या संबंधित उद्योगांकडे दुर्लक्ष करून सातत्याने स्पर्धा क्षमता वाढवत असते किंवा स्पर्धेला सामोरे जात असते बाजारपेठेतील स्पर्धेमध्ये आपले स्थान भक्कम करण्यासाठी डावपेच आखत असते परंतु त्याचबरोबर मानवी विकास साधण्यासाठी भांडवल व्यवस्थापनाची देखील आवश्यकता असते.

अनेक संशोधन अभ्यास साहित्यामध्ये असे दिसून येते की संघटनात्मक कामगिरी वाढविण्यासाठी मानवी भांडवलाची भूमिका खूप महत्त्वाची आहे उत्पादकता,कार्यप्रदर्शन तसेच स्पर्धात्मक शक्ती सुधारण्यासाठी हा मुख्य घटक आहे याकरिता नक्कीच कुशल आणि कार्यक्षम मनुष्यबळ हे संघटनात्मक उद्दिष्ट साध्य करण्यासाठी महत्त्वाचे साधन आहे कारण ते धोरणात्मक नियोजन आणि व्यवसाय संस्थेची उत्पादकता वाढविण्यात किंवा कमी करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडते.

अनेक संशोधन साहित्यामध्ये मध्ये हे देखील दिसून येते की मानवी भांडवल व्यवस्थापन विविध पद्धतींचा वापर करून मोजले जाते परंतु प्रभावी संस्थात्मक कामगिरी निश्चित करण्यासाठी मानवी भांडवल व्यवस्थापनाच्या मोजमापा करिता सर्व शाखांमधील तज्ञ व्यक्तींना विशिष्ट अशी चौकट ठरवता आलेली नाही. बासी अँड मॅकमुरर यांनी (2007) संस्थात्मक

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

कामगिरीचा अंदाज बांधण्यासाठी आणि संस्थांच्या मानवी भांडवल गुंतवणुकीचे मार्गदर्शन करण्यासाठी मानवी भांडवल व्यवस्थापनाचे मूल्यांकन करण्यासाठी एक प्रणाली विकसित केली त्यांनी केलेल्या प्रयोगिक संशोधनामध्ये मानवी भांडवल व्यवस्थापन करणाऱ्या व्यवस्थापकांचा एक समूह तयार करून मोठ्या प्रमाणावर मानवी भांडवल व कार्यक्षमता मोजण्याचे अंदाज लावता येतात असे स्पष्ट केले आहे त्यामध्ये त्यांनी एकूण पाच प्रमुख श्रेणी तयार करून त्यामध्ये नेतृत्व पद्धती, कर्मचाऱ्यांना कामाचे वाटप, माहितीची उपलब्धता आणि संस्थात्मक शिक्षणक्षमता तसेच प्रशिक्षण यांचा वापर केला जातो.

व्यवसाय संस्थेची मानवी भांडवलाची गुंतवणूक आणि त्यांची कार्यक्षमता तपासण्यासाठी पुढील घटक विचारात घेतले जातात.

1. **नेतृत्व:** व्यवस्थापकीय परिणामकारकता, संदेशवहन, कार्यप्रदर्शन, अभिप्राय, आत्मविश्वास निर्माण करण्याचे प्रयत्न आणि मुख्य संस्थात्मक मूल्यांचे प्रदर्शन याद्वारे मानवी भांडवल जास्तीत जास्त उपयोगात आणण्यासाठी प्रयत्न करणे हे व्यवस्थापकांच्या म्हणजेच प्रत्येक विभागाच्या नेतृत्वाच्या क्षमतेवर अवलंबून असते.
2. **मनुष्यबळाचा पर्याप्त वापर :** कर्मचाऱ्यांमधील प्रतिभा,कौशल्य आणि क्षमता विकसित करण्यासाठी आणि त्या टिकवून ठेवण्यासाठी तसेच योग्य मार्गदर्शन करून कर्मचाऱ्यांकडून जास्तीत जास्त काम करून घेण्यासाठी व संस्थेची उद्दिष्टे गाठून यश मिळवण्यासाठी प्रयत्न करणे.
3. **उपलब्ध ज्ञानाचा पर्याप्त वापर:** व्यवसाय संस्थेमध्ये उपलब्ध असणाऱ्या बुद्धिजीवी कर्मचाऱ्यांच्या ज्ञानाचा योग्य पद्धतीने वापर करून घेऊन संस्थेच्या क्षमता वाढविण्यासाठी प्रयत्न करणे.
4. **बुद्धिमत्ता वाढीसाठी प्रयत्न करणे:** व्यवसाय संस्थेतील कर्मचाऱ्यांच्या बुद्धिमत्तेमध्ये वाढ करण्यासाठी विविध योजना आखणे व त्यांच्या क्षमता टिकवून ठेवण्यासाठी आणि त्यांना गुंतवून ठेवण्यासाठी विविध प्रकारच्या योजना आखणे.
5. **नवनवीन बाबी शिकण्याची क्षमता:** व्यवसाय संस्थेतील कर्मचाऱ्यांना नवनवीन तंत्रज्ञानातील बदल तसेच सातत्यपूर्ण सुधारणा करण्यासाठी क्षमता निर्माण करणे.

वरील पाच घटकांवरून असे लक्षात येते की मानवी भांडवल व्यवस्थापनातील संस्थांची ताकद आणि कमकुवतपणा चे मूल्यमापन केले जाऊ शकते.वरील 5 घटकाद्वारे मानवी भांडवल व्यवस्थापन पद्धतींच्या कामगिरीचे निरीक्षण करणे सर्वसाधारणपणे संस्थात्मक कामगिरीतील सुधारणा किंवा घट, मानवी भांडवल व्यवस्थापन पद्धतीतील सुधारणा किंवा घट याच्याशी संबंधित आहे.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

मानवी भांडवल आणि कामगिरी यांच्यातील दुवा दोन सैद्धांतिक पैलूंवर आधारित आहे प्रथम व्यवसाय संस्थेचे मनुष्यबळ आणि दुसरे म्हणजे मनुष्यबळाची प्रेरणांची अपेक्षा. व्यवसाय संस्थेचा आधारित दृष्टिकोन ह◌ा एक मौल्यवान भाग तयार करण्याच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचा आहे थोडक्यात मानवी भांडवल हे व्यवसाय संस्थेचे सर्वात मौल्यवान संसाधन आहे खऱ्या अर्थाने ती एक अदृश्य मालमत्ता आहे.

**3. संशोधन समस्या:**

व्यक्ती संस्था आणि राष्ट्र यांच्या भविष्यातील सुरक्षिततेसाठी आणि यशासाठी उच्च प्रतीच्या कौशल्यांची आणि क्षमतांची आवश्यकता आहे. मूलतः व्यक्ती आयुष्यभर अधिक शिक्षण आणि प्रशिक्षण घेतात आणि त्याचा वापर आपल्या आणि आपल्या कुटुंबाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी करतात या मधून मानवी भांडवलाची निर्मिती होते मानवी भांडवल वस्तू आणि सेवांचे उत्पादन तसेच बाजारपेठेतील नवीन नवीन कल्पनांना चालना देण्याचे काम करते असे असून देखील मानवी भांडवलाच्या आर्थिक मूल्यांवर कायम प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाऊ शकत नाही परंतु मानवी भांडवल विकास आणि व्यवसाय संस्थेचा विकास यामध्ये काही संबंध असल्यास संशोधकांच्या मते ही महत्त्वाची बाब आहे याविषयी विश्लेषण करण्याचा व तथ्य जगापुढे आणण्याचा मानस संशोधकाचा आहे.

**4. संशोधन अभ्यासाचा उद्देश:**

संशोधकांनी बँकिंग व्यवसायावर विशेष लक्ष केंद्रित करून संस्थात्मक कामगिरीवर मानवी भांडवल व्यवस्थापनाचा प्रभाव पडतो हा या अभ्यासाचा सामान्य हेतू आहे. संबंधित संशोधनाची विशेष उद्दिष्टे पुढीलप्रमाणे

I. उपलब्ध संशोधन साहित्य आणि व्यवसाय संस्थांमधील मानवी भांडवल व्यवस्थापन पद्धतीचा अभ्यास करणे.

II. मानवी भांडवल व्यवस्थापनाचा संस्थात्मक कार्यक्षमतेवर किती प्रमाणात प्रभाव पडतो याचे परीक्षण करणे.

III. मानवी भांडवल व्यवस्थापनाचा आणि व्यवस्थापनातील प्रवृत्तींचा कर्मचाऱ्यांच्या भविष्यकालीन विकासाशी आणि संस्थात्मक कामगिरीचा संबंध तपासणे.

**5. संशोधन प्रश्न:**

I. मानवी भांडवल व्यवस्थापन संस्थात्मक कामगिरीवर किती प्रमाणात प्रभाव टाकते?

II. मानवी भांडवल व्यवस्थापनाशी व्यवस्थापन प्रवृत्तीचा भविष्यकालीन विकास आणि कर्मचाऱ्यांच्या संस्थात्मक कामगिरीचा काही संबंध आहे का?

**6.संशोधन पद्धती:**

देशातील बँकिंग उद्योगांमध्ये मानवी भांडवल व्यवस्थापन आणि संस्थात्मक कामगिरी यांच्यात संबंध आहे की नाही हे निश्चित करण्यासाठी या अभ्यासाने परस्पर सहसंबंध प्रकाराचे वर्णनात्मक संशोधन रचनेनुसार अभ्यास केलेला आहे.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

देशातील 12 सार्वजनिक बँकांपैकी 6 सार्वजनिक बँकांमधील प्रत्येकी 10 प्रमाणे एकूण 60 कायमस्वरूपी नोकरी करणाऱ्या वरिष्ठ कर्मचाऱ्यांची नमुना म्हणून निवड करण्यात आली.

प्रश्नावलीच्या माध्यमातून माहिती मिळविली ज्यामध्ये मानवी भांडवल व्यवस्थापन, नेतृत्व पद्धती,कार्य बल, कार्यक्षमता अत्याधुनिक गोष्टी शिकण्याची क्षमता, ज्ञान सुलभता त्याचबरोबर संस्थात्मक कार्यक्षमता, संस्थात्मक स्थिती मोजणे अशा विषयांवर प्रश्न विचारून माहिती गोळा केली.

मिळालेल्या माहितीचे मीन (x) सांख्यिकी आणि पियर्सन प्रॉडक्ट मोमेंट को रिलेशन (PPMC) वापरून विश्लेषण केले गेले यामध्ये 3.0 ची सरासरी हे निर्णयाचे महत्त्वपूर्ण मूल्य म्हणून घेतले गेले म्हणजेच 3.0 च्या खाली येणारा सरासरी प्रतिसाद प्रभावी नाही आणि 3.0 च्या वरती येणारा प्रतिसाद प्रभावशाली म्हणून समजला गेला.

**परिशिष्ट क्रमांक 1**

| अ. क्र. | तपशील | मध्य (x) | टिप्पणी |
|---|---|---|---|
| 1 | काम पूर्ण करण्याच्या प्रक्रिया चांगल्या प्रकारे केल्या आहेत तसेच त्यामध्ये सुधारणा केल्या आहेत आणि त्यांचा वापर कसा करायचा याचे कर्मचाऱ्यांनी चांगले प्रशिक्षण घेतलेले आहे. | 3.50 | प्रभावशाली |
| 2 | कर्मचाऱ्यांना त्यांना आवश्यक असलेली सामग्री पुरविली जाते आणि तंत्रज्ञानामध्ये सामावून घेतले जाते त्याचबरोबर कर्मचारी त्यांच्या कामामध्ये चांगले योगदान देतात. | 3.47 | प्रभावशाली |
| 3 | उच्च गुणवत्तेचे काम करण्यासाठी कर्मचाऱ्यांना जबाबदार धरले जाते. | 3.42 | प्रभावशाली |
| 4 | कर्मचाऱ्यांची पदोन्नती त्यांच्या सक्षमतेवर आधारित असते आणि खराब कामगिरी करणाऱ्यांना पदोन्नती दिली जात नाही. | 3.77 | प्रभावशाली |
| 5 | कर्मचाऱ्यांची निवड विशिष्ट कार्य करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या कौशल्यांच्यावर आधारित असते. | 3.55 | प्रभावशाली |
| 6 | नव्याने भरती झालेल्या कर्मचाऱ्यांना संस्थेची व कामाची पुरेशी परिचयात्मक माहिती दिली जाते त्याचबरोबर आवश्यक कौशल्यांची देखील माहिती दिली जाते. | 3.84 | “ |
| 7 | कर्मचाऱ्यांना नोकरीवर कायम करण्यासाठी अत्यंत प्रभावी प्रणाली वापरल्या जातात त्याचबरोबर कर्मचाऱ्यांची एकूण निपुणता पाहण्यासाठी त्यांची कामगिरी आणि कौशल्य यांची तपासणी केली जाते. | 3.48 | “ |
| 8 | कर्मचाऱ्यांना त्यांची कार्यक्षमता ओळखण्यासाठी मदत केली जाते. | 3.29 | “ |
| 9 | प्रत्यक्ष काम करत असताना येणाऱ्या समस्या, अडचणी सोडवण्यासाठी उपाय योजना आखल्या जातात. | 3.31 | “ |
| 10 | कर्मचाऱ्यांना त्यांचा वैयक्तिक विकास करण्यासाठी अभिप्रेरण दिले जाते. | 3.11 | “ |

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

| | | | |
|---|---|---|---|
| 11 | कर्मचाऱ्यांना कार्य पूर्ण करण्यासाठी व तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी व्यावहारिक प्रशिक्षण दिले जाते. | 3.68 | " |
| 12 | सातत्यपूर्ण नवीन संकल्पना शिकण्यावर भर दिला जातो. | 3.66 | " |
| 13 | मानवी भांडवलाची कार्यक्षमता मोजण्यासाठी व्यवस्थापना मार्फत विकसित प्रणालीचा वापर केला जातो. | 3.69 | " |
| 14 | ज्ञान वाढीच्या दृष्टिकोनातून विकसित प्रणाली आहेत. | 3.27 | " |
| 15 | उद्दिष्टानुसार काम पूर्ण करण्यासाठी कर्मचाऱ्यांची कौशल्य विकसित केली जातात. | 3.53 | " |
| 16 | कर्मचाऱ्यांनी जास्तीत जास्त कार्यक्षमतेने काम करण्यासाठी कार्यपद्धती विकसित केली आहे तसेच आवश्यकतेनुसार वेळोवेळी मदत केली जाते. | 3.34 | " |

परिशिष्ट 1मधील संशोधन प्रश्न क्रमांक 1 चे प्रतिसाद सुचित करतात की मानवी भांडवल व्यवस्थापन 3.11 ते 3.84 च्या सरासरी दर्शवितात म्हणजेच मानवी भांडवल संस्थात्मक कार्यक्षमतेवर लक्षणीय परिणाम करते या परिणामाचा असा अर्थ होतो की प्रतिसाद कर्त्यांनी हे मान्य केले आहे की मानवी भांडवल व्यवस्थापन हे कोणत्याही संस्थात्मक कार्यक्षमतेसाठी योग्य आहे.

**परिशिष्ट क्रमांक 2**

| **चल (Variables)** | **पियर्सन प्रॉडक्ट मोमेंट को रिलेशन ( Pearson r)** | **कामगिरी (Performance)** | **मानवीभांडवल व्यवस्थापन (HCM)** |
|---|---|---|---|
| कामगिरी (Performance) | Pearson Correlation. | 1 | .297(**) |
| | Sig. (2-tailed) | | .000 |
| | N | 62 | 62 |
| मानवीभांडवल व्यवस्थापन (HCM) | Pearson Correlation | .297(**) | 1 |
| | Sig. (2-tailed) | .000 | |
| | N | 62 | 62 |

परिशिष्ट दोनचा परिणाम असे दर्शवतो की मानवी भांडवल व्यवस्थापनाकडे व्यवस्थापनाची प्रवृत्ती भविष्यकालीन वाटचाल व विकास आणि कर्मचाऱ्यांच्या संस्थात्मक कामगिरीशी(r=0.297,p=. 000) सकारात्मक संबंध आहे.

**7. निष्कर्ष:**

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

1. परिशिष्ट एक नुसार मानवी भांडवल व्यवस्थापन संस्थात्मक कामगिरीवर लक्षणीय परिणाम करतात.

2. मानवी संसाधन पद्धतींच्या परिणामकारकते मध्ये वाढ झाल्याने प्रति कर्मचारी विक्रीत वाढ झाली आणि संस्थात्मक रोख प्रवाहात देखील वाढ झाली.

3. अभ्यासामध्ये असे दिसून आले की मानवी संसाधन प्रणालीतील एक मानक विचलन बदल भागधारक मूल्यातील 21% बदलाशी संबंधित आहे.

4. परिशिष्ट दोन नुसार मानवी भांडवल व्यवस्थापनाकडे व्यवस्थापनाची प्रवृत्ती आणि भविष्यकालीन विकास आणि कर्मचाऱ्यांच्या संस्थात्मक कामगिरीची सकारात्मक संबंध आहे थोडक्यात मागील संशोधनानुसार मानवी संसाधन लवचिकता विक्रीवरील परतावा प्रती कर्मचारी नफा आणि प्रति कर्मचारी विक्री यांच्याशी सकारात्मक संबंधित आहे

5. संशोधन अभ्यासाच्या परिणामानुसार मानवी संसाधन पद्धती आणि संस्थात्मक कार्यक्षमतेचा लक्षणीय सकारात्मक संबंध दर्शवतो मागील संशोधनानुसार मानवी भांडवल कार्यक्षमतेचा व संस्थेच्या कामगिरीचा महत्वपूर्ण आणि सकारात्मक संबंध आहे असे स्पष्ट करतो म्हणजेच मानवी भांडवलाचा संस्थात्मक कामगिरीवर महत्वपूर्ण सकारात्मक प्रभाव पडतो असे स्पष्ट होते

6. मानवी भांडवल मूल्य आणि कंपन्यांचे बाजार मूल्य यांच्यात महत्त्वपूर्ण संबंध आहे मागील संशोधनानुसार सांघिक कार्य, विशिष्ट संशोधन आणि विकास मानवी भांडवल वाढवेल आणि त्या बदल्यात संस्थेची उच्च सर्जनशीलता व कामगिरी वाढेल.

थोडक्यात व्यवसाय संस्थेच्या संशोधन आणि विकास कार्यामुळे मानवी भांडवलामध्ये नाविन्यपूर्ण बदल होतो तसेच कर्मचाऱ्यांच्या ज्ञानामध्ये देवाणघेवाण होते परिणामी संबंधात सकारात्मकता निर्माण होते.

7. संस्थांकडे त्यांचे ध्येय आणि उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी प्रभावी कार्यक्रम आणि कौशल्य आहेत याची खात्री करण्यासाठी व्यापक संस्थात्मक धोरणात्मक नियोजनासह मानवी भांडवल नियोजनाचे एकत्रीकरण करणे आवश्यक असते मागील संशोधनानुसार कर्मचारी प्रशिक्षण आणि विकास प्रोत्साहन मानवी भांडवलांच्या परिणामकारकतेवर आणि गुंतविलेल्या मानवी भांडवलाच्या परताव्यावर महत्वपूर्ण प्रभाव पडतो.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

**सारांश:**

मानवी संसाधन प्रणाली मानवी भांडवल आणि संस्थात्मक कार्यप्रदर्शन या संबंधित संशोधनाशी हे निष्कर्ष सुसंगत आहेत यामध्ये उच्च सहभागी मानवी भांडवल विकास प्रणालीचा अवलंब करणाऱ्या संस्था विशिष्ट मानवी भांडवल वाढवतात आणि त्या बदल्यात कर्मचाऱ्यांची उच्च सर्जनशील कामगिरी वाढवतात आणि शेवटी सकारात्मक संस्थात्मक कामगिरीच्या एकूण उद्दिष्टांची पूर्तता करतात.

**8. शिफारशी:**

1. संस्थांनी मनुष्यबळाची नेमणूक करताना योग्य कर्मचाऱ्यांची निवड करण्यासाठी मूल्यांकन पद्धती विकसित केली पाहिजे.

2. कर्मचाऱ्यांना सातत्यपूर्ण अद्ययावत ज्ञान देण्यासाठी मानवी भांडवल विकास पद्धतींचा वापर केला पाहिजे.

3. बँकिंग उद्योगांमध्ये प्रशिक्षण आणि विकास कार्यक्रमांना प्राधान्य दिले पाहिजे.

4. कर्मचाऱ्यांना त्यांच्या नोकरीची सुरक्षितता निश्चित करून दिली पाहिजे त्याचबरोबर भविष्यकालीन विकास साठी योजना आखल्या पाहिजेत.

5. संघटनेच्या वाढीकरिता कर्मचाऱ्यांचा वापर करून घेणे आवश्यक आहे.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

# केंद्र पुरस्कृत कृषी विकास योजना आणि भारतातील शाश्वत शेती : एक अभ्यास

**राम गोविंद दळवे,**
संशोधक विद्यार्थी, अर्थशास्त्र (Ph.D- pursuing)
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद.
Mob- 8208732188 / 9373208426, EmalL- dalvlram55@gmall.com

**गोषवारा (Abstract):**

कृषी संबंधी शाश्वत विकास या संकल्पने मध्ये शेती व्यवसायाशी सातत्याने नवनवीन प्रयोग करून शेती उत्पादन व व्यवसाय सुखकर करण्याचा प्रयत्न होत आहे. कृषि व्यवसाय विकसित व तांत्रिक पध्दतीने झाला पाहिजे या करिता शेती संबंधी शासन सतत नवनवीन योजना राबवित आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीचे महत्त्वाचे स्थान आहे तरी अन्य देशांच्या तुलनेत अवस्था वाईट आहे. उत्पादकता कमी आहे. भारतीय शेतकरी शेतीकडे उदारनिवाहाचे साधन म्हणून बघतात. पण शेतीच्या परिस्थितीत बदलायला कोणीच लवकर तयार होत नाही. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर हीच स्थिती होती, म्हणुन बाहेर पाडण्याकरीता सरकारने कृषी धोरण २००० जाहीर केले. या कृषी धोरणानंतर भारतातील शाश्वत शेती विकास आणि केंद्र पुरस्कृत विकास योजनांचे कृषिसाठीचे अध्ययन करण्याकरीता प्रस्तुत पेपर लिहण्यात आला आहे.

**Keywords:** भारतीय शेती, भारतीय अर्थव्यवस्थेत कृषिक्षेत्राचे योगदान, शाश्वत शेती विकास, केंद्र पुरस्कृत विकास योजना,

**प्रस्तावना :**

भारत हा विकसनशिल देश म्हणून ओळखला जातो. 2011 च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या 127 कोटी असुन ती जागतिक लोकसंख्या पैकी 16.7 टक्के आहे. जगाच्या एकूण भूभागाचे क्षेत्रफळ यांची तुलना केली तर अधिक लोकसंख्या आणि कमी भुभाग दिसून येतो. भारतात 50 ते 60 कोटी लोक हे आर्थिकदृष्टया दुर्बल आहेत. या दुर्बल लोकांपैकी 40 कोटी लोक हे दारिद्रय रेषेखाली आहेत.

भारत हा खेड्यांचा देश असून खेड्यात 67 टक्के लोकसंख्या वास्तव्य करीत आहे. या खेड्यातील लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती आहे. म्हणुन भारताची अर्थव्यवस्था कृषीप्रधान अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. शेती व्यवसाय हा निसर्गाचा लहरीपणा आणि तांत्रिक शेती, मशागत, नियोजन व्यवस्थापनावर अवलंबून आहे. आदिमानवापासून आधुनिक मानवापर्यंत शेती व्यवसायाच्या पध्दती आणि नियोजनात नवनवीन प्रयोग करून विकास घडून आणला जात आहे. त्यामध्ये शेतीची मशागत मृदा तपासणी, पाणी व्यवस्थापन, विकसित बि-बियाणे किटकनाशके, कृषी प्रदर्शन, मेळावे, शेतकरी संघटना इत्यादीचा समावेश झालेला दिसुन येतो.

**भारतीय अर्थव्यवस्थेत कृषिक्षेत्राचे योगदान :**

भारतात आजही 72.18 टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. त्यापैकी बहुसंख्य लोकांच्या उपजिविकेचे प्रमुख साधन शेती आहे. जवळपास एक चतुर्थांश (25 टक्के) स्थूल घरगुती उत्पादन शेतीपासून मिळते. दोन तृतीयांश

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

(60 टक्के ) लोकांच्या उपजिवीकेचे ते साधन आहे. शिवाय देशातील अन्नधान्याची टंचाई दूर करुन स्वयंपूर्णता निर्माण करण्याबाबत शेतीक्षेत्राची भूमिका महत्वाची ठरली आहे. तसेच खाजगी व सार्वजनिक क्षेत्रांतील गुंतवणूक वाढीसाठी शेती क्षेत्राच्या प्रगतीमुळे प्रेरणा मिळाली आहे. अर्थात 'हरितक्रांती' हा भारतीय शेतीच्या प्रगतीचा मुख्य आधार ठरला आहे. भारतातील बेरोजगारी व दारिद्र्य निर्मुलनाच्या दृष्टीने शेती क्षेत्राचे मोठे योगदान राहत आले आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेत रोजगारीचे मोठे क्षेत्र म्हणून कृषी क्षेत्राकडे पाहिले जाते. विशेषतः ग्रामीण भागाकरीता कृषी क्षेत्र वरदान ठरले आहे. राष्ट्रीय नमुना पाहणीनुसार सर्वसाधारणपणे 2001 ते 2005 या कालावधीत कृषी क्षेत्रात 66 टक्के पुरुष व 84 टक्के महिलांना ग्रामीण भागात रोजगार उपलब्ध झाला होता. 1999-2000 मध्ये 56 ते 57 टक्के श्रमशक्तीला प्राथमिक क्षेत्रात रोजगार उपलब्ध झाला. तर 2006-2007 या वर्षी एकूण श्रमशक्तीपैकी 51 टक्के श्रमशक्ती कृषी क्षेत्रात गुंतलेली होती. याचा अर्थ, अलिकडील काळात कृषी क्षेत्रात श्रमशक्तीचे अवलंबीत्व कमी होत असले तरी रोजगार प्राप्तीचे सर्वात मोठे क्षेत्र म्हणून आजही भारतीय शेतीकडे पाहिले जाते. शेतीचा शाश्वत विकास आणि शेती संबंधी शासनाच्या योजना कोणत्या स्वरुपात आहेत. या योजनाचा परिणाम कोणत्या स्वरुपात आहेत. याची उकल करण्याकरिता प्रस्तुत संशोधन विषयाला अनुसरून पुढीलप्रमाणे अध्ययनाची उद्दिष्टये मांडण्यात आली आहेत.

**उद्दिष्टये (Objectives) :**

1) भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्रांच्या योगदानांचा अभ्यास
2) कृषी क्षेत्राच्या समस्यांचा अभ्यास करणे.
3) शाश्वत शेती विकासाचे घटक जाणून घेणे.
4) शाश्वत शेती आणि आर्थिक स्थितीचे अध्ययन करणे.
5) शेती व्यवसायासंबंधी केंद्र पुरस्कृत कृषी विकास योजनांचा अभ्यास करणे.

सदरील अध्ययन उद्दिष्टांच्या पुर्तते करिता खालीलप्रमाणे गृहितकृत्यांची मांडणी करण्यात आली आहे.

**गृहितके (Hypothesis) :**

1) शाश्वत शेती निरंतर चालणारी प्रक्रिया आहे.
2) भारतीय शेतीला शाश्वत तांत्रिक सुविधांचा अभाव आहे.
3) शाश्वत विकसीत शेती उद्योगात शेतमालाच्या किंमतीत टोकाचा चढ-उतार आहे.
4) शाश्वत शेती विकासाला शासनाच्या योजना वरदान ठरत आहेत.

प्रस्तुत गृहितकृत्यांच्या पडताळणी करिता पुढीलप्रमाणे संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे.

**संशोधन पध्दती :**

सदरील शोध निबंधाच्या अध्ययनाकरिता प्रामुख्याने द्वितीय शोध पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे. त्यामध्ये विविध संदर्भ ग्रंथ मासिके, प्रकाशित प्रबंध, शासनाचे अहवाल, वर्तमान पत्रातील लेख, इंटरनेट इत्यादीचा अवलंब करण्यात आला आहे. प्रस्तुत शोध निबंधाची मांडणी करिता प्रामुख्याने वर्णनात्मक आराखड्याचा अवलंब करण्यात आला आहे.

**भारतीय शेतीच्या समस्यांचा कमी उत्पादकतेची कारणे-**

**1) जमिनीची धूप :**

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

भारतातील शेतजमीनीची मोठ्या प्रमाणात धूप होते. शेतजमीनीची धूप होण्याचे कारण म्हणजे सूर्याच्या उष्णतेमुळे, वाऱ्यामुळे व पावसाच्या व पुराच्या पाण्यामुळे जमिनीचा वरचा थर वाहून जातो. त्यामुळे जमिनीची उत्पादकता घटते

**2) जमीनीचे लहान आकारमान :**

भारतातील शेत जमीनीचे सरासरी आकारमान लहान व आर्थिकदृष्ट्या परवडणारे आहे. भारतात सुमारे 85 टक्के ज 4 हेक्टर पेक्षा कमी आहे. जमीन आकारमान आर्थिकदृष्ट्या किफायतशीर नाही. त्यामुळे शेतीत आधुनिक प्रयोग व येत नाही. पर्यायी शेती उत्पादन कमी राहते.

**3) श्रमिकाची कमी उत्पादकता :**

शेतकरी व शेतमजुरांची उत्पादन क्षमता कमी आहे. कारण जमीनीवर अतिरिक्त लोकसंख्येचा भार अधिक आहे. तसे शेतकरी व शेतमजूर व अकुशल आहेत. अतिरिक्त श्रमिकांची सीमांत उत्पादन क्षमता शून्य आहे. पर्यायी श्रमिकांच्या कमी उत्पादन क्षमतेमुळे शेतीची उत्पादकता सुद्धा कमी राहण्यास नकारात्मक पद्धतीने मदत होते.

**4) जलसिंचन सुविधांचा अभाव :**

भारतातील 32 टक्के जमीनीला जलसिंचन सुविधा उपलब्ध आहेत. उर्वरित 78 टक्के शेती पावसावर आधारित आहे. भारतात शेती हा एक जुगार म्हणून ओळखला जातो. कारण भारतीय शेती ही पूर्णतः पावसावर आधारित आहे. पाऊस हा अतिरिक्त, अनियमित व कमी या स्वरूपात पडतो. त्या सर्वांचा प्रतिकूल परिणाम शेतीची उत्पादकता घटण्यास मदत होते.

5) सुधारित बि-बियाणे व खतांच्या वापराचा अभाव :

भारतीय शेतीमध्ये जास्त उत्पादन देणाऱ्या सुधारित बियांचा वापर याचा अभाव आहे. तसेच खते व जंतुनाशके यांच्याही प्रभाव कमी असल्याने शेतीची उत्पादकता कमी राहते. भारतात खतांचा वापर तुलनात्मक दृष्ट्या कमी आहे. खतांच्या वाढत्या किमती, सरकारकडून मिळणारे कमी अनुदान इ. मुळे शेतकऱ्यांकडून कमी प्रमाणात खतांचा वापर केला जातो. पर्यायी शेतीची उत्पादकता कमी राहते.

**6) भांडवलाचा अभाव :**

भारतातील बहुतांश शेतकरी आपले जीवन दारिद्र्यरेषेखाली जगत आहेत. आपला उदरनिर्वाह चालवण्यासाठी आवश्यक असणारे उत्पन्न शेतकऱ्या जवळ नाही. सरासरी शेतकऱ्याचे उत्पन्न खूप कमी आहे. शेतकऱ्यांना शेती करण्यासाठी संस्थात्मक पतपुरवठा कमी केला जातो, बिगर संस्थात्मक पतपुरवठा च्या माध्यमातून शेती करावी लागते. यामध्ये जमीनदार, सावकार यांच्याकडून कर्ज घेतले जाते. अतिरिक्त व्याजदर यांसारख्या घटनांमुळे शेतकऱ्याची फसवणूक होते. शेती करण्यासाठी आवश्यक भाडवल उपलब्ध होत नाही त्यामुळे शेती उत्पादकता कमी असते.

**7) उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन :**

भारतीय शेती ही शेतकऱ्याच्या उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन म्हणून ओळखले जाते. शेतकऱ्याकडून शेती करीत असताना ती व्यापारी तत्त्वावर केली जात नाही. व्यापारी शेती दृष्टिकोनाच्या अभावी उत्पादकता कमी राहते.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

**विषय विवेचन (Discussion) :**

शाश्वत शेती विकास प्रक्रियेमध्ये शेती व्यवसायाशी संबंधीत विकसीत तंत्रज्ञानाचा समावेश होतो. तर शेती संबंधी शासनाच्या योजनामध्ये माती परिक्षण, तांत्रिक अवजारे, शास्त्रीय पध्दतीने शेतीमशागत, संकरीत बि-बियाणे, औषध फवारणी, पाणी नियोजन उत्पादीत मालाला हमीभाव, पिकविमा, माल खरेदी विक्री योजना इत्यादीचे स्वरुप पुढीलप्रमाणे दिसून येते.

**1) प्रधानमंत्री कृषी सिचंन योजना :**

शाश्वत शेती विकासाकरिता 2015 पासून प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेचा उद्देश शेती व्यवसाय तांत्रिक पध्दतीने करणे आणि 2022 पर्यंत शेतकऱ्यांच्या उत्पन्नात दुपटीने वाढ करणे आहे. या योजनेसाठी 2,600 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. या योजनेचे प्रमुख उद्दिष्टे म्हणजे प्रत्येक शेती करिता पाणी उपलब्ध करणे त्याचबरोबर नदी संपर्क योजनेची कार्यक्षमतेने अंमलबजावनी करणे. प्रत्येक गावामध्ये कमीत कमी एका जल-संग्रहण तलावाची निर्मिती करणे.

**2) प्रधानमंत्री पिक विमा योजना :**

ही योजना 13 जानेवारी 2016 पासून सुरु करण्यात आली. या योजनेतंर्गत शेतकऱ्यांना रब्बी आणि खरिप पिकांसाठी विमा संरक्षण दिले जाते. या योजनेत भात, बाजरी, गहु, नाचणी, तुर, मुग, उडीद, हरभरा, सोयाबीन इत्यादी तृणधान्य व कडधान्य त्याचबरोबर कारळे, भुईमुग, तीळ सूर्यफुल, करडई इत्यादी गळीत धान्य आणि कापूस, कांदा या नगदी पिकांचा समावेश करण्यात आलेला आहे.

**3) मृदाकार्ड योजना :**

शेतीतील मृदाची तपासणी करुन तीची गुणवता तपासुन त्यात कोणते पीक चांगल्याप्रकारे येईल. त्या पीकापासुन जास्तीत जास्त नफा शेतकऱ्यांना मिळेल या हेतुने केंद्र सरकारने 19 फेब्रुवारी 2015 मध्ये मृदा आरोग्य कार्ड योजनेचा प्रारंभ झाला. या योजनेचा उद्देश शेतकऱ्याला शेतातील मातीचे परिक्षण करून मातीचे परिक्षण व गुणवत्ता तपासून पिकाचे नियोजन केले जात आहे. माती परिक्षण करून जमिनीचा पोत सुधारण्यासाठी मदत होत आहे. या मुळे शेतीतून गुणवत्तापूर्ण आणि जास्तीत जास्त उत्पादन मिळण्यास सहाय्यभूत होत आहे. शेतीची सुपिकता योग्य नसेल तर शेतीत खर्च करुन त्याचा शेतकऱ्यांना लाभ मिळत नाही.

मृदा आरोग्य कार्ड योजना राबविण्याकरीता 2017 पर्यंत 10.58 कोटी मृदाकार्ड चे वितरण करण्यात आलेले आहे. या योजने अंतर्गत शेतकऱ्यांना मृदा तपासण्याची लिखीत पावती दिली जाते. त्यानुसार पुढील कार्यवाही केली जात आहे.

**4) प्रधानमंत्री किसान संपदा योजना :**

ही योजना भारत सरकारने ऑगस्ट 2017 मध्ये सुरु केली. या योजनेचा उद्देश आधुनिक यंत्र सामुग्रीच्या मदतीने कृषी व्यवसायाची मशागत, नियोजन, व्यवस्थापन आणि मुलभूत सुविधांची निर्मिती करणे आहे. आधुनिक सुविधामुळे शेती व्यवसाय वेळेवर पूर्ण होवून उत्पादनात वाढ होईल. अधिक उत्पादनामुळे देशात खाद्य सामुग्रीची कमतरता भासनार नाही. अधिक उत्पन्नातुन शेतकऱ्यांना आर्थिक लाभ ठेवून त्यांच्या कल्पना शक्तीचा मार्ग विकसित होईल.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

**5) राष्ट्रीय कृषी बाजार योजना :**

राष्ट्रीय कृषी बाजार योजना 14 एप्रिल 2016 पासून सुरु करण्यात आली. या योजनेचा उद्देश शेतकरी आणि खरेदीदार यांच्या मधील दलाल संपुष्टात आणून शेतकऱ्यांच्या शेती मालाला रास्त भाव मिळवून देणे होय. शेतकऱ्यांच्या मालाचे मापन योग्य पध्दतीने करणे. या योजनेमुळे सर्व बाजार समित्या ई-ट्रेडिंग व्यासपीठावर आणण्यात आलेल्या आहेत. देशातील प्रमुख 585 कृषी बाजार समित्या इंटरनेटने जोडण्यात आलेल्या आहेत. या योजनेचा शेतकऱ्यांना फायदा म्हणजे शेतकरी आपला माल प्रत्यक्ष ग्राहकांना विकू शकतो. विक्री करिता शेतकऱ्यांवर कोणतेही बंधन नाही. शेतकऱ्यांच्या मालाचे शासनाने भाव बांधणे बंधनकारक आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळत आहे.

**6) राष्ट्रीय ई-शासन योजना :**

ही योजना भारत सरकाने 18 ऑगस्ट 2006 मध्ये सुरु केली. या योजनेचा उद्देश देशातील सर्वच नागरिकांना सर्वत्र शासकीय सेवा इलेक्ट्रॉनिक साधनांचा माध्यमातून उपलब्ध करून देणे आहे.

ही योजना भारत सरकारने इलेक्ट्रॉनिक विभाग, माहिती तंत्रज्ञान विभाग आणि प्रशासकीय सुधारणा व जनतक्रार विभागाद्वारे बनविली आहे. या योजनेद्वारे माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा कृषी क्षेत्रामध्ये वापर करून कृषी विकासाला चालना देणे हा आहे. या योजनेमुळे नवनवीन माहिती तात्काळ शेतकऱ्यांना पोहचली जाते. त्याच बरोबर शेती मालाचे भाव शेतकऱ्यांच्या संदर्भातील योजना, शेतीला आर्थिक अनुदान शेती पिकांचा विमा, नवनवीन बि-बियाणे इत्यादीची माहिती शेतकऱ्यांना मिळत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना तांत्रिक शेतीची माहिती मिळुन त्यांचा आर्थिक विकास घडुन येत आहे.

**7) सरकारी पणन संस्था :**

शेतकऱ्यांच्या मालाला शाश्वत भाव मिळावा या करिता सरकारी पणन संस्थाची निर्मिती करण्यात आली. या संस्था बाजार समित्याच्या माध्यमातुन चालतात. या संस्थाद्वारे भारत सरकारने बाजार समित्याच्या विकासावर 500 कोटी रुपये खर्च केले आहेत. त्या मागील उद्देश शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था निर्माण करुन उत्पादीत माल समुहाने बाजार समित्याकडे आणने होय. या संस्थामुळे शेतकरी आपला शेतीमाल बाजारपेठेपर्यंत आणुन स्वच्छेप्रमाणे विक्री करु शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांना योग्य भाव मिळवून देण्याकरिता सहकारी पणन संस्था वरदान ठरत आहे.

**8) कृषी कर्जासाठी व्याज अनुदान योजना :**

व्याज अनुदान योजना 2006-07 पासून सुरु करण्यात आली. या योजने अंतर्गत शेतकऱ्यांना सार्वजनिक क्षेत्रातील बँकाकडून घेतलेल्या कर्जावर फक्त 7 टक्के व्याज द्यावे लागते. शासनाने 2009-10 पासुन जे शेतकरी अनुदाना सोबत व्याज भरणा करतील त्यांना व्याजदरात 1 टक्का सुट देण्याचे निश्चित केले आहे. तर 2010-11 पासून ही सुट 2 टक्के करण्यात आली आहे. वेळेवर कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना फक्त 4 टक्के व्याजदराने लघुमुदतीचे कर्ज मिळत आहे. त्यामुळे शेतकरी शेती व्यवसायाकरिता बँकाचे अर्थ सहाय्य घेवून शेतीव्यवसाय तांत्रिक पध्दतीने करीत आहे.

**9) किसान अपघात विमा योजना :**

शेतकरी ही शेती व्यवसायाशी प्रत्यक्ष संबंधीत कार्य करीत असतो. त्यामुळे विहीर, विद्युत पंप, शेती अवजारे, शेतमालाची ने-आण, पशुपालन, इत्यादी क्रिया पार पाडीत असताना शेतकऱ्यांचा अपघात होण्याची शक्यता अधिक

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

असते. शेतकऱ्यावर अशी वेळ येवू नये या करिता महाराष्ट्र शासनाने 2005-06 पासुन किसान अपघात विमा योजना सुरु केली आहे. ही योजना शेती व्यवसायातील 13 प्रकारच्या अपघातांना विमा संरक्षण देण्यात आले आहे. या योजना मुळे शेतकरी शेती व्यवसाय निसंकोच करून अधिकाअधिक उत्पादन करीत आहेत.

**10) शेतकरी स्वाभिमान योजना :**

शेतकऱ्यांना स्वाभिमानी जीवन जगता यावे त्यांना दारिद्रेरेषेखालुन काढता यावे. त्यांच्या कुटुंबाचा आर्थिक विकास घडून यावा. कोरडवाहु शेतकऱ्यांच्या शेतीला पाणी व्यवस्थेकरीता शासनाकडुन अनुदानित विहीर शेततलाव, फळ बागाकरिता फळबाग अनुदान योजना, पशुपालनाकरिता अनुदान दिले जात आहे. त्याच बरोबर पिक विमा, पशु विमा, फळबाग विमा इत्यादी स्वरुपाचे आर्थिक संरक्षण शेतकऱ्यांना दिले जात आहे. त्यामुळे आज शेतकरी शेती व्यवसाय करून स्वाभिमानी जीवन जगत आहेत.

**11) शेतकरी बाजार योजना :**

महाराष्ट्र शासनाने 2 जुलै 2012 पासून कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या माध्यमातून शेतकरी बाजार उभारण्याचा निर्णय घेतला असुन ही योजना राबविण्यासाठी राज्य कृषी मंडळा नोडल एजन्सी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. या योजनेची राज्यस्तरावर प्रभावी अंमलबजावणी व्हावी या करिता मंत्री महोदय, पणन यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली. असुन जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे. ह्या बाजार समित्या शेती मालाला योग्य भाव मिळवून देत आहेत.

**12) दस लाख विहिर योजना :**

या योजने अंतर्गत अल्पभूधारक शेतकऱ्यांना विहिर खोदण्याकरिता अनुदानित कर्ज दिले जाते. त्याच बरोबर सिंचन सुविधा शेती अवजारे कुकूटपालन, पशुपालन, दुग्धे व्यवसाय, कुटीर उद्योग, फळबागा, इत्यादी करिता अनुदानीत कर्ज दिले जात आहे. या योजनेचा उद्देश शेतकऱ्यांना शेतीतून मोठ्या प्रमाणात उत्पादन काढता यावे. शेती व्यवसायाबरोबरच शेतीला जोड उद्योग निर्माण करून देणे. या जोडउद्योगाच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे सबलीकरण घडून आणणे होय.

**संशोधन महत्त्व :**

सदरील संशोधनाच्या अध्ययनातून शाश्वत शेती विकास आणि शासनाच्या योजना यांचा परस्पर संबंध स्पष्ट करण्यात आला आहे. शेती विकासामध्ये शासकीय योजना कोणत्या प्रकारे महत्त्वापुर्ण भुमिका निभवित आहेत याचे स्वरुप व स्पष्टीकरण प्रामुख्याने विवेचन करण्यात आले. भारतीय कृषी विकासामधून मानव, समान आणि राष्ट्रांचा सर्वांगीण विकास घडुन येत आहे. म्हणून कृषी विकासाला शासन, स्वयंसेवी संस्था, बँक, पतसंस्था, सोसायटी इत्यादी कर्ज पुरवठा करीत आहेत. हे दिसुन आले.

**सारांश :**

आधुनिक शेतकरी कृषी व्यवसायामध्ये नवनवीन तांत्रिक सामुग्रीचा अवलंब करीत आहे. त्याच बरोबर आधुनिक पिक लागवड पध्दतीचा अवलंब करुन अधिकाधिक उत्पादन काढत आहेत. शेती विकासाच्या दृष्टीकोनातून शेती संबंध कृषी तंज्ञांचे मार्गदर्शन, कृषी मेळावे, कृषी प्रशिक्षण इत्यादीचा अवलंब केला जात आहे. आधुनिक शेती-अवजारे व यंत्रे, उत्तम प्रतीचे बि-बियाणे, खते, जंतुनाशक, धान्य साठविण्यासाठी शास्त्रीय पध्दतीने

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

उभारलेली गोदामे, आवश्यक तेवढा कर्जपुरवठा, हमी भाव, कार्यक्षम पद्धतीची विक्री व्यवस्था या सर्व सोयी केंद्राकडून शेतकऱ्यांना शेती विकास योजनांच्या मार्फत देता येतील.

**संदर्भ सूची :**


1. https://www.uttar.co/question/61c13f2b190ed44aaf813654
2. https://mr.vikaspedia.in/agriculture/bestpractices/sustainable-agriculture
3. कै. डॉ.स.श्री.मु. देसाई डॉ.सौ. निर्मल भालेराव, भारतीय अर्थव्यवस्था (मे. 2011 ) पुणे: निराली प्रकाशन
4. डॉ. टी.व्ही. पोवळे, डॉ. एस. आर. टकले, डॉ. विलास खंदारे, कृषी विकासाचे अर्थशास्त्र (जुलै 2012) औरंगाबाद : कैलास पब्लिकेशन्स
5. डॉ. दत्तात्रय भुतेकर, कृषी अर्थशास्त्र (सप्टेंबर 2015) औरंगाबाद : कैलास पब्लिकेशन्स
6. डॉ. विजय कविमंडन, कृषी अर्थशास्त्र (2002) नागपूर : श्री मंगेश प्रकाशन
7. डॉ. प्रदिप आगलावे, सामाजिक संशोधन पध्दती, साई प्रकाशन नागपूर 2007.
8. डॉ. दा.धो काचोळे, समाजशास्त्रीय संशोधन पध्दती, कैलास पब्लिकेशन्स औरंगाबाद 2009.
9. डॉ. वसुधा पुरोहित, कृषी अर्थशास्त्र, विद्या वुक्स पब्लिशर्स औरंगाबाद.
10. जयप्रकाश मिश्रा, कृषी अर्थशास्त्र, साहित्य भवन पब्लिकेशन आग्रा 2007.
11. लोकराज्य मासिक मे 2017.
12. डॉ. विजय कवीमंडन, कृषि व ग्रामीण अर्थशास्त्र
13. योजना मासिक डिसें. 2014.

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
*SPECIAL ISSUE ON MARATHI AARTHSHASHTRA PARISHED Nov. 2023*

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

# महाराष्ट्रातील रस्ते वाहतूक व्यवस्थेचे अर्थशास्त्र आणि वास्तविकता

**गणेश बापूराव गावंडे**
प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय बदनापूर जि. जालना.
सभासद क्रमांक: 961
भ्रमणध्वनी : 9422716106, ईमेल : gawandegb@gmail.com

**गोषवारा :**

एका स्थानापासून दुसऱ्या स्थानापर्यंत माल किंवा माणसे पोहोचविण्याची क्रिया म्हणजे वाहतूक होय.भारतात एकूण मालाच्या 60 टक्के आणि प्रवासी वाहतुकीच्या 85 टक्के वाहतूक करण्यासाठी रस्ते वापरले जातात. वाहतूक हा पायाभूत सुविधांचा आवश्यक घटक आहे. केवळ जागतिक स्पर्धेसाठीच नाहीतर एकात्मिक राष्ट्रीय बाजारपेठेच्या निर्मितीसाठी आवश्यक असणारा रस्ते हा एक मूलभूत घटक आहे. कितीही प्रगती केली तरी अकार्यक्षम वाहतूक व्यवस्थेमुळे उद्भवणाऱ्या वाढीव देवाण - घेवानींच्या किमती अर्थव्यवस्थेतील संपूर्ण वाढीच्या क्षमतेस अडथळा ठरू शकतात. परिवहन यंत्रणेत रेल्वे वाहतूक, जल वाहतूक, हवाई वाहतूक व रस्ते वाहतूक यांचा समावेश होतो.

रेल्वे वाहतूक, हवाई वाहतूक व जल वाहतुकीच्या तुलनेत रस्ते वाहतुकीचे विशेष महत्त्व आहे. कारण रस्ते तयार करण्यासाठी रेल्वेच्या तुलनेत कमी खर्च येतो. रस्ते निर्मितीसाठी परकीय आयातीची गरज नसते. रस्ते निर्मितीत श्रमशक्तीचा अधिक वापर होतो. त्यामुळे रोजगार निर्मिती वाढते. जवळच्या प्रवासासाठी किंवा वाहतुकीसाठी रस्ते वाहतूक अधिक योग्य ठरते. डोंगराळ किंवा ग्रामीण भागात रेल्वे मार्ग निर्माण करणे अधिक खर्चिक असते किंवा अनेक ठिकाणी अशक्यही असते. परंतु रस्ते निर्माण करता येतात. रस्ते वाहतूक रेल्वे वाहतुकीला पूरक असते. रस्ते वाहतुकीमुळे घरोघरी माल पोहोचविता येतो. संरक्षणाच्या दृष्टीने रस्ते वाहतूक अधिक फायदेशीर ठरते. असे असले तरी आज महाराष्ट्र राज्यातील रस्ते वाहतुकीच्या विकासात अनेक समस्या असल्याचे निदर्शनास येते. खाजगी क्षेत्रातील जड मोटार वाहतुकीवर सरकारला संपूर्ण नियंत्रण ठेवणे कठीण असते. त्यामुळे रस्ते अल्पकाळात खराब होतात. रस्ते दुरुस्तीचा खर्च वाढतो. विविध ठिकाणी लागणारा वस्तू व सेवा कर, नोंदणी कर, टोल वसुली यामुळे रस्ते वाहतूक व्यवसायात कराचे ओझे प्रचंड वाढते. रस्त्यांच्या वाईट स्थितीमुळे रस्ते अपघातांची संख्या प्रचंड आहे. याबरोबरच मोटार वाहनांच्या वाढत्या किमती व इंधनांच्या वाढत्या किमती यामुळे रस्ते वाहतूक व्यवसाय महागडा होऊन रस्ते वाहतूक व्यवस्थेत अडसर येत आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील रस्ते वाहतूक

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
*SPECIAL ISSUE ON MARATHI AARTHSHASHTRA PARISHED Nov. 2023*

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

व्यवस्थेचे अर्थशास्त्र आणि वास्तविकता अभ्यासण्यासाठी प्रस्तुत लेखात राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद यांच्या देखभालीखालील रस्त्यांची प्रकारानुसार लांबी, महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण व एकूण रस्त्यांच्या लांबीतील पंचवार्षिक वाढ, महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद यांच्या देखभालीखालील एकूण रस्त्यांची लांबी आणि राज्यातील मोटार वाहनांची संख्या यातील दशवार्षिक वाढीची तुलना, राज्यातील दर लाख लोकसंख्येमागे मोटार वाहनांची संख्या आणि सार्वजनिक बांधकाम व जिल्हा परिषद यांच्या देखभालीखालील दर किलोमीटर रस्ते लांबी मागे मोटार वाहनांची संख्या, महाराष्ट्रातील रस्ते अपघात, मृत व्यक्ती व जखमी व्यक्तींची संख्या, महाराष्ट्रातील विभागनिहाय व जिल्हानिहाय एकूण रस्त्यांच्या लांबीतील तफावत यांचा आढावा घेण्यात आला आहे.

**प्रस्तावना :**

एका स्थानापासून दुसऱ्या स्थानापर्यंत माल किंवा माणसे पोहोचविण्याची क्रिया म्हणजे वाहतूक होय.भारतात एकूण मालाच्या 60 टक्के आणि प्रवासी वाहतुकीच्या 85 टक्के वाहतूक करण्यासाठी रस्ते वापरले जातात. वाहतूक हा पायाभूत सुविधांचा आवश्यक घटक आहे. केवळ जागतिक स्पर्धेसाठीच नाहीतर एकात्मिक राष्ट्रीय बाजारपेठेच्या निर्मितीसाठी आवश्यक असणारा रस्ते हा एक मूलभूत घटक आहे. कितीही प्रगती केली तरी अकार्यक्षम वाहतूक व्यवस्थेमुळे उद्भवणाऱ्या वाढीव देवाण - घेवानींच्या किमती अर्थव्यवस्थेतील संपूर्ण वाढीच्या क्षमतेस अडथळा ठरू शकतात. परिवहन यंत्रणेत रेल्वे वाहतूक, जल वाहतूक, हवाई वाहतूक व रस्ते वाहतूक यांचा समावेश होतो.

रेल्वे वाहतूक, हवाई वाहतूक व जल वाहतुकीच्या तुलनेत रस्ते वाहतुकीचे विशेष महत्त्व आहे. कारण रस्ते तयार करण्यासाठी रेल्वेच्या तुलनेत कमी खर्च येतो. रस्ते निर्मितीसाठी परकीय आयातीची गरज नसते. रस्ते निर्मितीत श्रमशक्तीचा अधिक वापर होतो. त्यामुळे रोजगार निर्मिती वाढते. जवळच्या प्रवासासाठी किंवा वाहतुकीसाठी रस्ते वाहतूक अधिक योग्य ठरते. डोंगराळ किंवा ग्रामीण भागात रेल्वे मार्ग निर्माण करणे अधिक खर्चिक असते किंवा अनेक ठिकाणी अशक्यही असते. परंतु रस्ते निर्माण करता येतात. रस्ते वाहतूक रेल्वे वाहतुकीला पूरक असते. रस्ते वाहतुकीमुळे घरोघरी माल पोहोचविता येतो. संरक्षणाच्या दृष्टीने रस्ते वाहतूक अधिक फायदेशीर ठरते. असे असले तरी आज महाराष्ट्र राज्यातील रस्ते वाहतुकीच्या विकासात अनेक समस्या असल्याचे निदर्शनास येते. खाजगी क्षेत्रातील जड मोटार वाहतुकीवर सरकारला संपूर्ण नियंत्रण ठेवणे कठीण असते. त्यामुळे रस्ते अल्पकाळात खराब होतात. रस्ते दुरुस्तीचा खर्च वाढतो. विविध ठिकाणी लागणारा वस्तू व सेवा कर, नोंदणी कर, टोल वसुली यामुळे रस्ते वाहतूक व्यवसायात कराचे ओझे प्रचंड वाढते. रस्त्यांच्या वाईट स्थितीमुळे रस्ते

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

अपघातांची संख्या प्रचंड आहे. याबरोबरच मोटार वाहनांच्या वाढत्या किमती व इंधनांच्या वाढत्या किमती यामुळे रस्ते वाहतूक व्यवसाय महागडा होऊन रस्ते वाहतूक व्यवस्थेत अडसर येत आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील रस्ते वाहतूक व्यवस्थेचे अर्थशास्त्र आणि वास्तविकता अभ्यासण्यासाठी प्रस्तुत लेखात राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद यांच्या देखभालीखालील रस्त्यांची प्रकारानुसार लांबी, महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण व एकूण रस्त्यांच्या लांबीतील पंचवार्षिक वाढ, महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद यांच्या देखभालीखालील एकूण रस्त्यांची लांबी आणि राज्यातील मोटार वाहनांची संख्या यातील दशवार्षिक वाढीची तुलना, राज्यातील दर लाख लोकसंख्येमागे मोटार वाहनांची संख्या आणि सार्वजनिक बांधकाम व जिल्हा परिषद यांच्या देखभालीखालील दर किलोमीटर रस्ते लांबी मागे मोटार वाहनांची संख्या, महाराष्ट्रातील रस्ते अपघात, मृत व्यक्ती व जखमी व्यक्तींची संख्या, महाराष्ट्रातील विभागनिहाय व जिल्हानिहाय एकूण रस्त्यांच्या लांबीतील तफावत यांचा आढावा घेण्यात आला आहे.

**राज्यातील रस्त्यांचा विकास करणारी यंत्रणा :**

राज्यातील रस्त्यांच्या जाळ्यामध्ये राष्ट्रीय महामार्ग, प्रमुख राज्य महामार्ग, राज्य महामार्ग, प्रमुख जिल्हा रस्ते, इतर जिल्हा रस्ते, ग्रामीण रस्ते व शहरांतर्गत रस्ते यांचा समावेश असतो. राज्यातील रस्त्यांचा विकास राज्य शासनाचा सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषदा, वन विभाग, नागरी स्थानिक संस्था, कटक मंडळे, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी), शहर व औद्योगिक विकास महामंडळ ( सिडको ) आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण या यंत्रणामार्फत केला जातो. याशिवाय केंद्रीय रस्ते निधी योजना, प्रधान मंत्री ग्राम सडक योजना, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना आणि भारतमाला परियोजना यांच्यामार्फत राज्यातील रस्ते विकासाचे कार्य पार पाडले जाते.

**तक्ता क्र. 01**

**महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदा यांच्या देखभालीखालील रस्त्यांची प्रकारानुसार लांबी : 1965-66 ते 2021-22**

(किलोमीटर मध्ये)

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

| अ. क्र. | वर्ष | राष्ट्रीय महामार्ग | प्रमुख राज्य महामार्ग | राज्य महामार्ग | प्रमुख जिल्हा रस्ते | इतर जिल्हा रस्ते | ग्रामीण रस्ते | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1965-66 | 2364 (4.56) | -- | 10528 (20.33) | 12628 (24.38) | 8744 (16.88) | 17524 (33.84) | 51788 (100.00) |
| 2 | 1970-71 | 2445 (3.74) | -- | 14203 (21.73) | 17684 (27.05) | 11012 (16.85) | 20020 (30.63) | 65364 (100.00) |
| 3 | 1980-81 | 2945 (2.09) | -- | 18949 (13.43) | 25233 (17.88) | 25404 (18.00) | 68600 (48.61) | 141131 (100.00) |
| 4 | 1990-91 | 2959 (1.71) | -- | 30975 (17.91) | 38936 (22.51) | 38573 (22.28) | 61522 (35.57) | 172965 (100.00) |
| 5 | 2000-01 | 3688 (1.69) | -- | 33212 (15.31) | 46751 (21.55) | 43696 (20.14) | 89599 (41.30) | 216946 (100.00) |
| 6 | 2005-06 | 4367 (1.87) | -- | 33571 (14.50) | 48987 (21.17) | 45226 (19.54) | 99279 (42.89) | 231430 (100.00) |
| 7 | 2006-07 | 4367 (1.87) | -- | 33675 (14.41) | 49147 (21.03) | 45674 (19.54) | 100801 (43.14) | 233664 (100.00) |
| 8 | 2007-08 | 4367 (1.85) | -- | 33800 (14.35) | 49393 (20.97) | 45886 (19.48) | 102149 (43.36) | 235595 (100.00) |
| 9 | 2008-09 | 4367 (1.84) | -- | 33933 (14.28) | 49621 (20.88) | 46143 (19.41) | 103604 (43.59) | 237668 (100.00) |
| 10 | 2009-10 | 4376 (1.82) | -- | 34102 (14.21) | 49901 (20.89) | 46817 (19.50) | 104844 (43.68) | 240040 (100.00) |
| 11 | 2010-11 | 4676 (1.82) | -- | 34103 (14.10) | 49936 (20.66) | 46897 (19.40) | 106400 (44.02) | 241712 (100.00) |

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

| अ.क्र. | वर्ष | राष्ट्रीय महामार्ग | प्रमुख राज्य महामार्ग | राज्य महामार्ग | प्रमुख जिल्हा रस्ते | इतर जिल्हा रस्ते | ग्रामीण रस्ते | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 12 | 2011-12 | 4376 (1.80) | -- | 34157 (14.06) | 50256 (20.68) | 47529 (19.57) | 106601 (43.88) | 242919 (100.00) |
| 13 | 2012-13 | 4376 (1.80) | 6694 (2.75) | 27528 (11.32) | 50256 (20.67) | 47573 (19.56) | 106745 (43.90) | 243172 (100.00) |
| 14 | 2013-14 | 5858 (2.22) | 6337 (2.40) | 33933 (12.86) | 50232 (19.05) | 52761 (20.00) | 114557 (43.44) | 263708 (100.00) |
| 15 | 2014-15 | 4766 (1.59) | 6163 (2.06) | 33860 (11.31) | 50585 (16.89) | 58115 (19.41) | 145879 (48.73) | 299368 (100.00) |
| 16 | 2015-16 | 4901 (1.60) | 5249 (1.72) | 33695 (11.04) | 52275 (17.13) | 56564 (18.53) | 153435 (50.29) | 305119 (100.00) |
| 17 | 2016-17 | 7682 (2.52) | 3971 (1.30) | 30776 (10.11) | 51627 (16.96) | 56336 (18.51) | 153946 (50.58) | 304336 (100.00) |
| 18 | 2017-18 | 10195 (3.35) | 3272 (1.07) | 29151 (9.59) | 55030 (18.11) | 53924 (17.75) | 152272 (50.11) | 303843 (100.00) |
| 19 | 2018-19 | 10300 (3.34) | 2967 (0.96) | 28466 (9.22) | 60531 (19.61) | 49206 (15.95) | 157127 (50.92) | 308597 (100.00) |
| 20 | 2019-20 | 17726 (5.73) | 2967 (0.95) | 29030 (9.38) | 63886 (20.65) | 47398 (15.32) | 148335 (47.95) | 309342 (100.00) |
| 21 | 2020-21 | 18089 (5.59) | 2900 (0.89) | 29388 (9.09) | 68350 (21.15) | 46408 (14.36) | 157980 (48.89) | 323115 (100.00) |
| 22 | 2021-22 | 18366 (5.67) | 2622 (0.81) | 29265 (9.03) | 68535 (21.16) | 45371 (14.00) | 159714 (49.31) | 323873 (100.00) |

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

संदर्भ :- महाराष्ट्राची आर्थिक पाहणी 2022-23 (टीप :- कंसातील आकडे एकूणाशी प्रतिशत प्रमाण दर्शवितात)

तक्ता क्र. 01 मध्ये सन 1965 - 66 ते 2021 -22 या कालावधीतील राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद यांच्या देखभालीखालील रस्त्यांची प्रकारानुसार लांबी दर्शविली आहे. या वरून राष्ट्रीय महामार्ग, प्रमुख राज्य महामार्ग, राज्य महामार्ग, प्रमुख जिल्हा रस्ते, इतर जिल्हा रस्ते, ग्रामीण रस्ते व महाराष्ट्र राज्यातील एकूण रस्ते विकास याबाबत पुढील महत्त्वपूर्ण निष्कर्ष दिसून येतात. ते खालील प्रमाणे आहेत.

**1) महाराष्ट्रातील एकूण रस्ते:**

महाराष्ट्र राज्यात 1965-66 मध्ये सर्व प्रकारच्या एकूण रस्त्यांची लांबी 51,788 कि. मी. इतकी होती. त्यामध्ये सतत वाढ होऊन 2021-22 मध्ये ती 3,23,873 कि.मी. एवढी झाली. म्हणजे 1965-66 ते 2021-22 या 56 वर्षाच्या कालावधीत राज्यातील सर्व प्रकारच्या रस्त्यांच्या लांबीत वाढ झाली आहे. याचा अर्थ मागील 56 वर्षाच्या कालावधीत महाराष्ट्रातील एकूण रस्त्यांची लांबी जवळजवळ सव्वा सहा पटीने वाढली आहे.

**2) महाराष्ट्रातील ग्रामीण रस्ते :**

ग्रामीण भागात खेड्या - खेड्यांना जोडणारे रस्ते असतात. ग्रामीण भागात कच्चे व पक्के अशा दोन प्रकारचे रस्ते असतात. सन 1965-66 मध्ये ग्रामीण रस्त्यांची लांबी 17,524 कि.मी. एवढी होती. त्यामध्ये वाढ होऊन 2021- 22 मध्ये ती 1,59, 714 कि.मी. एवढी झाली. याचा अर्थ सन 1965 -66 ते 2021 -22 या कालावधीत महाराष्ट्रातील ग्रामीण रस्त्याच्या लांबी मध्ये नऊ पटीपेक्षा अधिक वाढ झाली आहे. महाराष्ट्रातील ग्रामीण रस्त्यांचे महाराष्ट्रातील एकूण रस्त्यांशी प्रतिशत प्रमाण काढले असता असे दिसून येते की, हे प्रमाण 30.63 टक्के ते 50.92 टक्केपर्यंत कमी जास्त झाले आहे.

**3) इतर जिल्हा रस्ते :**

इतर जिल्हा रस्ते म्हणजे छोटी शहरे आणि मोठ्या गावांना जोडणारी रस्ते. सन 1965 - 66 मध्ये महाराष्ट्रातील इतर जिल्हा रस्त्यांची लांबी 8744 किलोमीटर एवढी होती ती 2021 - 22 मध्ये 45,371 किलोमीटर एवढी झाली. याचाच अर्थ 1965-66 ते 2021-22 या कालावधी दरम्यान महाराष्ट्रातील इतर जिल्हा रस्त्यांची लांबी जवळपास सव्वा पाच पटीने वाढली आहे. सन 1965-66 ते 2021- 22 या कालावधीत महाराष्ट्रातील इतर जिल्हा रस्त्यांच्या लांबीचे

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

महाराष्ट्रातील एकूण रस्त्यांच्या लांबीशी प्रमाण काढले असता ते प्रमाण 22.28 टक्के ते 14.00 टक्के या दरम्यान राहिले आहे.

**4) प्रमुख जिल्हा रस्ते :**

जिल्ह्यातील बाजारपेठा, रेल्वे स्थानके, औद्योगिक केंद्रे व प्रमुख ठिकाणे यांना जोडणाऱ्या रस्त्यांना प्रमुख जिल्हा रस्ते असे म्हणतात. सन 1965- 66 मध्ये महाराष्ट्रातील प्रमुख जिल्हा रस्त्यांची लांबी 12628 किलोमीटर एवढी होती. त्यामध्ये वाढ होऊन सन 2021- 22 मध्ये ती 68,535 किलोमीटर एवढी झाली. याचा अर्थ सन 1965-66 ते 2021 -22 या कालावधी दरम्यान महाराष्ट्रातील प्रमुख जिल्हा रस्त्यांची लांबी जवळजवळ साडेपाच पटीने वाढली आहे. 1965-66 ते 2021-22 या कालावधी दरम्यान महाराष्ट्रातील प्रमुख जिल्हा रस्त्यांच्या लांबीचे महाराष्ट्रातील एकूण रस्त्यांच्या लांबीशी प्रतिशत प्रमाण काढले असता ते 27.05 टक्के ते 16. 89 टक्के या दरम्यान राहिले आहे.

**5) राज्य महामार्ग :**

जे रस्ते राज्याच्या राजधानीचे जिल्हा मुख्यालय, प्रमुख शहरे आणि इतर महामार्गांशी जोडतात त्यांना राज्य महामार्ग असे म्हणतात. 1965- 66 मध्ये राज्य महामार्ग आणि प्रमुख राज्य महामार्ग यांची एकत्रित लांबी 10,528 किलोमीटर एवढी होती. सन 2021-22 मध्ये ती 31,887 किलोमीटर एवढी झाली. म्हणजे सन 1965-66 ते 2021-22 या कालावधीत महाराष्ट्रातील राज्य महामार्ग व प्रमुख राज्य महामार्ग एकत्रित यांच्यालांबीत तीन पटीने वाढ झाली आहे. सन 1965-66 ते 2021- 22 या कालावधी दरम्यान राज्य महामार्ग व प्रमुख राज्य महामार्ग यांचे एकत्रित प्रमाण महाराष्ट्रातील एकूण रस्त्यांच्या लांबीशी काढले असता ते 20.33 टक्के वरून घटत जाऊन 9.84 टक्के एवढे कमी झाले आहे. याचा अर्थ असा की, राज्यातील राज्य महामार्ग व प्रमुख राज्य महामार्ग यांचे राज्याच्या एकूण रस्त्यांच्या लांबीतील प्रतिशत प्रमाण सातत्याने घटत गेले आहे. म्हणजेच ग्रामीण रस्ते, इतर जिल्हा रस्ते व प्रमुख जिल्हा रस्ते यांच्या तुलनेत राज्यातील राज्य महामार्ग व प्रमुख राज्य महामार्ग यांचे एकत्रित प्रमाण घटत गेले आहे. याचा अर्थ राज्यातील राज्य महामार्ग व प्रमुख राज्य महामार्ग यांच्या विकासाकडे तुलनात्मक दृष्ट्या दुर्लक्ष झाले आहे.

**6) प्रमुख राज्य महामार्ग :**

महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणी अहवालात प्रमुख राज्य महामार्गाची लांबी 2012-13 पासून स्वतंत्रपणे देण्यात आलेली आहे. 2012 - 13 मध्ये महाराष्ट्रातील प्रमुख राज्य महामार्गाची लांबी 6,694 किलोमीटर एवढी होती. त्यामध्ये 2021- 22 पर्यंत सतत घट होऊन ती 2622 किलोमीटर एवढी झाली आहे. (याचे कारण राज्यातील प्रमुख राज्य महामार्गाची दर्जोंनती होऊन या महामार्गाचे राष्ट्रीय महामार्गात रूपांतर झालेले असू शकते) या काळात राज्यातील

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

प्रमुख राज्य महामार्गांची लांबी राज्यातील एकूण रस्त्यांच्या प्रतिशत प्रमाणात एक टक्के पेक्षाही कमी होऊन ती 0.81 टक्के इतकीच शिल्लक राहिली आहे. याचा अर्थ सन 2012 - 13 पासून राज्यातील प्रमुख राज्य महामार्गांची लांबी वाढविण्यासाठी कोणत्याही प्रकारची गुंतवणूक करण्यात आलेली नाही. म्हणजेच राज्यातील प्रमुख राज्य महामार्ग विकासाकडे संपूर्णपणे दुर्लक्ष झालेले आहे.

**7) राष्ट्रीय महामार्ग :**

राज्याची राजधानी व राज्यातून दुसऱ्या राज्यात जाणारे, औद्योगिक शहरे आणि बंदराशी जोडणारे रस्ते म्हणजे राष्ट्रीय महामार्ग होय. राष्ट्रीय महामार्गाची वेग मर्यादा 80 ते 100 किलोमीटर प्रति तास एवढी असते. सन 1965- 66 मध्ये राज्यातील राष्ट्रीय महामार्गाची लांबी 2364 किलोमीटर एवढी होती. त्यामध्ये वाढ होऊन ती सन 2021- 22 मध्ये 18,366 किलोमीटर एवढी झाली. म्हणजे सन 1965-66 ते 2021- 22 या कालावधीत राज्यातील राष्ट्रीय महामार्गाची लांबी पावणे आठ पटीने वाढली. परंतु राज्यातील राष्ट्रीय महामार्गाच्या लांबीचे राज्यातील एकूण रस्त्यांच्या लांबीशी प्रतिशत प्रमाण पाहिले असता असे दिसून येते की, सन 1965-66 मध्ये राज्यातील राष्ट्रीय महामार्गाच्या लांबीचे राज्यातील एकूण रस्त्याच्या लांबीशी प्रतिशत प्रमाण 4.56 टक्के एवढे होते. त्यामध्ये 2013-14 या वर्षाचा अपवाद वगळता 2015-16 पर्यंत ते सतत घटत जाऊन 1.60 टक्के एवढे कमी झाले आहे. याचा अर्थ 1965- 66 ते 2015- 16 या पन्नास वर्षाच्या कालावधीत राज्यातील राष्ट्रीय महामार्गाचे प्रमाण राज्यातील एकूण रस्त्याच्या प्रमाणाशी कमी झाले आहे. म्हणजे केंद्र सरकारने महाराष्ट्रातील राष्ट्रीय महामार्ग विकासावर जो खर्च केला आहे तो राज्यातील एकूण रस्ते विकासावर होणाऱ्या खर्चाच्या तुलनेत कमी केला आहे. परंतु 2016- 17 पासून राज्यातील राष्ट्रीय महामार्गाचे राज्याच्या एकूण रस्त्यांशी प्रतिशत प्रमाण सतत वाढत गेले आहे आणि ते सन 2021- 22 मध्ये 5.67 टक्के एवढे झालेले आहे. याचा अर्थ 2016 -17 पासून केंद्र सरकारने महाराष्ट्रातील राष्ट्रीय महामार्ग विकासावर केलेला खर्च सतत वाढवला आहे.

**महाराष्ट्रातील ग्रामीण व एकूण रस्त्यांच्या लांबीतील पंचवार्षिक वाढ :**

रस्ते निर्मितीसाठी वर्षानुवर्ष अवाढव्य खर्च करावा लागतो व त्याचे अनुकूल आर्थिक परिणाम दीर्घकाळापर्यंत होतात.त्यामुळे राज्यातील रस्ते वाहतूक व्यवस्थेचे अर्थशास्त्र समजण्यासाठी एका वर्षातील रस्ते विकास लक्षात घेण्याऐवजी दर दहा वर्ष किंवा दर पाच वर्षाला राज्यातील रस्त्यांच्या लांबीत किती वाढ झाली? याचे अध्ययन उपयुक्त ठरते. ग्रामीण रस्त्यांची दर्जोन्नती झाली का? ग्रामीण रस्त्यांची सर्वाधिक वाढ व सर्वात कमी वाढ कोणत्या कालावधीत व किती प्रमाणात झाली? वाढीच्या दरात सातत्याने चढ-उतार झाले आहेत का? ग्रामीण रस्त्यांच्या वाढीचा दर एकूण रस्त्यांच्या वाढीच्या दराच्या तुलनेत किती होता? कच्चे व कमी खर्चाचे रस्ते वाढीवरच भर दिला का? हे अभ्यासण्यासाठी तक्ता क्रमांक 02 मध्ये महाराष्ट्रातील ग्रामीण व एकूण रस्त्यांच्या लांबीतील पंचवार्षिक वाढ दर्शविली आहे.

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
*SPECIAL ISSUE ON MARATHI AARTHSHASHTRA PARISHED Nov. 2023*

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

**तक्ता क्र. 02**

**महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदांच्या देखभालीखालील ग्रामीण रस्ते व एकूण रस्त्यांच्या लांबीतील पंचवार्षिक वाढ: सन 1965-66 ते 2020-21**

(किलोमीटर मध्ये)

| अ.क्र. | वर्ष | ग्रामीण रस्ते | पंचवार्षिक वाढ/घट | एकूण रस्ते | पंचवार्षिक वाढ/घट |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1965-66 | 17524 | -- | 51788 | -- |
| 2 | 1970-71 | 20020 | 2296 (13.10) | 65364 | 13576 (26.21) |
| 3 | 1975-76 | 36434 | 16414 (81.99) | 88757 | 23393 (35.79) |
| 4 | 1980-81 | 68600 | 32166 (88.29) | 141131 | 52374 (59.00) |
| 5 | 1985-86 | 76839 | 8239 (12.01) | 153671 | 12540 (8.88) |
| 6 | 1990-91 | 61522 | -15317 (-19.93) | 172965 | 19294 (12.55) |
| 7 | 1995-96 | 68829 | 7307 (11.88) | 185293 | 12328 (7.12) |
| 8 | 2000-01 | 89599 | 20770 (30.17) | 216946 | 31653 (17.08) |
| 9 | 2005-06 | 99279 | 9680 (10.80) | 231430 | 14484 (4.44) |
| 10 | 2010-11 | 106400 | 7121 (7.17) | 241712 | 10282 (4.44) |
| 11 | 2015-16 | 153435 | 47035 (44.21) | 305119 | 63407 (26.23) |
| 12 | 2020-21 | 157980 | 4545 (2.96) | 323115 | 17996 (5.89) |

संदर्भ :- 1) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी 2009-10

2) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी 2022-23

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

टीप :- कंसातील आकडे एकूणाशी प्रतिशत प्रमाण दर्शवितात.

तक्ता क्र. - 02 मध्ये महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदांच्या देखभालीखालील ग्रामीण रस्ते व एकूण रस्त्यांच्या लांबीतील पंचवार्षिक वाढ दर्शविली आहे. यावरून खालील महत्त्वपूर्ण निष्कर्ष आपल्याला दिसून येतात.

१) सन 1985 - 86 ते 1990-91 या पाच वर्षाच्या कालावधीत ग्रामीण रस्त्यांची -19.93 टक्क्यांनी घट झालेली दिसून येते. कारण या कालावधीत ग्रामीण रस्त्यांची दर्जोन्नती झाल्यामुळे ग्रामीण रस्त्यांचे प्रमाण 19.93 प्रतिशतने घटलेले आहे.

२) सन 1985-86 ते 1990- 91 हा पाच वर्षाचा कालावधी अपवाद वगळता सन 1965-66 ते सन 2020-21 या पन्नास वर्षाच्या कालावधीत राज्यातील ग्रामीण रस्त्यांच्या लांबीत पंचवार्षिक वाढ झाल्याचे स्पष्ट होते.

३) सन 1975- 76 ते 1980- 81 या कालावधीत महाराष्ट्रातील ग्रामीण रस्त्यांची सर्वाधिक पंचवार्षिक वाढ 88.29 प्रतिशत एवढी झालेली आहे. त्या खालोखाल सन 1970- 71 ते 1975-76 या कालावधीत राज्यातील ग्रामीण रस्त्यांची वाढ 81.99 प्रतिशत एवढी झाली आहे.

4) सन 2015-16 ते 2020- 21 या पाच वर्षाच्या कालावधीत राज्यातील ग्रामीण रस्त्यांच्या लांबीत सर्वात कमी 2.96 प्रतिशत एवढीच वाढ झाली आहे.

5) सन 1965-66 ते 2020- 21 या कालावधीत महाराष्ट्र राज्यातील एकूण रस्त्यांच्या लांबीत सतत वाढ झाल्याचे दिसून येते. परंतु वाढीच्या दरात सातत्याने चढ उतार झालेले आहेत. एकूण रस्त्यांच्या लांबीत सन 1975 -76 ते 1980 -81 या पाच वर्षाच्या काळात 59 प्रतिशत एवढी सर्वाधिक वाढ झाल्याचे दिसून येते. याउलट सन 2000-2001 ते 2010-2011 या दहा वर्षाच्या कालावधीत राज्यातील एकूण रस्त्याच्या लांबीत 4.44 प्रतिशत एवढी सर्वात कमी वाढ झाल्याचे दिसून येते.

6) सन 1965- 66 ते 2020-21 या 55 वर्षाच्या काळात महाराष्ट्रातील ग्रामीण व एकूण रस्त्यांच्या लांबीतील पंचवार्षिक वाढीची तुलना केली असता असे स्पष्ट होते की, सन 1965-66 ते 1970-71, 1985-86 ते 1990- 91 आणि 2015- 16 ते 2020- 21 हा तीन पंचवार्षिक वाढीचा कालावधी म्हणजे पंधरा वर्षाचा कालावधी वगळता इतर 40 वर्षांमध्ये राज्यातील ग्रामीण रस्त्यांचा पंचवार्षिक वाढीचा दर हा राज्यातील एकूण रस्त्यांच्या पंचवार्षिक वाढतील दरापेक्षा अधिक होता. याचाच अर्थ सन 1965-66 ते 2020- 21 या 65 वर्षाच्या कालावधीतील 40 वर्ष महाराष्ट्रात ग्रामीण रस्ते म्हणजे कच्चे व काही पक्के रस्ते यांच्या वाढीवर अधिक भर देण्यात आलेला आहे. या कालावधीत ग्रामीण भागातील रस्ते विकासावर अधिक भर देण्यात आलेला आहे. याचा दुसरा अर्थ असा होतो की, महाराष्ट्र राज्यात या 40 वर्षाच्या

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

कालावधीत कमी दर्जाच्या व कमी खर्च लागणाऱ्या रस्त्यांची लांबी वाढविण्यावर भर देण्यात आलेला होता. म्हणजेच या 40 वर्षाच्या कालावधीत अधिक दर्जाच्या व अधिक खर्चाच्या रस्त्यांच्या विकासावर तुलनात्मक दृष्ट्या कमी खर्च करण्यात आलेला आहे.

**एकूण रस्त्यांची लांबी आणि राज्यातील मोटार वाहनांची संख्या यांच्यातील दशवार्षिक वाढीची तुलना :**

राज्यातील रस्त्यांच्या विकासासाठी 20 वर्ष एवढ्या मोठ्या कालावधीसाठी धोरणे आखली जातात. परंतु 20 वर्षाच्या धोरणाची अंमलबजावणी होताना या दीर्घ कालावधीत मोटार वाहनांची संख्या देखील प्रचंड प्रमाणात वाढते. मोटार वाहनांच्या उत्पादन व विक्री संख्येत वाढ झाल्यामुळे वाहनावरील विविध कर, इंधनाच्या किमतीमधील विविध कर व टोल वसुली यामुळे रस्ते वाहतुकीपासून सरकारला मिळणारे उत्पन्न देखील वाढते. परंतु रस्ते वाढीच्या तुलनेत वाहनांची संख्या अधिक वाढल्याने वाहतूक कोंडी होऊन वेळ व इंधनाचा अपव्यय होतो. परिणामी रस्ते वाहतुकीमधील अडचणीत वाढ होते. त्यामुळे तक्ता क्र.03 मध्ये एकूण रस्त्यांची लांबी आणि मोटार वाहनांची संख्या यांच्यातील दशवार्षिक वाढीची तुलना दर्शविली आहे.

**तक्ता क्र.03**

**महाराष्ट्रातील सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद यांच्या देखभालीखालील एकूण रस्त्यांची लांबी आणि राज्यातील मोटार वाहनांची संख्या यातील दशवार्षिक वाढ: सन 1970-71 ते 2020-21**

(रस्त्यांची लांबी किलोमीटर मध्ये)

| अ. क्र. | वर्ष | एकूण रस्ते | एकूण रस्त्यांची दशवार्षिक वाढ | मोटार वाहनांची संख्या | मोटार वाहनांची दशवार्षिक वाढ | प्रतिशत प्रमाणातील तफावत (6-4) |
|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) |
| 1 | 1970-71 | 65364 | -- | 311769 | -- | -- |
| 2 | 1980-81 | 141131 | 75767 (115.91) | 804986 | 493217 (158.19) | (42.28) |
| 3 | 1990-91 | 172965 | 31834 (22.55) | 2640585 | 1835599 (228.03) | (205.48) |
| 4 | 2000-01 | 216946 | 43981 (25.42) | 6607064 | 3966479 (150.21) | (124.79) |
| 5 | 2010-11 | 241712 | 24766 (11.41) | 16989659 | 10382595 (157.14) | (145.73) |
| 6 | 2020-21 | 323115 | 81403 | 38636247 | 21646588 | (93.74) |

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | (33.67) | | (127.41) | |

संदर्भ :- 1) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी 2022-23

टीप :- कंसातील आकडे दशवार्षिक वाढीचे प्रतिशत प्रमाण दर्शवितात

तक्ता क्र.03 मध्ये सन 1970-71 ते 2020-21 या 50 वर्षाच्या कालावधीतील महाराष्ट्रातील सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद यांच्या देखभालीखालील एकूण रस्त्यांची लांबी आणि राज्यातील मोटार वाहनांची संख्या यातील दशवार्षिक वाढ दर्शविली आहे. यावरून पुढील महत्त्वपूर्ण निष्कर्ष दिसून येतात.

1) महाराष्ट्रातील एकूण रस्त्यांच्या लांबीतील दशवार्षिक वाढ सन 1970-71 ते 1980-81 या कालावधीत सर्वाधिक 115.91 प्रतिशत एवढी झाली आहे; तर महाराष्ट्रातील एकूण रस्त्यांच्या लांबीतील दशवार्षिक वाढ सन 2010-11 ते 2020-21 या कालावधीत सर्वात कमी केवळ 11.41 प्रतिशत एवढीच आहे. याचा अर्थ राज्यातील एकूण रस्त्यांच्या दशवार्षिक वाढीतील तफावत 104 प्रतिशत पेक्षाही अधिक आहे.

2) महाराष्ट्रातील मोटार वाहनांच्या संख्येतील दशवार्षिक वाढ सन 1980-81 ते 1990-91 या कालावधीत सर्वाधिक 228.03 प्रतिशत एवढी आहे; तर महाराष्ट्रातील वाहनांच्या संख्येतील दशवार्षिक वाढ सन 2010-11 ते 2020-21 या कालावधीत सर्वात कमी 127.41 प्रतिशत एवढी आहे. याचा अर्थ मोटार वाहनांच्या दशवार्षिक वाढीतील तफावत 100 प्रतिशत पेक्षाही अधिक आहे.

3) सन 1970-71 ते 2020-21 या पन्नास वर्षाच्या कालावधीतील महाराष्ट्रातील एकूण रस्त्यांच्या लांबीतील दशवार्षिक वाढ आणि मोटार वाहनांच्या संख्येतील दशवार्षिक वाढ यांची तुलना केली असता असे स्पष्ट होते की, या कालावधीत महाराष्ट्रातील एकूण रस्त्यांच्या दशवार्षिक वाढीच्या प्रतिशत प्रमाणापेक्षा महाराष्ट्रातील मोटार वाहनांच्या संख्येतील दशवार्षिक वाढीचे प्रतिशत प्रमाण हे नेहमीच अधिक राहिले आहे.

4) सन 1970-71 ते 2020-21 या 50 वर्षाच्या काळातील एकूण रस्त्यांच्या दशवार्षिक वाढीचे प्रतिशत प्रमाण आणि मोटार वाहनांच्या संख्येतील दशवार्षिक वाढीचे प्रतिशत प्रमाण यांची तुलना केली असता असे स्पष्ट होते की, मोटार वाहनांच्या दशवार्षिक वाढीतील प्रतिशत प्रमाण हे एकूण रस्त्यांच्या दशवार्षिक वाढतील प्रतिशत प्रमाणापेक्षा कमीत कमी 42.28 प्रतिशत व जास्तीत जास्त 205.48 प्रतिशत एवढे अधिक आहे. याचा अर्थ महाराष्ट्रातील रस्त्यावरील वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे वाहतुकीमध्ये अडसर निर्माण होत आहेत. परिणामी रस्ते वाहतुकीचा वेळ, खर्च व पर्यावरण प्रदूषण वाढून अपघातांची संख्या देखील अपेक्षेप्रमाणे कमी होत नाही. याचा महाराष्ट्राला मोठा धोका पत्करावा लागत आहे. म्हणजे वाहतूक व्यवस्थेतील अडथळ्यांचा महाराष्ट्रातील मानव समाजाला फार मोठा मोबदला चुकवावा लागत आहे. अशाच गतीने महाराष्ट्रातील एकूण रस्त्यांच्या दशवार्षिक

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

वाढीतील प्रतिशत प्रमाण व मोटार वाहनांच्या संख्येतील दशवार्षिक वाढतील प्रतिशत प्रमाणाची तफावत येणाऱ्या काळात वाढत गेल्यास हे रस्ते वाहतुकीतील अडसर दुप्पट होण्यास फारसा वेळ लागणार नाही.

**दर लाख लोकसंख्येमागे मोटार वाहनांची संख्या आणि दर किलोमीटर रस्ते लांबी मागे मोटार वाहनांची संख्या यांच्यातील दशवार्षिक वाढ :**

दर लाख लोकसंख्येमागे मोटार वाहनांची संख्या वाढल्यास ते प्रगतीचे लक्षण मानले जाऊ शकते. कारण त्यामुळे लोकांच्या राहणीमानासोबतच सरकारच्या उत्पन्नात देखील वाढ होते. परंतु दर लाख लोकसंख्येमागे मोटार वाहनांची संख्या जेवढी वाढते त्यापेक्षा कमी प्रमाणात रस्त्यांची लांबी वाढल्यास रस्त्यावरील वाहनांच्या गर्दीत वाढ होते, दर किलोमीटर रस्ते लांबी मागे मोटार वाहनांची संख्या वाढते. परिणामी रस्ते वाहतुकीवरील भार वाढून रस्ते दुरुस्ती खर्च वाढतो, खराब रस्त्यामुळे अपघातांची संख्या वाढते, अपघातात मृत व्यक्तींची संख्या वाढते. तसेच अपघातात जखमी व्यक्तींची संख्या वाढते. मानवी जीवनाचे प्रचंड नुकसान होते. त्यामुळे दर लाख लोकसंख्येमागे मोटार वाहनांची संख्या आणि दर किलोमीटर रस्ते लांबी मागे मोटार वाहनांची संख्या यांच्यातील दशवार्षिक वाढ तक्ता क्र.04 मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता क्र.04**

**दरलाख लोकसंख्येमागे मोटार वाहनांची संख्या आणि सार्वजनिक बांधकाम व जिल्हा परिषद यांच्या देखभालीखालील दर किलोमीटर रस्तेलांबी मागे मोटार वाहनांची संख्या सन 1971 ते 2021**

| अ. क्र. | वर्ष | दरलाख लोकसंख्ये मागे मोटार वाहनांची संख्या | दशवार्षिक वाढ | सा.बां.वि. व जि.प. यांच्या देखभाली खालील दर किमी रस्ते लांबी मागे मोटार वाहनांची संख्या | दशवार्षिक वाढ |
|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
| 1 | 1971 | 618 | -- | 5 | -- |
| 2 | 1981 | 1309 | 691 (112.94) | 6 | 01 (20.00) |
| 3 | 1991 | 3353 | 2044 (156.15) | 15 | 09 (150.00) |
| 4 | 2001 | 7186 | 3833 (114.31) | 31 | 16 (106.66) |
| 5 | 2011 | 15119 | 7933 (110.39) | 71 | 40 (129.03) |

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 6 | 2021 | 31168 | 16049<br>(106.15) | 125 | 54<br>(76.05) |

संदर्भ :- महाराष्ट्राची आर्थिक पाहणी 2022-23

टीप :- कंसातील आकडे दशवार्षिक वाढीचे प्रतिशत प्रमाण दर्शवितात.

तक्ता क्र.04 मध्ये सन 1971 ते सन 2021 या पन्नास वर्षाच्या कालावधीतील दर लाख लोकसंख्येमागे मोटार वाहनांची संख्या आणि सार्वजनिक बांधकाम व जिल्हा परिषद यांच्या देखभालीखालील दर किलोमीटर रस्ते लांबी मागे मोटार वाहनांची संख्या दर्शविली आहे. तक्त्यावरून पुढील महत्त्वाचे निष्कर्ष दिसून येतात.

1) सन 1971 मध्ये महाराष्ट्रातील दर लाख लोकसंख्येमागे मोटार वाहनांची संख्या 618 एवढी होती. त्यामध्ये सतत वाढ होऊन ती 2021 मध्ये 31,168 एवढी झाली. म्हणजे सन 1971 ते 2021 या पन्नास वर्षाच्या कालावधीत महाराष्ट्रातील दर लाख लोकसंख्येमागे मोटार वाहनांची संख्या निव्वळ 30,550 ने वाढली. याचा अर्थ या कालावधीत दर लाख लोकसंख्येमागील मोटार वाहनांच्या संख्येत 50 पटीपेक्षाही अधिक वाढ झाली आहे.

2) तक्त्यात स्तंभ क्रमांक 4 मध्ये महाराष्ट्रातील दर लाख लोकसंख्येमागे मोटार वाहनांच्या संख्येत झालेली दशवार्षिक वाढ दर्शविली आहे. सन 1971 ते 2021 या पन्नास वर्षाच्या कालावधीत महाराष्ट्रातील दर लाख लोकसंख्येमागे मोटार वाहनांच्या संख्येत झालेली दशवार्षिक वाढ ही 106 प्रतिशत ते 156 प्रतिशत या दरम्यान झालेली आहे. दर लाख लोकसंख्येमागे मोटार वाहनांच्या संख्येत झालेली दशवार्षिक वाढ ही नेहमी 100 प्रतिशत पेक्षा अधिकच झालेली आहे. यामध्ये सर्वाधिक दशवार्षिक वाढ ही सन 1981 ते 1991 या दशकातील 156.15 प्रतिशत एवढी आहे;तर सर्वात कमी दशवार्षिक वाढ ही सन 2011 ते 2021 या दशकामध्ये 106.15 प्रतिशत एवढी आहे.

3) तक्त्यात स्तंभ क्रमांक 5 मध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद यांच्या देखभालीखालील दर किलोमीटर रस्ते लांबी मागे मोटार वाहनांची संख्या दर्शविली आहे. सन 1971 मध्ये सामाजिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद यांच्या देखभालीखालील दर किलोमीटर रस्ते लांबी मागे मोटार वाहनांची संख्या केवळ 05 एवढी होती. त्यामध्ये सतत वाढ होऊन सन 2021 मध्ये ती 125 एवढी झाली. म्हणजे 1971 ते 2021 या पन्नास वर्षाच्या कालावधीत सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद यांच्या देखभालीखालील दर किलोमीटर रस्ते लांबी मागे मोटार वाहनांची संख्या निव्वळ 120 एवढी वाढली. याचा अर्थ सन 1971 ते 2021 या पन्नास वर्षाच्या कालावधीत दर किलोमीटर रस्ते लांबी मागे मोटार वाहनांची संख्या 25 पटीने वाढली.

4) तक्त्यात स्तंभ क्र. 06 मध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद यांच्या देखभालीखालील दर किलोमीटर रस्तेलांबी मागे वाहनांच्या संख्येतील दशवार्षिक वाढ दर्शविली आहे. सन 1971 ते सन 2021 या पन्नास वर्षाच्या कालावधीत महाराष्ट्रातील सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद यांच्या देखभालीखालील दर किलोमीटर रस्तेलांबी मागे मोटार वाहनांची झालेली दशवार्षिक वाढ ही 20 प्रतिशत ते 150 प्रतिशत या दरम्यान

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

झालेली आहे. ही दशवार्षिक सर्वाधिक वाढ सन 1981 ते 1991 या दशकात 150 प्रतिशत इतकी झाली आहे; तर सर्वात कमी दशवार्षिक वाढ ही सन 1971 ते 1981 या दशकात केवळ 20 प्रतिशत एवढी कमी झाली आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद यांच्या देखभालीखालील दर किलोमीटर रस्ते लांबी मागे मोटार वाहनांच्या दशवार्षिक वाढीत फार मोठे चढ उतार झालेले दिसून येतात.

**रस्ते अपघात, मृत व जखमी व्यक्तींची संख्या :**

महाराष्ट्र राज्यातील वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढून रस्ते वाहतुकीवरील भार वाढत आहे. त्यामुळे रस्ते दुरुस्तीचा खर्च वाढतो. रस्त्यावरील अपघातांची संख्या वाढते. रस्ते अपघातात मृत पावणाऱ्या व्यक्तींची संख्या वाढते. तसेच अपघातात जखमी व्यक्तींची संख्या देखील वाढते. त्यामुळे रस्ते अपघातामुळे मानवी जीवन आणि संपत्तीचे अमाप नुकसान होते. रस्ता सुरक्षा सप्ताहाचे ब्रीदवाक्य "अपघातांमुळे अश्रू आणि सुरक्षेमुळे हसू" हे होते. राज्यामध्ये रस्ता सुरक्षा विषयक विविध पथनाट्ये व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. 2022 मध्ये राज्यात प्रति दहा हजार वाहनांमध्ये झालेल्या अपघातांची संख्या आठ होती. त्यामुळे रस्ते सुरक्षेवर होणारा खर्च हा सुद्धा रस्ते वाहतूक विकासावरील महत्त्वाचा खर्च असतो. या खर्चाचा समावेश सुद्धा महाराष्ट्रातील रस्ते वाहतूक व्यवस्थेमध्ये करावा लागतो. रस्ते वाहतूक व्यवस्थेमध्ये हा खर्च किती महत्त्वाचा आहे हे आपल्याला रस्ते वाहतुकीतील अपघातांची संख्या, मृत व्यक्तींची संख्या व जखमी व्यक्तींची संख्या यांच्या आकडेवारीवरून लक्षात येतो. त्यासाठी तक्ता क्रमांक 05 मध्ये महाराष्ट्र राज्यातील रस्ते वाहतुकीतील अपघातांची संख्या, मृत व्यक्तींची संख्या व जखमी व्यक्तींची संख्या यांची आकडेवारी दर्शविली आहे.

**तक्ता क्र.05**

**महाराष्ट्रातील रस्ते अपघात, मृत व्यक्ती व जखमी व्यक्तींची संख्या: सन 2006-2022**

| अ. क्र. | वर्ष | अपघातांची संख्या | मृत व्यक्तींची संख्या | जखमी व्यक्तींची संख्या | मृत व जखमी व्यक्तींची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
| 1 | 2006 | 75779 | 11300 | 54006 | 65306 |
| 2 | 2007 | 76601 | 11804 | 52408 | 64212 |
| 3 | 2008 | 75527 | 12397 | 52780 | 65177 |
| 4 | 2009 | 71995 | 11396 | 47878 | 59274 |

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

| अ. क्र. | वर्ष | अपघातांची संख्या | मृत व्यक्तींची संख्या | जखमी व्यक्तींची संख्या | मृत व जखमी व्यक्तींची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
| 5 | 2010 | 69573 | 12287 | 46528 | 58815 |
| 6 | 2011 | 68438 | 13057 | 45616 | 58673 |
| 7 | 2012 | 66316 | 13333 | 43847 | 57180 |
| 8 | 2013 | 61890 | 12194 | 41106 | 53300 |
| 9 | 2014 | 61511 | 12691 | 39991 | 52682 |
| 10 | 2015 | 63805 | 13212 | 39606 | 52818 |
| 11 | 2016 | 39848 | 12883 | 35894 | 48777 |
| 12 | 2017 | 35853 | 12264 | 32128 | 44392 |
| 13 | 2018 | 35955 | 13084 | 31216 | 44300 |
| 14 | 2019 | 32925 | 12788 | 28628 | 41416 |
| 15 | 2020 | 24971 | 11569 | 19914 | 31483 |
| 16 | 2021 | 29477 | 13528 | 23071 | 36599 |
| 17 | 2022 | 33069 | 14883 | 27218 | 42101 |
| | **एकूण** | **923533** | **214670** | **661835** | **876505** |

संदर्भ :- महाराष्ट्राची आर्थिक पाहणी 2011-12 ते 2022-23

तक्ता क्रमांक 05 वरून पुढील महत्त्वपूर्ण निष्कर्ष स्पष्ट होतात.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

1) सन 2006 मध्ये महाराष्ट्रातील रस्ते अपघातांची संख्या 75,779 एवढी होती. त्यामध्ये सतत घट होऊन 2022 मध्ये ती 33,069 एवढी कमी झाली आहे. हे रस्ते अपघातांची संख्या कमी होण्याचे कारण रस्त्यामध्ये होणारी दर्जा उन्नती व रस्ते अपघात टाळण्यासाठी सरकारने राबवलेले रस्ता सुरक्षा अभियान ही दिसून येतात.

2) सन 2006 मध्ये रस्ते अपघातातील मृत व्यक्तींची संख्या 11300 एवढी होती. त्यामध्ये वाढ होऊन ती 2022 मध्ये 14883 एवढी झाली. म्हणजे महाराष्ट्रातील रस्ते वाहतुकीतील अपघातांची संख्या 50% पेक्षा अधिक घटून सुद्धा अपघातातील मृत व्यक्तींची संख्या मात्र घटन्या ऐवजी वाढलेली आहे.

3) सन 2006 मध्ये महाराष्ट्रातील रस्ते अपघातात जखमी होणाऱ्या व्यक्तींची संख्या 54,006 एवढी होती. त्यामध्ये सतत घट होऊन ती 2022 मध्ये 27,218 एवढी झाली आहे. याचा अर्थ राज्यातील रस्ते अपघातांच्या संख्येतील घटी बरोबर रस्ते अपघातात जखमी होणाऱ्या व्यक्तींची संख्या सुद्धा घटत गेली आहे. म्हणजेच रस्ते अपघातांची संख्या व रस्ते अपघातात जखमी होणाऱ्या व्यक्तींची संख्या यामध्ये समसंबंध असल्याचे निदर्शनास येते.

4) महाराष्ट्रातील रस्ते अपघातात मृत व्यक्तींची संख्या व जखमी व्यक्तींची संख्या यांचा एकत्रित विचार केला असता 2006 मध्ये ही संख्या 65,306 एवढी होती. त्यामध्ये घट होऊन ती 2022 मध्ये 42,101 एवढी झाली आहे. म्हणजे 2022 मध्येही महाराष्ट्रातील 42,101 एवढ्या व्यक्तींना रस्ते अपघातांच्या समस्येला तोंड द्यावे लागत आहे.

5) सन 2006 ते सन 2022 या सतरा वर्षाच्या कालावधीत महाराष्ट्रात 9,23,533 अपघात झाले आहेत. त्यामध्ये 2,14,670 व्यक्ती मृत्युपावल्या आहेत व 6,61,835 व्यक्ती जखमी झाल्या आहेत. या कालावधीत महाराष्ट्रातील रस्ते अपघातात मृत पावलेल्या व्यक्तींची व जखमी व्यक्तींची संख्या एकत्रित पाहिली असता ती 8,76,505 एवढी प्रचंड आहे. म्हणजे या सतरा वर्षाच्या कालावधीत महाराष्ट्रातील 8,76,505 व्यक्तींना शारीरिक व आर्थिक नुकसान झाले आहे. तसेच दवाखान्याचा प्रचंड खर्च करावा लागलेला आहे. त्यापैकी 2,14, 670 व्यक्तींचे तर प्राण जाऊन त्यांच्या कुटुंबातील किमान दोन पिढ्या प्रभावीत होउ शकतात. ज्यांचे प्राण गेलेत त्यांचे आर्थिक नुकसान पैशांमध्ये तर व्यक्त करणे अशक्यच आहे.

**इतर निष्कर्ष :**

1) सन 1966 ते 1976 या दहा वर्षाच्या कालावधीत महाराष्ट्रातील दर 100 चौरस किलोमीटर भौगोलिक क्षेत्रामागे असलेली रस्त्यांची लांबी (किलोमीटर) ही भारतातील दर 100 चौरस किलोमीटर भौगोलिक क्षेत्रमागे असलेल्या रस्त्यांच्या लांबीपेक्षा कमी होती. परंतु सन 1981 ते 2001 या वीस वर्षाच्या कालावधीत महाराष्ट्रातील दर 100 चौरस किलोमीटर भौगोलिक क्षेत्रामागे असलेली रस्त्यांची लांबी (किलोमीटर) ही भारतातील दर 100 चौरस किलोमीटर भौगोलिक क्षेत्रमागे असलेल्या रस्त्यांच्या लांबीपेक्षा अधिक आहे.

2) सन 1966 ते सन 2001 या 35 वर्षाच्या कालावधीत महाराष्ट्रातील दर लाख लोकसंख्येमागे असलेली मोटार

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

वाहनांची संख्या ही भारतातील दर लाख लोकसंख्येमागे असलेल्या मोटार वाहनांच्या संख्येपेक्षा नेहमीच जास्त असल्याचे दिसून आले.

3) इतर शासकीय विभाग व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या देखभालीखालील रस्त्यांची लांबी ही सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदांच्या देखभालीखालील रस्त्यांच्या लांबीपेक्षा नेहमीच खूप कमी राहिली आहे. उदाहरणार्थ मार्च, 2008 अखेर इतर यंत्रणांच्या देखभालीखालील रस्त्यांची लांबी ही (वन विभाग 11,489 किलोमीटर, एम.आय.डी.सी. 2613 किलोमीटर, सिडको 838 किलोमीटर, महानगरपालिका 16,374 किलोमीटर, नगरपरिषदा, नगर पंचायती व कटक मंडळे 14,986 किलोमीटर अशी) एकूण 46,300 किलोमीटर एवढी आहे. याच वेळी महाराष्ट्रातील सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदांच्या देखभालीखालील रस्त्यांची लांबी 2,35,595 किलोमीटर एवढी होती. या इतर यंत्रणांच्या देखभालीखालील रस्त्यांच्या लांबीचे सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदांच्या देखभालीखाली रस्त्यांच्या लांबीशी प्रतिशत प्रमाण काढले असता ते केवळ 19.65 प्रतिशत एवढे कमी आहे. म्हणजे ते 20 टक्के पेक्षाही कमी आहे.

4) सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद यांच्या देखभालीखालील विभागनिहाय रस्त्यांची लांबी पाहिली असता असे दिसून येते की, पुणे विभागातील एकूण रस्त्यांची लांबी 72,228 किलोमीटर असून अमरावती विभागातील एकूण रस्त्यांची लांबी ही 29,015 किलोमीटर एवढी आहे. म्हणजे महाराष्ट्रातील विभागनिहाय एकूण रस्त्यांच्या लांबीतील तफावत ( 72,228 - 29,015 ) 43,213 किलोमीटर एवढी मोठी आहे. याचा अर्थ महाराष्ट्रातील रस्त्यांच्या लांबीतील विभागनिहाय तफावत ही विभागात उपलब्ध रस्त्यांच्या दुपटीपेक्षाही अधिक आहे.

5) बृहन्मुंबई वगळता महाराष्ट्रातील सामाजिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद यांच्या देखभालीखालील एकूण रस्त्यांच्या लांबीतील तफावत (अहमदनगर 20,939 किलोमीटर - वाशिम 3092 किलोमीटर) 17847 किलोमीटर एवढी आहे. याचा अर्थ महाराष्ट्रातील रस्त्यांच्या लांबीतील जिल्हानिहाय तफावत जिल्ह्यात उपलब्ध रस्त्यांच्या पाच पटी पेक्षाही अधिक आहे.

**उपाययोजना:**

1) राज्यातील प्रमुख राज्य महामार्गाचे प्रमाण एकूण रस्त्यांच्या प्रमाणाशी एक टक्के एवढे सुद्धा नाही. त्यामुळे राज्यातील प्रमुख राज्य महामार्गाची लांबी वाढवावी.
2) राज्यातील राष्ट्रीय महामार्गाचे प्रमाण एकूण रस्त्यांच्या प्रमाणाशी केवळ 5.67 टक्के एवढेच आहे. त्यामुळे राज्यातील राष्ट्रीय महामार्गाची लांबी वाढवावी.
3) राज्यातील राज्य महामार्गाच्या लांबीचे राज्यातील एकूण रस्त्यांच्या लांबीशी असलेले प्रतिशत प्रमाण दहा टक्के पेक्षाही कमी आहे. त्यामुळे राज्यातील राज्य महामार्गाची लांबी वाढवावी.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

4) राज्यातील रस्ते अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी रस्ते वाहतुकीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा.
5) विशेषत: ग्रामीण भागात दोन रस्ते एकत्र येतात अशा ठिकाणी वाहन चालकांना दुसऱ्या रस्त्यावरून येणारे वाहन लवकर दिसतील अशा पद्धतीने व्यवस्था करावी.
6) वाहतूक व्यवस्थेवरील विविध करांचा बोजा कमी करावा.
7) पावसाळ्यात पक्क्या रस्त्यांच्या अभावी अनेक गावांचा संपर्क तुटतो. त्यामुळे कच्चे रस्ते निर्माण करण्याऐवजी केवळ पक्के रस्तेच निर्माण करावेत. 'गाव तेथे पक्का रस्ता' हा कार्यक्रम प्रभावीपणे राबवावा.
8) रस्ते निर्मितीसाठी प्रचंड प्रमाणात खर्च करावा लागत असला तरी रस्ते वाहतुकीपासून मिळणारे उत्पन्न व रस्ते वाहतुकीपासून होणारे आर्थिक व सामाजिक लाभ दीर्घकाळपर्यंत मिळत असतात. त्यामुळे रस्ते निर्मितीसाठी निधीची कमतरता जाणवणार नाही याची दक्षता घ्यावी.
9) राज्यातील दिवसेंदिवस वाहनांच्या संख्येत होणारी प्रचंड वाढ यामुळे रस्ते वाहतुकीची कोंडी होताना दिसते. वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून येणाऱ्या काळात वाहनांच्या विक्री वाढिशी राज्यातील रस्ते लांबी आणि रुंदीचा संबंध जोडावा.
10) वाहनातून बाहेर पडणाऱ्या धुरामुळे वायू प्रदूषण व वाहनांच्या आवाजामुळे ध्वनी प्रदूषण वाढत आहे. हे वायू प्रदूषण व ध्वनी प्रदूषण टाळण्यासाठी केवळ इलेक्ट्रिक वर चालणाऱ्या गाड्या निर्मितीसाठीच परवानगी द्यावी.
11) रस्त्यांच्या बाजूला उर्वरित जागेत सौर ऊर्जा निर्माण करणारे संच उभारून वाहनांसाठी लागणारी विद्युत निर्मिती करावी व त्या माध्यमातून रस्त्यापासून मिळणारे उत्पन्न वाढवावे.
12) रस्त्यांच्या बाजूला उर्वरित जागेत मान्यता दिलेले पेट्रोल पंप व उपहार ग्रहापासून मिळणारे उत्पन्न देखील रस्त्यांच्या उत्पन्नात मिळवावे.
13) रस्ते निर्मिती केल्यानंतर रस्त्यांच्या बाजूच्या जमिनी किंवा मालमत्तेच्या किमती वाढल्यामुळे सरकारी महसुलात जी वाढ होते ते उत्पन्न सुद्धा रस्ते निर्मितीच्या उत्पन्नामध्ये मिळवावे.
14) रस्ते निर्मितीमुळे वाढलेली वाहनांची विक्री व इंधनाची विक्री यामुळे सरकारी महसुलात होणारी वाढ ही सुद्धा रस्ते उत्पन्नामध्ये मिळवावी.

विभागनिहाय व जिल्हा निहाय एकूण रस्त्यांच्या लांबीतील तफावत दूर करण्यात यावी.

Vol. 9, Special Issue 11, November, 2023
ISSN: 2454-8499, Impact Factor: 2.89(GIF), 0.679(IIFS)

**संदर्भ सूची :**

1) अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, 'महाराष्ट्राची आर्थिक पाहणी' - 2001-02, पान क्रमांक 70, 71.
2) अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, 'महाराष्ट्राची आर्थिक पाहणी-2009-10. पान क्रमांक 128.
3) अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी - 2011-12 ते 2022-23.
4) भोसले के. एम. व के.बी. काटे, 'अर्थशास्त्र' फडके प्रकाशन कोल्हापूर, जून, 2006
5) माधव बिरादार, 'महाराष्ट्राची अर्थव्यवस्था' विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद, एप्रिल, 2018
6) Planning Commission Government of India, Maharashtra Development Report-2007.
7) संतोष दास्ताने, महाराष्ट्रातील वाहतूक व्यवस्थेचे अर्थशास्त्र, अर्थसंवाद-2023 एप्रिल -मे -जून खंड - 47 अंक-1
8) सोळुंके आर. एस. 'महाराष्ट्राची अर्थव्यवस्था' कैलास पब्लिकेशन, औरंगपुरा, औरंगाबाद.
9) vishwakosh.marathi.gov.in
10) mr.m.Wikipedia.org
11) www.adda247.com




# INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISIPLINARY STUDIES

MONTHLY DOUBLE-BLIND PEER REVIEWED REFERRED OPEN ACCESS INTERNATIONAL JOURNAL

ISSN : 2454-8499 (online)


www.irjms.in


International Research Journal of Multidisciplinary Studies is Seeking Scholars. Those who are Interested in our Serving as our volunteer additional review board. If u are interested Please send us your biodata applicants must have decorate and significant publishing work.



Published by :

**IRJMS**

Sr. No. 397, Flat No. 7, 4, Sizan Society, Bhugaon,
Tal. Mulshi, Dist. Pune - 412115.
Website : www.irjms.in E-mail : irjms2015@gmail.com, irjms.in@gmail.com

Mobile No. : 9823131575, 9028311410, 9766264309.

Design & Printed by : Harshada Graphics, Pune-58. Mob. - 9371208731.